# ज्ञान प्रबोधिनी

(न्यास नोंदणी क्र. एफ-२५४/पुणे)

## वार्षिक वृत्त

दि.१ एप्रिल २०२१ ते ३१ मार्च २०२२



# विशेष अभिनंदन!!

## ज्ञान प्रबोधिनीतील विभाग व केंद्रांमधील सदस्यांचे विशेष यश व पुरस्कार




मातृमंदिर विश्वस्त संस्थेचा 'कार्यकर्ता गुणगौरव पुरस्कार'
स्वीकारताना महेंद्रभाई सेठिया



मातृमंदिर विश्वस्त संस्थेचा 'अध्यापकोत्तम पुरस्कार'
स्वीकारताना ओंकारदादा बाणाईत



द्वारकाताई वालगुडे मातृमंदिर विश्वस्त संस्थेचा
'धन्य राधामाता पुरस्कार' स्वीकारताना



शिक्षण मंडळ, कराड यांच्याद्वारे 'साने गुरुजी आदर्श शिक्षक पुरस्कार'
स्वीकारताना प्रशांतराव दिवेकर



प्रसाददादा चिक्षे रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई – सिटीच्या वतीने
देण्यात येणारा रोटरीभूषण पुरस्कार स्वीकारताना



'अन् पारिजातक हसला' या पुस्तकासाठी
'हरित पुस्तक पुरस्कार' स्वीकारताना शिवराजदादा पिंपुडे




प्राचार्य मिलिंदराव नाईक
लोकमत मीडिया
प्रा. लि. तर्फे
प्रशालेला मिळालेल्या
"School Icon of Pune"
पुरस्कारासह



नवनीत फाउंडेशन तर्फे
परिमलाताई पांडे व
संगिनी नारी संघटने तर्फे
सुनीताताई भन्साळी यांचा सन्मान

# ज्ञान प्रबोधिनी

(न्यास नोंदणी क्र. एफ-२५४/पुणे)

# वार्षिक वृत्त

(सौर शके १९४३-४४)

दि.१ एप्रिल २०२१ ते ३१ मार्च २०२२



| | | |
|---|---|---|
| पत्ता | : | ज्ञान प्रबोधिनी भवन<br>५१०, सदाशिव पेठ,<br>पुणे ४११०३० |
| दूरभाष क्र. | : | (०२०) २४२०७००० |
| संकेत स्थळ | : | www.jnanaprabodhini.org |
| ई–मेल | : | contact@jnanaprabodhini.org |

## ज्ञान प्रबोधिनीचे सन्माननीय सदस्य

| | |
|---|---|
| डॉ. रघुनाथ माशेलकर | माजी महासंचालक, CSIR नवी दिल्ली |
| श्री. आण्णा हजारे | सामाजिक कार्यकर्ते |
| श्रीमती अनु आगा | माजी खासदार, उद्योजिका, सामाजिक कार्यकर्त्या |
| डॉ. जयंत नारळीकर | माजी संचालक, आयुका, पुणे |

## ज्ञान प्रबोधिनी, पुणे

### पदाधिकारी

१. डॉ. रघुनाथ माशेलकर (अध्यक्ष)
२. श्री. आण्णा हजारे (उपाध्यक्ष)
३. डॉ. विजय लक्ष्मण केळकर (उपाध्यक्ष)
४. श्री. श. बा./रवि पंडित (कार्याध्यक्ष)
५. वा. गिरीश श्री. बापट (संचालक)
६. श्री. वि. शं./सुभाष देशपांडे (कार्यवाह)
७. प्रा. विश्वनाथ ध. गुर्जर (सहकार्यवाह)

### कार्यकारी मंडळ

१. श्री. श. बा./रवि पंडित (कार्याध्यक्ष)
२. वा. गिरीश श्री. बापट (संचालक)
३. श्री. वि. शं./सुभाष देशपांडे (कार्यवाह)
४. प्रा. विश्वनाथ ध. गुर्जर (सहकार्यवाह)
५. श्री. रामकुमार राठी
६. श्री. मोहन चि. गुजराथी
७. वा. विवेक बा. कुलकर्णी
८. वा. सुधाताई कोठारी
९. श्री. महेश आठवले
१०. प्रा. महेन्द्र सेठिया
११. श्री. मनोज देवळेकर
१२. वा. अनघा लवळेकर
१३. सौ. सुवर्णा गोखले
१४. वा. मिलिंद नाईक

### संचालक नियुक्त सदस्य

१५. प्रा. प्रशांत दिवेकर
१६. श्री. आशुतोष बारमुख
१७. श्रीमती शर्मिष्ठा चिपळूणकर
१८. प्रा. मधुरा लुंकड
१९. श्री. नचिकेत नित्सुरे

### संस्थात्मक सदस्य

१. ज्ञान प्रबोधिनी संशोधन संस्था
२. ज्ञान प्रबोधिनी शिवप्रदेश
३. ज्ञान प्रबोधिनी सोलापूर
४. ज्ञान प्रबोधिनी आयुर्विज्ञान संस्था
५. ग्राम प्रबोधिनी, साळुंब्रे

(या न्यासांचे वृत्तांत स्वतंत्रपणे प्रसिद्ध केले जातात. त्यातील काही सारांश या वृत्तात दिले आहेत.)

### संलग्न सेक्शन 8 कंपन्या

१. ज्ञान प्रबोधिनी प्रशाला ॲल्युम्नाय फौंडेशन (JPPAF)
२. ACIC Jnana Prabodhini Innovation Foundation
३. ज्ञान प्रबोधिनी फौंडेशन, अमेरिका (JPF, USA)

### केंद्रे

#### मुख्य केंद्रे

१. पुणे
२. निगडी
३. सोलापूर
४. हराळी (उस्मानाबाद)

#### उपकेंद्रे

१. पुणे केंद्र : शिवापूर, वेल्हे, शिरवळ (जिल्हा सातारा)
२. निगडी केंद्र : साळुंब्रे

#### विस्तार केंद्रे

१. अंबाजोगाई विस्तार केंद्र (जिल्हा बीड)
२. डोंबिवली विस्तार केंद्र
३. बोरीवली विस्तार केंद्र

ज्ञान प्रबोधिनीच्या पुण्यातील विविध विभागांचे आणि विविध केंद्रांवर सन २०२१-२२ (सौर शके १९४३-४४) या वर्षात झालेल्या कामांचे वृत्त आपल्या हाती देताना आनंद होत आहे. या आधीच्या वर्षामध्ये करोनाच्या संकटाला तोंड देताना अनेक नित्य कामे स्थगित झाली होती, तर काही सेवा विभागांवर विलक्षण ताण वाढला होता. एकूणच शिक्षण क्षेत्राचे लवकर भरून न येणारे असे नुकसान झाले, अशा वार्ता चोहोकडून येत आहेत. त्या तुलनेत प्रबोधिनीच्या शाळांनी अगोदरच काळजी घेतल्यामुळे ऑनलाईन पद्धतीने वर्षभर शिक्षण चालू राहू शकले. प्रबोधिनीच्या पाचही शाळांचे शालान्त परीक्षेचे निर्णय त्यामुळेच समाधानकारक लागले आहेत, असे दिसून येते.

पुण्यात ज्ञान प्रबोधिनी प्रशालेमध्ये बुद्धिमान विद्यार्थ्यांच्या विविधांगी शिक्षणासाठी जे अनेक प्रयोग चालू आहेत, त्यामध्ये विशेष अभिरुची गट आता स्थिरावू लागले आहेत. चिनी व जर्मन भाषा शिकण्यापासून कृत्रिम बुद्धिमत्तेचा मागोवा विद्यार्थी आपापल्या आवडीनुसार घेत होते. शैक्षणिक सहलींबरोबर संस्कार कार्यक्रमांवर नेहमीप्रमाणे भर देण्यात आला. प्रबोधिनीचे संस्थापक कै. ती. आप्पासाहेब पेंडसे यांचे पुतणे श्री. अजितराव पेंडसे यांनी त्यांच्या आई-वडिलांच्या स्मरणार्थ प्रशालेत शालान्त परीक्षेत सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थी/ विद्यार्थिनीस दरवर्षी रु. ५० सहस्र पारितोषिक दिले जाईल, असा निधी प्रबोधिनीकडे यंदा सुपुर्द केला. प्रबोधिनीच्या शैक्षणिक प्रयोगांचा विस्तार महाराष्ट्रातील आणि देशातील अन्य शाळांमध्ये व्हावा यासाठी शैक्षणिक उपक्रम संशोधिका हा विभाग काम करतो. वृत्तान्त वर्षात ६०० हून अधिक शाळांमध्ये असे प्रशिक्षण वर्ग झाले, त्याचा लाभ सुमारे ५०० शिक्षक व ३०,००० विद्यार्थ्यांनी घेतला.

पुणे जिल्ह्याच्या वेल्हे तालुक्यातील ४६ गावांमध्ये 'विकास मित्र' प्रकल्पाद्वारे ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी जसे काम झाले, तसे कर्नाटक, तेलंगण व झारखंड येथील शाळांमध्ये उपक्रम झाले. पूर्वांचलातील आसाम, अरुणाचल प्रदेश आणि नागालँड येथील संस्थांशी प्रबोधिनीचा अनेक वर्षे संबंध आहे. त्यांच्याद्वारे वैज्ञानिक प्रयोगांच्या कार्यशाळा झाल्या. दूरस्थ पद्धतीने शिक्षक प्रशिक्षण जम्मू-काश्मिर राज्यातही शैक्षणिक साधन केंद्राने घेतले. कर्णबधीर मुलांसाठी विविध शैक्षणिक साधनांची निर्मिती हा विभाग करीत आहे. स्वातंत्र्यदिनानिमित्त अशा विद्यार्थ्यांनी पाठ्य पुस्तकातील प्रतिज्ञेचे सादरीकरण केले व त्याच्या चित्रफिती प्रबोधिनीकडे पाठविल्या. कुमारांसाठी गेली तीस वर्षे चालू असलेले छात्र प्रबोधन हे मासिक आता छापील स्वरूपात मर्यादित संख्येने व दृक्श्राव्य माध्यमातून अधिक संख्येपर्यंत पोहोचत आहे. कथा व कविता मोबाईलच्या माध्यमातून ऐकवून त्याद्वारे काही कृती उपक्रम करवून घेतले. ही ऐका-पाहा-वाचा-करा (ऐपावाक) योजना ४,१५० विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचू शकली, याचा आनंद होतो. छात्र प्रबोधनचे यूट्यूब चॅनल सुरू झाले आहे. तसेच एका वेबसाईटद्वारे छात्र प्रबोधनचे अंक व पुस्तके दूरस्थ मागवण्याची व्यवस्थाही झाली आहे.

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी चालणाऱ्या नेतृत्व संवर्धन केंद्राचे कामकाज काही प्रत्यक्ष तर काही दूरस्थ पद्धतीने चालू होते. या केंद्रातून पुढे विद्यार्थी-विद्यार्थिनी स्पर्धा परीक्षांना बसतात. वृतान्त वर्षात मृणाली जोशी, शुभम जाधव, पार्थ कश्यप आणि दिव्या गुंडे यांची प्रशासकीय सेवेसाठी निवड झाली, हे नमूद करण्यास आनंद वाटतो. स्पर्धा परीक्षा केंद्रामध्ये नव्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी माजी विद्यार्थी अधिकारी नेहमी येत असतात. आता अरुणाचल प्रदेशात या केंद्राची एक शाखा रोईंग येथे सुरू झाली आहे.

प्रज्ञा मानस संशोधिका या विभागाने 'युवा साथी' व 'संयम' या प्रकल्पांद्वारे विविध जिल्ह्यांमधील महाविद्यालयीन युवक-युवतींचे प्रशिक्षक म्हणून वर्ग घेतले. या विभागाच्या संस्थापिका आदरणीय वा. उषाताई खिरे आणि त्यांच्या शिष्या सौ. धनश्री सोवनी यांनी लिहिलेले 'Intelligence, Creativity and Giftedness' हे पुस्तक हिमालय पब्लिशिंग हाऊसने प्रकाशित केले. बुद्धिविषयक भारतीय आणि पाश्चिमात्य संकल्पनांचा तौलनिक अभ्यास या पुस्तकात मांडला आहे. संस्कृत संस्कृति संशोधिकेद्वारे पूर्वांचलातील इदू आणि आदि जनजातींच्या पारंपरिक आचार पद्धतींवर संशोधन करून एक चित्रपट्टिका तयार करण्यात आली. संस्कारविधींच्या माध्यमातून गेल्या वर्षभरात सुमारे ६,००० घरांपर्यंत प्रबोधिनी पोहोचली, यातील ३५ संस्कार कार्यक्रम परदेशातील भारतीय कुटुंबांमध्ये करण्यात झाले. या विभागांतर्गत जे सामाजिक शास्त्र अध्ययन केंद्र सुरू झाले आहे, त्यामध्ये श्री अरविंदांचे तत्त्वज्ञान व इस्लाम धर्माचा अभ्यास असेही उपक्रम नियमितपणे चालू होते.

ग्रामीण भागामध्ये पाणीटंचाईचा सामना करण्यासाठी विहीर खोदाई व बांधकाम हा उपक्रम गेल्या वर्षी तीन धनगर वस्त्यांवर पूर्ण झाला. पिण्याच्या पाण्याच्या साठवणुकीसाठी सोळा गावांमध्ये फेरो सिमेंटच्या टाक्यांचे बांधकाम करण्यात आले. महाबळेश्वर-पोलादपूर रस्त्यावर कासरूड गावामध्ये अतिवृष्टीमुळे झालेल्या हानीवर उपाय म्हणून 'सेव्ह इंडियन फार्मर्स' यांनी अमेरिकेत काही निधी गोळा केला होता. त्याद्वारे बांध-बंदिस्तीचे काम प्रबोधिनीने करवून घेतले. सौर ऊर्जेचा प्रसार करण्यासाठी ग्रामीण भागात वापरता येतील अशी तीन वॅट क्षमतेची छोटी पॅनेल्स् ग्रामीण युवक-युवतींना तयार करण्याचे प्रशिक्षण प्रबोधिनी देते. तांत्रिक कौशल्य प्रशिक्षणामध्ये शिवापूर येथे कातारी (turner) या व्यवसायाचे प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करण्यात आली. उद्योजकता विकास केंद्रातर्फे विविध Startups ना मार्गदर्शन

करण्यात येते. सोलापूर केंद्रातील आपल्या उद्योजकांनी विडी कामगार महिलांना आरोग्यदायी रोजगाराचा पर्याय म्हणून शोभिवंत कागदी पिशव्यांचा जो व्यवसाय दोन वर्षांपूर्वी सुरू केला, तो आता चांगला वाढत आहे.

ग्रामीण आरोग्याच्या संदर्भात शिरवळ येथे कमला मेहता नेत्र रुग्णालय कार्यरत आहे. गेल्या वर्षी तेथे ९०४ शस्त्रक्रिया झाल्या. वेल्हे व भोर तालुक्यांमध्ये ८० हून अधिक गावांमध्ये स्त्री-शक्ती प्रबोधनाचे काम चालू आहे. या विभागाने ग्रामीण महिलांसाठी 'आरोग्य सखी' हा प्रकल्प पूर्ण केला. राजगड-तोरणा परिसरातील ज्या कातकरी वस्त्या आहेत, त्यातील मुलांच्या शिक्षणासाठी भागातीलच काही युवती खटपट करीत आहेत. वेल्हे येथे महाविद्यालयीन युवतींसाठींच्या वसतिगृहाच्या बांधकामाची समाधानकारक प्रगती होऊ शकली. बचतगट व स्वयंरोजगारातून ग्रामीण महिलांना स्वावलंबी बनवण्याचे काम आता सुमारे ६,००० महिलांपर्यंत पोहोचले आहे.

शहरी भागातील मध्यमवयीन महिलांसाठी संवादिनी हा उपक्रम चालतो. त्यातील कार्यकर्त्या महाराष्ट्रातील विविध शाळांमध्ये जाऊन पौगंडावस्थेतील मुला-मुलींसाठी विविध मार्गदर्शक सत्रे घेत असतात. पुण्यातील पाच नागरी वस्त्यांमध्ये प्रबोधिनीचे जे काम चालते, त्यातून २० मुलींचे महाविद्यालयीन शिक्षण मार्गी लागले आहे. त्यांतील काहींना बांबूच्या वस्तू तयार करण्याचे व सोल्डरिंगचे कौशल्य शिकवून सोलर पॅनेल्स् तयार करण्याचे प्रशिक्षण देण्यात आले.

युवक आणि युवती विभागांचे काम वाढते आहे. पुणे शहराच्या विविध भागांमध्ये युवकांची १७ व युवतींची ४ दले चालू आहेत. सुमारे ७० मार्गदर्शक त्यासाठी स्वयंसेवी वृत्तीने काम करीत असतात. राष्ट्रीय वृत्तीची जोपासना आणि युवक-युवतींचे व्यक्तिमत्त्व विकसन या उद्देशाने ही दले चालवली जातात व त्यातूनच प्रबोधिनीचे कार्य पुढे सातत्याने चालवण्यासाठी कार्यकर्ते तयार होत असतात. विशेष निमित्ताने होणाऱ्या प्रतिज्ञाग्रहण समारंभांमध्ये भाग घेणाऱ्यांची संख्या वाढते आहे, ही समाधानाची गोष्ट आहे.

प्रबोधिनीच्या निगडी केंद्रामध्ये नवीन बांधकामाची भर गेल्या वर्षी पडली. या हर्षदराय रतिलाल कारिया कलाभवन इमारतीत विविध कला व क्रीडा यांची स्वतंत्र दालने सिद्ध करण्यात आली आहेत. पालक महासंघाने अनेक उपक्रमांमध्ये पुढाकार घेतला, ही मोठी समाधानाची गोष्ट आहे.

सोलापुरात 'चैतन्य भुवन' या नव्या वास्तूची उभारणी पूर्ण झाली. अनेक उपक्रमांपैकी तेथे मणिपुरातील विद्यार्थ्यांचे वसतिगृह सुरू झाले. त्यातील दहा जणांची पहिली तुकडी गेल्या वर्षी दाखल झाली. हराळी मध्ये शेतीपूरक असे जे उपक्रम चालतात, त्यामध्ये शेतीनिविष्ठा यांचा पुरवठा करणाऱ्या दुकानदारांसाठी एक प्रशिक्षण वर्ग घेण्यात आला. परिसरातील तोरंबा, हिप्परगा, करवंजी व शीतलनगर (धानुरी) या गावांमध्ये पूरक शिक्षणाच्या विकासिका चालू आहेत. ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी १० लमाण तांड्यांवर आनंदशाळा असा अभिनव प्रकल्प चांगला रुजतो आहे. ग्राम प्रबोधिनी न्यासाच्या अंतर्गत साळुंब्रे येथे जे विद्यालय चालते, त्यामध्ये एक सुसज्ज संगणक कक्ष उभारण्यात आला आहे. तेथील व्यवसाय प्रशिक्षण केंद्रामध्ये एअर कंडिशनर्स दुरुस्तीचे प्रशिक्षण देण्यात आले. सौर शक्तीचा परिचय अभ्यासक्रम चालवण्यासाठी साधन सामग्री उभारण्यात आली.

बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई येथे प्रबोधिनीचे विस्तार केंद्र चालते. तसेच डोंबिवली येथे गेली २०-२२ वर्षे प्रबोधिनीचे उपक्रम सातत्याने चालू आहेत. यामध्ये आता ठाणे, चिपळूण, बदलापूर, भाईंदर व शिरूर अशा संपर्क केंद्रांची भर पडली आहे. महाराष्ट्राबरोबरच कर्नाटक, मध्य प्रदेश, छत्तीसगड, अरुणाचल प्रदेश आणि जम्मू-काश्मिर या प्रांतांमध्ये प्रबोधिनीचे प्रासंगिक उपक्रम व प्रशिक्षण कार्यक्रम गेली काही वर्षे सुरू आहेत. तेथील स्थानिक नागरिकांचे गट बांधण्याचे काम गेल्या वर्षात चांगले झाले.

प्रबोधिनीच्या सुवर्ण महोत्सवाच्या निमित्ताने एकत्र आलेल्या माजी विद्यार्थ्यांनी ज्ञान प्रबोधिनी प्रशाला ॲल्युम्नाय फाऊंडेशन या नावाने एक Section 8 Company स्थापन केली. तिच्याद्वारे विशेष उद्दिष्ट गटांचे (SPGs) काम चालणार आहे. वृत्तान्त वर्षात अशा काही गटांचे अहवाल प्रकाशित झाले. अमेरिकेत शिकणाऱ्या अथवा स्थायिक झालेल्या माजी विद्यार्थी-विद्यार्थिनींनी एक ज्ञान प्रबोधिनी फौंडेशन तेथे नोंदविले. प्रबोधिनीच्या विविध उपक्रमांमध्ये हे माजी विद्यार्थी आवर्जून भाग घेऊ लागले आहेत व त्याच बरोबरीने स्थानिक लोक आणि संस्थांकडून आर्थिक निधी सुद्धा गोळा करू लागले आहेत. या दोन्ही फौंडेशनच्या गतवर्षातील कामांचा सारांश वृत्तात शेवटी दिला आहे. त्यांच्या वेबसाईटस् जिज्ञासूंनी आवर्जून पाहाव्यात.

वृत्तान्त वर्षात एकूण प्रबोधिनीची वाटचाल वेगाने झाली. विविध ठिकाणांहून प्रबोधिनीच्या वैशिष्ट्यांची आवृत्ती करण्यासाठी मागणी येत असते. त्यासाठी आगामी दहा वर्षांमध्ये व्यापक विस्ताराचे धोरण प्रबोधिनीने आखले आहे. सन २०२२ ते २०३२ या आगामी दहा वर्षांमध्ये प्रबोधिनीचे काम महाराष्ट्राच्या प्रत्येक महसुली विभागात व देशातील किमान सहा राज्यांमध्ये नियमितपणे कसे सुरू होईल, याचा आराखडा मांडणारा तिसरा भवितव्य लेख कार्यकर्त्यांनी एकत्रितपणे सहविचार करून तयार केला आहे. प्रबोधिनीच्या हीरक महोत्सवी वर्षात आणि भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षात पुढील वाढीची झेप घेण्यासाठी आपणा सर्वांचे सहकार्य असेच लाभत राहो, अशी विनंती आहे.

आपले,

| | |
|---|---|
| **गिरीश श्री. बापट** | **वि. शं./सुभाष देशपांडे** |
| **संचालक** | **कार्यवाह** |

# अंतरंग


❀ **मध्यवर्ती कार्यक्रम** ०६

❀ **ज्ञान प्रबोधिनी, पुणे केंद्र**

१. ज्ञान प्रबोधिनी प्रशाला ११
२. शैक्षणिक उपक्रम संशोधिका १४
३. शैक्षणिक साधन केंद्र १७
४. छात्र प्रबोधन १९
५. नेतृत्व संवर्धन केंद्र २१
६. स्पर्धा परीक्षा केंद्र २३
७. प्रज्ञा मानस संशोधिका २६
८. संस्कृत संस्कृति संशोधिका २९
९. सामाजिक शास्त्र अध्ययन केंद्र ३०
१०. ग्रामविकसन विभाग ३१
  ▶ कौशल्य प्रशिक्षण केंद्र, शिवापूर ३३
  ▶ कमला मेहता नेत्र रुग्णालय, शिरवळ ३४
११. जिजामाता दल ३४
१२. स्त्री-शक्ती प्रबोधन, ग्रामीण ३५
१३. संवादिनी (स्त्री-शक्ती प्रबोधन, शहरी) ३८
१४. नागरीवस्ती अभ्यासगट ४०
१५. युवक विभाग ४२
१६. युवती विभाग ४४
१७. उद्योजकता विकास केंद्र ४६

❀ **ज्ञान प्रबोधिनी, अन्य केंद्रे**

१८. ज्ञान प्रबोधिनी, निगडी केंद्र ४७
१९. ज्ञान प्रबोधिनी, सोलापूर केंद्र ५०
२०. ज्ञान प्रबोधिनी, हराळी केंद्र ५३
२१. ज्ञान प्रबोधिनी, साळुंब्रे उपकेंद्र ५६

❀ **विस्तार कार्य**

२२. अंबाजोगाई विस्तार केंद्र ५७
२३. डोंबिवली विस्तार केंद्र ५९
२४. महाराष्ट्रातील अन्य विस्तार कार्य
  ▶ ठाणे स्थायी संपर्क केंद्र ६१
  ▶ चिपळूण स्थायी संपर्क केंद्र ६२
  ▶ बदलापूर अस्थायी संपर्क केंद्र ६२
  ▶ शिरूर, औंध, पौड संवादिनी विस्तार ६३
  ▶ सोलापूर व भाईंदर संवादिनी विस्तार ६४
२५. महाराष्ट्राबाहेरील विस्तार कार्य ६५

❀ **संलग्न संस्था**

२६. ज्ञान प्रबोधिनी प्रशाला ॲल्युम्नाय फाऊंडेशन (JPPAF) ६७
२७. ज्ञान प्रबोधिनी फाऊंडेशन (JPF), अमेरिका ६८

❀ **सन्माननीय देणगीदार व CSR साहचर्य** ६९

## रूप पालटू देशाचे

ज्ञान प्रबोधिनीचे संथापक कै. वि. वि. तथा आप्पा पेंडसे यांच्या जन्मशताब्दी पासून त्यांचा जन्मदिन १७ ऑगस्ट ते निर्वाणदिन १९ ऑगस्ट याच्या आसपास त्यांचे स्मरण म्हणून 'रूप पालटू देशाचे' ही व्याख्यानमाला आयोजित केली जाते. यावर्षी याचे सातवे पुष्प गुंफले गेले. यावर्षीच्या व्याख्यानात 'समाजमाध्यमांचे बदलते स्वरूप' मांडण्यासाठी मा. आनंद आगाशे आले होते. त्यांनी पत्रकारिता या क्षेत्रात, तीस वर्षांपेक्षा अधिक काळ घेतलेल्या अनुभवातून या विषयावर संवाद स्वरूपात मांडणी केली. हा संवाद साधण्यासाठी आरंभ महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी श्री. सारंग दर्शने आले होते. माध्यमांमुळे होणारे सामाजिक बदल आणि सामाजिक बदलांचा माध्यमांवर होणारा परिणाम या दोन्ही बद्दलचा चित्तवेधक आढावा, तंत्रामधला आणि मूल्यव्यवस्थेतला बदल, अशा अनेक अंगांचे दर्शन घडवणाऱ्या गप्पांमधून विषयाची मांडणी झाली. संचालक वाच. गिरीशराव बापट यांनी सभेचा समारोप केला.

## यशवंत गाथा

ज्ञान प्रबोधिनीचे संस्थापक सदस्य आणि संस्कृत संस्कृति संशोधिकेचे माजी विभागप्रमुख मा. यशवंतराव लेले यांच्या वयाला ९० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने 'यशवंत गाथा' हा गौरव ग्रंथ प्रकाशित करण्यात आला. मा. यशवंतराव लेले यांचे कुटुंबीय, त्यांचे विद्यार्थी, नातेवाईक, त्यांचे प्रबोधिनीमधील सहकारी कार्यकर्ते, बाहेरील संस्थांमधील स्नेही-परिचित अशा विविध सदस्यांनी त्यांच्याविषयी लिहिलेले लेख या ग्रंथात समाविष्ट करण्यात आले आहेत. त्यातून मा. यशवंतराव यांचा संपूर्ण जीवनपट उलगडला गेला आहे.

## युवती संघटन भगिनी निवेदिता स्मृती कार्यक्रम

युवतींसाठी एक आदर्श असलेल्या भगिनी निवेदिता यांच्या स्मृतिदिन व जयंती यादरम्यान त्यांच्यासंबंधी अभ्यास सुरू व्हावा, वाढावा यासाठी दि. १३ ते २८ ऑक्टो. या कालावधीत विविध केंद्रांवरील युवतींद्वारे चार प्रकारचे कार्यक्रम झाले.

**वाचन बैठक :** युवती-महिलांना निवेदितांचे चरित्र, त्यांचे विचार व प्रत्यक्ष लेखन माहिती व्हावे यासाठी योजलेली बैठक. एकूण १६ दिवस दैनंदिन वाचन व चर्चा झाली. संक्षिप्त चरित्र, निवेदितांचा स्वातंत्र्यलढा सहभाग, कला, त्यांचे स्नेहसंबंध, मूल्यविचार, स्त्रीशिक्षण व संघटना, या विषयांवर प्रत्येकी दोन आणि त्यांचे शिक्षणविषयक विचार यासंबंधी तीन सत्रे झाली. कै. आप्पांनी लिहिलेल्या निवेदिता चरित्रातील शेवटच्या प्रकरणावर दोन सत्रांमध्ये चर्चा घेतली. सात केंद्रांमधून एकूण ६६ व रोज किमान २५ युवती सहभागी झाल्या.

**सामूहिक पद्यगायन :** भगिनी निवेदिता यांच्या जयंतीला म्हणजे दि. २८ ऑक्टो. रोजी एका वेळी प्रबोधिनीच्या सगळ्या केंद्रांवर शालेय, महाविद्यालयीन व प्रौढ युवतींनी 'निवेदितांचे स्वप्न जयस्वी' हे पद्य गायले. यानिमित्त सर्व केंद्रांच्या प्रतिनिधींना आधी दूरस्थ पद्धतीने पद्य शिकवले आणि अर्थाबद्दलची चर्चा केली. सहा केंद्रांवर मिळून सुमारे ३५० युवती पद्यगायनात सहभागी झाल्या होत्या.

**चरित्रकथन :** प्रबोधिनीच्या वेगवेगळ्या केंद्रांवर भगिनी निवेदिता पोहोचाव्यात यासाठी चरित्र कथन व्हावे असे ठरवले. त्यानुसार प्रत्यक्ष व दूरस्थ अशा दोन्ही माध्यमातून आठ ठिकाणी चरित्रकथन झाले. यामध्ये इंदोर येथील संपर्कातल्या युवती गटासमोरही त्यांची गोष्ट गटातीलच युवतींनी सादर केली हे विशेष. विविध प्रशालेय युवती, महाविद्यालयीन युवती, प्रौढ गट, संवादिनी विस्तार गट अशा गटांमध्ये सात युवतींनी सुमारे २७५ युवतींपर्यंत चरित्र पोचवले.

**'कर्मयोगिनी निवेदिता' प्रश्नमंजुषा स्पर्धा :** दि. २८ ऑक्टो. रोजी 'कर्मयोगिनी निवेदिता' या प्रश्नमंजुषेचे आयोजन करण्यात आले होते.

## संयुक्त माजी विद्यार्थी मेळावा

ज्ञान प्रबोधिनी प्रशाला अल्युम्नाय फौंडेशन आणि ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालय स्नातक संघाचा संयुक्त माजी विद्यार्थी मेळावा दि. १९ डिसेंबर २१ रोजी निगडी केंद्रात झाला. या संयुक्त मेळाव्याचा उद्देश दोन्ही ठिकाणच्या माजी विद्यार्थी गटांमध्ये संपर्क आणि समन्वय निर्माण करणे आणि एकत्रितपणे प्रबोधिनीच्या विविध उपक्रमांमध्ये मदत करण्यासाठी विविध कल्पनांवर चर्चा करणे असा होता. मेळाव्यात कला विशेष उद्दिष्ट गटाने ''नांदी'' हा कार्यक्रम सादर केला. सुप्रसिद्ध कीर्तनकार श्री. चारुदत्तबुवा आफळे याचे 'सूत्रधार' होते. नाट्यसंगीतांचा १४० वर्षांचा इतिहास सांगत, त्यांनी प्रेक्षकांना खिळवून ठेवले. 'शाकुंतल', 'सौभद्र', 'कालिदास' आणि 'स्वरसम्राज्ञी' अशा प्रसिद्ध नाट्यसंगीतातील 'नांदी' यावेळी सादर झाल्या.

सभेत निगडी केंद्राचे प्रमुख श्री. मनोजराव देवळेकर यांनी केंद्राचा आत्तापर्यंतचा प्रवास आणि केंद्राच्या आगामी सुवर्ण महोत्सवात कै.

वामनराव अभ्यंकर तथा भाऊ यांच्या स्मृतीस अभिवादन करण्याविषयी संबोधन केले. वाच. विवेकराव कुलकर्णी यांनी दोन्ही केंद्रांवरील माजी विद्यार्थ्यांमधील networking चे महत्त्व अधोरेखित करत, या शक्तीचा उपयोग समाजाचे प्रश्न सोडवण्यासाठी करावा, असे आवाहन केले. यानंतर ज्ञान प्रबोधिनी प्रशाला ॲल्युम्नाय फौंडेशनच्या Connect या नियतकालिकाचे प्रकाशन झाले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे श्री. अतुलचंद्र कुलकर्णी यांनी सर्वांनी एकत्र येण्याची गरज अधोरेखित करत, स्वार्थापलीकडे विचार करण्याचे आणि भव्य उद्देशांसाठी एकत्र येण्याचे आवाहन केले. संचालक वाच. गिरीशराव बापट यांनी त्यांच्या मार्गदर्शनात कै. भाऊ यांचे सर्व विद्यार्थ्यांनी भगीरथाप्रमाणे परिश्रमी आणि कणखर होण्याचे स्वप्न आणि कै. डॉ. आप्पा पेंडसे यांची 'विद्याव्रतींनी' समाजाच्या विकासासाठी एकत्र येण्याची दृष्टी, याबद्दल सांगितले. आपण सर्वजण असे विद्याव्रती घडवणे हेच उद्दिष्ट असलेल्या संस्थेचे सदस्य आहोत, असेही त्यांनी मांडले.

## पद्मश्री निवेदितादीदी भिडे यांची प्रबोधिनी भेट

विवेकानंद केंद्राच्या राष्ट्रीय उपाध्यक्षा पद्मश्री श्रीमती निवेदितादीदी भिडे आणि कार्यवाह श्री. भानुदासजी यांनी दि. ९ मार्च रोजी ज्ञान प्रबोधिनीला सदिच्छा भेट दिली. त्यांच्यासोबत केंद्राचे कार्यकर्ते श्री. किरण कीर्तने (महाराष्ट्र प्रांत, संचालक), श्रीमती सुजाता दळवी (महाराष्ट्र प्रांत, संघटक) व श्री. जयंत कुलकर्णी (पुणे नगर, संचालक) हे देखील उपस्थित होते. ज्ञान प्रबोधिनीच्या विविध विभागातील कार्यकर्त्यांचा त्यांनी परिचय करून घेतला. नागरीवस्ती अभ्यासगटाचे काम, वेल्हे भागात कातकरी समाजासोबत चालू असलेले काम, प्रबोधिनीतील कार्यकर्त्यांसाठी होणारे समूहगुणविकसन प्रशिक्षण, युवक व युवती विभागाचे काम, सीमावर्ती राज्यांमध्ये चालणारे काम याविषयी अधिकची चर्चा झाली. विवेकानंद केंद्राचे आगामी काळातील कार्यक्रम, विविध जनजातींसोबतचे काम, अंदमान निकोबार द्वीपसमूहांमध्ये सध्या चालू असलेले काम याबाबत निवेदितादीदींनी सर्वांना माहिती दिली.

## प्राध्यापक इघोसा इ. ओसाघे यांची प्रबोधिनीला भेट

भारत सरकारचे पाहुणे म्हणून भारत दौऱ्यावर आलेले नायजेरियाचे प्राध्यापक इघोसा इ. ओसाघे यांनी दि. १५ मार्च रोजी प्रबोधिनीला भेट दिली. भारतीय संस्कृती आणि सामाजिक संस्था समजून घेणे या उद्देशाने त्यांचा हा भारत दौरा होता. केंद्र शासनाच्या Indian Council for Cultural Relations (ICCR) तर्फे त्यांना प्रबोधिनीला भेट देण्याबाबत सुचवले गेले होते. त्यांच्यासोबत त्यांच्या पत्नी डॉ. व्हेरॉनिका ओसाघे व महाराष्ट्र प्रमुख डॉ. निशीबाला उपस्थित होत्या. पाहुण्यांसमोर प्रबोधिनीच्या कामाविषयी निवडक सादरीकरणे झाली. प्रज्ञावंत विद्यार्थ्यांसाठी होणारे काम, संत्रिकेचे भारतीय संस्कृतीबद्दलचे काम, प्रज्ञा मानस संशोधिकेत होणारे संशोधन, महिला बचतगट, सौर पटल, पाणलोट क्षेत्र विकासाचे काम याबद्दल कार्यकर्त्यांनी मांडणी केली. प्रा. इघोसा यांनी कामाबाबत समाधान व्यक्त केले. भारतीय संस्कृतीचे रक्षण तसेच बचत गटांविषयीच्या कामाचा त्यांनी विशेष उल्लेख केला. ज्ञान प्रबोधिनीचे संचालक वाच. गिरीशराव बापट यांनी कार्यक्रमाचा समारोप केला.

## चिपळूण पूर मदतकार्य

चिपळूण मधील भीषण पूरस्थितीचा अंदाज आल्यावर पहिल्या फेरीत काही जण स्वच्छतेचे सामान घेऊन जाण्यासाठी तयार झाले. मदतीसाठी केलेल्या आवाहनाला धान्य व आर्थिक स्वरूपातून चांगला प्रतिसाद मिळाला. २५ युवक, १५ युवती व १० पालक यांनी आलेल्या साहित्याचे वर्गीकरण केले. त्याचे छोटे-छोटे संच बनवून झाले. पहिल्या फेरीत निगडीमधून अकरा सदस्य साहित्य घेऊन चिपळूणला गेले. चिपळूण शहर व आजूबाजूच्या एकोणीस भागात धान्य, कपडे, अंथरूण-पांघरूण, औषधे, स्वच्छतेचे साहित्य साधारण १५०० कुटुंबांपर्यंत पोचवले. प्रत्यक्ष कामामध्ये प्रामुख्याने घरांची स्वच्छता, भागातले सर्वेक्षण, गृहभेटी, संपर्क इ. कामे झाली. आठ युवकांच्या गटाने चिपळूणला सहा वर्षापर्यंतच्या मुलामुलींसाठी असलेल्या अनाथालयात स्वच्छतेचे काम केले. यात प्रामुख्याने साचलेला गाळ काढण्याचे काम केले. तसेच चार दवाखाने, पाच घरे, एक भोजनालय व भारतीय समाजसेवा केंद्र आणि सार्वजनिक रस्ता या सर्व ठिकाणी साठलेला गाळ काढण्यात आला. निगडी केंद्रातून आठ व पुणे केंद्रातून दोन अशा दहा युवती चिपळूण मध्ये काही वेगळ्या प्रकारचे मदतकार्य करायला गेल्या होत्या. महिलांचे कपडे आणि sanitary pads चे वाटप तसेच प्रबोधिनीच्या स्थानिक कार्यकर्त्यांना सदिच्छा भेट असा उद्देश या गटाचा होता. या मदतकार्यात चिपळूण संपर्क केंद्रातील १७ सदस्य, पुणे-निगडीतील २१ युवक, १० युवती, तीन पालक आणि दोन कार्यकर्ते असे ५३ जण उत्स्फूर्तपणे सहभागी झाले. ''दवाखान्यांची वेळेत झालेली स्वच्छता, वैद्यकीय उपकरणे, प्रथमोपचाराचे साहित्य वाटप, स्वतः चारचाकी चालवत मदतीला आलेल्या युवती...'' हे सगळे नेहमी लक्षात राहील, अशी भावना चिपळूण केंद्राच्या कार्यकर्त्यांनी व्यक्त केली.

## कोविड काळात मदतकार्य

**युवक विभाग :** गणेश कला क्रीडा मंच येथे पुणे महानगरपालिका व सकाळ रिलीफ फंड यांच्या वतीने सुरू झालेल्या कोविड रुग्णालय केंद्रामध्ये २५ स्वयंसेवकांनी काम केले. रुग्णांची ॲडमिशनची व्यवस्था, रुग्णालय व्यवस्थापनाच्या संगणकीय प्रणालीचे इंस्टॉलेशन व प्रशिक्षण, रुग्णांची संख्या व स्थिती यांच्यासाठी dashboard बनविणे, केंद्राचा स्वागतकक्ष सांभाळणे, नातेवाईकांशी बोलणे इ. कामे युवकांनी केली. या दरम्यान तीन आठवडे रुग्णालयातील खाटा, ऑक्सिजन, व्हेंटीलेटर यांची उपलब्धता फोन वरून शोधण्याचे काम सुमारे १०० युवक आणि इतर गटातील सुमारे ४० जणांनी केले. दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाच्या दोन लसीकरण केंद्रांमध्ये स्वयंसेवक म्हणून ३० जणांनी सहभाग घेतला.

**स्त्री-शक्ती प्रबोधन, ग्रामीण :** दुर्गम भागामधील एकल महिला, ज्येष्ठ नागरिक, कर्त्या व्यक्तीच्या कामावर परिणाम झालेली कुटुंबे शोधून ज्यांना शिधा देण्याची गरज आहे असे व ज्यांच्या मुलांना पुढील वर्षी शिकण्यासाठी काही मदतीची आवश्यकता आहे अशांच्या माहितीचे संकलन केले. आत्तापर्यंत ५२२ कुटुंबांना शिधा देण्याचे काम पूर्ण झाले आहे.

**निगडी केंद्र :** सेवावाहिनी उपक्रमांतर्गत डॉ. अमित म्हेत्रे व डॉ. पराग पाटील यांनी रुग्णांना २४ तास फोनवर वैद्यकीय सेवा दिली. वैद्यकीय सेवा, योग प्राणायाम, फिजिओथेरपीचे वर्ग, मानसिक स्वास्थ्यासंदर्भात मार्गदर्शन, Home Sanitization, रक्ताचा / प्लाझ्माचा पुरवठा, घरपोच मोफत जेवणाचा डबा, Antigen, RT-PCR Testing, वैद्यकीय तज्ज्ञांची व्याख्याने या माध्यमांतून निगडी, रावेत, किवळे, चिंचवड, यमुना नगर या भागांमध्ये १५०० हून अधिक लोकांना सहकार्य केले. तसेच हराळी गावातील १६० लोकांना टेलिमेडिसिनद्वारे मार्गदर्शन करण्यात आले. ३५ डॉक्टर्स, ११ वैद्यकीय समन्वयक, १५ Helpdesk व कार्यालयीन सदस्य, १० डबे बनविणारे सदस्य, २१ संघटन समिती सदस्य अशा विविध प्रकारच्या ६६ जणांच्या मदतीने ही कामे झाली.

**सोलापूर केंद्र :** युवक विभागाने दि. १ मे रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. यात ३६ जणांनी रक्तदान केले. श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालयातील रक्तपेढीने रक्त तपासणी व संकलन केले. त्याशिवाय कोविडमुळे ज्या बालकांचे मातृ-पितृ छत्र हरपले आहे, अशा ३० बालकांना आवश्यक ते शैक्षणिक साहित्य देण्यात आले.

**हराळी केंद्र :** हराळी आणि करवंजी गावांमध्ये लसीकरणाविषयी जनजागृती आणि तयार झालेल्या लोकांसाठी वाहनाची सोय करण्यात आली. कार्यकर्त्यांनी गावांमध्ये घरोघरी जाऊन लोकांना या आजाराची माहिती दिली. केंद्रावर विलगीकरण कक्षाची परवानगी मिळाल्यावर २५ जणांची सोय तिथे करण्यात आली. निगडी केंद्राच्या मदतीने १५ ऑक्सिजन सिलेंडरची उपलब्धता झाली. त्यानुसार लोहारा आणि सास्तूर येथील ग्रामीण रुग्णालयांना सहा सिलेंडर उपलब्ध करून देण्यात आले.

**ज्ञान प्रबोधिनी फौंडेशन, अमेरिका :** फौंडेशनने दिलेल्या देणगीतून चिपळूण येथील एका रुग्णालयात BiPap - 40 Ventilator देण्यात आले. अन्य परदेशी संस्थांच्या मदतीतून चिपळूण येथील रुग्णालयात उच्च दर्जाचे ऑक्सिजन कॉन्संट्रेटर देण्यात आले.
तसेच दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात पाच उच्च क्षमतेची ईसीजी उपकरणे देण्यात आली.

**अंबाजोगाई विस्तार केंद्र :** लोखंडी सावरगावमधील दोन्ही रुग्णालयात दोन BiPap - 40 Ventilator (Philips) तसेच उच्च दर्जाची पाच ऑक्सिजन संयंत्रे देण्यात आली. तीन BiPap व्हेंटिलेटर आणि म्युकर मायकोसिसच्या शस्त्रक्रियेसाठीचे Asipirator ८० LPMA VPA २०५ हे यंत्र स्वामी रामानंदतीर्थ रुग्णालयास ज्ञान प्रबोधिनी फौंडेशन, अमेरिका यांच्या अर्थसाहाय्यातून दिले. अंबाजोगाईतील वीस मनोरुग्णांसाठी, तसेच इतर रुग्ण व नातेवाईकांसाठी अन्नछत्र चालवून ४५० ते ५०० जणांसाठी भोजन व्यवस्था केली. स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करणारे बांधव व मेडिकल कॉलेजमधील शव व्यवस्थापन करणारे बांधव यांना आर्थिक व किराणा सामानाची मदत केली.

### श्रद्धांजली

१. ज्ञान प्रबोधिनी प्रशालेच्या माजी उपप्राचार्या **प्रा. सुप्रियाताई दर्प** यांचे दि. १७ जून २०२१ रोजी कर्करोगाच्या दीर्घ आजारानंतर निधन झाले. इंग्रजीच्या उत्तम अध्यापिका, विद्यार्थीप्रिय प्रयोगशील शिक्षिका, छात्र प्रबोधनच्या इंग्रजी आवृत्तीसाठी मोलाची मदत करणाऱ्या अनुवादक, संपादक, मार्गदर्शक म्हणून त्या सर्वांना परिचित होत्या. सुप्रियाताईंना भावपूर्ण श्रद्धांजली.

२. ज्ञान प्रबोधिनीचे ज्येष्ठ मार्गदर्शक शिक्षणतज्ज्ञ **प्रा. डॉ. प्रभाकर लक्ष्मण गावडे** यांचे दि. २ ऑगस्ट २०२१ रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. असंख्य विद्यार्थ्यांना घडवणारे आ. गावडे सर ज्ञान प्रबोधिनीच्या कार्यकारिणीवर २४ वर्षे कार्यरत होते. १९९३ ते २००३ या कालावधीत त्यांनी उपकार्याध्यक्ष आणि २००३ ते २०१७ कार्याध्यक्ष या पदावर राहून मार्गदर्शन केले. प्रबोधिनीत होणाऱ्या सर्व गोष्टींची आस्था आणि कौतुक असणाऱ्या गावडे सरांना भावपूर्ण श्रद्धांजली.

३. ज्ञान प्रबोधिनीच्या संस्थापक सदस्या व ज्येष्ठ कार्यकर्त्या **डॉ. पुष्पाताई आगाशे** यांचे दि. २७ सप्टेंबर २०२१ रोजी दीर्घ आजाराने पुण्यात निधन झाले. अमेरिकेत त्यांनी गणितामध्ये पीएचडी प्राप्त केली होती व तेथील विद्यापीठात त्या अध्यापन करीत होत्या. पुण्यातील कन्यका प्रशालेच्या उपप्राचार्या व प्राचार्या म्हणून आणि त्यानंतर आरंभ महाविद्यालयाच्या प्राचार्या म्हणून त्यांनी काम केले होते. पुष्पाताईंना भावपूर्ण श्रद्धांजली.

## विशेष अभिनंदन!!

### ज्ञान प्रबोधिनीतील विभाग व केंद्रांमधील सदस्यांचे विशेष यश व पुरस्कार

१. ज्ञान प्रबोधिनी प्रशालेचे प्राचार्य वाच. मिलिंदराव नाईक यांची राष्ट्रीय शैक्षणिक अनुसंधान व प्रशिक्षण परिषदेच्या (NCERT) 'मूल्यमापन व सर्वंकष गुणपत्रके यातील सुधार' (Reforms in Evaluation and Holistic Progress Cards) यावर काम करणाऱ्या राष्ट्रीय अभ्यास समिती (Focus group) वर निवड झाली.

२. मातृमंदिर विश्वस्त संस्थेतर्फे शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या व्यक्ती व संस्था यांचा गुणगौरव पुरस्कार देऊन सन्मान केला जातो. यावर्षी 'कार्यकर्ता गुणगौरव' पुरस्कार श्री. महेंद्रभाई सेठिया यांना देण्यात आला. शैक्षणिक उपक्रम संशोधिकेचे प्रकल्प समन्वयक श्री. ओंकार बाणाईत यांना 'अध्यापकोत्तम' या पुरस्काराने तर स्त्री-शक्ती प्रबोधन, ग्रामीण विभागातील श्रीमती द्वारकाताई वालगुडे यांना 'धन्य राधामाता' पुरस्कार देण्यात आला.

३. शिक्षण मंडळ, कराड यांच्याद्वारे साने गुरुजी आदर्श शिक्षक हा पुरस्कार शैक्षणिक उपक्रम संशोधिकेचे प्रमुख प्रा. प्रशांतराव दिवेकर यांना २०२० वर्षासाठी जाहीर झाला. २०२१ साली याचे वितरण झाले.

४. निगडी केंद्र व्यवस्थापक व पूर्व माध्यमिक विभागप्रमुख श्री. शिवराज पिंपुडे लिखित 'अन् पारिजातक हसला' या पुस्तकाला 'अलाईव्ह' या संस्थेतर्फे ज्येष्ठ लेखक, दुर्ग व वनस्पती तज्ज्ञ प्राध्यापक प्र. के. घाणेकर यांच्या हस्ते 'हरित पुस्तक पुरस्काराने' गौरवण्यात आले.

५. रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई - सिटीच्या वतीने देण्यात येणारा रोटरीभूषण पुरस्कार ज्ञान प्रबोधिनीच्या अंबाजोगाई विस्तार केंद्राचे प्रमुख श्री. प्रसाददादा चिक्षे यांना मिळाला.

६. कोविड काळातील प्रयोगशील शिक्षणासाठी ज्ञान प्रबोधिनी प्रशालेस लोकमत मीडिया प्रा. लि. तर्फे 'School Icon of Pune' हा पुरस्कार मिळाला.

७. शिक्षणविवेक आयोजित आंतरशालेय पपेट सादरीकरण स्पर्धेत शिक्षक गटातून प्रथम क्रमांक 'गोगलगायीचा प्रवास' या गोष्टीला मिळाला. याचे स्वरचित लेखन तसेच या सादरीकरणात ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालयातील पूर्वप्राथमिक व प्राथमिक विभागातील अध्यापिकांचा सहभाग होता.

८. जागतिक महिला दिनानिमित्त नवनीत फाऊंडेशन तर्फे संवादिनीतल्या कामाबद्दल व सामाजिक कार्याबद्दल परिमला पांडे यांना पुरस्कार मिळाला. तसेच संगिनी नारी संघटनेतर्फे सुनीता भन्साळी यांना पुरस्कार मिळाला.

९. साधना सखी महासंघातर्फे शिरूर संवादिनी गटाला गुणवत्तापूर्ण कामासाठी शिरूर आयकॉन पुरस्काराने गौरविण्यात आले.

### स्पर्धा परीक्षा केंद्र विद्यार्थी अधिकारी - राष्ट्रीय पुरस्कार २०२१

१. श्रीमती मृण्मयी जोशी (निवडणूक अधिकारी, जिल्हाधिकारी, पल्लकड, केरळ) : उत्कृष्ट निवडणूक प्रक्रियेसाठी राष्ट्रीय पुरस्कार

२. डॉ. नितीन खाडे (राज्य निवडणूक आयुक्त, आसाम) : उत्कृष्ट निवडणूक प्रक्रियेसाठी राष्ट्रीय पुरस्कार

३. श्री. रोहन बोत्रे (पोलीस अधीक्षक, कासगंज, उत्तर प्रदेश) : शौर्य सुवर्ण पदक

४. श्रीमती दीप्ती मेहेंदळे-कानडे (उपसचिव, वित्त, बंगळूरू) : उत्कृष्ट कामाबद्दल २०२१ चा प्रधानमंत्री पुरस्कार

५. श्री. अभिजीत बांगर (महापालिका आयुक्त, नवी मुंबई) : कोविड काळातील कामासाठी तरुण तेजांकित पुरस्कार

६. श्री. संजय शिंदे (पनवेल महापालिका उपायुक्त) : मुख्यमंत्री पुरस्कार

### मुखपृष्ठ छायाचित्रे

(गोलाकार डावीकडून उजवीकडे या क्रमाने)

१. संस्कृत संस्कृति संशोधिकेतर्फे दूरस्थ पद्धतीने महालय श्राद्ध मार्गदर्शन

२. निगडी केंद्रात झालेल्या संयुक्त माजी विद्यार्थी मेळाव्याचे संयोजक सदस्य मा. संचालकांसह

३. ज्ञान प्रबोधिनी प्रशालेचे विद्यार्थी ग्रामीण विद्यार्थ्यांचे खेळ घेताना

४. तेजोमय या उद्योगाच्या अंतर्गत बनवलेली सौर पणत्यांची माळ

५. शैक्षणिक उपक्रम संशोधिकेच्या विकासमित्र प्रकल्पातील शिक्षणदूत युवतींचा गट

६. छात्र प्रबोधन पुस्तक प्रकाशन समारंभ

## इ. १०वी शालान्त परीक्षा

### ज्ञान प्रबोधिनी प्रशाला

एकूण उत्तीर्ण १००%

१. खुशी राव ९९.००%
२. ईशान करवा ९८.६०%
३. ऐश्वर्या अभ्यंकर ९८.४०%

### ज्ञान प्रबोधिनी नवनगर निगडी

एकूण उत्तीर्ण १००%

- **माध्यमिक मराठी विभाग**

१. मल्हार ओझर्डे ९८.६०%
२. प्राची दशरथ ९७.६०%
३. सिद्धेश कोतकर ९७.४०%

- **क्रीडाकुल विभाग**

१. आयुष कुलकर्णी ९०.६०%
२. ओंकार गोमे ९०.००%
३. ईश्वरी लोंढे ८७.००%

- **गुरुकुल विभाग**

१. अंतरा खैरनार ९०.८०%
२. कल्पना सूर्यवंशी ९०.००%
३. नेहा गोखले ८८.६०%

- **माध्यमिक इंग्रजी विभाग**

१. चिन्मयी रानडे ९६.००%
२. आयुष डी. ९५.४०%
३. अवनी सारडा ९५.४०%

### ज्ञान प्रबोधिनी, सोलापूर

एकूण उत्तीर्ण १००%

१. वरद बडवे ९८.४०%
२. मेघना मते ९७.००%
३. क्षितिजा कुलकर्णी ९५.६०%

### ज्ञान प्रबोधिनी, हराळी

एकूण उत्तीर्ण १००%

१. रवी विभूते ९२.००%
२. जगदीश बनसोडे ८९.८०%
३. प्रियंका पाटील ८७.६०%

### ग्राम प्रबोधिनी, साळुंब्रे

एकूण उत्तीर्ण १००%

१. समृद्धी राक्षे ९१.८०%
२. वेदिका पाटील ८९.८०%
३. वैष्णवी राक्षे ८६.८०%

### जास्वंद कन्या निवास, वेल्हे

१. नंदीनी भावळेकर ७३.८०%
२. उज्वला महाडीक ७३.४०%
३. रुपाली जोरकर ६९.८०%

### नागरीवस्ती अभ्यासगट

१. अदिती घोरपडे ७५.८०%
२. अक्षदा भोगटे ७१.८०%
३. संस्कृती मेंघे ६६.४०%

## इ. १२वी

### ग्राम प्रबोधिनी, साळुंब्रे

इ. १२वी, वाणिज्य शाखा : एकूण उत्तीर्ण १००%

१. ज्ञानेश्वरी बोडके ६९.०७%
२. आदित्य मरकळे ६८.००%
३. गायत्री राक्षे ६७.८३%

### जास्वंद कन्या निवास, वेल्हे

१. नेत्राली चऱ्हाटे ६५ %
२. दिपाली पारडे ६४.८३%
३. प्रगती खाटेवर ६३.३३%

---

## केंद्रीय लोकसेवा आयोग-२०२१ (UPSC)

स्पर्धा परीक्षा केंद्रातील एकूण २४ विद्यार्थी यावर्षी उत्तीर्ण झाले असून, ते विविध पदांसाठी निवडले गेले. केंद्राची मृणाली जोशी महाराष्ट्रात सर्वप्रथम आली.

### २०२१ मधील यशवंत

| | | | |
|---|---|---|---|
| १. मृणाली जोशी | ७. शुभम जाधव | १३. विनायक नरवडे | १९. जयजीत उमाप |
| २. विनायक महामुनी | ८. अनामिका | १४. निवृत्ती आव्हाड | २०. ओंकार पवार |
| ३. पार्थ कश्यप | ९. नितीन पुके | १५. प्रतिक जुईकर | २१. श्रीकांत कुलकर्णी |
| ४. प्रतिक धुमाळ | १०. सायली म्हेत्रे | १६. संकेत वाघे | २२. सचिन लांडे |
| ५. श्रीकांत विसपुते | ११. पूजा कदम | १७. दिव्या गुंडे | २३. सायली गायकवाड |
| ६. अनिल म्हस्के | १२. सुब्राह्मण्य केळकर | १८. राकेश अकोलकर | २४. दीक्षा भवरे |

# १ ज्ञान प्रबोधिनी प्रशाला

२०२१-२२ हे वर्ष दूरस्थ आणि प्रत्यक्ष दोन्ही पद्धतीने पार पडले. प्रत्यक्ष शाळा सुरू झाल्यामुळे प्रशालेत जिवंतपणा आला. मागे रेंगाळलेले अधिकाधिक उपक्रम घेण्याचा यावर्षी प्रयत्न केला.

## विद्याव्रत संस्कार

इ. ८वीच्या विद्यार्थ्यांसाठी विद्याव्रताची ओळख व्हावी यादृष्टीने पुढील प्रकारे विद्याव्रत व्याख्यानमाला योजली होती.

| वक्ते | विषय व सार |
|---|---|
| प्रा. अश्विनी जोशी | प्रास्ताविक : विद्याव्रत संकल्पनेची ओळख, आश्रम, कर्तव्ये, ऋण, आवश्यक व्रते यांची ओळख. |
| प्रा. प्रज्ञा अक्कलकोटकर | शारीरिक विकसन : आहार-विहार व विश्रांती याचे महत्त्व व विविध प्रकारचे व्यायाम. |
| वैद्य प्रयाग सेठिया | आहारशास्त्र : आयुर्वेदानुसार आदर्श आहार संकल्पना. |
| डॉ. मंदार अक्कलकोटकर | व्यायामशास्त्र : आयुर्वेदानुसार व्यायाम संकल्पनेच्या संस्कृतमधील विविध व्याख्यांची ओळख. |
| वाच. मिलिंद नाईक | बौद्धिक विकसन : समाजासाठी उपयुक्त 'कर्ती बुद्धिमत्ता असावी' म्हणजे काय यासाठी कार्यकर्त्यांचे काम दाखविणाऱ्या चित्रफिती बघणे, व्यक्तींचे निरीक्षण करणे व स्वत: निरीक्षण करून लिखाण करणे. |

इ.९वी मधील विद्यार्थ्यांसाठी वरील प्रमाणेच व्याख्याने झाली. त्याशिवाय, मानसिक विकसन या विषयात मन आणि मनाचे पैलू, भावनिक विकसनात भावनांचे तटस्थपणे मापन, भावनांची हाताळणी, सामाजिक विकसनात ज्ञान प्रबोधिनीच्या स्त्री-शक्ती प्रबोधन (ग्रामीण) विभागामार्फत चालवल्या जाणाऱ्या महिला बचतगटाचे काम आणि त्या संबंधातील अनुभवकथन, बौद्धिक विकसनात बुद्धिमत्तेचा उपयोग सर्जन आणि संशोधनासाठी करणे म्हणजेच देशाला बलशाली करण्यात हातभार लावणे, अशी अधिकची व्याख्याने झाली. या सोबतच विद्याव्रत पोथीचा अर्थ आणि संस्कृत श्लोकांचे आणि संदर्भांचे स्पष्टीकरण याविषयी वाच. आर्याताई जोशी यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. तर आत्मगुणांचे विकसन - जाणिवेचे विविध स्तर आणि 'स्व'ची ओळख यावर संचालक वाच. गिरीशराव बापट यांनी मार्गदर्शन केले.

## बौद्धिक प्रगल्भता

**▶ विशेष व्याख्याने**

यावर्षी पाठ्यविषयांशी निगडित आणि अन्य विषयांवरील व्याख्यानांची योजना केली होती. तपशील पुढीलप्रमाणे -

**विशेष भेट**

प्रशालेतील प्रयोग समजून घेण्यासाठी देश व राज्य स्तरावरील १४ शिक्षणतज्ज्ञांनी, विज्ञान आश्रम पाबळचे संचालक डॉ. योगेश कुलकर्णी यांच्यासमवेत दि. २ नोव्हें. २०२१ रोजी प्रशालेला भेट दिली. आंध्र प्रदेश, कर्नाटक, तेलंगणा येथील अटल टिंकरिंग लॅब्ज चांगल्या प्रकारे कशा चालवता येतील, याची कल्पना येण्यासाठी प्रशालेच्या धडपड प्रयोगशाळेची (मेकर्स स्पेस) रचना व कार्यपद्धती त्यांनी समजून घेतली. या भेटीत पुढील मान्यवरांचा समावेश होता - १. शेषगिरी मधुसूदन (शैक्षणिक सल्लागार, युनिसेफ, दक्षिण भारत), २. स्वाती देव वसुदेव (युनिसेफ प्रतिनिधी आणि समग्र शिक्षा, आंध्र प्रदेश), ३. नमिता राव (शैक्षणिक सल्लागार, कर्नाटक), ४. मोहन राव (संचालक, एससीईआरटी, आंध्र प्रदेश), ५. बागेश्री जी. (शैक्षणिक सल्लागार, एससीईआरटी, आंध्र प्रदेश)

| दिनांक व इयत्ता | विषय व वक्ते |
|---|---|
| ११ डिसेंबर २०२१<br>इ. ५वी मुले व मुली | माहितीचा संग्रह करणे, विश्लेषण करणे, अर्थ समजावून घेणे.<br>प्रा. मनीषा कुलकर्णी (अध्यापक) |
| ११ डिसेंबर २०२१<br>इ. ५ वी मुले व मुली | कागदाच्या त्रिमितीय प्रतिकृती व किल्लीधारक (Key Holders) बनविणे.<br>प्रा. प्रणव पुजारी (अध्यापक) |
| २३ डिसेंबर २०२१<br>इ. ८वी मुली | गणित विषयातील प्रकल्प व इंग्रजी प्रतिभाशाली लेखन<br>इंद्रनील कसमळकर (तुकडी - २००९) |
| डिसेंबर-जानेवारी<br>इ. ८वी मुले, मुली | संयम कार्यशाळा<br>(व्यसनांपासून दूर राहण्यासाठी एक जागृती व प्रबोधनपर प्रकल्प)<br>कार्यकर्ते - ताराचंद रामनाथ सेवा ट्रस्ट आणि ज्ञान प्रबोधिनी संशोधन संस्था |
| ७ फेब्रुवारी २०२२<br>इ. ९वी मुले, मुली | युवा जाहीरनामा<br>तन्मयदादा आणि वैदेहीताई<br>('उन्मुक्त यूथ ऑर्गनायझेशन') |
| १२ एप्रिल २०२२<br>इ. ८वी मुले, मुली | प्रतिभाशाली लेखन प्रकल्प<br>आश्लेषा महाजन (लेखिका) |
| २० एप्रिल २०२२<br>इ. ८वी मुले, मुली | प्रतिभाशाली लेखन प्रकल्प<br>आदित्य महाजन (लेखक) |
| २० एप्रिल २०२२<br>इ. ८वी मुली | भगिनी निवेदिता<br>मा. स्वर्णलता भिशीकर<br>(ज्ञा. प्र. ज्येष्ठ कार्यकर्त्या) |

प्रकल्प शिबिर - दि. ४ ते १४ एप्रिल या कालावधीत इ. ५वी ते ९वी या वर्गांचे प्रकल्पशिबिर घेण्यात आले. शिबिरामधे प्रत्यक्ष करावयाच्या कृती, तक्ते तयार करणे व प्रकल्प विषय टोकास नेणे असे काम करण्यात आले. याबरोबरच प्रकल्पांचे अंतर्गत व बाह्य परीक्षण झाले. दि. १७ ते २४ एप्रिल या कालावधीत पुढील वर्षाच्या प्रकल्प विषयांची ओळख व स्वत:चा विषय निश्चित करणे असे काम करण्यात आले.

**▶ सहाध्याय दिन**

सहाध्याय दिनाच्या निमित्ताने यावर्षी विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या संस्थांना भेटी देऊन नवनवीन अनुभव घेतले.

| वर्ग | उपक्रम / स्थळ |
|---|---|
| इ. ५वी | राजा दिनकर केळकर संग्रहालय |
| इ. ६वी | लोकमान्य नगर, नवी पेठ या भागातले विविध झाडांचे नमुने बघत त्यावर चर्चा |
| इ. ७वी | शिखांचे प्रार्थना स्थळ कॅम्पमधील गुरुद्वाराला भेट |
| इ. ८वी | सायन्स पार्क, पिंपरी-चिंचवड |
| इ. ९वी | शैक्षणिक उपक्रम संशोधिकेच्या विकासमित्र प्रकल्पातील ३५ शाळांमध्ये विज्ञान प्रयोग |

**▶ स्वातंत्र्यदिन व प्रजासत्ताक दिन**

दि. १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्यदिनानिमित्त ध्वजवंदन झाले. त्यानंतर युवक विभागातील विराजदादा देवचके यांनी 'समान नागरी कायदा' या विषयावर आभासी पद्धतीने अभ्यास मांडणी केली.

दि. २६ जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजवंदन झाले. यावेळी युवक कार्यकर्ता श्रीकांतदादा काशिद यांनी 'जागतिक ऊर्जा व तंत्रज्ञान घडामोडींच्या परिप्रेक्षात भारताचे ऊर्जा धोरण' या विषयावर आभासी पद्धतीने अभ्यास मांडणी केली.

## मानसिक समृद्धी

आभासी पद्धतीने प्रशालेला सुरुवात झालेली असल्याने वर्षारंभ उपासनेऐवजी वर्गाध्यापकांनी दैनंदिन उपासना घेऊन वर्षाची सुरुवात केली.

इ. ९वी व १०वी गटाची वर्षान्त उपासना दि. ९ एप्रिल रोजी झाली. मा. मनोजराव देवळेकर, प्रमुख ज्ञान प्रबोधिनी निगडी केंद्र हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

## शारीरिक कौशल्य

युवक विभाग व युवती विभागातर्फे प्रशालेतील विद्यार्थ्यांसाठी नियमित दैनंदिन दल होते. त्याचे संक्षिप्त तपशील पुढीलप्रमाणे आहेत. सविस्तर वृत्त त्या-त्या विभागाच्या वृत्तात आलेले आहे.

**▶ युवक विभाग**

सहकारनगर, कोथरूड व सिंहगड रोड अशा ठिकाणी भागश: दल झाले. इ. ५वी, ६वी, ७वीच्या मुलांसाठी दशहस्तांतरण, डॉजबॉल आणि गोल खोखो हे खेळ घेण्यात आले. मुलांची ताकद आणि वेग वाढवण्यासाठी वेगवेगळे व्यायाम व सेट्स घेण्यात आले. संचलन, पद्य आणि चर्चासत्र या गोष्टीही दलावर घेण्यात आल्या. सहनिवासातल्या मुलांसोबत पावनखिंड हा चित्रपट बघितला. त्याशिवाय जलतरण दलावर एक महिना सर्वांना जलतरण प्रशिक्षण दिले. इ. ७वीच्या दर आठवड्याला एक अशा इस्कॉन मंदिर, ज्ञान प्रबोधिनी निगडी, खडकवासला, एन्.डी.ए गेट, आगाखान पॅलेस, तळजाई इ. ठिकाणी सायकल सहली झाल्या.

**▶ युवती विभाग**

आभासी पद्धतीने व प्रत्यक्ष शाळा सुरू झाल्यानंतर मैदानांवर नियमित दल घेण्यात आले. गणेशोत्सव काळामधे इ. ५वी ते ७वी गटकार्ये व इ. ८वी ते १०वीसाठी वर्गश: बर्ची नृत्य घेण्यात आले. तसेच इ. १०वी मुलींनी गटागटाने एकेका मुलीच्या घरी जाऊन गणपतीची आरती केली. इ. ७वी मुलींना लेझीम शिकविण्यात आले. इ. ५वी ते ८वीच्या मुलींसाठी राखी विक्री, इ. ९वीसाठी वस्ती उपक्रम तर, इ. ५वी ते १०वीसाठी भोंडला असे अन्य उपक्रम झाले. समूहजीवनाचा आनंद घेत त्यासाठी आवश्यक ती कौशल्ये व वृत्ती आत्मसात करण्याच्या हेतूने विविध शिबिरे डिसेंबर अखेर घेण्यात आली. स्वत:च्या शारीरिक क्षमता ताणून सहकाऱ्यांबरोबर दऱ्याखोऱ्यांमधे भटकत, इतिहासामधे रमून जाणे हा अनुभव इ. ५वी ते १०वीच्या विद्यार्थिनींनी गिरीभ्रमण सहलींमध्ये घेतला.

## नेतृत्वगुण विकसन

अग्रणी योजनेअंतर्गत इ. १०वीच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींनी आपापल्या वर्गासाठी गुरूपौर्णिमेनिमित्त गुरूपूजनाच्या कार्यक्रमाचे नियोजन केले होते. त्यात पुढील अभ्यागतांनी मार्गदर्शन केले.

| वर्ग | विषय | वक्ते |
|---|---|---|
| ९वी मुली | पथकाधिपती चरित्र | मा. नलिनीताई गुजराथी |
| ९वी मुले | भारतीय संस्कृतीत गुरू-शिष्याचे नाते | श्री. अमोलदादा गांगजी |
| १०वी मुले व १०वी मुली | प्रशालेतील व सैन्यातील अनुभव, लढाईच्या मैदानावर आणि मैदानाबाहेर आपल्या फौजा करीत असलेले काम | माजी लेफ्टनंट जनरल श्री. सुदर्शनजी हसबनीस |

**कौशल्य प्रशिक्षण -** प्रशाला प्रत्यक्ष सुरू झाल्यानंतर अग्रणी तासिकांना संवाद कौशल्य याविषयी प्रशालेचे पालक श्री. अमेय जोशी यांनी इ. ९वी व १०वी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

## अभिव्यक्ती सादरीकरण

आपले विचार व भावना मोकळेपणाने व्यक्त करण्यासाठीचे अभिव्यक्ती हे महत्त्वाचे माध्यम मानले गेले आहे. त्यामुळेच दि. ४ ते २५ एप्रिल या कालावधीत अभिव्यक्ती शिबिर घेतले. यात कार्यक्रमासाठीची तयारी व सराव घेतला गेला. दि. २६ एप्रिल रोजी मुलांचा व दि. २७ एप्रिल रोजी मुलींचा अभिव्यक्ती सादरीकरणाचा कार्यक्रम झाला. मुलांकडे प्रशालेचे माजी विद्यार्थी श्री. शिरीश

जोशी व मुलींकडे उदयोन्मुख गायिका व माजी विद्यार्थिनी सौ. ऋचा बोंद्रे-पवार हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

## विशेष अभिरुची गट

विद्यार्थ्यांच्या विशेष अभिरुचींना प्रेरणा देणे व त्याद्वारे सर्वंकष ज्ञान वाढविणे या उद्देशाने, तसेच विद्यार्थ्यांना शैक्षणिक आणि व्यावसायिक कामात उत्तमता गाठता यावी, यासाठी विशेष अभिरूची गट तयार केले जातात. या वर्षीचे अभिरुची वर्गाचे विषय व अध्यापक पुढीलप्रमाणे -

१. जर्मन भाषा - श्रुती पावगी
२. चित्रकला - राकेश भुजबळ
३. धडपड प्रयोगशाळा - प्रणव पुजारी
४. कृत्रिम बुद्धिमत्ता - राहुल धर्माधिकारी
५. खगोल शास्त्र - पिनाकिन कर्वे
६. बुद्धिबळ - चेतन चव्हाण

## अन्य महत्त्वाचे

**▶ अध्यापक प्रशिक्षण व बैठकी**

वर्षभर साप्ताहिक बैठक व मासिक प्रशिक्षण वर्गांतून सर्व अध्यापकांसाठी प्रशिक्षणाची योजना केली गेली. नियमित अध्यापक बैठकीत पुढील विविध विषयांवर चर्चा झाली - क्वीझ ट्रेनिंग, शिक्षक प्रशिक्षण अपेक्षा, प्रथमोपचार, पालक संघटन, वर्गाध्यापक जबाबदारी, सत्र पद्धती-तांत्रिक प्रशिक्षण, अधिमित्र गट बैठक, शैक्षणिक बदल, मूल्यमापन पद्धती, गणेशोत्सव नियोजन, नवीन शिक्षणप्रणालीनुसार बदल-चर्चा, प्रशाला भविष्यवेध, प्रत्यक्ष शाळा सुरू झाल्यानंतरचे लगेच जाणवलेले बदल, भवितव्य लेख मांडणी-नियोजन, शाश्वत विकास उद्दिष्टे, विद्याव्रत कार्यक्रम-नियोजन, खातेवाटप, इ. ५वी ते ८वी सत्र एक निकाल आढावा, नवीन वास्तू रचना- आराखडा/नमुना, भवितव्य लेख उपक्रम लेखन, खातेनिहाय निवेदने, इ. ५वी प्रवेश प्रक्रिया, बुद्धिमत्ता, सहाध्यायदिन निवेदने, प्रकल्प पद्धती-पुर्नरचना चर्चा, कोविड काळातील विद्यार्थी सर्वेक्षणावर आधारित शोध निबंध, गणित विषयाचे उपयोजन इ.

त्याशिवाय, १. बदलत्या भविष्यात अध्यापकांची भूमिका आणि मूल्यमापनाच्या पद्धती, क्षमताधिष्ठित अध्ययन, २. गणित, विज्ञान, सामाजिक विज्ञान, भाषा, संगणक विषय शिकवणाऱ्या अध्यापकांची क्षमताधिष्ठित अध्ययन चर्चा, ३. करिअर मार्गदर्शन प्रशिक्षण वर्ग अशी विशेष प्रशिक्षणे झाली. महिनाअखेर होणाऱ्या मासिक प्रशिक्षणामधे उत्तम अध्यापन करण्यासाठीचे मार्गदर्शन व विषयशः बैठकांचे आयोजन केले होते.

याबरोबरच विद्यार्थी समुपदेशन या विषयावर कार्यशाळा घेण्यात आल्या. अध्यापकांच्या विषयशः क्षमताधिष्ठित अध्ययन चर्चा व त्याप्रमाणे नियोजन झाले.

वर्गाध्यापक व अधिमित्र बैठकींमध्ये कोविड काळातील बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेताना मुलांना येणाऱ्या अडचणी समजून घेणे आणि त्यातून बाहेर पडण्यासाठी मुलांना कशी मदत करता येईल यावर चर्चा झाली. सर्वंकष मूल्यमापनावरून प्रत्येक विद्यार्थ्याचे व्यक्तिमत्त्वाचे पैलू समजून घेऊन आवश्यक तिथे त्यांच्यासाठी विशिष्ट अनुभवांची रचना करणे आणि त्यांच्या क्षमता ओळखून त्या वृद्धिंगत होण्यासाठी उपक्रमांची योजना करणे याविषयी चर्चा केली. व्यक्तिमत्त्व विकसनाच्या दोन वर्षातील उपक्रमांचा आढावा घेऊन इयत्ताशः राहून गेलेले उपक्रम पूर्ण करण्याच्या नियोजनाविषयी चर्चा केली.

**▶ पालक-शिक्षक संघ बैठकी**

या वर्षी दर महिनाअखेरीला पालक-शिक्षक संघाची बैठक झाली. यामधे शुल्क विषयक निर्णय, दर महिन्याचा आढावा व नियोजन, प्रशाला भवितव्य लेख चर्चा व पालकांच्या शंकाचे निरसन अशा चर्चा झाल्या.

### कौतुक!

१. इ. १०वी मध्ये सर्वोत्तम गुण मिळविणाऱ्या विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी मा. श्री. अजितराव पेंडसे यांनी दिलेल्या देणगीच्या व्याजातून कै. ती. चिंतामणी (सुभाषचंद्र) विश्वनाथ पेंडसे व कै. सौ. कमलाताई (सरोजिनी) चिंतामणी पेंडसे यांचे स्मरणार्थ पारितोषिक वितरणाचा कार्यक्रम ज्ञान प्रबोधिनी प्रशालेमध्ये शनिवार दि. ९ एप्रिल २०२२ रोजी झाला. या कार्यक्रमास ज्ञान प्रबोधिनी निगडी केंद्राचे प्रमुख श्री. मनोज देवळेकर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. पारितोषिक प्राप्त विद्यार्थी-विद्यार्थिनींची नावे पुढीलप्रमाणे - सन २०२० : गौतम राजहंस - रु. ५०,००० व तन्वी जोशी आणि मोहना बर्वे यांना रु. २५,००० प्रत्येकी. तसेच सन २०२१ : कृशानू पत्की आणि रणजित कुलकर्णी यांना रु. २५,००० प्रत्येकी, व हर्षाली कुंजीर - रु. ५०,०००.
२. कै. प्रभाकर लक्ष्मण दाते यांच्या स्मृतीप्रित्यर्थ, गणितातील उत्तम प्रकल्पांसाठीची बक्षिसे देण्यात आली.
३. राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षेमधे कु. श्रुतिका इंगोले (इ. १०वी) हिला शिष्यवृत्ती मिळाली.
४. पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत सीबीएसई/आयसीएसई बोर्डाच्या पहिल्या ५०च्या यादीत पुढील विद्यार्थी चमकले. इ. ५वी : प्रथम ढोकले, वरद फाळके, प्रणव रेटावडे, अवनी भट्टड आणि इ. ८वी : आर्य गुजर, सिद्धा ढोक, समृद्धी कानडे, स्वानंदी मोहरीर, प्रचिती ढोकले, उत्कर्षा माने.
५. प्रशालेतील इतिहास विषयाच्या अध्यापिका संस्कृतीताई बापट या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे घेतल्या गेलेल्या बी. एड. परीक्षेत (एप्रिल/मे २०२०) पुणे विद्यापीठात सर्वप्रथम आल्या.

# २ शैक्षणिक उपक्रम संशोधिका

ज्ञान प्रबोधिनीच्या शिक्षण प्रणालीचा विस्तार या उद्देशाने विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकसन, कौशल्य प्रशिक्षण, प्रज्ञा विकास, वैज्ञानिक दृष्टिकोन विकसन, नेतृत्व विकसन इत्यादी पैलूंवर आधारित विविध उपक्रम या वर्षभरात विभागातर्फे राबवले गेले. **६१४ शाळांमधील ७०२ शिक्षक** आणि **२९,६१७ विद्यार्थी** यांच्यापर्यंत ज्ञान प्रबोधिनीतील शैक्षणिक आशय व प्रक्रिया पोहोचवता आल्या.

विभागात सुरू असलेल्या प्रकल्पांची थोडक्यात ओळख आणि सविस्तर वृत्तांत पुढीलप्रमाणे -

## छोटे सायंटिस्ट

विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन तयार व्हावा, विज्ञानाची गोडी लागावी या हेतूने हा प्रकल्प राबविला जातो. भारतातील सहा राज्यात याचा विस्तार आहे. शिक्षकांचा वाढता उत्साही सहभाग, विविध राज्यात दूरस्थ आणि प्रत्यक्ष उपक्रमांची वाढलेली व्याप्ती आणि प्रकल्पाचा शैक्षणिक साहित्य निर्मितीमधील विस्तार हे या वर्षातील महत्त्वाचे टप्पे आहेत.

यावर्षी प्रकल्पांतर्गत महाराष्ट्र आणि अन्य राज्यांमध्ये इ. ८वी, ९वी साठी विज्ञान संकल्पनांवर आधारित ६० प्रयोग, विज्ञान खेळणी, त्यानुसार विज्ञान साहित्य पेट्या आणि विज्ञान कार्यपत्रके तयार करण्यात आली. २१६ शाळांमधील १०,६२७ विद्यार्थ्यांसाठी विज्ञान प्रयोगावर आधारित प्रत्येकी सहा तासिका घेण्यात आल्या. वर्षाच्या शेवटी झालेल्या विज्ञान शिबिरात पुणे आणि पिंपरी-चिंचवड मनपाच्या शाळांमधून निवडक ३८ विद्यार्थ्यांनी भाग घेतला. शिबिरात विद्यार्थ्यांना सायन्स पार्क दाखविण्यात आले. निरीक्षण कौशल्ये, प्रश्न कौशल्ये, प्रयोगातून प्रकल्पाकडे, कल्पनास्फोट तंत्र, संशोधकांच्या गोष्टी या विषयांवर संवाद साधण्यात आला. झारखंड येथील वनवासी कल्याण आश्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी दूरस्थ पद्धतीने विज्ञान कार्यशाळा घेण्यात आली. राष्ट्रोत्थान विद्या केंद्र, बंगलोर इथे ८वीच्या विद्यार्थ्यांचे विज्ञान शिबिर घेतले आणि तीन शाळांमधील शिक्षकांचे प्रशिक्षण झाले. विवेकानंद केंद्राच्या आसाम येथील शिक्षकांचे दूरस्थ पद्धतीने पाच प्रशिक्षण वर्ग झाले. इ. ५वी ते ७वी मधील विद्यार्थ्यांसाठी विज्ञान कौशल्यावर आधारित अभ्यासक्रमाची रचना पहिल्यांदाच तयार केली गेली. त्यापैकी निरीक्षण कौशल्य यावर प्रायोगिक शिक्षक प्रशिक्षण घेण्यात आले. त्याद्वारे २८५ शाळांमधील १४,२५० विद्यार्थ्यांसाठी तासिका घेण्यात आल्या.

## विकासमित्र

वेल्हे तालुक्याचा 'शैक्षणिक गुणवत्ता विकास' हे ध्येय ठेवून या प्रकल्पाची सुरुवात केली गेली. शाळा, गावात साप्ताहिक विकासिका, शिक्षणदूत प्रशिक्षण, अभ्यास साहित्य निर्मिती, प्रज्ञा विकास कार्यक्रम, शिक्षक प्रशिक्षण कार्यशाळा हे उपक्रम नियमित घेण्यात आले. या शैक्षणिक वर्षात इ. १०वी साठी विशेष विकासिका सत्रे, विज्ञान प्रदर्शन, विज्ञान कार्यशाळा, तंत्रज्ञान साक्षरता सत्रे असे विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

या प्रकल्पामध्ये एकूण ७१ जणांचा गट नियमित तसेच प्रासंगिक काम करतो आहे. प्राथमिक शाळेतील साप्ताहिक विकासिका घेण्यासाठी वेल्हे तालुक्यातील वेगवेगळ्या गावातील ४० युवतींनी आपापले शिक्षण आणि घरातील जबाबदारी सांभाळून शिक्षणदूताची भूमिका समर्थपणे निभावली. यावर्षी एकूण ६५ शिक्षणदूतांचे वर्षभर प्रशिक्षण झाले. शाळा बंद असताना ४६ गावांमध्ये २,२१७ विकासिका घेण्यात आल्या. यात प्रामुख्याने गणित, भाषा, व्यायाम, प्रकल्प व कला या विषयांचा समावेश होता. वाचन व निरीक्षण कृति पुस्तिका तसेच हस्ताक्षर पुस्तिका देऊन मुलांचा सराव घेण्यात आला. छात्र प्रबोधन सुबोध द्वैमासिक अंक तयार करण्यात आला. त्यात मुलांनी तयार केलेल्या कविता आणि त्यांनी काढलेली चित्रे छापण्यात आली. १५ ऑगस्टला गावागावात सांस्कृतिक कार्यक्रम घेतले व राख्या बनविण्याचे प्रशिक्षण दिले गेले. वर्षभर मुलांचे व्यायाम व तंत्रशुद्ध पद्धतीने सूर्यनमस्कार घेण्यात आले. शाळा सुरू झाल्यानंतर ३९ प्राथमिक आणि १२ माध्यमिक शाळा मिळून ५४६ विकासिका झाल्या. त्यामध्ये स्मरण कौशल्य, श्रवण कौशल्य, आरोग्य साक्षरता, संवाद कौशल्य अशा वेगवेगळ्या कौशल्यांचा परिचय मुलांना करून देण्यात आला. इ. ७वी मधल्या निवडक ६५ विद्यार्थ्यांसाठी प्रज्ञा विकास कार्यक्रमात नेतृत्व विकसन आणि सामाजिक जाणीव संवर्धन अशा विषयांची सत्रे झाली. विशेष उपक्रम म्हणून युवक विभागातल्या अठरा युवकांनी बारा गावांमध्ये २०० विद्यार्थ्यांसाठी बौद्धिक खेळ, गंमत खेळ तसेच मैदानी खेळ घेतले. विज्ञान कार्यशाळा आणि विज्ञान प्रदर्शन हे या वर्षातले वैशिष्ट्यपूर्ण उपक्रम होते. पुण्यातील मराठवाडा मित्रमंडळ अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी माध्यमिक शाळांमधील १५० मुलांकरिता तंत्रज्ञान साक्षरता सत्र घेतले.

## प्रज्ञा विकास

समाजातील विविध घटकातील विशेष गुणवत्ता असलेल्या मुलांच्या बुद्धिमत्ता संवर्धनासाठी हा प्रकल्प चालविला जातो. या उपक्रमाचा विस्तार यावर्षी रायगड जिल्ह्यातील रोहा तालुक्यातील दहा शाळांत करण्यात आला.

इ. १०वी मध्ये असलेल्या मुलांची अभ्यास कौशल्य विकसनाची सत्रे यावर्षी घेण्यात आली. त्यात अभ्यास नियोजन, टिपणे काढणे, तक्ते तयार करणे, परीक्षा पूर्व तयारी आणि प्रश्नपत्रिका संच उपलब्ध करून दिले. पुणे शहरातील तीन वस्त्यांमध्ये ९०

विद्यार्थ्यांची निवड करून नवीन तुकडी तयार केली. त्यांच्या अभ्यासक्रमात मुख्यतः मुलभूत अध्ययन क्षमता, अभ्यास कौशल्ये, व्यक्तिमत्त्व विकसन, चिकित्सक विचार कौशल्य, निर्णय व नियाजन कौशल्य याचा समावेश करण्यात आला.

श्री विवेकानंद रिसर्च अँड ट्रेनिंग इन्स्टिटयूट, रोहा व एक्सेल उद्योग समूह, रोहा, रायगड यांच्या सोबत रोहा परिसरातील दहा शाळांतील विद्यार्थ्यांसाठी प्रज्ञा विकास कार्यक्रम सुरू आहे. सर्व शाळांना सेंगाती या खेळ साहित्य पेट्या व सर्व विद्यार्थ्यांना छात्र प्रबोधनचे दिवाळी अंक देण्यात आले. इ. १०वीच्या विद्यार्थ्यांसाठी अभ्यास कौशल्य सत्रे प्रत्यक्ष घेण्यात आली तसेच 'वेध यशाचा' या दहावी परीक्षा पूर्वतयारी व्याख्यानमालेच्या ध्वनिचित्रफिती उपलब्ध करून देण्यात आल्या.

## अनुभव शाळा

समाजातील वंचित घटकांतील ६ ते ११ या वयोगटातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अभ्यास आणि विविध कौशल्ये विकसित करण्यासाठी हा प्रकल्प राबविला जातो.

प्रकल्पात प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या मूलभूत अध्ययन क्षमता विकसित होण्यासाठी अभ्यासक्रमात भाषा, गणित, इंग्रजी विषयांचा समावेश करण्यात आला. इ. १ली ते ३री लहान गट आणि ४थी ते ६वी मोठा गट अशा दोन गटांसाठी दैनंदिन तासिका तीन वस्त्यांवर होत होत्या. विद्यार्थ्यांकडून दररोज श्लोक, प्रार्थना, बडबडगीते घेण्यात आली. तसेच नियमितपणे सूर्यनमस्कार, कवायत आणि योगासने घेण्यात आली. गाणी, गोष्टी आणि विविध खेळातून तासिका रंजक करण्यात आल्या. संगणक वापर, कला, हस्तकला, कोडी सोडविणे, हस्ताक्षर याचा सराव घेण्यात आला. दररोज प्रत्येक वर्गात पौष्टिक खाऊ देण्यात आला. यावर्षी नित्य उपक्रमांव्यतिरिक्त शैक्षणिक वातावरण समृद्धीसाठी पालक भेटी आयोजित करण्यात आल्या होत्या. भेटी दरम्यान जाणवले की पालकांना अनुभव शाळेत येऊन मुलांमध्ये झालेल्या बदलांचा आनंद वाटतो. मुलांचा अभ्यासाचा सराव होतो आहे, मुलांवर चांगले संस्कार होत आहेत, हे पालकांनी आवर्जून नमूद केले.

## ज्ञानसेतू

राष्ट्रीय एकात्मतेसाठी विज्ञान प्रसार हा हेतू घेऊन ज्ञानसेतू हा उपक्रम भारतातील आठ राज्यांच्या दुर्गम भागात राबवला जातो.

या प्रकल्पांतर्गत अरुणाचल प्रदेशात माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी विज्ञान आधारित कार्यशाळा आयोजित केल्या होत्या. तसेच स्थानिक परिसर, तेथील समस्या, संस्कृती समजून घेण्यात आली.

कोविडमुळे वर्षभरात प्रत्यक्ष दौरे शक्य झाले नाहीत, परंतु दूरस्थ माध्यमातून विविध उपक्रम सुरू होते. ज्ञानसेतू

**विभागातील प्रकल्पानुसार तपशील तक्ता**

| प्रकल्पाचे नाव | विस्तार | ठळक उपक्रम | शाळा/वस्ती संख्या | सहभागी विद्यार्थी / शिक्षक |
|---|---|---|---|---|
| छोटे सायंटिस्ट | महाराष्ट्र, झारखंड, आसाम, अरुणाचल प्रदेश, नागालँड, कर्नाटक | विज्ञान प्रयोग, दूरस्थ सत्रे, विज्ञान शिबिर, शिक्षक प्रशिक्षण, विविध स्पर्धा | ५३१ | विद्यार्थी - २६,६०६<br>शिक्षक - २९५ |
| विकासमित्र | वेल्हे तालुका ४६ गावे | साप्ताहिक विकासिका स्पर्धा, प्रज्ञा विकास कार्यक्रम, शिक्षक प्रशिक्षण कार्यशाळा | ५१ | विद्यार्थी - २,१००<br>शिक्षक - १९७ |
| प्रज्ञा विकास पुणे | पर्वती पायथा, हडपसर, मुंढवा | साप्ताहिक सत्र, व्याख्यानमाला तासिका - ७वी, ८वी -१०० / ९वी, १०वी - १०० | ५ केंद्रे | १२९ |
| प्रज्ञा विकास रोहा | रोहा तालुका (जिल्हा रायगड) | अभ्यास कौशल्य सत्रे (अभ्यास नियोजन, उद्दिष्ट निश्चिती) | १० | ३०० |
| अनुभव शाळा | गायरान वस्ती, कम्युनिटी सेंटर (केशवनगर), महात्मा फुले वसाहत (हडपसर) | दैनंदिन तासिका, विविध स्पर्धा, पूरक आहार, सण, उत्सव साजरे करणे, पालक भेटी - एकूण २०५ तासिका | ३ | ३२२ |
| ज्ञानसेतू | अरुणाचल प्रदेश | कार्यशाळा, इंटर्नशिप | २ गावे | विद्यार्थी -१०० |
| प्रेरणासेतू | महाराष्ट्र, मध्य प्रदेश, गोवा, आंध्र प्रदेश, आसाम, अरुणाचल प्रदेश | विविध उद्योजक, कला क्षेत्रातील अनुभवकथन | १२ | विद्यार्थी -६० |
| शिक्षक प्रशिक्षण केंद्र | व्याख्यानमाला व प्रशिक्षण वर्ग | उच्च बौद्धिक क्षमता जोपासना वर्ग, प्रकल्प पद्धत प्रशिक्षण | - | शिक्षक - २१० |

कट्ट्या मध्ये दरमहा एका राज्यातील स्थानिक कार्यकर्ते आणि अधिकाऱ्यांचे अनुभवकथन झाले. युवोन्मेष मासिकाच्या राष्ट्रीय एकात्मता ई-विशेषांकाचे प्रकाशन, गणपती आरती उपक्रम तसेच महाविद्यालयीन गटासाठी काही कार्यशाळा घेण्यात आल्या.

### प्रेरणा सेतू

या उपक्रमात विविध राज्यांतील शालेय विद्यार्थ्यांपर्यंत आभासी माध्यमातून पोहोचून विविध क्षेत्रातील लोकांशी गप्पा मारण्याचे आणि करियर क्षेत्रांची ओळख करून देण्याचे व्यासपीठ उपलब्ध करून दिले गेले.

गेल्या वर्षभरात विविध राज्यांतील विद्यार्थ्यांबरोबर उद्योजकता आणि कला क्षेत्रातील प्रत्येकी पाच वक्त्यांनी गप्पा मारल्या. उद्योजकता क्षेत्रातील अमिता देशपांडे, अमित घैसास, परेश देशमुख यासारख्या व्यक्तींनी त्यांचा प्रवास आणि त्यासाठी लागणारी कौशल्ये, चिकाटी आणि धैर्य याचे महत्त्व सांगितले. कला क्षेत्रात आपला वेगळा ठसा उमटवू पाहणाऱ्या शिवराज वायचळ, अदिती जोगळेकर या वक्त्यांनी त्यांचा प्रवास आणि प्रेरणास्थाने याबद्दल मुलांना सांगितले.

### वा. ना. दांडेकर शिक्षक प्रशिक्षण केंद्र

वा. ना. दांडेकर शिक्षक प्रशिक्षण केंद्रातर्फे शिक्षक आणि शाळा यांना केंद्रस्थानी ठेवून विविध विषयांवरील व्याख्याने आणि परिसंवाद आयोजित करण्यात आले. मराठी तसेच इंग्रजी माध्यमातील या सत्रांचा लाभ अन्य राज्यांतील सदस्यांना देखील घेता आला. तसेच वरील प्रकल्पात शिक्षक आणि प्रशिक्षक प्रशिक्षण यावर विशेष भर दिला गेला.

शिक्षकांना केंद्रस्थानी ठेवून शिक्षण व्हावे चैतन्यदायी व्याख्यानमाला, उच्च बौद्धिक क्षमतांची जोपासना वर्ग यासारखे उपक्रम घेतले. तेलंगणा येथील परामिता स्कूल्स यांच्या सहा शाळांत प्रकल्प पद्धतीसाठी शिक्षकांचे वार्षिक प्रशिक्षण घेण्यात आले. रोटरी क्लबद्वारा आयोजित शिक्षक प्रशिक्षण वर्गात वर्ग व्यवस्थापन आणि अध्यापकाची परिणामकारकता, सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन तसेच नवीन शैक्षणिक धोरण आणि शिक्षणातले बदलते प्रवाह यावर व्याख्याने आयोजित करण्यात आली.

### संशोधन

यावर्षी निगडी केंद्रात चालणाऱ्या 'मातृभूमी परिचय शिबिरे' या उपक्रमाचा मागोवा घेण्यात आला. हा उपक्रम विद्यार्थ्यांना किती प्रमाणात 'मातृभूमीचा परिचय' घडवतो व त्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वात कसे बदल घडत जातात, याचा अभ्यास केला जात आहे.

### विशेष उपक्रम

विशेष उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांसाठी उन्हाळी सुट्टीमध्ये चित्रपट रसास्वाद, विज्ञान प्रयोग व खेळणी, स्वयं अध्ययन कौशल्य या विषयांवर कार्यशाळा व शिबिरांचे आयोजन करण्यात आले तसेच विभागातील सदस्यांचे विविध विषयांवर प्रशिक्षण घेण्यात आले.

### सहाध्यापन दिन!

नाही नाही.. ही टायपिंगची चूक नाही बरं का.. प्रबोधिनीमध्ये सहाध्याय दिन ही अनेक वर्षे चालू असलेली परंपरा. पण आम्ही काहीतरी वेगळं केलं आणि त्यालाच म्हणतोय सहाध्यापन (सह अध्यापन) दिन!! आम्ही म्हणजे? आम्ही ज्ञान प्रबोधिनी प्रशालेतले ९वीचे विद्यार्थी-विद्यार्थिनी.

हा नेमका काय प्रकार??.. तर २०१९ पासून वेल्हे तालुक्यामध्ये विकासमित्र प्रकल्प सुरू आहे. फेब्रुवारी महिन्यात ३९ उच्च प्राथमिक शाळांना ५वी ते ७वीच्या पाठ्यपुस्तकातले जवळजवळ सगळे विज्ञान प्रयोग करता येतील, असे विज्ञान साहित्य दिले होते. पण नुसते साहित्य देऊन उपयोग होणार नव्हता. कारण नेहमी या शाळांत जाऊन विकासिका घेणाऱ्या ताई दादांचा विज्ञान विषयाशी प्रत्यक्ष संपर्क नव्हता.

त्यातूनच कल्पना सुचली की, आम्ही प्रशालेतले ९वीचे सगळे जण एकाच दिवशी सगळ्या शाळांमध्ये जाऊन विज्ञान कार्यशाळा घेऊ शकू का? अशी संधी, प्राचार्य तरी कसे सोडतील? त्यांनी लगेच परवानगी दिली आणि चार अध्यापकांचा गट पण साथीला दिला. दोन किंवा तीन विद्यार्थ्यांच्या गटाने एकेका शाळेत जायचे, काही प्रयोग करून दाखवायचे, काही करायला द्यायचे, प्रश्नमंजुषा सोडवायला द्यायची, काही प्रश्न असे विचारायचे की उत्तर मिळवायला परत एक प्रयोगच करावा लागेल, असे मिळून दोन ते तीन तासांची कार्यशाळा घ्यायची असे ठरवले. पूर्वतयारी आणि प्रशिक्षण होऊन कार्यवाहीचा दिवस ठरला ४ मार्च २०२२!

केळद, घिसर, देवपाल, वांगणीवाडी अशा वेल्हे तालुक्याच्या चार टोकांना पोचणे पुरेसे आव्हानात्मक! पण पीएमपीएमएल् मदतीला आली. आधीच्याच आठवड्यात कात्रज ते वेल्हे अशा मार्गावर पाच बसेस धावायला सुरुवात झाली होती. तिथून पुढची व्यवस्था करायला आपले गावोगावचे चालक दादा तयार होतेच.

पहिला गट पहाटे साडेपाचला प्रबोधिनीतून निघाला आणि बाकी गटही ठरल्याप्रमाणे टप्प्याटप्प्याने बसने निघाले. करंजावणे, कोदवडी फाटा, वेल्हे असे कुठे-कुठे उतरले आणि पुढे आपापल्या शाळांत पोचले. दुपारी ११ ते २ बहुतेक सगळ्या शाळांत अशी कार्यशाळेची धमाल सुरू होती. काही शाळेतली तिसरी, चौथीची किंवा ८वीची मुलं पण उत्सुकतेने येऊन बसली. ११०० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी विज्ञान प्रयोगांचा आनंद लुटला. अनेक ठिकाणी शिक्षक पण खूप उत्साहाने सहभागी झाले.

आता आम्ही पण पुण्याला येऊन या ताई दादांना काहीतरी शिकवणार ही प्रतिक्रियाच पुरेशी बोलकी आहे. आणखी काय लिहायचे.. या सगळ्या उपक्रमाची कल्पना, नियोजन आणि प्रत्यक्ष कार्यवाही याचं नेतृत्व करणारा स्वप्निलदादा, साथीला विकासमित्रची सगळी टीम आणि शैक्षणिक उपक्रम संशोधिका, प्रशाला, स्त्री-शक्ती प्रबोधन, ग्रामीण या विभागांमधले अनेक जण - असे एक मोठे गटकार्य उत्तम पार पडले.

# ३ शैक्षणिक साधन केंद्र

जागतिकीकरणामुळे शिक्षणाचा परीघ विस्तारला. तंत्रज्ञानामुळे दूरस्थ शिक्षणाची मोठी संधी सर्व स्तरातील आणि वयोगटापर्यंत, जगभरातील विद्यार्थ्यांसाठी निर्माण झाली. ती आवश्यकता पूर्ण करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान वापरून ज्ञान प्रबोधिनीच्या त्रिवेणी शिक्षण पद्धतीला अनुसरून दर्जेदार शैक्षणिक ई-साहित्य निर्मिती करणे आणि दूरस्थ पद्धतीने प्रशिक्षण देणे हे काम शैक्षणिक साधन केंद्र करते.

शालेय अभ्यासक्रमाशी निगडित ज्ञान प्रबोधिनीच्या शिक्षण प्रणालीनुसार आणि नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार चित्रफिती, ई-खेळ, आभासी पद्धतीने अनुभव शिक्षण देणारी ॲप निर्मिती आणि प्रशिक्षणे यावर्षी करण्यात आली.

### दीक्षा प्रकल्प

३५७ चित्रफिती - १७ राज्ये - २ दशलक्ष दर्शक (Views)

यावर्षी इ. १ली ते ४थीसाठी गणित, परिसर अभ्यास या विषयाच्या चित्रफिती सामान्य विद्यार्थी आणि कर्णबधिर विद्यार्थ्यांसाठी तयार केल्या. इ. १ली ते १०वी मराठी विषयाच्या चित्रफिती प्रकाशित केल्या. इ. ७वी आणि ८वी भूगोल विषयाच्या चित्रफिती लवकरच प्रकाशित होतील. ३५७ चित्रफितींच्या निर्मितीचे काम करून ते WWW.DIKSHA.GOV.IN/EXPLORE या दीक्षा पोर्टलवर आणि ॲपवर प्रकाशित केले. #GYANQR शोधल्यावर प्रबोधिनी निर्मित चित्रफिती बघता येतात.

भारतातील सोळा राज्यांत या चित्रफिती शासनाच्या पाठ्यपुस्तकात जोडलेल्या आहेत. आपल्या परिसरातून आणि कुटुंबातील अनुभवातून गणित शिकता येते हा विचार घेऊन प्राथमिकसाठी गणिताच्या चित्रफिती केल्या आहेत. तसेच परिसर अभ्यास हा देखील अनुभवातून शिकायला हवा. पण तसा अनुभवणे प्रत्येक वेळी शक्य असेल असे नाही, तर त्यासाठी दृश्य माध्यमातून अनुभवसमृद्ध करण्याचा प्रयास यातून केला आहे. दूरस्थ पद्धतीने शाळा सुरू असल्याने मागील दोन वर्षांत या चित्रफितीचा उपयोग मोठ्या प्रमाणात केला गेला. तसेच ५० शाळांना दीक्षा ज्ञानवर्धन पेटी देण्यात आली. शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्राच्या अभ्यासमालेत देखील या चित्रफितींच्या लिंक शासन यंत्रणे मार्फत महाराष्ट्रातील सर्व शिक्षकांना पोहोचवण्यात आल्या. कर्ण बधिरांसाठी केलेले ५० मराठी भाषा चित्रफिती बृहन् महाराष्ट्र मंडळ, नॉर्थ अमेरिका येथील रविवार मराठी शाळांनी सामान्य विद्यार्थ्यांसाठी वापरल्या. कर्णबधिर मुलांचा भाषा विकास अत्यंत मर्यादित असल्यामुळे भाषाविकास आणि शब्द संख्या वाढविण्याचे उद्दिष्ट डोळ्यापुढे ठेऊन चित्रफिती तयार केल्या होत्या. परदेशातील मराठी बांधवांचा हेतू आपल्या पाल्यांना मराठी समजावे, मराठी बोलता यावे आणि थोड्या प्रमाणात मराठी लिहिता, वाचता यावे असाच आहे. ज्यांची मराठी भाषा अविकसित आहे त्या सर्वांसाठी या चित्रफिती अनौपचारिक पद्धतीने भाषा शिकविण्याचे एक उत्तम माध्यम आहे. शाळाबाह्य मुले, वाडा-वस्तीतील मुलांना मोबाईलच्या साहाय्याने शिकविण्यासाठी स्वयंसेवकांना देखील याचा उपयोग होईल. या चित्रफिती सांकेतिक खुणा काढून विशेष विदयार्थी आणि परदेशी, अन्य भाषिक विद्यार्थ्यांसाठी ERCJPP या यूट्यूब चॅनेलवर उपलब्ध आहेत.

स्वातंत्र्य दिन आणि प्रजासत्ताक दिन देशाभिमान जागवतो, हे दिन बंधूभाव जागवतात, अशावेळी एका वंचित गटासाठी हा संदेश कसा द्यायचा हा प्रश्न उपस्थित झाला. त्यावेळी लक्षात आले राष्ट्रीय प्रतिज्ञा कर्णबधिर व्यक्तींना माहिती नाही किंवा त्यांना समजली नाही. त्यामुळे त्याची चित्रफीत सांकेतिक भाषेत तयार केली. दि. १४ ऑगस्ट २०२१ रोजी सांकेतिक भाषेतील प्रतिज्ञा चित्रफितीचे आणि दीक्षा साधन पुस्तिकांचे प्रकाशन झाले. महाराष्ट्रातील ११ जिल्ह्यांतील ८० कर्णबधिर विद्यार्थ्यांनी स्वयंप्रेरणेने सांकेतिक भाषेतील चित्रफीत बघून, त्याचा सराव करून प्रतिज्ञेचे सादरीकरण केले आणि त्याचे व्हिडीओ पाठवले. त्यांना यासाठी प्रमाणपत्र देण्यात आले. २५ जानेवारीला 'वंदे मातरम्' देखील सांकेतिक भाषेत प्रकाशित केले.

२०१९ साली दीक्षा प्रकल्प सुरू झाला तेव्हा शैक्षणिक चित्रफितीचा आशय शिक्षकांनी लिहिलेला आहे तसा चित्रफितीत येत नव्हता. वर्गात शिकवताना कृती करून दाखवणे सहज जमते पण कलाकार असल्यासारखे संहिता पाठ करून रेकॉर्डिंग करणे शक्य होत नव्हते. या समस्येवर उत्तर म्हणून केंद्रातील कल्पक विज्ञान शिक्षक रविंद्र गोडबोले यांनी एरवी हजारो रुपये किंमत असलेला टेलीप्रॉम्प्टर फक्त ६०० रुपयात बनवला. अनेक शिक्षकमित्र, कार्यकर्ते यांना हे नाविन्य बघायचे होते. त्यासाठी टेलीप्रॉम्प्टर कसा बनवावा ही चित्रफीत तयार केली.

### Webinar

कर्णबधिर मुलांसाठी सांकेतिक भाषेतील अभ्यासक्रम चित्रफितींचा खजिना या विषयावर BleeTV आयोजित वेबिनार घेण्यात आले. त्यासाठी कर्णबधिर शाळांचे शिक्षक, पालक उपस्थित होते. यासाठी ५५० जण प्रत्यक्ष कार्यक्रमात उपस्थित होते आणि २,२९९ views मिळाल्या.

### ॲप निर्मिती

मेघ आणि सरिता या दोन ॲपची निर्मिती केली. यातून प्रश्न शोधणे, त्याला तंत्रज्ञानाच्या माध्यमातून उत्तर देणे, असा अभ्यासपूर्ण कृती संशोधन आणि नाविन्यपूर्ण निर्मितीचा अनुभव घेतला. मेघ ॲपमध्ये वेगवेगळ्या प्रकारचे ढग तयार करून बघता

येतात. त्यांच्या गुणधर्माचा अभ्यास करता येतो. सरिता ॲपमधून गंगा आणि यमुना नदीचा प्रवास बोटीतून आभासी पद्धतीने अनुभवता येतो. नदी स्वच्छ करत खेळातून वेगवेगळ्या राज्यांतून प्रवास होतो. तेथील सांस्कृतिक, शैक्षणिक, राजकीय, सामाजिक, ऐतिहासिक, पर्यावरण याविषयीच्या माहितीपटामधून शिकता येते. 'नदीला समजूया' या मोड्यूलमधून वेगवेगळे पर्यावरणाचे प्रश्न समजून त्याचे उत्तर विद्यार्थी देतील अशी सोय आहे.

या दोन्ही ॲपसाठी विश्वकर्मा विद्यालय, काशीबाई नवले अभियांत्रिकी महाविद्यालय, MITWPU मधील शेवटच्या वर्षाच्या संगणक अभियांत्रिकी आणि फाईन आर्टस्‌च्या विद्यार्थ्यांनी काम केले. तसेच २० आजी आणि माजी विद्यार्थी, SPG Ecology गट आणि ५० मार्गदर्शक, तज्ज्ञ, तंत्रज्ञांनी काम केले. ॲप १३०० जणांनी वापरले. त्यात ९०% भारतीय आणि १०% परदेशी विद्यार्थी आहेत. सरिता ॲपला नूतन महाराष्ट्र कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचा TECHCULT 2K22 चा पुरस्कार मिळाला.

**प्रशिक्षण**

**दोन राज्ये / १५० शाळा / ५४२ लाभार्थी / ३१ दिवस**

नियमितपणे शासनासाठी आणि अन्य संस्था, शिक्षक यांच्यासाठी डिजिटल साधने वापर, निर्मिती आणि शैक्षणिक तंत्रज्ञान याची प्रशिक्षणे घेतली. याचा मुख्य उद्देश साधनांचा प्रसार आणि शिक्षक जोडणे हा आहे. यावर्षी महाराष्ट्र व जम्मूमध्ये प्रशिक्षणे घेतली.

शैक्षणिक साधन केंद्र हे दूरस्थ शिक्षणातून ज्ञान आणि कौशल्य, व्यक्तिमत्त्व विकास घडवणारे पाठ्यक्रम उपलब्ध करून देणारे जागतिक स्तरावरील मुक्त आणि व्यापक इ-व्यासपीठ येत्या काळात असेल.

| कालावधी | प्रशिक्षण विषय | कोणासाठी | शाळा | लाभार्थी | प्रशिक्षण दिवस |
|---|---|---|---|---|---|
| ९ आणि १९ एप्रिल २१ | कर्णबधिर शाळांसाठी ज्ञानवर्धन पेटीचा वापर | महाराष्ट्र (११ जिल्हे) - अनुदानित आणि विना अनुदानित शाळा | २८ | १२२ | १ |
| ६ ऑगस्ट २१ आणि ७ सप्टें. २०२१ | चित्रफितींचा वर्गाध्यापनात वापर | महाराष्ट्र - ज्ञा. प्र. नवनगर विद्यालय, निगडी<br>पुणे जिल्हा विज्ञान अध्यापक मंडळ | १<br>१० | ९<br>१० | १<br>१ |
| १२ ऑगस्ट आणि ४-६ ऑक्टो. २१ | ज्ञानवर्धन पेटीचा वापर | महाराष्ट्र (५ जिल्हे) - अनुदानित आणि विना अनुदानित शाळा | २२ | २२ | २ |
| १८ ऑगस्ट २१ | चित्रफितींचा प्रसार | महाराष्ट्र - कार्यकर्ते | ० | २१ | १ |
| ७-१८ सप्टेंबर २१ | Simulation, Film making, GeoGebra, Content Licensing, White board animation, ARVR, AI, Cyber Security | जम्मू - पूँछ, जिल्हास्तरीय शासकीय प्रशिक्षण | ७५ | ७५ | १० |
| ९, १६ ऑक्टो. / २१ फेब्रु. २२ | चित्रफितीचा वापर आणि Google classroom | महाराष्ट्र - पुणे, अनुदानित शाळा | १ | २१ | ३ |
| ९-११ डिसें. २१ | Foundational Literacy and numeracy (FLN), Creating Worksheets Gamification | जम्मू - पूँछ, जिल्हास्तरीय शासकीय प्रशिक्षण | ५५ | ५५ | ३ |
| ११-१२ डिसें. २१ | चित्रफितीवरून अभ्यास कसा करावा | महाराष्ट्र - पुणे, सात वस्त्या (नागरीवस्ती अभ्यासगट) | ० | ३५ | २ |
| ११-१२ फेब्रु. २२ | चित्रफीत निर्मिती | महाराष्ट्र (११ जिल्हे) - कर्णबधीर शाळांतील शिक्षकांसाठी | २५ | ८२ | २ |
| २२-२३ मार्च २२ | Gamification | जम्मू - पूंछ, जिल्हास्तरीय शासकीय प्रशिक्षण | २० | ३५ | २ |
| २३-२५ मार्च २२ | चित्रफीत निर्मिती आणि Gamification | जम्मू - जम्मू शिक्षण विभाग | ५५ | ५५ | ३ |

छात्र प्रबोधन मासिकाचे हे तिसावे वर्ष होते. त्यानिमित्ताने नित्य मासिक व दिवाळी अंकांच्या बरोबरीने अंकातील साहित्यातून १० पुस्तकांचे प्रकाशन, प्रबोधन दूत, प्रबोधन संवादक व ऐपावाक या शिक्षक-पालक-विद्यार्थ्यांसाठीच्या नवीन उपक्रमांना प्रारंभ, संपादक मंडळात नवीन सदस्यांची भर, अभिवाचन कार्यशाळा व राज्यस्तरीय स्पर्धा, jpprakashane.org वरून दूरस्थ खरेदीची यंत्रणा, यूट्यूब चॅनल प्रारंभ व इ-टेक द्वारा दूरस्थ देणगी जमा करण्याची व पावती पाठवण्याची सुविधा इ. गोष्टींची भर पडली.

### मासिक व दिवाळी अंक

वर्षभरात ११ नित्य अंक व एक दिवाळी अंक नियमितपणे प्रकाशित झाले व ते १२०० सभासदांपर्यंत छापील स्वरूपात व सुमारे ३०० सभासदांपर्यंत इ अंकाच्या रूपाने वितरित झाले. सर्व अंकांमध्ये मिळून अंकातील साहित्याला सुमारे ११३ QR Code द्वारे दृक्श्राव्य ध्वनि-चित्रफितीची जोड दिली गेली. नित्य दिवाळी अंक, इंग्रजी दिवाळी अंक व सुबोध ग्रामीण दिवाळी अंक मिळून १४ हजार प्रतींची ६० गावांमधील कार्यकर्त्यांद्वारा प्रकाशनपूर्व नोंदणी व वितरण झाले.

**▶ बोलका दिवाळी अंक**

पुणे नगर वाचन मंदिर, पुणे व छात्र प्रबोधन यांच्या संयुक्त विद्यमाने ऑक्टोबर व नोव्हेंबर या दिवाळीच्या सुट्टीतील काळात एक महिना फोनद्वारे मोफत ऐकता येईल असा बोलका दिवाळी अंक प्रकाशित करण्यात आला. दर आठवड्याला कथा, कविता, ललित लेख, प्रबोधनगीत, कलाकृती-विज्ञानप्रयोग, व्यक्तिविकसनपर लेख, कर्तृत्ववान व्यक्तींचे अनुभवकथन इ. आठ साहित्य प्रकारांच्या श्राव्य ध्वनिफिती विद्यार्थी फोनवरील १ ते ९ बटणांच्या साहाय्याने ऐकू शकले. महिन्याभरात ४० साहित्यकृती प्रक्षेपित करण्यात आल्या. सुमारे १० हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी हा बोलका दिवाळी अंक ऐकला. यावर्षी 'मिस्ड कॉल' देऊन हे साहित्य पूर्णत: मोफत ऐकण्याची विशेष सोय करण्यात आली होती.

### प्रकाशने

छात्र प्रबोधन मधील साहित्यामधून सुमारे २० पुस्तकांचे प्रकाशन करण्याच्या दृष्टीने वर्षभर काम चालू होते, त्यापैकी प्रवीण दवणे, आश्लेषा महाजन, कविता मेहेंदळे, भारत सासणे, सुहासिनी देशपांडे व अंजली कुलकर्णी यांची कथा-ललित व कवितासंग्रह मिळून सात पुस्तके प्रकाशित झाली. उर्वरित १३ पुस्तके निर्मितीच्या विविध टप्प्यांवर आहेत. ती येत्या सहा महिन्यांत प्रकाशित होतील. या व्यतिरिक्त 'प्रेरक कथा', 'हरित संदेश' व 'स्मृतीतुनी स्फुरो कृती' या पुस्तकांच्या पुढील आवृत्त्या, पुनर्मुद्रण प्रकाशित करण्यात आले. jpprakashane.org या संकेतस्थळाद्वारा सुमारे दीड लक्ष रुपये किंमतीच्या प्रकाशनांची विक्री झाली.

**▶ दिनदर्शिका**

खास कुमारांसाठी दिनदर्शिका प्रकाशित करण्याचे हे सहावे वर्ष. ग्रेगोरियन दिनांकासोबत राष्ट्रीय सौर दिनांक, प्रेरणादायी दिनविशेष, स्फूर्तिगीते, नावीन्यपूर्ण खेळ-कोडी व ४८ QR Code द्वारा स्फूर्तिगीतांच्या ध्वनिफिती, छात्र प्रबोधनचे १२ दिवाळी अंक, प्रेरणादायी चित्रफिती, इ. दृक्श्राव्य गोष्टींची जोड या दिनदर्शिकेला दिली गेली. एकूण ८,००० दिनदर्शिका सवलतीच्या दरात वितरित करण्यात आल्या.

### विद्यार्थ्यांसाठी ऑनलाइन उपक्रम

**▶ ऐपावाक (ऐका-पाहा-वाचा-करा)**

गेल्या वर्षी कोविड काळात सुरू केलेल्या ऐपावा, 'ऐका-पाहा-वाचा' या उपक्रमाला 'करा' द्वारे कृतीची जोड दिली गेली. १ मे ते २० जून या कालावधीत या उपक्रमात २३ वॉटस्ॲप गटांद्वारे ४,१५० सदस्य सहभागी झाले. यामध्ये रोज ऐका-पाहा-वाचा पैकी एक साहित्य व 'करा'मध्ये एक कृती गटावर पाठवली जायची व त्यावर प्रतिसाद देण्यासाठी गुगलफॉर्मची लिंक दिली जायची. ऐका-पाहा-वाचा या सदरात कथा, कविता, ललितलेख, स्फूर्तिगीते, कर्तृत्ववान व्यक्तींच्या कहाण्या, कल्पकता, सामाजिक जाणीव जागृती, कला-संस्कृती इ. विषयांवरील पिडीएफ फाईल्स, ध्वनिफिती व चित्रफिती पाठवल्या जायच्या; तर 'करा' या सदरात भन्नाट खेळ, प्रयोगातून प्रकल्पाकडे, कल्पक कलाकृती, उत्साहाला वाव देणाऱ्या कृती, कुटुंब व समाज विषयक जाणिवा समृद्ध करणाऱ्या कृतींचा समावेश होता. २० पेक्षा अधिक कृती पूर्ण केलेल्या सुमारे १७५ विद्यार्थ्यांना श्री. दत्ता टोळ यांच्या देणगीतून बक्षिसे, इ-प्रमाणपत्रे देण्यात आली. महाराष्ट्र टाइम्सचे संपादक श्री. पराग करंदीकर व ज्येष्ठ साहित्यिक श्री. प्रवीण दवणे यांच्या हस्ते दूरस्थ बक्षीस समारंभ व त्यांच्याशी गप्पांचे कार्यक्रम झाले.

**▶ ऐपावाक स्वयंविकास**

जूनपासून साप्ताहिक स्वरूपात हा कार्यक्रम वर्षभर राबविण्यात आला. दर शनिवारी ऐका-पाहा-वाचा-करा असे चार दुवे गटावर पाठवले जायचे. त्याचबरोबर या विद्यार्थ्यांसाठी मासिक गप्पांचा कार्यक्रमही योजला गेला. त्यामध्ये IAS अधिकारी संपदा मेहता, ऊर्जातज्ज्ञ विनय गडीकर, प्रबोधिनीच्या कार्यकर्त्या सुवर्णाताई गोखले, भाषातज्ज्ञ नीलिमा गुंडी, अंध विद्यार्थ्यांसाठी भरीव काम करणाऱ्या मीराताई बडवे यांच्याशी प्रेरणादायी गप्पा झाल्या. १५० विद्यार्थी या गटामध्ये सहभागी झाले होते. या गटातील काही पालकांचा 'संवादक' गट तयार करण्यात आला व त्यांच्याद्वारा

विद्यार्थ्यांसाठी गटागटात कार्यक्रम घेण्यात आले. त्यांच्या मासिक बैठकांमधून त्यासाठीचे प्रशिक्षण देण्यात आले. एकूण २५ सदस्य स्वयंसेवी वृत्तीने 'संवादक' म्हणून सहभागी झाले.

**▶ अभिवाचन कार्यशाळा व राज्यस्तरीय स्पर्धा**

जानेवारी २०२२ मध्ये अभिवाचन संदर्भात दोन दूरस्थ कार्यशाळा घेण्यात आल्या. अभिवाचनासाठी 'संहिता कशी लिहावी' याबाबत ज्येष्ठ साहित्यिक आश्लेषा महाजन व 'गद्य, पद्य अभिवाचन कसे करावे' याबाबत मयुरीताई, मानसीताई व अनघाताई या निगडीतील प्रबोधिनीच्या युवतींनी मार्गदर्शन केले. सुमारे २५० विद्यार्थी यामध्ये सहभागी झाले. प्रत्यक्ष राज्यस्तरीय अभिवाचन स्पर्धेत विद्यार्थ्यांनी कोणत्याही एका विषयावर छात्र प्रबोधन मासिकांतील साहित्याची निवड करून व त्याला संहितेची जोड देऊन ६ ते ८ विद्यार्थ्यांनी मिळून त्याचे ४० ते ५० मिनिटांचे अभिवाचन करावयाचे होते व त्याची चित्रफीत परीक्षणासाठी पाठवायची होती. एकूण ३७ संघांनी स्पर्धेत भाग घेतला. मातृमंदिर विश्वस्त संस्था, निगडी व छात्र प्रबोधन यांच्या संयुक्त विद्यमाने या स्पर्धा घेण्यात आल्या. पुणे, अंबाजोगाई, कराड, नांदेड येथील संघांनी बक्षिसे मिळवली.

## शिक्षक-पालकांसाठी उपक्रम

**▶ शिक्षकांसाठी प्रबोधन दूत योजना**

महाराष्ट्रातील २३ जिल्ह्यांमधील धडपडणाऱ्या ८२ शिक्षकांची या योजनेमध्ये निवड करण्यात आली. त्या सर्वांना सुमारे ७५० रुपयांचे छापील साहित्य (मासिके, पुस्तके, दिनदर्शिका इ.) मोफत पाठविण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी वाढावी, शिकण्याची हौस व विकासाची प्रेरणा वाढावी आणि सामाजिक भान वाढावे यासाठी या साहित्याचा उपयोग त्यांनी करावा, त्यासाठी नियमित व प्रासंगिक उपक्रम योजावेत अशी योजना होती. हे सर्व कसे करावे याबाबतचे मार्गदर्शन दरमहा दूरस्थ बैठकींद्वारे केले जायचे. जानेवारी २०२२ पासून या योजनेला प्रारंभ झाला. कोविडनंतर सुरू झालेल्या शाळा, अभ्यासक्रम पूर्ण करण्याचे प्राधान्य व वार्षिक परीक्षा यावर मात करत अनेक शिक्षकांनी या साहित्याचा उपयोग करून विविधांगी कार्यक्रम योजले. प्रशालेच्या १९८२ च्या तुकडीचे विद्यार्थी वामन पारखी व त्यांच्या वर्गातील अन्य चार जणांच्या पुढाकाराने व अर्थसाहाय्याने ही योजना कार्यान्वित करण्यात आली. त्याद्वारा सुमारे ७००० विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचता आले.

**▶ प्रबोधन संवादक**

पालकांसाठी मार्च २०२२ मध्ये या उपक्रमाला प्रारंभ झाला. सुमारे १५०० रुपयांची निवडक पुस्तके व अंक पालकांना सशुल्क देण्यात आले व या पुस्तकांचा उपयोग करून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासामध्ये पालक अधिक डोळसपणे व कृतिशीलपणे कसे योगदान करू शकतील यासाठी दरमहा दूरस्थ मार्गदर्शन, व्याख्याने व प्रश्नोत्तरांचे कार्यक्रम वर्षभर योजले जाणार आहेत. मार्चअखेर ५० पालकांनी या उपक्रमामध्ये नावनोंदणी केली आहे. त्या सर्वांना साहित्य पाठविले. मासिक दूरस्थ व्याख्यानांना एप्रिलपासून प्रारंभ होणार आहे.

## अन्य विशेष

१. छात्र प्रबोधन च्या संपादक मंडळात ज्येष्ठ पत्रकार, सकाळचे निवृत्त संपादक, लेखक श्री. मल्हार अरणकल्ले व अनुभवी व प्रयोगशील शिक्षिका, मराठी पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ व शालेय परीक्षा मंडळाच्या सदस्या श्रीमती स्वातीताई ताडफळे यांची विशेष भर पडली. त्यांच्या तज्ज्ञतेचा, संपर्कांचा व अनुभवाचा छात्र प्रबोधनला निश्चितच उपयोग होईल. वर्षभरात संपादक मंडळाच्या तीन बैठकी झाल्या.

२. छात्र प्रबोधनद्वारा यूट्यूब चॅनेल सुरू करण्यात आले आहे. आत्तापर्यंत १० चित्रफिती त्याद्वारे प्रसारित करण्यात आल्या आहेत. पुढील काळात त्याचा वापर अधिक प्रभावीपणे केला जाईल.

३. छात्र प्रबोधनला मिळणाऱ्या देणग्या दूरस्थ पद्धतीने स्वीकारता याव्यात, त्यांच्या देणगीच्या पावत्या तत्परतेने त्यांच्यापर्यंत पोहोचाव्यात या दृष्टीने इ-टेकद्वारा यंत्रणा विकसित केली गेली. त्यामध्ये प्रबोधिनीचे माजी विद्यार्थी-कार्यकर्ते अनिरूद्ध वाघ व सागर देशमुख यांनी मोलाचे सहकार्य केले.

४. वास्तुदेखभाल विभागाच्या सहकार्याने व मध्यवर्ती अर्थसाहाय्यातून विभागाचे रंगकाम व विद्युत व्यवस्थेचे नूतनीकरण करण्यात आले.

५. परदेशी असलेल्या माजी विद्यार्थ्यांनी सुमारे ६५०० डॉलरच्या देणग्या (ज्ञान प्रबोधिनी फाऊंडेशन, अमेरिका द्वारा) छात्र प्रबोधन साठी दिल्या. कोविडच्या पार्श्वभूमीवर ही मदत निश्चितच मोलाची ठरली.

६. विभागातील सदस्यांच्या सहभागातून पुढील दहा वर्षांच्या भवितव्य लेखाची प्रक्रिया वर्षभर चालू होती.

७. विभागातील सदस्यांच्या वर्षभरात सहा बैठकी व चार कार्यक्रम उत्साहात पार पडले. साप्ताहिक उपासना, दैनंदिन प्रार्थना, साप्ताहिक सहविचार बैठकी, मा. संचालक यांच्यासमवेत मासिक सहविचार बैठकी व मा. संचालकांची विभागाला वार्षिक भेट व मार्गदर्शन यांमधून विभागातील सदस्यांची वैचारिक तयारी व्हायला, कामासाठी पोषक वातावरण टिकून राहायला व कामाची प्रेरणा वाढायला निश्चितच मदत झाली.

# ५ नेतृत्व संवर्धन केंद्र

## प्रशासकीय नेतृत्व विकसन

▶ **फाऊंडेशन व प्रिपरेटरी वर्ग**

**अभ्यासक्रम व सत्रे :** उन्हाळ्याच्या सुट्टी दरम्यान दोन दिवसांचा यूपीएस्सी परिचय वर्ग घेण्यात आला. त्यापाठोपाठ १५ दिवसांचे दोन यूपीएस्सी प्रशिक्षण वर्ग झाले आणि वार्षिक यूपीएस्सी नेतृत्व पायाभरणी व प्रिपरेटरी वर्गाला सुरुवात झाली. जिज्ञासा - १६ वर्गाची सुरुवात १९ जुलै २०२१ रोजी आभासी माध्यमातून झाली. पुढे ही सत्रे आभासी आणि प्रत्यक्ष अशा दोन्ही माध्यमातून वर्षभर सुरू होती. वर्गात एकूण १६ जिल्ह्यांमधून ५५ युवक-युवतींचा सहभाग होता. प्रिपरेटरीची प्रत्येकी दोन तासांची १०० सत्रे झाली. यात राज्यशास्त्र, इतिहास, भूगोल, विज्ञान आणि तंत्रज्ञान, प्रशासकीय सेवा योग्यता चाचणी, नैतिकता, अर्थशास्त्र याव्यतिरिक्त यूपीएस्सी परिचय, चालू घडामोडी, अभ्यास कौशल्ये ही सत्रे घेतली. नेतृत्व पायाभरणीच्या नियोजनाप्रमाणे दहा सत्रे 'नेतृत्व कौशल्य' आणि आठ सत्रे 'व्यक्तिमत्त्व विकसन' या विषयावर झाली. विषय शिकवून पूर्ण झाल्यानंतर प्रत्येक विषयाची चाचणी, लेखनसराव झाला. दोन्ही वार्षिक सत्रांमध्ये संबंधित विषयांवर मुलांनी सादरीकरण केले. नेतृत्व पायाभरणी या भागात राजगड रात्रसहल, नेतृत्व प्रशिक्षण शिबिर आणि ग्रामीण परिचय शिबिर उत्साहपूर्वक पार पडले. विद्यार्थ्यांच्या पुढाकाराने गणेशोत्सव, सूर्यनमस्कार संकल्प आणि शहरी प्रश्नांवर प्रकल्पही झाले. आभासी माध्यमातून पालक बैठका झाल्या. यात पालकांचे शंका निरसन केले तसेच पुढे वर्गाची माहिती वेळोवेळी व्हॉटस् ॲप गटावर दिली जात होती. फेब्रुवारी महिन्यात अंतिम परीक्षा घेतली. सामान्य अध्ययन, बौद्धिक क्षमता विकसन, नेतृत्व कौशल्ये आणि अभ्यास कौशल्ये या विषयांच्या परीक्षा यूपीएस्सी प्राथमिक परीक्षेच्या धर्तीवर घेतल्या.

प्रिपरेटरी चे ७०० गुण, नेतृत्व पायाभरणी चे ३०० गुण अशा एकूण वर्षभराच्या १००० गुणांवर आधारित जिज्ञासा-१६ वर्गाचा निकाल जून महिन्यात जाहीर झाला. या मध्ये प्रज्ञा बलदावा - प्रथम क्रमांक, पलक अगरवाल - द्वितीय क्रमांक व समाधान मिसाळ - तृतीय क्रमांक आणि १३ विद्यार्थ्यांना विशेष गुणवत्तेचे पारितोषिक दिले.

वर्षभरात अनेक अधिकाऱ्यांची 'अनुभवकथने' विभागातर्फे घेतली. यात प्रामुख्याने स्पर्धा परीक्षा देऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी, नेतृत्वगुणांचे महत्त्व आणि त्याचा प्रत्यक्ष कामातला अनुभव या विषयावर मार्गदर्शन मिळाले. १४ ऑगस्ट २०२१ रोजी झालेल्या वर्षारंभ समारंभात पिंपरी-चिंचवड मनपाचे आयुक्त मा. राजेश पाटील (IAS) तसेच वर्षान्त उपासनेला मा. उज्ज्वल चव्हाण (IRS) यांचे मार्गदर्शन लाभले. मा. सागर डोईफोडे (IAS) यांच्या व्याख्यानाला विविध महाविद्यालयांमधील १५० विद्यार्थ्यांचा सहभाग होता.

> नेतृत्व संवर्धन केंद्राचे माजी विद्यार्थी, कु. मृणाली जोशी, शुभम जाधव, पार्थ कश्यप, दिव्या गुंडे यांची २०२० साली भारतीय प्रशासकीय सेवेत निवड झाली. विभागातर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला. केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेकडे बघण्याचा दृष्टिकोन, अभ्यास नियोजन या विषयांवर एकूण पाच सत्रे त्यांनी जिज्ञासा वर्गावर घेतली.

**अनुभव शिक्षण :** केंद्रातील क्षमतावान आणि आर्थिकदृष्ट्या गरजू विद्यार्थ्यांना दरवर्षी शुल्कात सवलत आणि शिष्यवृत्ती देण्यात येते. त्याबरोबरीने प्रबोधिनीतील विविध विभागांमध्ये कामाचा अनुभव घेण्याची संधीही विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिली जाते. यासाठी अनुभव शिक्षण योजना या वर्षीही राबवण्यात आली. चार विद्यार्थ्यांनी प्रत्येकी १०० तास काम करण्याचा अनुभव या योजनेच्या माध्यमातून घेतला. शैक्षणिक उपक्रम संशोधिका, सामाजिक शास्त्र अध्ययन केंद्र, छात्र प्रबोधन, नेतृत्व संवर्धन केंद्र या विभागांमध्ये विद्यार्थ्यांनी काम केले. यासाठी श्री. संजय जोगळेकर यांनी रु. २०,०००/- व गरजू विद्यार्थ्यांच्या शुल्कासाठी रु. ४०,०००/- चे अर्थसाहाय्य केले.

## सामाजिक व संघटनात्मक नेतृत्वगुण विकसन

▶ **व्याख्यानसत्रे, कार्यशाळा व शिबिरे**

सामाजिक आणि संघटनात्मक नेतृत्वगुणविकसनाच्या दिशेने प्रासंगिक कार्यशाळा व शिबिरे यांच्या माध्यमातून काम झाले.

ज्ञान प्रबोधिनी शैक्षणिक उपक्रम संशोधिकेच्या व डोंबिवली केंद्राच्या गटासाठी संवाद कौशल्ये, ज्ञान प्रबोधिनीच्याच चिपळूण विस्तार केंद्रासाठी संस्थात्मक नेतृत्व विकसनाचे प्रशिक्षण शिबिर, नवोन्मेष विद्यालय, चाकण येथील शिक्षकांसाठी शिक्षक नेतृत्व प्रशिक्षण कार्यशाळा आणि प्रज्ञा मानस संशोधिकेतील विशेष बुद्धिमत्तेच्या संवर्धनाचे शिक्षण घेणाऱ्या व्यावसायिक गटासाठी नेतृत्व विकसन या विषयांवरील सत्रे झाली.

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकरिता फर्ग्युसन महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे सत्र शिवे (ता. मावळ) येथे झाले.

### संकलन, संशोधन व अभ्यास

ज्ञान प्रबोधिनीच्या नेतृत्व विषयक प्रकाशित साहित्याचा व त्यानुसार स्वीकारलेल्या नेतृत्वगुणांचा अभ्यास करण्यात आला. नेतृत्व प्रशिक्षण वर्गाची परिणामकारकता तपासण्यासाठी विद्यावाचस्पती पदवीचे प्रबंध लेखन पूर्ण झाले. विभागातील साहस शिबिर व ग्रेट भेट मुलाखत स्पर्धा या उपक्रमांचा अभ्यास करून राष्ट्रीय स्तरावरील नियतकालिकांमध्ये शोधनिबंध प्रकाशित झाले.

**▶ नेतृत्व प्रशिक्षण वर्गाची परिणामकारकता तपासणाऱ्या विद्यावाचस्पती पदवीसाठीच्या संशोधनाची संक्षिप्त माहिती**

ज्ञान प्रबोधिनी नेतृत्व संवर्धन केंद्रात चालवल्या जाणाऱ्या प्रशासकीय नेतृत्व संवर्धनाच्या वर्गाची परिणामकारकता तपासणे अशा उद्देशाने एक वर्षाच्या प्रशिक्षणाच्या अखेरीस नेतृत्वाची कौशल्ये आणि वर्तन यासंबंधी प्रशिक्षणार्थींमध्ये काय बदल होतात हे पूर्वचाचणी आणि प्रशिक्षणोत्तर चाचणी यांच्या आधारे तपासणे असे या संशोधन अभ्यासाचे स्वरूप होते. तसेच प्रशिक्षणार्थींमध्ये झालेले बदल हे या प्रशिक्षण वर्गाचा परिणाम म्हणूनच झालेले आहेत हे पडताळण्यासाठी नेतृत्व प्रशिक्षण घेतलेल्या आणि नेतृत्व प्रशिक्षण न घेतलेल्या अशा दोन गटांच्या कौशल्य आणि वर्तनांचा तौलनिक अभ्यास या संशोधनात केला गेला.

नेतृत्व कौशल्ये म्हणून नऊ कौशल्यांची निवड केली आणि वर्तनाचे दहा पैलू निश्चित केले. हे तपासण्यासाठी दोन मानसशास्त्रीय चाचण्या आणि प्रशिक्षणादरम्यान सहभागी युवक, युवतींनी दिलेले लेखी प्रतिसाद यांचा वापर केला. नेतृत्व कौशल्यांवर झालेला परिणाम तपासण्यासाठी अमेरिकेतील दोन शास्त्रज्ञांनी विकसित केलेली 'Leadership Skills Inventory' ही चाचणी वापरली. नेतृत्वविषयक वर्तनावर होणारा परिणाम तपासण्यासाठी वाच. उषाताई खिरे यांच्या मार्गदर्शनातून तयार झालेली 'Leadership Behavior Inventory' वापरली. याशिवाय दहा उपक्रमांचे प्रतिसाद अभ्यासून त्यातूनही सहभागी सदस्यांमध्ये झालेले बदल तपासले.

या संशोधनाचे थोडक्यात निष्कर्ष पुढीलप्रमाणे आले:

१. प्रशिक्षण वर्गातून निवडलेल्या विद्यार्थ्यांच्या कौशल्यांचे विकसन होते.
२. प्रशिक्षण वर्गातून नेतृत्वाला आवश्यक वर्तन बदलाची सुरुवात होते. मात्र त्याचा वेग कमी आहे.
३. ग्रामीण प्रशिक्षणार्थींमध्ये हे कौशल्य व वर्तनातील बदल जास्त वेगाने होतात असे दिसले.
४. युवक सदस्यांमध्ये सकारात्मक बदल होण्याचे प्रमाण अधिक दिसले.

ज्ञान प्रबोधिनीतील नेतृत्वगुणविकसनाच्या अनौपचारिक प्रक्रिया नेतृत्व संवर्धन केंद्रातील वर्गांमुळे अनेकांना खुल्या झाल्या. संशोधनादरम्यान केलेल्या निरीक्षणामधून आणि माहितीच्या विश्लेषणामधून नेतृत्वगुण विकसनाच्या प्रबोधिनीतील अनौपचारिक आणि शास्त्रीय पद्धतींवरचा विश्वास आणखी दृढ झाला. अशा संशोधनामुळे त्यातल्या परिणामकारकतेबद्दल आणि विस्ताराच्या संधींबद्दल अधिक नेमकेपणाने विचार करता आला.

## युवोन्मेष

नेतृत्व या विषयावरचा आशय निर्माण होत राहावा यासाठी प्रकाशित होणाऱ्या युवोन्मेषचे अंक इ-स्वरूपात, ७५०० हून अधिक युवक, युवतींना मोफत वितरण करण्यात आले. यावर्षी युवोन्मेषच्या अंकांच्या निर्मितीचा अनुभव तीन गटांनी घेतला. त्या-त्या विभागात युवक-युवतींच्या नेतृत्वगुण विकसनासाठी चालणाऱ्या कामांचे अनुभव, त्या कामाच्या मागच्या प्रेरणांचा शोध व त्या-त्या क्षेत्रातील नेतृत्वाची भूमिका यांवर मांडणी केली गेली.

यावर्षी विविध युवागटांनी केलेली विशेषांकांची निर्मिती:

१. ज्ञान प्रबोधिनी ज्ञानसेतू गट - राष्ट्रीय एकात्मता विशेषांक
२. 'स्व'-रूपवर्धिनी कार्यकर्ता गट- संघटनात्मक नेतृत्व विशेषांक
३. ज्ञान प्रबोधिनी युवती संघटन गट - स्त्री नेतृत्व व युवती संघटन विशेषांक

## नेतृत्व प्रशिक्षण केंद्र

वेल्हे येथे चालू असलेल्या नेतृत्व संवर्धन केंद्राच्या ले. कर्नल सुहास गोगटे नेतृत्व प्रशिक्षण केंद्राच्या वास्तूचे बांधकाम नियोजनाप्रमाणे चालू राहिले. मार्च २१ मध्ये भूमिपूजन झालेल्या या वास्तूचे बांधकाम डिसेंबर २३ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजित आहे. त्यादृष्टीने आवश्यक साधनांची जुळवाजुळव करत आहोत.

## नेतृत्व संवर्धन केंद्रातील विद्यार्थ्यांचे अनुभव

**ऋत्विजा देशमुख :** गेल्या वर्षी मी स्वयंसेवक म्हणून सामाजिक शास्त्र अध्ययन केंद्रात श्री. अमोलदादा फाळके यांच्या मार्गदर्शनाखाली काम केले. मला तिथे दादांनी कोणती कामे कशी करावी याबद्दल मार्गदर्शन केले. वेळेचे नियोजन, पद्धतशीरपणा, रोजचे अनुभवलेखन करणे, स्वतःच्या कामांची यादी असलेली डायरी करणे व ती रोज अपडेट करणे, इ. गोष्टी आयुष्यात किती महत्त्वाच्या असतात हे मी अनुभवले. त्यातून स्वतःमध्ये येणारी तत्परता आणि शिस्तबद्धता मला जाणवली. तसेच कोणतेही काम खूप काही शिकवून जाते हे कळलं. त्यामुळे मी स्वयं परीक्षण करायला शिकले व ते आयुष्यातील प्रत्येक टप्प्यावर खूप महत्त्वाचे असते हे मला जाणवले. त्यानंतर स्व-जाणीव होणं खूप म्हणजे खूपच महत्त्वाचं असतं. म्हणजेच मला नेमके आयुष्यात काय करायचंय? हे आयुष्य मला कशासाठी दिलंय? यावर मी विचार करतेय.

**सूरज मंगरुळे :** It was a wonderful experience to work with the EARC department of JP. It gave me an exposure of teaching, where I used to teach slum based students ranging from 5th to 10th class. Mainly we focused on experience learning having hand crafting, science experimenting in curriculum. Other than this, students were enthusiastically participated in yoga, sports activities, etc. In the course of time I realised my own potential of management of all these things and it also gave an ground report of functioning of education system.

### नियमित उपक्रम

▶ **केंद्रीय लोकसेवा आयोग - नियमित वर्ग २०२१-२२**

केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेसाठी या वर्षी Comprehensive आणि Facilitation अशी तुकडी दूरस्थ व प्रत्यक्ष पद्धतीने झाली. एकूण ५८ विद्यार्थ्यांनी वर्गाला प्रवेश घेतला. यासाठी केंद्राच्या माजी विद्यार्थ्यांनी विषय मार्गदर्शन केले.

**पालक मेळावा :** नियमित वर्गाचा वर्षारंभ उपासना व पालक मेळावा दूरस्थ पद्धतीने झाला. या मेळाव्यामध्ये वाच. सविताताईंनी ज्ञान प्रबोधिनी व स्पर्धा परीक्षा केंद्राबद्दल माहिती दिली व वाच. विवेकराव कुलकर्णी यांनी स्पर्धा परीक्षेचे स्वरूप व त्यासाठीच्या तयारीमध्ये पालकांची व इतर कुटुंबियांची भूमिका याविषयी पालकांशी संवाद साधला. या मेळाव्यामध्ये केंद्राची माजी विद्यार्थिनी व राजस्थान मध्ये नुकत्याच रुजू झालेल्या IAS अधिकारी स्नेहल धायगुडे यांनी केंद्रातील त्यांच्या प्रवासाविषयी अनुभवकथन केले.

**समुपदेशन सत्र :** सर्व विद्यार्थ्यांचे समुपदेशन झूमच्या माध्यमातून प्रत्येकी अर्धा तास वाच. सविताताई यांनी घेतले. सर्व विद्यार्थ्यांच्या समुपदेशनाच्या तीन फेऱ्या झाल्या.

**News Circle :** दिवाळीनंतर News Circle ची सत्रे मा. शशिकांत गोडबोले सरांनी घेतली. यामध्ये वर्तनमानपत्र वाचन, बातम्यांचे विश्लेषण, गटचर्चा व वक्तृत्व याबद्दलचे मार्गदर्शन केले गेले.

**सराव परीक्षा :** UPSC 0th Attempt - UPSC Mains चा अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर त्यावर आधारित सराव परीक्षा झाली. सर्व अनिवार्य पेपर मिळून एकूण १२५० गुणांचे पाच पेपर्स (प्रत्येकी २५० गुण) घेतले होते. केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या पूर्वपरीक्षेसाठी १२ सराव चाचण्यांची मालिका झाली.

**साप्ताहिक उपासना :** शनिवारी नियमित वर्ग व अभ्यासिका सदस्य यांची साप्ताहिक उपासना असते. उपासनेच्या माध्यमातून वाच. सविताताई व वाच. विवेकराव विद्यार्थ्यांशी संवाद साधतात. या वर्षात दूरस्थ व प्रत्यक्ष पद्धतीने उपासना घेतल्या गेल्या.

### UPSC Mission batch

पूर्वपरीक्षा देऊन मुख्य परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी Mission mains चा वर्ग घेण्यात आला. यामध्ये पूर्ण गुणांच्या चार परीक्षा झाल्या व त्याची चर्चासत्रे ही झाली. या वर्गाला २०२१ या वर्षातील यूपीएससी यशवंतांनी मार्गदर्शन केले.

### अरुणाचल प्रदेश नागरी सेवा परीक्षा (APPSC)

मुलाखतीला पात्र झालेल्या विद्यार्थ्यांसाठी दूरस्थ सराव मुलाखती आयोजित केल्या होत्या. एकूण १४ विद्यार्थी मुलाखतीला होते. या वर्गामध्ये विविध सद्यघटना, मुलाखतीची तयारी पद्धत, गट मुलाखती, अनुभवकथन अशा विषयांवर सत्रे झाली. सराव मुलाखतीला श्री. अतुलचन्द्र कुलकर्णी (DG, कारागृह प्रशासन), प्रा. प्रशांत दिवेकर, ऋजुता बनकर (ICLS), वाच. विवेक कुलकर्णी, श्री. राजीव रानडे (निवृत्त आयकर आयुक्त), डॉ. कौस्तुभ बोंद्रे, वाच. अजित कानिटकर, वाच. सविता कुलकर्णी आणि स्नेहल धायगुडे (IAS, राजस्थान), श्री. प्रवीण इंगवले (IPS, मणिपूर), मृणाली जोशी (IAS) हे अधिकारी व तज्ज्ञ Panel म्हणून होते.

**अरुणाचल प्रदेश दौरा**

अरुणाचल प्रदेशातील रोईंग इथल्या रिवॉच संस्थेमध्ये स्पर्धा परीक्षा केंद्राचे उद्घाटन वाच. सविताताई कुलकर्णी यांच्या हस्ते झाले. ज्ञान प्रबोधिनी स्पर्धा परीक्षा केंद्राच्या मार्गदर्शनाने हे केंद्र पुढील काळात चालणार आहे. प्रमुख पाहुणे म्हणून IAS, २००१ अधिकारी आणि सध्या अरुणाचल प्रदेशचे Planning Commissioner श्री. प्रशांत लोखंडे उपस्थित होते. तेजपूर, आसाम SP श्री. धनंजय घनवट आणि दिग्बोई, आसाम DFO कस्तुरी सुळे हे स्पर्धा परीक्षा केंद्राच्या Network मधील अधिकारी उपस्थित होते. केंद्रातर्फे गेल्या सात वर्षांपासून अरुणाचल प्रदेश राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षेसाठी स्थानिक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन दिले जात आहे. सेवा भारती आणि ज्ञान प्रबोधिनी असे संयुक्तपणे चालवल्या जाणाऱ्या वर्गांमध्ये शिकवण्यासाठी, तसेच विद्यार्थ्यांचे mentoring करण्यासाठी स्पर्धा परीक्षा केंद्राचे माजी विद्यार्थी सुरुवातीला प्रत्यक्ष तिथे जाऊन, तर गेली दोन वर्षे दूरस्थ माध्यमातून सहभागी होत आहेत. या वर्षीच्या वर्गातील १३ विद्यार्थ्यांनी परीक्षेत यश मिळवले, त्यापैकी पाच विद्यार्थी (पूजोम बूची, मापे झिर्डो, कालोम तासिंग, असुनाम पेरमे आणि टिंग पेरॉन) या कार्यक्रमाला उपस्थित होते.

▶ **अंतिम निकाल व कौतुक समारंभ**

अरुणाचल प्रदेश नागरी सेवा परीक्षेसाठी आपण मार्गदर्शन केलेल्या गटातल्या तेरा विद्यार्थ्यांची विविध पदांसाठी अंतिम निवड झाली. सर्कल अधिकारी, पोलीस उपाधीक्षक आणि साहाय्यक कक्ष अधिकारी अशा पदांवर विद्यार्थी निवडले गेले.

या सर्वांचा कौतुक कार्यक्रम दूरस्थ पद्धतीने आयोजित केला होता. यामध्ये निवड झालेले विद्यार्थी, त्यांच्यासाठी मार्गदर्शन केलेले मार्गदर्शक, मुलाखत प्रशिक्षणात सहभागी झालेले मार्गदर्शक, तसेच श्री. प्रशांत लोखंडे (आयुक्त, नियोजन, अरुणाचल प्रदेश) आणि ज्ञान प्रबोधिनीचे काही सदस्य उपस्थित होते. श्री. विजय स्वामी आणि श्रीमती मौसमी गोगोई हेही उपस्थित होते. सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांच्याविषयी माहिती सर्व उपस्थितांना देण्यात आली. चार विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले.

## व्यक्तिमत्त्व विकसन उपक्रम

▶ **अभ्यास सहल**

२०२१-२२ या तुकडीच्या विद्यार्थ्यांच्या वेल्हे येथे झालेल्या सहलीमध्ये वेल्ह्यातील कातकरी वस्ती, कोंढवली येथील वस्तीवरील लोकांचे राहणीमान, त्यांना भेडसावणारे प्रश्न, व्यवसाय व प्रबोधिनीशी त्यांचा आलेला संपर्क याविषयी गप्पा झाल्या. पंचायत समिती वेल्हे मध्ये विविध अधिकारी भेटी झाल्या. जास्वंद वसतिगृह भेट झाली.

▶ **विकासमित्र प्रकल्प**

शैक्षणिक उपक्रम संशोधिकेच्या विकासमित्र प्रकल्पात केंद्रातील १८ विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन वेल्ह्यातील शाळांमध्ये कौशल्य प्रशिक्षणाचे तास घेतले.

▶ **रक्तदान शिबिर**

ज्ञान प्रबोधिनीचे संस्थापक मा. कै. अप्पा पेंडसे यांच्या स्मृती-प्रीत्यर्थ प्रबोधिनीमध्ये झालेल्या रक्तदान शिबिरात स्पर्धा परीक्षा केंद्राच्या ३२ विद्यार्थ्यांनी रक्तदान केले.

▶ **गणेश आरती**

गणेशोत्सवादरम्यान गणपतीच्या आरतीसाठी प्रमुख पाहुण्या म्हणून प्रशालेच्या माजी विद्यार्थिनी व प्रिशन्ट कंपनीच्या संचालिका श्रीमती दीप्ती वाघमारे उपस्थित होत्या.

▶ **दिवाळी फराळ**

केंद्रीय लोकसेवा आयोगाची मुख्य परीक्षा असल्यामुळे दिवाळीच्या वेळी अभ्यासिकेत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी भाऊबिजेच्या दिवशी उपासनेच्यावेळी फराळाचे आयोजन केले होते. एकूण ६० विद्यार्थी, सविताताई व विवेकराव यांनी उपासना करून फराळाचा आनंद घेतला.

## अन्य उपक्रम

▶ **स्पर्धात्मक कल चाचणी**

स्पर्धा परीक्षा देण्याची इच्छा असलेल्या विद्यार्थ्यांसाठी स्पर्धात्मक परीक्षेसाठी आवश्यक कौशल्ये, क्षमता आणि वृत्ती तपासण्यासाठी एक कलचाचणी (Competitive Aptitude Assessment Tool) विकसित करण्याचे काम चालू आहे.

▶ **यूपीएस्सी अधिकारी मेळावे**

आपल्या केंद्रातून प्रशिक्षण घेतलेले विद्यार्थी भारतातील सर्व राज्यांमध्ये आणि अन्य देशांमध्ये विविध अधिकारी पदांवर कार्यरत आहेत. सर्वांशी संपर्क राहावा म्हणून आपण दूरस्थ मेळाव्यांचे आयोजन केले होते. मागील वर्षी दहा मेळावे झाले.

या वर्षी पुढील मेळावे झाले –

**मेळावा क्र. ११ :** 'How politicians think about policy making and the politician-administrator interface functioning in various ministries' या विषयावर विविध मंत्रालयांमध्ये महत्त्वाच्या पदांवर काम करणाऱ्या पाच वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या मेळाव्यात अनुभव मांडले.

**मेळावा क्र. १२ :** 'Challenges in the implementation of Administrative and Police Reforms' हा मेळाव्याचा विषय होता. श्री. नीळकंठ आव्हाड (Tax Commissioner, पंजाब) यांनी प्रशासकीय सुधारणा राबवताना कोणत्या आव्हानांना तोंड द्यावे लागते याविषयी, तर श्री. महेश भागवत (पोलीस आयुक्त, राचकोंडा, तेलंगणा) यांनी पोलीस यंत्रणेतील सुधारणांविषयी मांडणी केली.

**मेळावा क्र. १३ :** Concern Sharing by Officers and Experience sharing by mentors या अनुषंगाने झालेल्या बैठकीत प्रशासकीय सेवांनुसार अधिकाऱ्यांचे गट करून त्या गटांमध्ये ज्येष्ठ mentors बरोबर चर्चा करणे असे स्वरूप होते.

▶ **JP Healthcare Policy Meet**

केंद्राच्या यूपीएस्सी अधिकारी गटापैकी काही डॉक्टर्स अधिकाऱ्यांच्या पुढाकारातून आपल्या देशाच्या आरोग्यविषयक धोरणाचा अभ्यास करणे, त्यात कुठले बदल आणि सुधारणा करता येतील या विषयी चिंतन व मांडणी करणे या हेतूने JP Healthcare Policy या नावाचा अभ्यास गट सुरू केला होता. यूपीएससी अधिकाऱ्यांनी कोविड साथीच्या पार्श्वभूमीवर देशाच्या आरोग्य व्यवस्थेविषयी, त्यातील प्रश्नांविषयी आणि संभाव्य उपाययोजनांविषयी काही धोरण निश्चित केले.

▶ **एमपीएससी अधिकारी मेळावे**

**मेळावा क्र. १ :** 'कोविड आपत्तीमुळे आपल्या नियमित कामांमध्ये कोणत्या प्रकारचे नवीन प्रश्न निर्माण झाले आणि ते हाताळण्यासाठी करावे लागलेले बदल' याविषयी चार अधिकाऱ्यांनी कोविड काळातील त्यांचे काम, आलेल्या अडचणी व त्यावर कशी मात केली याबद्दल मांडणी केली.

**मेळावा क्र. २ :** 'महाराष्ट्रातील सुशासनाची आव्हाने - कायदा आणि सुव्यवस्था' या विषयावर श्रीमती गीता चव्हाण (DCP मुंबई) यांनी पोलीस सेवेत नव्याने रुजू होणाऱ्या अधिकाऱ्यांच्या प्रशिक्षणाविषयीचे अनुभव मांडले. श्री. रमेश धुमाळ (IG मुंबई) यांनी गडचिरोली जिल्ह्यात नक्षलवाद्यांविरुद्ध कारवाई प्रसंगी झालेल्या चकमकीचे थरारक अनुभव सांगितले. श्री. अतुलचंद्र कुलकर्णी, महाराष्ट्र CID (DG) यांनी समारोप करताना पोलीस उपनिरीक्षकांना दिल्या जाणाऱ्या प्रशिक्षणाच्या अभ्यासक्रमातील महत्त्वाच्या मुद्द्यांचा उल्लेख केला.

**मेळावा क्र. ३ :** मंत्रालयातून दिसणारा महाराष्ट्र या विषयावर सध्या अपर सचिव म्हणून काम करणारे श्री. सचिन सहस्रबुद्धे आणि श्री. संतोष रोकडे यांनी मंत्रालयातील विभागांची कार्यक्षमता आणि प्रभाव त्या-त्या विभागांशी निगडित संचालनालय किंवा आयुक्तालयांच्या कामगिरीशी कसा जोडलेला असतो, याविषयी सांगितले.

महसूल विभागात काम करत असताना आलेल्या अनुभवांची मांडणी श्री. विशाल दौंडकर (तहसीलदार, रायगड) यांनी मंत्रालयात केली.

## यूपीएस्सी २०२१ परीक्षेतील यशवंतांचा कौतुक समारंभ व अधिकारी मेळावा

केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या २०२१च्या परीक्षेमध्ये केंद्रातील २४ विद्यार्थी अंतिम यादीमध्ये निवडले गेले. त्यांच्या कौतुक समारंभाच्या निमित्ताने पुण्यामध्ये कार्यरत असणाऱ्या आपल्या केंद्राच्या २५ अधिकाऱ्यांनी प्रबोधिनीत येऊन अनौपचारिक कार्यक्रमात सहभाग घेतला. १५ यशवंत, त्यांचे पालक, शिक्षक, आणि प्रबोधिनीच्या अन्य विभागातील सदस्य असे या मेळाव्याला उपस्थित होते.

## Networking - अधिकारी भेटी

स्पर्धा परीक्षा केंद्राच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त केंद्राच्या संपर्कातील अधिकाऱ्यांना, तसेच विविध क्षेत्रांमध्ये काम करणाऱ्या माजी विद्यार्थ्यांना भेटण्यासाठी काही संपर्क-दौऱ्यांचे आयोजन या वर्षात केले जात आहे.

अधिकाऱ्यांशी असलेला स्नेह वाढावा, आपापल्या कार्यक्षेत्रांमध्ये ते करत असलेल्या कामांची दखल घ्यावी आणि पुढील कारकीर्दीसाठी त्यांना शुभेच्छा द्याव्यात यासाठी हे दौरे आयोजित केले आहेत.

**▶ सोलापूर-हराळी दौरा**

वाच. विवेक कुलकर्णी व वाच. सविता कुलकर्णी यांनी ज्ञान प्रबोधिनी सोलापूर केंद्र व हराळी केंद्र, तसेच तिथल्या अधिकाऱ्यांना भेट दिली.

१. शमा ढोक (निवासी उपजिल्हाधिकारी, सोलापूर)
२. तेजस्वी सातपुते (पोलीस अधीक्षक, सोलापूर)
३. धनराज पांडे (उपायुक्त, महानगरपालिका, सोलापूर)
४. अजयसिंह पवार (वित्त व लेखाधिकारी, जि. परिषद, सोलापूर)
५. अंजली हजारी (तहसीलदार, सोलापूर)
६. योगीता कोल्हे (तहसीलदार, व्यवस्थापक, तुळजाभवानी देवस्थान, तुळजापुर)

**▶ सांगली-कोल्हापूर-रत्नागिरी दौरा**

१. श्री. अतुल पाटील (मुख्याधिकारी, विटा, जिल्हा नगर प्रशासन अधिकारी, सांगली)
२. श्रीमती मेघना लोंढे (अन्न व औषधे सुरक्षा अधिकारी)
३. श्रीमती किरण कुलकर्णी (उपजिल्हाधिकारी, सांगली)
४. श्री. विशाल नरवडे (IAS, साहाय्यक जिल्हाधिकारी, सांगली)
५. श्री. सुरेंद्र पाच्छापूरकर (भारतीय जीवन विमा निगम - विशेष व्यवसाय अधिकारी)
६. श्रीमती शिल्पा ओस्वाल (साहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी),
७. श्री. अभिजित चौधरी (जिल्हाधिकारी, सांगली)
८. श्री. सुशांत बनसोडे (उपविभागीय अधिकारी, कोल्हापूर)
९. श्री. शैलेश बलकवडे (पोलीस अधीक्षक, कोल्हापूर)
१०. श्रीमती सविता लष्करे (उपजिल्हाधिकारी, पुनर्वसन, रत्नागिरी)

**▶ महाराष्ट्र दौरा**

केंद्रात काम केलेला समन्वयक अजित शिंदे याने मोटर सायकल वरून महाराष्ट्रामध्ये विविध जिल्ह्यांमध्ये प्रवास केला. अधिकाऱ्यांची सदिच्छा भेट घेऊन त्यांना स्मृतिचिन्ह दिले आणि गप्पासुद्धा झाल्या. नाशिक, धुळे, जळगाव, गडचिरोली, नागपूर, चंद्रपूर, अकोला व अमरावती अशा १६ जिल्ह्यांमध्ये प्रवास झाला.

'सहकार्याची प्रबल भावना ।
हेचि शिक्षणाचे मुख्य सूत्र जाणा ।
सहकार्यावाचोनि शिक्षणा ।
महत्त्व नाही ।।३३।।

व्हावे परस्परांशी पूरक ।
हेचि आहे शिक्षणाचे कौतुक ।
व्यक्तिनिष्ठतेने भयाण दुःख ।
मानव-जीवनी ।। ३४।।'

(श्री तुकडोजी महाराज रचित ग्रामगीता, अध्याय १९)

'एरव्ही चौदा विद्या, चौसष्ट कला ।
काय करावे शिकोनी गलबला?
जो दुसऱ्याच्या कामी न आला ।
व्यर्थ मेला अभिमानाने ।।८५।।

कमीतकमी गरजांत राहिला ।
अधिकांत अधिक उपकार केला ।
समाजाशी समरस झाला ।
तोचि खरा कलावंत ।।८६।।'

(श्री तुकडोजी महाराज रचित ग्रामगीता, अध्याय ३६)

## ७ प्रज्ञा मानस संशोधिका

प्रज्ञा मानस संशोधिका आपल्या विविध उपक्रमांद्वारा २०२१-२२ या वर्षी १५,००० हून अधिक लोकांपर्यंत पोहोचली आहे. यात संशोधनातील प्रतिसादी व्यक्तींसोबत थेट उपक्रमातील सहभागी लाभार्थींपर्यंत मोठी व्याप्ती आहे.

| | |
|---|---|
| संशोधन (६०००+) | समुपदेशन (१००+) |
| अभिक्षमता मापन (४०००+) | क्षमता संवर्धन (४००+) |
| मानव संसाधन (१०००+) व्यवस्थापन | शैक्षणिक अभ्यासक्रम (१००+) |

### संशोधन उपविभाग

**▶ युवा-साथी** (Palladium-Kyeema Foundation)

या प्रकल्पामध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील एका उर्दू शाळेमध्ये ८वी आणि ९वीसाठी सत्र घेतले गेले. भाषेची थोडी अडचण जाणवत होती. पण हिंदी आणि इंग्रजीची मदत घेऊन सर्व विषय पोहोचवले. तेथील शिक्षक, मुख्याध्यापक आणि ग्रामपंचायतीचे माजी सरपंच यांनी अशा प्रकारचे सत्र योजल्याबद्दल खूपच धन्यवाद दिले आणि इ. १०वी साठी सुद्धा असे सत्र योजावे असे आवर्जून सांगितले.

**▶ युवा-साथी (HCL)**

या पुणे आणि औरंगाबाद जिल्ह्यातील प्रकल्पात असा अनुभव आला, की विद्यार्थ्यांना शरीरशास्त्र, व्यसनाधीनता, लैंगिक दुर्वर्तन या विषयांमध्ये खूप शंका होत्या, आणि त्यांनी त्या मोकळेपणानी विचारल्यासुद्धा! काही मुले सत्राच्या वेळी सुरुवातीला ताईंवर शिवराळ भाषेत, शब्दात टिप्पणी करत होती; पण लैंगिक दुर्वर्तन सत्रानंतर तीच मुले गप्प झाली, त्यांनी शांतपणे सर्व ऐकून घेतले. बोलून दाखवले नाही तरी त्यांना त्यांच्या वागण्याबद्दल लाज वाटली हे समजून आले.

**▶ संयम (ताराचंद रामनाथ सेवा ट्रस्ट)**

या व्यसन परावृत्ती निर्माण करणाऱ्या प्रकल्पामध्ये एका वर्गात लैंगिक दुर्वर्तनाच्या सत्रानंतर ८वी मधल्या एका मुलीने ‘आपल्या बरोबर काल रात्री असा प्रसंग घडला आहे’, हे पुढे येऊन सांगण्याचे धाडस दाखवले. प्रशिक्षकाने ही गोष्ट तिच्या वर्गशिक्षिकेच्या निदर्शनास आणून दिली आणि पुढे त्यावर योग्य कारवाई झाली.

राष्ट्रीय महिला आयोगाने संमत केलेल्या महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेसमवेतच्या प्रकल्पामध्ये, पुणे आणि औरंगाबाद येथील पोलिस आणि प्रशासनातील वरिष्ठ महिला अधिकाऱ्यांच्या कोविड काळातील मानसिक स्वास्थ्याचा अभ्यास केला गेला. विपरीत आणि तणावपूर्ण परिस्थितीमध्ये या अधिकाऱ्यांनी आपले कर्तव्य पार पाडण्यात कोणतीही कसर ठेवली नाही. औरंगाबाद येथील जिल्हा रुग्णालयातील एका डॉक्टरांना भल्या पहाटे फोन आला की ऑक्सिजनच्या टाकीचे प्रेशर कमी होत आहे. याचा अर्थ अतिदक्षता विभागात व्हेंटिलेटरवर असलेल्या ४० रुग्णांचा जीव धोक्यात होता. त्या डॉक्टरांनी क्षणाचाही विलंब न करता १०/१२ फोन केले आणि जवळपास ४० जणांचा गट पुढच्या ५/७ मिनिटांत कामाला लागला. अथक प्रयत्नाने ऑक्सिजन टँकचे प्रेशर पूर्ववत करण्यात यश आले आणि ४० जणांचे जीव वाचवल्याचे समाधान त्या डॉक्टरांना मिळाले.

याच संस्थेच्या महिला महाविद्यालय अध्यापकांसाठी प्रज्ञा मानस संशोधिकेच्या वतीने दि. १६ व १७ जून रोजी Research methodology वरचा Faculty development program पार पडला. एकूण सहभागी ५२ सदस्यांपैकी, ११ सदस्य प्रज्ञा मानस संशोधिकेचे होते. यामुळे त्या महाविद्यालयातील अनेकांना मानस शास्त्रीय मापनाचे यथायोग्य प्रशिक्षण देता आले.

कोविड-१९ मुळे लागलेल्या पहिल्या दीर्घ टाळेबंदीमध्ये ‘जागेवरच अडकलेल्यांच्या समायोजन प्रक्रियांचा गुणात्मक अभ्यास’ आणि ‘आध्यात्मिक आचार (practice) असलेल्या/ नसलेल्या व्यक्तींच्या मन:स्वास्थ्याचा तौलनिक अभ्यास’ ह्या दोन प्रकल्पांमधूनही मानवी मनाचे अनेक गुंतागुंतीचे कंगोरे समोर आले.

**▶ शोधनिबंध**

२०२१-२२ मध्ये प्रज्ञावंतता, जीवन गुणवत्ता, मनोस्वास्थ्य, अशा विषयांवरील एकूण सहा संशोधकांचे शोधनिबंध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील संशोधन नियतकालिकात (AERA, NIMHANS, Indian Journal of Positive Psychology, NAOP IIT Mumbai इ.) प्रसिद्ध झाले.

### मनोमापन शास्त्र उपविभाग (संशोधन)

रचना चाचणीमधील सात प्रकारच्या क्षमता चाचण्या व एक व्यक्तिमत्त्व शोधिका अशा आठ उपचाचण्यांचे जे प्रदत्त संकलन झाले होते, त्यावर घटक विश्लेषणाचे काम झाले.

**▶ रचना अभिक्षमता मापन चाचणी**

गेल्या काही वर्षांत डिझायनिंगच्या क्षेत्रात वाढ झाली आहे (आर्किटेक्चर, इंटेरिअर, लँडस्केप, फर्निचर, फॅशन, टेक्सटाईल इ.) डिझायनिंग इंडिया अहवालात असे सुचवले आहे की, डिझायनिंग क्षेत्रात आपले करिअर घडवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सातत्याने वाढत आहे. त्यामुळे डिझायनिंगची अभिक्षमता असलेल्या विद्यार्थ्यांना ओळखण्यासाठी रचना अभिक्षमता ओळखणारी आणि मोजणारी चाचणी विकसित करणे आवश्यक वाटू लागले. आपल्या मार्गदर्शन केंद्राकडेही पालकांची या बद्दलची विचारणा वाढत आहे. त्याप्रमाणे विभागामध्ये रचना अभिक्षमता मापन चाचणी विकसनाला सुरुवात झाली. शास्त्रशुद्ध पद्धतीने

मानसशास्त्रीय चाचणी विकसनाच्या सर्व निकषांच्या गाळणीतून चाचणीचे काम टप्प्याटप्प्यानी करत असताना कोविड सारख्या महामारीमध्ये सुद्धा चाचणी विकसनाचे काम अविरत चालूच राहिले. आलेल्या डेटाचे विश्लेषण करून चाचणी प्रमाणीकरणासाठी साहित्य तयार करण्यात आले. आणि आता रचना अभिक्षमता मापन चाचणी एक प्रमाणित मानसशास्त्रीय चाचणी म्हणून वापरली जात आहे.

## मानव संसाधन विकास उपविभाग

या विभागातर्फे राष्ट्रीय पातळीवरच्या सहा आणि राज्य पातळीवरच्या सात अशा एकूण तेरा कंपन्यांसाठी चाचणीकाम केले गेले. यात काही अगदी वेगळ्या प्रकारची कामे झाली. उदा. सुधागड तहसील, पाली येथील आरोग्य, पाणीपुरवठा इ. विभागातील सरकारी कर्मचाऱ्यांसाठी वेगवेगळ्या विषयांवर दूरस्थ पद्धतीने व्याख्यानसत्रे झाली. काही विषय पुढील प्रमाणे - भावनांना समजून घेताना, सरकारी नोकरीत समर्पित वृत्ती, आनंद नक्की आहे कशात?, निर्भयता, कार्य-जीवन समतोल इ. या सर्वच सत्रांचा आपल्याला अतिशय सकारात्मक उपयोग आणि फायदा झाला, असे या सर्व सहभागी सदस्यांनी आवर्जून नोंदवले.

लातूर येथील विवेकानंद रुग्णालयात सर्व स्तरावरील सुमारे ३०० कर्मचाऱ्यांसाठी मागील वर्षांतील (२०१८-१९) सत्रांचा टप्पा दोन म्हणून 'स्व-विकास ते संस्था विकास' या विषयावरची एकूण नऊ प्रशिक्षण सत्रे वर्षभर सातत्याने घेण्यात आली. चर्चा, चित्रपट्टिका, कृतीखेळ, प्रसंग नाट्ये, निवडक वाचन, गटकार्ये अशी माध्यमे असल्याने सुरक्षा रक्षक, स्वच्छता कर्मचारी, परिचारिका, स्वागतिका, ओपीडी कर्मचारी या सर्वांनी याचा मनसोक्त आनंद घेत प्रशिक्षण पूर्ण केले. या सत्रांमुळे त्या सर्वांच्या विचारात आणि वर्तणुकीत अतिशय सकारात्मक असा बदल दिसून आला असे त्यांनी आणि व्यवस्थापनाने आवर्जून नोंदवले आहे.

## अभिक्षमता मापन, व्यवसाय मार्गदर्शन उपविभाग

या विभागातर्फे ७वी ते १२वीचे विद्यार्थी यांच्यासाठी विविध चाचण्यांद्वारे मनोमापन केले जाते. यामध्ये itap, iA, Swayam, CATP अशा विविध चाचण्या वेगवेगळ्या वयोगटासाठी वापरल्या जातात. विशेषत: १०वी, १२वीच्या मुलांना iA या चाचणीची भविष्यातील अभ्यासक्षेत्र निवडण्यासाठी मदत होते. यासाठी अनेकदा दूरवरचे प्रवास करून तेथे ही सेवा दिली जाते.

बेळगावच्या एका प्रथितयश कंपनीने कोविडच्या पहिल्या लाटेच्या नंतर लगेचच त्यांच्या कर्मचाऱ्यांसाठी 'स्वयम्' चाचणीचे आयोजन केले होते. RTPCR ही कोविड-१९ साठीची चाचणी करणे तेव्हा बंधनकारक होते. त्याप्रमाणे तिथे जाणाऱ्या विभागाच्या सदस्यांनी ही चाचणी केली होती. सुदैवाने रिपोर्ट निगेटिव्ह आले. त्यांची प्रत त्यांनी जवळ ठेवलीच होती. कोल्हापूरच्या थोडेसे पुढे महाराष्ट्र हद्द संपून कर्नाटक राज्याची हद्द सुरू होते. तिथल्या तपासणी नाक्यावर या लोकांना अडवले. आमच्याकडे RTPCR चे निगेटिव्ह असल्याचे रिपोर्टस् आहेत असे वारंवार सांगूनही खूप चौकशांना आणि प्रश्नांना सामोरे जावे लागले. बेळगावच्या कंपनीमध्ये खूप फोनाफोनी केल्यानंतर आणि चेकपोस्टवरच्या लोकांचे समाधान झाल्यानंतर कशीबशी सुटका होऊन चाचणी कामासाठी गेलेले सदस्य हॉटेलवर पोहोचले, तर तिकडे वेगळ्याच समस्येला सामोरे जावे लागले. हॉटेलमधील आरक्षण वेगळ्याच दिवसांचे केले गेले होते. परत कंपनीशी फोनाफोनी, चर्चा असे सर्व होऊन तासाभरानंतर हॉटेलमध्ये जागा मिळाली. या सर्व गोष्टींमुळे अचानक/अकल्पित समोर आलेल्या समस्यांना कसे तोंड द्यायचे याचा वस्तुपाठ सदस्यांना मिळाला.

## क्षमता विकसन उपविभाग

कोविडच्या कसोटी पाहणाऱ्या कालखंडामध्ये क्षमता विकसन विभागाने विदयार्थ्यांसाठी प्रत्यक्ष आणि दूरस्थ अशा दोन्ही पद्धतीने सत्र घेत कोविड काळात घरात अडकून पडलेल्या आणि त्यामुळे त्रस्त झालेल्या मुलांसाठी हा काळ थोडातरी सुसह्य बनवला. यातील दोन हृद्य अनुभव!!

Save the children India या संस्थेने कोविड काळात दुर्दैवाने ज्यांचे पालक गेले अशा ग्रामीण भागातील १०० मुलांसाठी भावनिक समायोजनासाठी मुलांच्या मनात सकारात्मक विचारांची पेरणी करण्यासाठी मदत मागितली. सध्या व्हॉटस्अ‍ॅप तंत्रज्ञानाचा वापर करून विविध रंगतदार खेळांमध्ये त्यांना रमवून प्रचोदक तायांनी त्या मुलांच्या दुखऱ्या मनावर अप्रत्यक्षपणे मायेची फुंकर घातली.

निरंतर बालविकास उपक्रमात 'कृतज्ञता' या विषयावर सत्र घेतले. सैनिकांप्रती कृतज्ञता दाखवण्यासाठी त्यांची मुलाखत घेणे, त्यांच्यासाठी कृतज्ञता पत्र तयार करून वाचून दाखवणे, असे सत्राचे स्वरूप ठरले. मुलांनी अतिशय बारकाईने विचार करून, सैनिकांना विचारण्यासाठी प्रश्न काढले, आणि सुंदर पत्रही प्रत्येक गटात तयार झाले. सैन्यदलातील १२ अधिकारी व्यक्तिपर्यंत पोहोचण्याचा योग आला. या सर्वांनीच मुलांच्या आणि त्यांच्या पालकांच्या प्रश्नांना साध्या, सोप्या आणि सुंदर भाषेत उत्तरे दिली.

**▶ प्रज्ञा प्रबोधन वर्ग**

प्रज्ञा प्रबोधन वर्गाच्या कुमार गटाने (इ. ९वी, १०वी) किशोर गटाबरोबर (इ. ५वी ते ७वी) दर महिन्याला वर्षभर उपासना सत्र घेतले. प्रत्येक महिन्याचा वैशिष्ट्यपूर्ण विषय निवडून त्यावर वैचारिक, त्याला अनुसरून पद्य, चर्चासत्र इ. ची योजना केली होती. कोणत्याही मोठ्या ताई-दादाची मदत न घेता मुलांनी हे काम केले आणि वर्षपूर्ती कार्यक्रमाला 'सरदार वल्लभभाई पटेल जयंतीचे' औचित्य साधून नेटका कार्यक्रम केला. सर्व कार्यक्रमाचे नियोजन उत्तम पद्धतीने केले इतकेच नाही तर प्रज्ञा प्रबोधन वर्गाचा यूट्यूब चॅनेल तयार करून वर्षपूर्ती कार्यक्रम त्याच्यावर थेट प्रसारित केला. अंतःस्फूर्तीने एखादा उपक्रम वर्षभर राबवणे हा खूप वेगळा आणि सुंदर अनुभव होता.

▶ **प्रज्ञा मैत्र**

हा उच्चक्षमता दर्शवणाऱ्या मुलांच्या पालकांसाठीचा गट आहे, ज्यात पालक, मुलांमधील विविध प्रकारच्या उच्चक्षमता ओळखायला व जोपासायला शिकतात व त्याबाबतच्या संवादातून एकमेकांना पाठबळही देतात. २०२०-२०२१ च्या गटात कोविडमुळे पालक दूरस्थ पद्धतीने सहभागी झाले आणि त्यामुळे पुण्याबाहेरील पालकही सहभागी होऊ शकले. अशाच एक अमेरिकेतून सहभागी झालेल्या पालक ज्ञान प्रबोधिनी प्रशालेची माजी विद्यार्थिनी. प्रज्ञा-मैत्र गटातील सहभागातून तिला त्यांच्या सहा वर्षाच्या मुलाची तीव्र संवेदनशीलता व अचूकतेची गरज लक्षात आली आणि त्यातून त्याला समजून घेत त्याच्या विचारांना, वर्तनाला वळण देण्याची पद्धतही त्या दोघांच्या लक्षात आली. त्याचे वडील हे तर 'प्रज्ञावंतता' ह्या संकल्पनेबद्दल प्रथमच ऐकत होते आणि त्यातून अनेक गोष्टींची उकल होत राहिल्याने त्या तिघांचा संवाद सुधारला, ऊर्जा सत्कारणी लागू लागली आणि हा सहप्रवास अधिक सहज व आनंददायी होऊ लागला.

## मार्गदर्शन - समुपदेशन उपविभाग

वर्ष २०२०पर्यंत मार्गदर्शन-समुपदेशनासाठी येणाऱ्यांमध्ये चाचणी कामाची संख्या जास्त होती. पण २०२१-२२ मध्ये समुपदेशनासाठी येणाऱ्यांच्या संख्येमध्ये दुपटीने वाढ झाल्याचे दिसून येते आहे. गेल्या वर्षभरात समुपदेशनासाठी येणाऱ्या लहान मुलांमध्ये आणि प्रौढांमध्ये 'कोविड-पश्चात परिणाम' (post covid effect) खूपच दिसून येतो आहे. कौटुंबिक समस्या, शैक्षणिक समस्या, नातेसंबंध, प्रेरणेचा अभाव, इंटरनेट, मोबाईलचे व्यसन या सर्वांवरच कोविडचा भयंकर परिणाम झालेला आहे.

आलेल्या सल्लार्थींमध्ये कोविडच्या काळात ज्यांची लग्ने झाली अशा जोडप्यांमध्ये काही समस्या निर्माण झाल्याचे दिसले. त्याचे कारण मुला-मुलींना एकमेकांची पुरेशी ओळख व्हायला वेळच मिळाला नाही, तर काही बाबतीत बाह्य परिस्थितीचा फायदा घेऊन फसवणूक केली गेली. त्यावर काम करावे लागत आहे.

पालक आपल्या पाल्याची कोणतीही समस्या घेऊन आले तरी त्याच्यामागे screen obsession ही महत्त्वाची बाब असतेच, असे निदर्शनास आले, आणि म्हणूनच या विषयावर एक सत्र घेण्यात आले. ज्यामध्ये पालकांनी दूरस्थ पद्धतीने भाग घेतला होता. मुलांसाठी मात्र प्रत्यक्ष पद्धतीने पूर्ण दिवसाचे सत्र योजले होते. या सत्राला पालकांचा आणि मुलांचा उत्तम प्रतिसाद मिळाला.

**प्रकाशन**

मा. वाच. उषाताई खिरे आणि धनश्रीताई सोवनी यांनी लिहिलेले 'Intelligence, Creativity and Giftedness' हे पुस्तक हिमालय पब्लिशिंग हाऊसने प्रकाशित केले.

## शैक्षणिक उपविभाग

२०२१-२२ हे वर्ष अभ्यासक्रमांच्या दृष्टीने खूप शिकवणारे ठरले. दूरस्थ आणि प्रत्यक्ष अध्यापनाचे तंत्र वापरणे, चाचणीकामावर असलेल्या मर्यादा गृहित धरून विद्यार्थ्यांना क्षेत्र कार्याचा अनुभव देणे ही आव्हाने पार पडता आली.

दोन अभिमानाच्या बाबी म्हणजे : शालेय मानस शास्त्राच्या विद्यार्थ्यांनी स्वयंस्फूर्तीने केलेलं कोविड रुग्णांचे प्रचंड प्रमाणातील समुपदेशन आणि प्रज्ञावन्तता विषयातील अध्यापक आणि विद्यार्थ्यांनी नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील प्रज्ञावंत मुलांच्या शिक्षणासाठी प्रबोधिनीने केलेल्या शिफारसींमध्ये दिलेले मोलाचे योगदान!!

## पीएचडी सेंटर

या वर्षी ज्ञान प्रबोधिनी संशोधन केंद्राला चार नवीन संलग्न (Affiliated) मार्गदर्शक उपलब्ध झाल्यामुळे, पीएचडीसाठी आलेल्या ८३ अर्जदार विद्यार्थ्यांच्या प्रवेश मुलाखतींमधून निवड झालेल्या २० विद्यार्थ्यांची सूची विद्यापीठाची अंतिम मंजुरी मिळून प्राप्त झाली आहे.

वाच. अनघा लवळेकर यांचे विद्यार्थी धनश्री सोवनी व श्री. रणजीत सिंह भोगल तसेच, वाच. अल्पना वैदय यांच्या विद्यार्थिनी कीर्ति गोहेल असे तिघांचे पीएचडीचे प्रबंध सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात जमा झाले.


**प्रज्ञा मानस संशोधिका व संस्कृत संस्कृति संशोधिकेत उपलब्ध मराठी प्रकाशने**

**प्रज्ञा मानस संशोधिका -** १. बुद्धिवैभव, २. हसत खेळत बुद्धिविकास (भाग १), ३. हसत खेळत बुद्धिविकास (भाग २), ४. सामाजिक जाणीव संवर्धन, ५. स्त्रीविधा

**संस्कृत संस्कृति संशोधिका -**
१. संस्कृत साहित्याचा इतिहास - ७ भागांची पुस्तकमाला- वाच. सुरूचि पांडे (भाग १ वेद व वेदांगे, भाग २ ब्राह्मणे-आरण्यके-उपनिषदे, भाग ३ रामायण, महाभारत आणि पुराणे, भाग ४ संस्कृत काव्य, भाग ५ दशरूपके, भाग ६ भारतीय तत्त्वज्ञान, भाग ७ प्राचीन भारतीय विद्या)
२. हस्त्यायुर्वेद - अनुवाद - वाच. अ.पां .देशपांडे, वाच. रा. ब. गोगटे
३. भगिनी निवेदिता - एक चिंतन : शास्त्र, शिक्षण, कला - दिलीप कुलकर्णी, संध्या गुळवणी, चारुता पुराणिक

* याशिवाय विविध प्रकारच्या संस्कार तसेच पूजा विधी पोथ्या *

## पौरोहित्य उपविभाग

▶ **कार्यशाळा**

दि. २९ ऑगस्ट, ४ आणि ५ सप्टेंबर २०२१ या तीन दिवशी श्री गणेश प्रतिष्ठापना पोथी प्रशिक्षण कार्यशाळा दूरस्थ पद्धतीने घेण्यात आल्या. यात तिन्ही कार्यशाळा मिळून एकूण ११० सदस्य सहभागी झाले होते. पौरोहित्य गटातील प्रशिक्षक सदस्यांनी यात मार्गदर्शन केले. या कार्यशाळा घेण्यासाठी आधी प्रशिक्षक प्रशिक्षण घेण्यात आले आणि त्यामध्ये शिकलेल्या नव्या प्रशिक्षक सदस्यांनी कार्यशाळेत मार्गदर्शन केले. ज्ञान प्रबोधिनी फाऊंडेशनच्या सोबत आयोजित कार्यशाळेत परदेशातील आठ सदस्य सहभागी झाले होते.

सर्वपित्री अमावास्येच्या निमित्ताने दूरस्थ पद्धतीने महालय श्राद्ध मार्गदर्शन आयोजित करण्यात आले. विद्याश्री पुरंदरे आणि सुरेखा लिखिते या पुरोहितांनी यामध्ये मार्गदर्शन केले. एकूण ४५ सदस्यांनी याचा लाभ घेतला.

▶ **अन्य**

पुरोहितांसाठीच्या साप्ताहिक बैठकीत 'वेद व वेदांगे' या विषयावरील व्याख्याने झाली.

▶ **व्याख्याने / मुलाखती**

| विषय व वक्ते | संयोजक |
|---|---|
| Importance of Hindu Religion : वाच. आर्या जोशी | कॅलिफोर्निया स्टेट विद्यापीठ व ओबेरॉय फौंडेशन |
| शारदीय नवरात्री उत्सवाचे महत्त्व : वाच. आर्या जोशी | विश्व मराठी परिषद |
| दिवाळी सणाचे महत्त्व : वाच. आर्या जोशी | चिन्मय मिशन युथ फोरम |
| Changes in Hindu Religion and leadership of women : वाच. मनीषा शेटे | Associated Press (US) |

▶ **चित्रफिती**

सध्याच्या काळात विविध पूजा करण्यासाठी पुरोहितांची उपलब्धता असणे किंवा भारताच्या बाहेर राहत असलेल्या भारतीय नागरिकांना आपल्या परंपरेतील पूजा सांगण्यासाठी पुरोहित उपलब्ध असणे याची थोडी अडचण जाणवते. या हेतूने प्रत्यक्ष पुरोहित उपलब्ध नसताना सुद्धा चांगल्या पद्धतीने पूजा करता यावी, यासाठी श्री मंगलागौरी पूजा (मराठी) आणि दीपावली लक्ष्मीपूजन (मराठी व हिंदी) याच्या चित्रफिती प्रकाशित करण्यात आल्या. मुख्यत: व्यापारी वर्ग हा हिंदी भाषिक असल्याने त्यांच्या भाषेत लक्ष्मीपूजन मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यात आले आहे.

गणेशस्थापना पूजेच्या निमित्ताने समाजातून नेहमी विचारल्या जात असलेल्या प्रश्नांची उत्तरे देणाऱ्या चार मार्गदर्शनपर चित्रफिती 'त्वं ज्ञानमयः विज्ञानमयः।' या शीर्षकाअंतर्गत मराठी आणि हिंदी भाषेत प्रकाशित करण्यात आल्या. हे सर्व साहित्य यूट्यूब या माध्यमावर उपलब्ध करून देण्यात आले आहे.

> संत्रिकेतील पुरोहितांच्या माध्यमातून दूरस्थ आणि प्रत्यक्ष असे सुमारे ६,००० संस्कार या वर्षभरात केले गेले. यातील ३५ पेक्षा अधिक संस्कार परदेशातील भारतीय कुटुंबांमध्ये दूरस्थ पद्धतीने करण्यात आले. प्रामुख्याने विवाह, साखरपुडा, वास्तुशांती, एकोद्दिष्ट श्राद्ध आणि सत्यनारायण या विधींचा दूरस्थ पद्धतीने होणाऱ्या संस्कारांमध्ये समावेश होता.

## संशोधन उपविभाग

वाच. आर्या जोशी यांनी Manas Puja- Worship through the Mind, Bhavani Bharati- Sanskrit poetry by Yogi Shri. Aurobind Ghosh आणि Feminism of the Earth and rivers from Hindu Religion हे तीन शोधनिबंध तीन वेगवेगळ्या परिषदांच्या माध्यमातून सादर केले.

▶ **शिष्यवृत्ती**

एशियाटिक सोसायटी मुंबई यांच्या वतीने सामाजिक शास्त्रे या विषयाच्या अंतर्गत वाच. आर्या जोशी यांना Junior Research Scholarship जाहीर झाली. अरुणाचल प्रदेशातील 'इदू आणि आदि जनजातीच्या निधनोत्तर विधी आणि पूर्वज स्मरण' पद्धतींचा अभ्यास असा त्यांच्या संशोधन प्रकल्पाचा विषय आहे.

## विशेष नोंद घेण्याजोगे

दि. १७ डिसेंबर २०२१ रोजी येड्तोरे मठाचे शंकराचार्य श्री शंकर भारती स्वामीजी यांनी ज्ञान प्रबोधिनीला भेट दिली आणि प्रबोधिनी कार्यकर्ते आणि प्रशालेय विद्यार्थी यांना मार्गदर्शन केले. श्री शंकर भारती स्वामीजी हे आद्य शंकराचार्य रचित सौंदर्यलहरी या स्तोत्राचा प्रचार करण्यासाठी भारतभर परिक्रमा करीत आहेत. या स्तोत्राचे पठण विद्यार्थ्यांनी नियमित करावे यासाठी विविध शाळांमध्ये जाऊन ते संस्कृत भाषेतून मार्गदर्शन करीत आहेत.

नागरीवस्ती अभ्यासगटाच्या एका युवती कार्यकर्तीचा विवाह प्रथमच प्रबोधिनी पद्धतीने संपन्न झाला. वाच. मनीषा शेटे यांनी पौरोहित्य केले. नागरीवस्तीतील विविध समाजगटांना ज्ञान प्रबोधिनीच्या विधींची फारशी माहिती नाही. त्यामुळे त्यांच्यापर्यंत हा विधी पोहोचविणे हे एक मुख्य उद्दिष्ट साध्य करण्याचा प्रयत्न याद्वारे केला गेला आहे.

# ९ सामाजिक शास्त्र अध्ययन केंद्र

## व्याख्याने व कार्यशाळा

▶ **वैश्विक मानवी मूल्ये सत्रे आणि विशेष उद्दिष्ट गट**

Army Institute of Technology च्या अभियांत्रिकीच्या पहिल्या वर्षाच्या देशभरातून आलेल्या ३०० विद्यार्थ्यांसाठी वैश्विक मानवी मूल्ये या विषयावर इंग्रजीमध्ये दूरस्थ माध्यमातून सहा सत्रे दि. ११ नोव्हें. ते ८ डिसें. कालावधीमध्ये झाली.

सुधागड तालुका तहसीलदार यांच्याबरोबर प्रशासकीय काम करणाऱ्या गटासाठी 'कृतज्ञता' या विषयावर व्याख्यान झाले.

जव्हारमधील आदिवासी पाडे, गुरूनानक जयंतीनिमित्ताने गुरुद्वारा अशा भेटी झाल्या.

## प्रबोधिनी अंतर्गत साहचर्य

Social Behaviour Change या विषयावर प्रज्ञा मानस संशोधिका आणि सामाजिक शास्त्र अध्ययन केंद्र संयुक्त विद्यमाने अभ्यासक्रम तयार करण्याच्या दृष्टीने प्राथमिक बैठकी झाल्या.

विभागातर्फे विविध विषयांवर वैचारिकांची योजना केली जाते. या सर्व कामाचे दस्तऐवजीकरण होण्याच्या दृष्टीने वैचारिकांचे शब्दांकन करायचे ठरवले. विविध केंद्रावरील २६ सदस्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळून, स्वयंसेवी पद्धतीने आत्तापर्यंत ५० पैकी ३२ वैचारिकांच्या शब्दांकनाचा पहिला आराखडा पूर्ण झाला.

शालेय मानसशास्त्र पदव्युत्तर पदविका वर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी झालेल्या Critical Thinking for Counselling कार्यशाळेत नियोजक व प्रशिक्षक म्हणून श्री. अमोल फाळके सहभागी झाले. नागरीवस्ती अभ्यासगट आयोजित राष्ट्रीय एकात्मता महोत्सवाच्या नियोजनात सहभाग घेतला. नेतृत्व संवर्धन केंद्राच्या वर्गासाठी मानसिक विकसनाची तीन सत्रे घेतली.

'Discussing immunity in the holistic context - multispeciality, multidisciplinary approach' या अहवाल-निर्मितीमध्ये श्री. अमोल फाळके यांनी सहभाग घेतला. ECOFUSION मासिकात 'Building social capital to enable environmental action' या शीर्षकाचा लेख लिहिला.

## अभ्यासगट व चिंतनगट

| क्र. | गटाचे नाव व तपशील | उद्दिष्ट | उपक्रम |
|---|---|---|---|
| १. | **प्रभात चिंतनगट** (११ सदस्य, सहा नियमित, दैनंदिन दूरस्थ बैठकी) | प्रबोधिनी व संबंधित साहित्य वाचन, मनन, चिंतन, संवाद | ज्ञान प्रबोधिनीतील आठ पुस्तके व गीतेतील निवडक श्लोकांचे मा. संचालकांचे निरुपण, इ. वाचन. |
| २. | **तत्त्वसप्तक अभ्यासगट** (११ सदस्य, १४ बैठकी - मार्च ते ऑक्टो. २१) | प्रबोधिनीचे तत्त्वसप्तक स्वत:मध्ये रुजविण्यासाठी अभ्यास | विशिष्ट मुद्द्यांच्या आधारे प्रत्येक तत्त्वाबद्दलचा mindmap तयार करून गटसदस्यांची मांडणी व त्याबद्दल गटात सविस्तर संवाद. (सध्या स्थगित) |
| ३. | **श्रीअरविंद तत्त्वज्ञान अभ्यासगट** (६३ सदस्य, सहा बैठकी - जून २१ सुरुवात) | राष्ट्रीय एकात्मतेसाठी तत्त्वज्ञान परिचय व अभ्यास | मा. विश्वनाथ गुर्जर यांची पाच व्याख्याने व अरविंदांच्या तत्त्वज्ञानाविषयक साहित्याची देवाणघेवाण. |
| ४. | **भारतीय संस्कृतीचा पाया पुस्तक अभ्यासगट** (२३ सदस्य, आठ बैठकी - ऑक्टो. २१ ते मार्च २२) | राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टिने अभ्यास व प्रख्यायिका अभ्यासणाऱ्या 'गाथा' गटाला आशय पुरवठा | अभ्यास करून गटात सदस्यांची मांडणी व संवाद, नंतर प्रश्नोत्तरे आणि शेवटी अर्धा तास मा. विश्वनाथ गुर्जर यांचे विवेचन अशा प्रकारे पुस्तकाची एकंदर १०० पाने अभ्यासून झाली. त्याबद्दलची ध्वनिमुद्रणे व टिपणे उपलब्ध. |
| ५. | **आंतरराष्ट्रीय संबंध व परराष्ट्र धोरण अभ्यासगट** (३० सदस्य, १७ बैठकी - ऑगस्ट २१ ते मार्च २२) | आंतरराष्ट्रीय घटक, परराष्ट्र धोरणांचा भारताच्या सुरक्षा व एकात्मतेवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास | गटसदस्यांनी विविध निगडित विषयांवर अभ्यास करून गटामध्ये मांडणी, व्हॉटस्ॲप गटामधून साहित्याची देवाणघेवाण व त्यावर संवाद. तज्ज्ञ व्यक्तींच्या व्याख्यानांचे आयोजन |
| ६. | **इस्लाम अभ्यासगट** (२९ सदस्य, १० बैठकी) | राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने मुस्लिम समाजाचा अभ्यास | इस्लामविषयक तीन पुस्तकांचा परिचय, काही सदस्यांच्या मुस्लिम समाजाबरोबरच्या अनुभव विश्वाचे सादरीकरण (जम्मू-काश्मिर, रायचूर-मुस्लिमबहुल प्रदेश, आखाती देश), श्री. अतुलचंद्र कुलकर्णी यांचे विशेष मार्गदर्शनपर सत्र, श्रीमती इला दलवाई यांच्या कामाची माहिती घेण्यासाठी सत्र, सच्चर समिती अहवालाचा अभ्यास, ॲड. शहनाज शेख यांची वाच. मनीषा शेटे यांच्याद्वारे मुलाखत |

# १० ग्रामविकसन विभाग

## पाणी टंचाई निवारण कार्यक्रम

भोर व वेल्हे तालुक्यातील डोंगराळ भागातील दुर्गम गावांमधील पाणीटंचाई निवारणाच्या उपक्रमावर गेली काही वर्षे विभागातर्फे सातत्याने विशेष भर देण्यात येत आहे. यासाठी शासनाच्या अधिकृत पाणीटंचाईग्रस्त गावांच्या यादीचा आधार घेण्यात येत आहे. तीन वर्षांहून अधिक काळ टँकरने पाणीपुरवठा करण्यात येणाऱ्या गावांना यात प्राधान्य देण्यात येत आहे.

पाणीटंचाई निवारणाच्या या उपक्रमात झरे विकास, नवीन विहीर खोदाई, जुन्या विहिरींचे खोलीकरण व रुंदीकरण, नवीन नळपाणी पुरवठा योजना, जुन्या नळपाणी योजनेची दुरुस्ती, पाणी साठवण टाकीचे बांधकाम आदी विषय लोकांच्या सहभागातून हाताळण्यात येत आहेत. श्रमदान व लोकवर्गणी याआधारे प्रत्येक गावाचा सहभाग निश्चित करण्यात येत असतो. कामापोटी येणाऱ्या खर्चाच्या मोठ्या रकमेची तजवीज मात्र पुण्यातील विविध कंपन्यांच्या सीएसआर निधीतून करण्यात येत असते.

**▶ विहीर खोदाई व बांधकाम**

यंदाच्या वर्षी तीन विहिरींचे खोदकाम पूर्ण करून त्याभोवती आवश्यक त्या उंचीचे संरक्षक कठडे बांधण्याचे काम पूर्ण झाले. यंदाच्या वर्षी मुळशी तालुक्यातील धडवली व मूगाव आणि वेल्हे तालुक्यातील नाळवट या तीन गावांत विहिरीचे खोदकाम व बांधकाम पूर्ण करण्यात आले. लवासा प्रकल्पाच्या आतमध्ये असणाऱ्या या दुर्गम मूगाव गावात कातकरी कुटुंबे मोठ्या संख्येने आहेत. तेथे कातकरी व धनगर मिळून सुमारे ७२ कुटुंबे आहेत.

धडवली येथेही डोंगर कड्यावर राहणाऱ्या धनगर कुटुंबाना विहिरीचा मोठा फायदा होणार आहे. पाण्याची सोय झाल्यामुळे ते आता सपाटीला येऊन राहू शकणार आहेत. मूगाव येथील कामास अमेरिकेतील ज्ञान प्रबोधिनी फौंडेशनचे तर धडवली येथील कामास इनरव्हील क्लब ऑफ निगडी यांचे अर्थसाहाय्य लाभले. नाळवट येथील कामास केपीआयटी टेक्नॉलॉजिज्‌चे अर्थसाहाय्य मिळाले.

गेल्या वर्षी बांधलेल्या कांगुरमाळ (ता. मुळशी) येथील विहिरचे उद्‌घाटन विहिरीसाठी अर्थसाहाय्य करणाऱ्या क्लाउज युनिअन इंजिनिअरिंग इंडिया प्रायव्हेट लिमिटेड या जर्मन कंपनीचे भारतातील संचालक आनंद देशपांडे यांच्या हस्ते करण्यात आले. वातुंडे-निगडीवाडा (ता. मुळशी) येथील विहीरीचेही गेल्या वर्षी अर्धवट राहिलेले बांधकाम यंदा पूर्ण झाले. या विहिरीसाठी अर्थसाहाय्य करणाऱ्या केपीआयटी टेक्नॉलॉजीज्‌ या कंपनीचे वरिष्ठ अधिकारी अनुप साबळे यांच्या हस्ते विहिरीचे लोकार्पण करण्यात आले. अशाच प्रकारे गेल्या वर्षी बांधलेल्या शिळींब व जयतपाड-गोरेवस्ती (ता. भोर) येथील विहिरींचे लोकार्पण अर्थसाहाय्य करणाऱ्या पर्सिस्टंट फौंडेशनचे वरिष्ठ व्यवस्थापक अमोल उंडरे यांच्या हस्ते करण्यात आले.

बांधकाम करण्यात आलेल्या सर्व विहिरीच्या जागांचे शासनाच्या नावे बक्षिसपत्र करण्यासाठी मोठ्या चिकाटीने पाठपुरावा करून ती मिळवण्यात आली. यंदाच्या विहिरींची कामे धरून विभागातर्फे आत्तापर्यंत ३४ विहिरींचे खोदकाम व बांधकाम यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आले आहे.

**▶ फेरोसिमेंट टाकी बांधकाम**

यंदाच्या वर्षी पिण्याच्या पाण्याच्या साठवणुकीसाठी एकूण १६ गावांमध्ये फेरोसिमेंट टाक्यांचे बांधकाम करण्यात आले. यांपैकी पुणे जिल्ह्यात १२ तर सोलापूर आणि सातारा जिल्ह्यात प्रत्येकी दोन टाक्या बांधण्यात आल्या. यंदा तीस हजार लिटर टाकीचे बांधकाम मुंबईतील जलवर्धिनी संस्थेच्या मार्गदर्शनाखाली शिकून घेण्यात आले. इतक्या मोठ्या क्षमतेच्या टाक्या आपण गेल्या पाच वर्षात प्रथमच बांधत आहोत.

यंदा भोर तालुक्यातील नऊ गावांमध्ये टाक्या बांधून पूर्ण करण्यात आल्या. यापैकी वेनवडी येथील टाकी ३० हजार लिटर क्षमतेची तर डेरे-डोंबेवाडा येथील टाकी १० हजार लिटर क्षमतेची आहे. भोरमधील उर्वरित सर्व टाक्यांची क्षमता १५ हजार लिटर इतकी आहे. वेल्हे तालुक्यातील शेनवड व घेवंडे येथे अनुक्रमे १८ हजार व २२ हजार लिटर क्षमतेची टाकी बांधण्यात आली. याशिवाय सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा तालुक्यातील गुंजेगाव येथे दोन २२ हजार लिटर क्षमतेच्या टाक्या बांधण्यात आल्या. याशिवाय साळुंब्रे (ता. मावळ) व बिरवाडी (ता. महाबळेश्वर) येथे

### श्रमकार्य उपक्रम

साळुंब्रे येथील ग्राम प्रबोधिनी शाळेतील फेरोसिमेंट टाकीचा सांगाडा उभारण्यासाठी पिंपरीमधील डी. वाय. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयातील सुमारे ३० विद्यार्थी-विद्यार्थिनींनी सलग तीन दिवस श्रमकार्य केले. शाळेतील विद्यार्थी व विद्यार्थिनी यांनी टाकी लिंपण्यासाठी श्रमदान केले. भोर येथील श्रीछत्रपती संभाजीराजे पदविका अभियांत्रिकी महाविद्यालयातील सुमारे २० विद्यार्थ्यांनी टाकीचा सांगाडा उभारण्यासाठी सलग दोन दिवस श्रमकार्य केले. युवक विभागातील सात युवकांनी सांगाड्यातील तारेची जाळी उभारण्यासाठी श्रमकार्य केले.

याशिवाय सोलापूर जिल्ह्यातील गुंजेगाव (ता. मंगळवेढा) येथे प्रत्येकी २२ हजार लिटर क्षमतेच्या दोन टाक्या बांधून पूर्ण झाल्या. या दोन्ही टाक्यांसाठी गावातील स्थानिक खासगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांनी सांगाडा बांधण्याचे काम करण्यासाठी उत्साहाने श्रमकार्य केले आहे. धडवली येथील विहिरीच्या बांधकामासाठी दगड जागेवर आणण्यासाठी युवक विभागाच्या आठ युवकांनी श्रमकार्य केले.

३० हजार लिटर क्षमतेच्या टाक्या बांधण्यात आल्या. सातारा जिल्ह्यातील घाडगेवाडी (ता. खंडाळा) येथे २२ हजार लिटर क्षमतेची टाकी बांधण्यात आली. यंदाच्या वर्षी बांधलेल्या टाक्या धरून विभागातर्फे आत्तापर्यंत एकूण ४० टाक्या बांधल्या आहेत. या सर्व लोकसहभागातून बांधलेल्या आहेत!

यंदाच्या सोळा टाक्यांसाठी पॉलिवन पॉलिमर्स इंडिया प्रा. लि., रोटरी क्लब ऑफ शनिवारवाडा चॅरिटेबल ट्रस्ट, इनरव्हील क्लब, कृतज्ञता ट्रस्ट पुणे, ज्ञान प्रबोधिनी फौंडेशन, अमेरिका अशा अनेकांचे अर्थसाहाय्य लाभले. मुंबईतील जलवर्धिनी संस्थेचे उल्हास परांजपे व बाळकृष्ण कुलकर्णी यांचे या फेरोसिमेंट टाकी बांधकामासाठी वेळोवेळी तांत्रिक मार्गदर्शन लाभले.

**▶ साठवणटाकी उद्‌घाटन**

चेराववाडी (ग्रा.पं. कसबेशिवथर, ता. महाड, जि. रायगड) येथे बांधलेल्या १५ हजार लिटर क्षमतेच्या टाकीचे उद्‌घाटन प्रबोधिनीच्या ज्येष्ठ कार्यकर्त्या हर्षताई किर्वे यांच्या हस्ते झाले. शिवथरघळीच्या वरच्या बाजूला असणाऱ्या या गावात डोंगरातील झऱ्याचा पाणीस्रोत उपलब्ध आहे.

भांड्रवली (ग्रा.पं. भुतोंडे, ता. भोर) येथे बांधलेल्या १५ हजार लिटर क्षमतेच्या टाकीचे नुकतेच उद्‌घाटन झाले. या टाकीला अर्थसाहाय्य देणाऱ्या इनरव्हील क्लब ऑफ पुणेच्या अध्यक्षा जयश्रीताई कुबेर, अंजलीताई तेलंग आणि या क्लबच्या इतर सात सदस्या यावेळी उपस्थित होत्या. या टाकीमुळे गावात आता पाण्याची साठवण व्यवस्था झालेली आहे.

बिरवाडी (ता. महाबळेश्वर) या गावात ३० हजार लिटर क्षमतेच्या टाकीचे बांधकाम नुकतेच पूर्ण करण्यात आले. सुमारे चारशेहून अधिक लोकसंख्या असणाऱ्या ७६ कुटुंबांना या पाण्याच्या टाकीचा लाभ होणार आहे. महाबळेश्वरमधील डोंगरातील जिवंत झरे हा या टाकीचा पाण्याचा स्रोत आहे. या टाकीचे लोकार्पण नुकतेच रोटरी क्लब ऑफ शनिवारवाडाच्या अध्यक्षा मीराताई भरवीरकर यांच्या हस्ते झाले. वेल्ह्यातील शेनवड व घेवंडे येथील टाकीचेही मीराताई भरवीरकर यांच्या हस्ते उद्‌घाटन झाले.

## नळपाणी योजना

घाडगेवाडी-ढेबेवस्ती (ता. खंडाळा, जि. सातारा) येथील धनगर कुटुंबांसाठी डोंगरातील झऱ्यापासून टाकीपर्यंत व टाकीपासून कचरेवस्ती व ढेबेवस्ती या दोन वस्त्यांपर्यंत नळपाणी योजना करण्यात आली. यासाठी १,०७५ मीटर लांबीचा एक इंची व्यासाचा एचडीपी पाईप वापरण्यात आला.

दुर्गाडी-मानटवस्ती (ता. भोर) येथेही तीनशे मीटर लांबीची जीआय पाईपलाईन व १,१२५ मीटर लांबीची एचडीपी पाईपलाईन याद्वारे विहिरीपासून टाकीपर्यंत पाणी आणण्यात आले. या दोन्ही पाईपलाईन दीड इंच व्यासाच्या आहेत. टाकी ते नळ कोंडाळ्यापर्यंतही याद्वारे पाणी पोहोचविले जाणार आहे.

पऱ्हरच्या आखाडेवस्ती येथे कूपनलिकेपासून टाकीपर्यंत पाणी आणण्यासाठी २०० मीटर लांबीची व दीड इंच व्यासाची एचडीपी पाईपलाईन अंथरण्यात आली आहे. या तीनही गावांमध्ये पाईपलाईनसाठी चर खोदणे, पाईपलाईन बुजविणे ही कामे लोकांनी श्रमदानातून केली.

## झरे विकास कार्यक्रम

धानेप खुटेकरवस्ती (ता. वेल्हे) येथे नैसर्गिकरित्या उपलब्ध असलेल्या झऱ्याचे पाणी साठवणूक करण्यासाठी एक पाण्याचा डवरा खोल करण्यात आला. यासाठी ४८६ भूसुरुंगाद्वारे १८ फूट रुंद व १० फूट खोल असे पाणी साठवणुकीचे टाके तयार झाले आहे. भूसुरुंगाद्वारे उडालेली दगडमाती काढण्याचे काम ग्रामस्थांनी स्वखर्चाने जेसीबी मशीनद्वारे केली. याचा उपयोग सुमारे १५ धनगरांना व त्यांच्या सुमारे ५० जनावरांना होणार आहे.

अशाच प्रकारे मेट पिलावरे-जोरकरवस्ती येथे झऱ्याचे पाणी साठवणुकीसाठी १३ फूट रुंद व ११.५ फूट खोल असे खडकातील पाणी साठवण टाके खोदण्यात आले. त्यासाठी १८१ भूसुरुंगाने निघालेली दगड-माती ग्रामस्थांनी श्रमदानाने उपसून बाहेर टाकली. मोजक्या सहा आदिवासी महादेव कोळी कुटुंबांना व त्यांच्या सुमारे ६० जनावरांना याचा फायदा होणार आहे.

## जमीन सपाटीकरण कार्यक्रम

गेल्यावर्षी अतिवृष्टीमुळे कोकणात अनेक ठिकाणी मोठे नुकसान झाले. सातारा जिल्ह्यातील कासरुड (ता. महाबळेश्वर) येथे डोंगरभागातील माती निसटून भात खाचरात वाहून आल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले होते. या भात खाचरांची वैयक्तिक पातळीवर दुरुस्ती करणे शेतकऱ्यांच्या आवाक्यापलीकडचे होते. शासनाने देऊ केलेली मदत अगदीच तुटपुंजी होती.

या गावात सेव्ह इंडिअन फार्मर्स, अमेरिका यांच्या अर्थसाहाय्यातून २३ शेतकऱ्यांकडे सुमारे १५ एकर क्षेत्रावर जमीन सपाटीकरणाचे व शेतबांध दुरुस्तीचे काम स्थानिक शेतकऱ्यांच्या पुढाकारातून पूर्ण करण्यात आले. यासाठी साडेतीनशे तास जेसीबी मशीन यंत्राचा वापर करण्यात आला. दगड वेचून बाजूला काढणे, त्याच्या ताली घालणे, वाहून आलेली झाडे बाहेर काढणे आदी कामे शेतकऱ्यांनी एकत्रित श्रमदान करून केली.

## सौर ऊर्जा प्रचार - प्रसार कार्यक्रम

**▶ सौर पट्टिका (पॅनेल) व दिवे जुळणी प्रशिक्षण**

शिवापूर (ता. हवेली) येथील कौशल्य प्रशिक्षण केंद्रातील सहा विद्यार्थ्यांसाठी सौर पट्टिका जुळणी प्रशिक्षण वर्ग घेण्यात आला. पुण्यातही नागरीवस्ती गटातील चार मुले व सहा मुली यांच्यासाठीही आठवडाभराचा सौर पट्टिका जुळणी प्रशिक्षण वर्ग घेण्यात आला.

या दोन्ही वर्गात सौर पट्टिका जुळणी ही प्रामुख्याने शिकविण्यात आली. जपानी सौरतज्ज्ञ ताजिमा तोशिओ यांच्या मार्गदर्शनाखाली प्रबोधिनीने बनविलेल्या सौर लॅमिनेटरच्या आधारे यावेळी काही सौर पट्टिका प्रात्यक्षिक स्वरूपात बनवून दाखविण्यात आल्या.

नागरीवस्ती अभ्यासगटाच्या सात मुलींनी दिवाळी उपक्रमांतर्गत तीन महिन्यात ६५० सौर पट्टिका बनविल्या व ५,७५० पणत्या तेजोमय गटासाठी रंगवून दिल्या.

▶ **सौर दिवे प्रसार उपक्रम**

जुने जपानी स्नेही, मार्गदर्शक व सौर तज्ज्ञ प्रशिक्षक तोशिओ ताजिमा यांना जपानमधील खेडेगावात प्रसार करण्यासाठी गेल्यावर्षी प्रमाणे यंदाही ६० सौर दिवे व ५० मोबाईल चार्जर विभागातर्फे जुळणी करून पाठविले. याशिवाय १० तयार सौर पट्टिका व ४० सौर पट्टिकांचे सुटे साहित्य पाठविण्यात आले.

'शहराकडे चालला प्रवाह ।
तो थांबवावा निःसंदेह ।।
सर्वांचा गावीच होईल निर्वाह।
ऐसी योजना करावी ।।१०५।।'

(श्री तुकडोजी महाराज रचित ग्रामगीता, अध्याय १८)

# कौशल्य प्रशिक्षण केंद्र, शिवापूर

२०२१-२२ या वर्षात एकूण तीन 'कातारी यंत्रचालक' व एक 'स्वयंकातारी यंत्रचालक' अशा एकूण चार तुकड्या सुरू होत्या. यातील एकूण दोन तुकड्या या वर्षात पूर्ण झाल्या व उरलेल्या दोन तुकड्या अजूनही सुरू आहेत. एकूण मिळून या वर्षात केंद्रात ४० विद्यार्थी होते. केंद्रात स्वयंकातारी तुकडीसाठी नवीन यंत्रशाळा तयार केली गेली. ज्यामध्ये दोन नवीन कारखान्यात असणारी यंत्रे यांचा समावेश करण्यात आला आहे.

तसेच सौर विषयातीलही एक कार्यशाळा या वर्षात केंद्रात नव्याने तयार केली आहे. ज्यामध्ये सौर विषयातील दोन प्रमुख तुकड्या व इतर वस्तू तयार करण्याच्या छोट्या कार्यशाळा घेता येणार आहेत.

## कातयंत्र चालक तुकडी

या शैक्षणिक वर्षात पूर्ण झालेली एक व सुरू असलेल्या दोन अशा एकूण तीन तुकड्या सुरू होत्या. एकूण मिळून २८ विद्यार्थी या तुकड्यांमध्ये आहेत. मागच्या वर्षातील कोविडमुळे लांबलेली तुकडी या वर्षात पूर्ण झाली. या विषयाबरोबर इतर विषयांची ओळख करून देणे व छोटे प्रात्यक्षिक घडवून आणणे सुरू आहे. या अंतर्गत केंद्रातील माजी अध्यापक श्री. खासबागे सरांचे 'संधाता' या विषयावर एक प्रात्यक्षिक झाले. त्यातून काही ट्री गार्डची निर्मिती विद्यार्थ्यांनी केली.

## स्वयं-कातारी चालक तुकडी (CNC)

या शैक्षणिक वर्षात १२ विद्यार्थ्यांची एक तुकडी सुरू आहे. यांचे प्रात्यक्षिक नव्याने तयार केलेल्या कार्यशाळेत सुरू झाले. नवीन घेतलेल्या यंत्रांवर विविध प्रात्याक्षिके करणे असे सुरू आहे.

## कंपनी भेटी व संबंध

केंद्रातील चार विद्यार्थी कमवा व शिका या योजने अंतर्गत कंपन्यांमध्ये कामासाठी जात आहेत. त्यांचे योग्य ते निरीक्षण संबंधित कंपन्या आपल्यापर्यंत पोहोचवत आहेत. या शिवाय एकूण पाच कंपन्यांबरोबर आपण विद्यार्थ्यांना काम देता यावे, या अर्थाचे पत्रक भरून घेतले आहे.

## सौर कार्यशाळा

सौर विषयातील तुकड्या घेता याव्यात म्हणून सौर कार्यशाळा आपण केंद्रात तयार केली आहे. यामध्ये मुख्यतः दोन जास्त कालावधीचे वर्ग आणि तीन छोटे वर्ग घेता येणार आहेत. सौर उत्पादने तयार करत राहणेही विद्यार्थ्यांच्या मदतीने सुरू राहणार आहे. या विषयातील तुकड्यांसाठीचे शैक्षणिक साहित्य तयार करणे सुरू असून लवकरच आपण या तुकड्या सुरू करणार आहोत.

## अन्य

कार्यालयीन सदस्य आणि अध्यापक वर्ग यांच्या नियमित बैठका सुरू आहेत. तसेच विषयातील कौशल्य वाढावे यासाठी काही प्रशिक्षणाचेही नियोजन केले जात आहे. यामध्ये विज्ञान आश्रम पाबळ येथे जाऊन तेथील प्रकल्प समजून घेणे हे या वर्षात घडले आहे.

याशिवाय केंद्रात वृक्षारोपण कार्यक्रम घेण्यात आला होता. एकूण ६४ रोपं लावली गेली. विद्यार्थ्यांचे गट पाडून या रोपांची देखभाल करणे सुरू आहे. निवासी विद्यार्थ्यांच्या बरोबर मिळून केंद्रातील वास्तू देखभालीसाठीची विविध कामे करण्यात आली.

## कमला मेहता नेत्र रुग्णालय, शिरवळ

ग्रामीण भागात नेत्रसेवा करण्याच्या उद्देशाने या रुग्णालयाची स्थापना १९९७ मध्ये सातारा जिल्ह्यात शिरवळ येथे झाली. आजतागायत दोन लाखांहून अधिक रुग्णांना नेत्रसेवा पुरवण्यात आली आहे. रुग्णालयाचा उद्देश ग्रामीण सेवा हा असून पहिल्यापासून ग्रामीण शालेय विद्यार्थ्यांची नेत्र तपासणी, औद्योगिक संस्थांच्या कामगारांची नेत्र तपासणी, आठवड्यातून दोन वेळा नेत्रशिबिर, रुग्णांची विनामूल्य ने-आण व शस्त्रक्रिया इ. उपक्रम आग्रहपूर्वक केले जातात.

### चालू वर्षातील रुग्णसंख्या (२०२०-२१)

▶ बाह्यरुग्ण विभाग एकूण १३०४१
शस्त्रक्रिया - मोतीबिंदू व अन्य एकूण ९०४

▶ शासनाच्या आदेशामुळे यावर्षी नेत्रशिबिरे घेतली नाहीत.

### सध्याची परिस्थिती

▶ बाह्य रुग्ण विभाग :

१. दोन द्विपदवीधर स्थायिक नेत्रविशारद उपलब्ध.

२. दरमहा आठ शल्यविशारदांची भेट.

३. पूर्ण वेळ वैद्यकीय अधिकारी उपलब्ध.

▶ महिन्यातून एकदा :

१. स्पेशॅलिटी ओ.पी.डी., रेटिना ओ.पी.डी., लेसर ओ.पी.डी., टेरिजियम, लॅक्रीमल सॅक ॲन्टीरियर सेगमेंट शस्त्रक्रिया

▶ आठवड्यातून दोन वेळा फॅको शस्त्रक्रिया

▶ शिकाऊ नेत्रविशारदांसाठी योग्य मार्गदर्शन व अनुभव

▶ महिन्यातून दोनदा ग्लुकोमा शस्त्रक्रिया

▶ Research activity : KAP study on diabetic retinopathy in rural population

▶ दिव्यांग व्यक्तींसाठी शिबिरे

▶ अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज रुग्णालय- सर्वोत्तम दर्जाची नेत्रचिकित्सा व चष्म्याचे दुकान

## ११ जिजामाता दल

सन २०२१-२२ हा कोविडचा कालखंड होता. दलाच्या सर्व सदस्या साठ ते नव्वद वयोगटातील ज्येष्ठ आहेत. त्यामुळे प्रत्यक्ष एकत्र भेटण्यावर बंधने होती. मात्र या कालखंडात दोन महत्त्वपूर्ण विषयांवर सदस्यांनी लिखाण करून दोन प्रकल्प पूर्ण केले.

१. 'भारतरत्न' पुरस्काराने गौरवलेल्या सर्वांची प्रत्येकावर एक स्वतंत्र लेख लिहून तपशीलवार माहिती सदस्यांनी एकत्र केली.

२. 'ज्ञानपीठ' पुरस्काराने गौरविलेल्या सर्व व्यक्तींची समग्र माहिती लिहिणे, हा प्रकल्प देखील सदस्यांनी पूर्ण केला.

समाजात मिसळण्यास बंधने असली तरी दोन वर्षांच्या कालखंडात दल बंद न ठेवता, उन्हाळ्याची सुट्टीही न घेता दल दूरस्थ पद्धतीने सुरू ठेवले. सर्व सदस्या म्हणजे अतिज्येष्ठ!! पण नव्वदीच्या सदस्यांनी सुद्धा झूम, गुगल मीट हे नवीन तंत्रज्ञान आत्मसात केले आणि त्या दलात उत्साहाने सहभागी होत होत्या, ही विशेष कौतुकाची बाब होती.

एका दूरस्थ बैठकीत प्रबोधिनीच्या विस्तार कार्यकर्त्या मानसीताई बोडस यांना बोलावले होते. त्यांनी त्यांचा प्रबोधिनीतील प्रवास सांगितला.

मराठीतील काही अनवट शब्दांचे संकलनही सदस्यांनी या काळात केले. काही वेगळे विषय घेऊन त्यावर लेख लिहिले, वेगवेगळी पुस्तके वाचून त्याचे परीक्षण लिहिण्याचा उपक्रमही राबविला. अशा अनेक विषयांची धारिणी पुढील वर्षी तयार होईल.

# १२ स्त्री-शक्ती प्रबोधन, ग्रामीण

## आरोग्य सखी प्रकल्प

भोर-वेल्हे तालुक्यातील ८० गावांमध्ये सुरू असणाऱ्या आरोग्य सखी प्रकल्पाची सांगता मार्च २०२२ ला झाली. महिलांची स्वतःच्या आरोग्यविषयक प्रश्नांविषयीची जाणीव वाढावी, आरोग्याची माहिती व्हावी यासाठी हा प्रकल्प केला. Bajaj Holdings and Investments Limited या कंपनीच्या अर्थसाहाय्यातून हा प्रकल्प करण्यात आला. यामध्ये प्रशिक्षण घेऊन ६५ स्थानिक कार्यकर्त्यांनी 'आरोग्य सखी' म्हणून काम केले. कोविड काळातही गावागावात वेगवेगळ्या सहा विषयांवरील जाणीव-जागृतीची सत्रे आरोग्य सखींनी केली. महिलांची तपासणी केली. महिलांची तपासणी केल्यावर पुढे वैद्यकीय उपचार करण्याची गरज आहे अशांना डॉक्टरांपर्यंत पोहोचवून, आवश्यक ते उपचार मिळतील यासाठी पाठपुरावा केला. आवश्यक तेथे आर्थिक मदतही मिळवून दिली. स्थानिक कार्यकर्त्यांनी अतिशय मनापासून आरोग्याचे हे काम केले.

**जाणीव-जागृती सत्रे :** मासिक पाळी संदर्भात शिक्षण, गर्भाशयाचा व स्तनाच्या कॅन्सर विषयक जाणीव-जागृती, जंतु संसर्ग, सकस आहार, तंबाखू मुक्ती, मानसिक आरोग्य, आरोग्य विमा आणि ओळख स्पर्शाची ही लहान मुलांसाठीची कार्यशाळा अशी एकूण १२१ सत्रे झाली. त्याला ९७१ मुले-महिला हजर होत्या.

**आरोग्य तपासण्या :** डोळे तपासणी (१६), गर्भाशय कर्करोग तपासणी (२), गरोदर माता तपासणी (७), दाताची तपासणी (१८), हिमोग्लोबिन तपासण्या (४७), बाल आरोग्य तपासणी (७), लहान मुलांचे काविळीसाठीचे लसीकरण (२) अशा एकूण १०६ तपासण्या झाल्या. त्यात १,३८६ व्यक्ती सहभागी झाल्या.

**प्रशिक्षण :** वेल्हे तालुक्यातील अंगणवाडी सेविकांसाठी दोन प्रशिक्षणांचे आयोजन केले होते. यामध्ये ११५ अंगणवाडीताई सहभागी झाल्या. १५ आशा वर्करसाठी एक प्रशिक्षण झाले.

**किशोरी विकास :** लहान मुलांमध्ये लहानपणापासूनच व्यायामाची गोडी लागावी यासाठी १५ गावांमधून २२५ मुला-मुलींसाठी 'दले' घेण्यात आली. ज्यामध्ये मैदानी खेळ, सूर्यनमस्कार यावर भर दिला होता. किशोरवयीन मुलींच्या व्यक्तिमत्त्व विकसनासाठी पाच शाळांमधील १०० किशोरींसाठी व्यक्तिमत्त्व विकसनाच्या पैलूंची ओळख करून देणारी सत्रे घेण्यात आली. यामध्ये शारीरिक, मानसिक, बौद्धिक विकसनासाठी सत्रे घेण्यात आली. १०वीच्या विद्यार्थिनींसाठी अभ्यासकौशल्यांची सत्रे घेण्यात आली.

आरोग्य सखी प्रकल्पामुळे आरोग्यविषयक सत्रे आणि तपासण्या यांच्या माध्यमातून सुमारे १२,००० नागरिकांपर्यंत आपण पोहोचलो. त्यांची आरोग्यविषयक जाणीव वाढवू शकलो.

### कोविड समुपदेशन प्रकल्प

दि. ४ मे ते २५ जून या कालावधीत B&K कंपनीच्या अर्थ साहाय्याने हा प्रकल्प झाला. कोविड बाधित व्यक्ती व त्यांच्या कुटुंबामधील सदस्यांसोबत फोनवर अथवा प्रत्यक्ष बोलून त्यांना मानसिक आधार देणे असा या प्रकल्पाचा हेतू होता. या प्रकल्पात २४ जणींचे समुपदेशनाचे प्रशिक्षक प्रशिक्षण वंदनाताई कामठे, जयश्रीताई तुंगार आणि दीपालीताई गोडसे यांनी केले. स्थानिक महिलांना प्रशिक्षण देऊन बोलायला शिकवण्याचा हा एक वेगळा उपक्रम झाला. समुपदेशकांनी ६४ गावातील ५०५ जणांसोबत बोलणे (सखी संवाद) केले. यामुळे गावातील लोकांची मानसिकता, आर्थिक परिस्थिती लक्षात आली. तसेच त्यांच्या मनात असलेली भीती कमी झाली. अनेक जण लस घ्यायला तयार झाले. बऱ्या झालेल्या रुग्णांना वाळीत टाकले जात होते, त्यावर सुद्धा आजूबाजूच्या लोकांशी बोलता आले. गटाच्या नियमित आढावा बैठकीमुळे विषयाचे गांभीर्य कुठल्या भागात कसे आहे हे समजत होते. नेमक्या माहितीची देवाण घेवाणही चांगल्या प्रकारे झाली. यामध्ये वय वर्षे ६ पासून ६० वर्षा पुढीलांशीही संवाद साधला गेला. कर्त्या गटाला या आशावादी संवादातून एक वेगळाच विश्वास आला!

मार्च २०२२ मध्ये सर्व आरोग्य सखींचा एकत्र मेळावा घेऊन या प्रकल्पाची सांगता झाली.

स्त्री-शक्ती प्रबोधन, ग्रामीणच्या कामावरील चित्रफिती आपण यूट्यूब वर जाऊन पाहू शकता.

## वंचित गटांसाठी काम

### ▶ कातकरी विकास

गेल्या आठ वर्षांपासून कातकरी समाजासाठी विभागाने काम सुरू केले आहे. सध्या ११ जणींचा गट हे काम करीत आहे. दैनंदिन काम चार वस्त्यांवर आहे. तसेच वेल्ह्यातील १४ वस्त्यांवर प्रासंगिक काम चालते.

**नियमित सत्रे :** ६ ते १५ वयोगटातील ९७ मुला-मुलींसाठी नियमित सत्रे घेण्यात आली. या मुला-मुलींची शिक्षणाची प्रेरणा वाढावी याकरता, तसेच चांगल्या सवयी लागण्यासाठी वेगवेगळे उपक्रम घेतले. चार वस्त्यांवर मिळून १८५ सत्रांच्या माध्यमातून विषय पोहोचवले. या सोबत खेळाच्या स्पर्धा, १५ ऑगस्टचा कार्यक्रम (तीन वस्त्यांवर), सहली असेही झाले. वस्तीनुसार सत्र संख्या पुढीलप्रमाणे - कोंढवली ५४, मालवली ५५, धानेप ३२, चेलाडी -४४

**सहल :** मालवली, कोंढवली, चेलाडी या तीन वस्त्यांवरील ३८ मुले-मुली व ११ ताई अशी ४९ जणांची सहल सज्जनगडला काढली. गडाचा इतिहास सांगून गड पाहिला, साताऱ्यात छत्रपती संभाजी महाराज उद्यानात मुले खेळली. असा सहलीचा आनंद बऱ्याच जणांनी पहिल्यांदाच घेतला.

**आनंदी शिबिर :** तीन वस्त्यांवरील ३० मुले-मुली सहभागी असणारे दोन दिवसांचे आनंदी शिबिर वेल्ह्यात झाले. पहिल्या दिवशी विज्ञान प्रयोग गटागटाने केले. हवेचा दाब, भिंगाचा वापर, तरंगणे-बुडणे तपासणे. तर दुसऱ्या दिवशी शिक्षण आणि स्वच्छता या विषयावर 'दप्तर' ही लघु चित्रफीत बघून चर्चा केली. निवासातील मुलींनी व कातकरी प्रकल्पातील ताईंनी शिक्षण व स्वच्छता या दोन विषयांवर पथनाट्य सादर करून महत्त्व समजावून संगितले. शिबिराच्या शेवटी वस्तीवरील बऱ्याच मुलांकडे चप्पल नसल्याने सर्वांना चप्पल खरेदी करून देण्यात आली.

**दिवाळी सण :** कातकरी समाज हा मासेमारी बरोबरच रोजंदारीवर काम करणारा गट आहे. त्यामुळे सगळेच सण साजरे केले जातात असे होत नाही. यावर्षी नियमित व प्रासंगिक संपर्कातील १४ कातकरी वस्त्यांवर २०० कुटुंबांसोबत दिवाळी साजरी केली. त्यांना दिवाळी किट वाटप केले.

**महिला मेळावा :** जागतिक महिला दिना निमित्ताने कातकरी मेळावा घेतला. मेळाव्याला नऊ वस्त्यांवरून ४२ महिला सहभागी झाल्या. महिलांनी गाणी म्हणून मेळाव्याला सुरुवात केली. वेगवेगळ्या उपक्रमांबद्दल सर्वांना माहिती सांगितली.

वस्त्यांवर येत असणाऱ्या अडचणींवर चर्चा घेतली. चर्चेतून वस्तीसाठी करायच्या कामाची यादी तयार झाली. त्यानंतर पाच प्रकारच्या वेगवेगळ्या स्पर्धा घेऊन बक्षिस वाटप केले. मेळाव्यात सहभागी झालेल्या प्रत्येकीला सौर दिवे दिले. वर्षभरात महिलांचे तीन बचत गट सुरू झाले. वनभोजनाचा कार्यक्रम झाला.

**महत्त्वाचे :** आपल्या प्रयत्नातून सुरू झालेल्या कामामुळे नियमित शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या आता ३८ झाली आहे. नियमित संपर्कामुळे आता आरोग्य व परिसर स्वच्छतेत बदल दिसून येत आहेत.

**▶ एकल महिला**

महिला गरीब असेल आणि एकटी असेल तर तिला अजूनच भीषण परिस्थितीला तोंड द्यावे लागते. त्यामुळे विभागाने शिवगंगा-गुंजवणी खोऱ्यात एकल महिलांसाठी २०१३ पासून काम सुरू केले. आता भागातल्या ४५० एकल महिलांची माहिती आपल्याकडे आहे.

**योजनेचा लाभ मिळवून देणे :** एकल महिलांसाठी शासनाच्या संजय गांधी निराधार योजना आणि श्रावण बाळ योजना आहेत. या योजना त्यांच्यापर्यंत पोहोचवण्याचे काम करीत आहोत. महिलांचे स्वतःचे वेगळे रेशन कार्ड काढायला त्यांना मदत करण्यापासून कामाची सुरुवात होते. यावर्षी नवरा गेल्यामुळे एकल झालेल्या दारिद्र्यरेषेखालच्या तीन जणींना रु. २०,०००/- भविष्य निर्वाह योजनेतून मिळवून दिले. आजपर्यंत श्रावण बाळ किंवा संजय गांधी निराधार योजना यापैकी एका योजनेतून दरमहा १,००० रुपये १०० महिलांना त्यांच्या खात्यावर जमा होऊन मिळायला सुरुवात झालेली आहे.

**उपक्रम :** एकल महिलेच्या मुलींच्या शिक्षणासाठी शिष्यवृत्ती, एकल महिलेसाठी रु. १०,०००/- खेळत्या भांडवलाची उपलब्धी करून देणे आणि छोटे उद्योग करण्यासाठी तिला प्रवृत्त करणे अशी कामे चालू आहेत. या वर्षी नऊ जणींना स्वतंत्रपणे उद्योग करायला ९०,०००/- रुपयांचे खेळते भांडवल दिले.

## स्वयंरोजगार

ग्रामीण महिलांच्या स्वयंरोजगाराचे काम शिवापूर, नसरापूर, आंबवणे आणि वेल्हे या चार केंद्रांवरून चालते. त्यात कौशल्य प्रशिक्षण, विविध वस्तू आणि पदार्थांचे उत्पादन केले जाते. स्टॉलवरून व दूरस्थ विक्री केली जाते. या वर्षी १०० गावांमधील ४,००० महिलांनी २५० प्रशिक्षणे घेतली. ही प्रशिक्षणे धनश्री, राम सीता पुराणिक तंत्रनिकेतन, सायबेज, शाश्वत अशा चार प्रकल्पांचा भाग म्हणून घेतली. या वर्षीची उलाढाल रु. २० लक्ष आहे.

**▶ शाश्वत प्रकल्प**

वेल्हे तालुक्यातील अडवली, अस्कवडी, मार्गासनी या तीन गावांमध्ये १ जानेवारी २०२१ पासून शेतीवर आधारित उपजिविकेला पाठिंबा देऊन गावातील शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावणे असा प्रकल्प सुरू झाला. तसेच विविध प्रशिक्षणे घेऊन त्याद्वारे उत्पादन करणे असे या प्रकल्पात केले. गाववार कृषी सखींच्या मदतीने बचत गटाची स्थापना केली. १२१ महिलांसाठी १६ प्रकारची प्रशिक्षणे घेतली. यात लाकडी कोळसा इंधन बनवणे, मक्याच्या कणसाचे दाणे काढणे, उकडीचे मोदक, शंकरपाळी, बेसन लाडू, सोयाबीन दूध व दुधाचे पदार्थ, गांडूळखत बनवणे, कृषी पर्यटन असे विषय झाले.

**शेती आणि शेतीपूरक गोष्टींसाठी बचत गटाद्वारे कर्जे :** या प्रकल्पात एकूण ४८ शेतकरी महिलांना शेतीसाठी, गाय खरेदी साठी, खते, बियाणे यासाठी रु. १३,६०,०००/- कर्ज दिले.

**फराळ उत्पादन :** शाश्वत प्रकल्पाअंतर्गत कंपनीला दिवाळी फराळाचे २७० संच दिले. स्टॉलवर विक्रीसाठी फराळ उत्पादन केले. तीन गावातील महिलांनी प्रत्येकी ९२ किलो बेसन लाडू, ६३ किलो शंकरपाळी, ८७ किलो पोहे चिवडा उत्पादन केले. दिवाळी फराळ संच व स्टॉल यातून १,४३,०००/- रुपयांची विक्री झाली.

**शेती व जोडव्यवसाय उत्पादने :** गांडूळखत प्रशिक्षण घेऊन त्याचा डेमो बेड तयार केला. शेण उचलण्याच्या मशीनचे वाटप केले. काहींना पिठाची गिरणी देऊन स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करून दिली. तसेच दोन ठिकाणी बायोगॅस बसवला.

**दापोली कृषी विद्यापीठास भेट :** अडवली, अस्कवडी व मार्गासनी गावातील महिलांची दापोली येथे अभ्यास सहल गेली. अस्कवडी येथे मक्याचे दाणे सोलणे हा स्वयंरोजगार सुरू झाला.

**स्वयंरोजगाराच्या संधी :** या प्रकल्पाच्या कामामुळे सहभागी २१ कुटुंबाचे उत्पादन वाढले आहे. दोन शेतकऱ्यांचे उत्पादन २०,०००/- रुपयांनी वाढले. नऊ जणांचे उत्पादन १० ते २० हजारापर्यंत वाढले, तर १० जणांचे उत्पादन ३ ते १० हजारापर्यंत




शैक्षणिक उपक्रम
संशोधिका विज्ञान
कार्यशाळा



छात्र प्रबोधन अभिवाचन स्पर्धेतील विजेता गोळवलकर विद्यालयाचा संघ



केंद्रीय लोकसेवा आयोग २०२१ परीक्षेतील यशवंत विद्यार्थ्यांसह
नेतृत्व संवर्धन केंद्र चालू वर्गातील विद्यार्थी



नेतृत्व संवर्धन केंद्राची मुक्त वातावरणातील तासिका



प्रज्ञा मानस संशोधिका इंडस्ट्रियल ट्रेनिंग



प्रज्ञा मानस संशोधिकेचे प्रज्ञा प्रबोधन वर्गातील सत्र



'यशवंत गाथा' पुस्तकाचे आ. यशवंतराव लेले यांच्या उपस्थितीत प्रकाशन

'सरिता ॲप' डाऊनलोड करण्यासाठीचा
क्यूआर कोड

'मेघ ॲप' डाऊनलोड करण्यासाठीचा
क्यूआर कोड



वातुंडे (ता. मुळशी) येथील विहीर उद्घाटन कार्यक्रमात
मार्गदर्शन करताना सुभाषराव देशपांडे



बिरवाडी (ता. महाबळेश्वर) येथे रोटरी अध्यक्षा मीराताई भरवीरकर
यांच्या हस्ते टाकी लोकार्पण


सौर पट्टिका व दिवे बनवण्याचे युवतींना प्रशिक्षण


गुंजवणी येथे वाड्या-वस्त्यांवर स्त्री-शक्ती प्रबोधन,
ग्रामीण विभागातर्फे कोविड काळात सर्वेक्षण


आरोग्य सखी प्रकल्पांतर्गत ग्रामीण किशोरी, युवती व महिलांचे तंबू शिबिर



कौशल्य प्रशिक्षण केंद्र, शिवापूर येथे विद्यार्थ्यांनी तयार केलेले 'ट्री गार्ड'



संवादिनी दिवाळी अंक प्रकाशन समारंभ


नागरीवस्ती अभ्यासगटाच्या राष्ट्रीय एकात्मता महोत्सवातील सहभागी युवती




गणेश कला क्रीडा मंच येथील तात्पुरत्या कोविड रुग्णालयाच्या कामात युवकांचा सहभाग



शालेय दले शाडू मातीच्या गणेशमूर्ती तयार करणे उपक्रम, युवक विभाग



दीपोत्सव, युवती विभाग


निगडी येथे संयुक्त माजी विद्यार्थी मेळाव्यात सादर झालेल्या नांदी कार्यक्रमातील प्रसंग






निगडी केंद्र पालक महासंघाच्या सिंहगड सहलीतील क्षणचित्र

JPPAF तर्फे प्रकाशित 'Connect' नियतकालिकाचे मुखपृष्ठ






माध्यमिक विभाग विद्याव्रत संस्कार, सोलापूर केंद्र



अन्य शालेय विद्यार्थ्यांसाठी विकासिका, पूरक शिक्षण विभाग हराळी केंद्र




निगडी केंद्र 'हर्षदराय रतिलाल कारिया कलाभवन'
उद्घाटन कार्यक्रमातील क्षणचित्र




'चैतन्य भुवन', सोलापूर उद्घाटन प्रसंगी मार्गदर्शन करताना श्री. विश्वासजी लापालकर




हराळी केंद्र सदस्यांची कृषी उत्पन्न बाजार समितीला भेट



पवनामाई उत्सव, साळुंब्रे उपकेंद्र



अंबाजोगाई येथील रुग्णालयात कोविड काळात वैद्यकीय उपकरणांचे वाटप



डोंबिवली विस्तार केंद्र कार्यकर्त्यांची ग्रामीण सहल



चिपळूण केंद्राचे सदस्य मा. संचालकांसह



ठाणे केंद्र सदस्यांची आनगाव बालिकाश्रमाला भेट

## स्वयंरोजगाराची चळवळ

दिवाळी निमित्ताने एका कंपनीने क्विलिंगच्या दिव्यांची ऑर्डर दिली. पूर्णपणे हाताने करायच्या एका दिव्याला ३-४ तास तरी लागायचे. या मागणीमुळे, जणू विभागात स्वयंरोजगाराची चळवळच सुरू झाली! शिवापूर, खोपी, नसरापूर, आंबवणे, करंजावणे, पाबे, वेल्हे अशा ठिकठिकाणी जवळपासच्या गावांसाठी चार दिवसांत प्रशिक्षण वर्ग योजले. २२५ युवती, महिला यामध्ये सहभागी झाल्या. चिकाटीने व्यवस्थित काम करणाऱ्या ३१ गावातल्या ८५ जर्णींनी १० दिवसांत ९००० कागदाच्या क्विलिंगच्या दिव्यांचे उत्पादन केले. गावोगावी काम करणारी कार्यकर्ती तयार होती म्हणून इतक्या कमी वेळात एवढे उत्पादन शक्य झाले! त्यातून लाखो रुपयांची उलाढाल झाली. २५-२७००० मनुष्य तासांचे काम झाले! कोण, कधी, कोणाला, कुठे सामान देणार आणि उत्पादन पोचवणार हे ३१ गावातल्या प्रमुखांनी केले म्हणूनच जमले. आयुष्यात अशा प्रकारची पहिलीच कमाई केलेल्या त्यापैकी ६२ जणी होत्या. एका ऑर्डरमुळे ४.२ लाखापेक्षा जास्त रक्कम करणावळ म्हणून महिलांनी मिळवली. अर्थातच त्यामुळे कोविडचे सावट जाऊन अनेक कुटुंबातील दिवाळी साजरी झाली. या करणावळीतून काहींनी कॉलेजची राहिलेली फी भरली तर कोणी पहिली कमाई बचत केली. काहींनी उद्योगासाठी त्यातून भांडवल उभं केलं तर काहींनी शेतीतल्या चालू भात काढणीचा खर्च भागवला. एकीनं सांगितले की स्वतःचा वीज मीटर घ्यायला आता अर्ज केला! दिवाळीमुळे बाहेर दिवे लागलेच पण या निमित्ताने अनेकींच्या मनातील दिवे उजळून निघाले. जगायचा उत्साह वाढला... आमच्यासाठी ही खरी दिवाळी!!

वाढले. शाश्वत विभागाची स्वयंरोजगाराची उलाढाल खालील प्रमाणे झाली.

| उपक्रम | उलाढाल |
|---|---|
| शेतसहली (४९ कुटुंबे, रु. ५,००० प्रत्येकी) | रु.२,४५,००० |
| फराळ | रु.१,४३,००० |
| तांदूळ व वाळवण | रु.२७,५११ |
| सोयाबीन दूध उत्पादन | रु.१०,२२४ |
| एकूण | रु.४,२५,७३५ |

### विशेष

विभागाच्या कामावरील दीर्घ लेख असलेले 'थेंबे थेंबे तळे साचे' हे प्रसिद्ध लेखिका मंगलाताई गोडबोले यांचे पुस्तक प्रकाशित झाले. मंगलाताई यांनी प्रत्यक्ष भागात येऊन काही महिलांच्या मुलाखती घेतल्या आणि नंतर आपल्या कामावर आधारित एक प्रदीर्घ लेख त्यांनी दिवाळी अंकात लिहिला होता. त्या लेखाचा अंतर्भाव या पुस्तकात केलेला आहे.

**▶ राजस्थान अभ्यास सहल**

स्वतःचे घर सोडून आपल्या कामाच्या विषयाशी संबंधित काहीतरी विशेष बाहेर जाऊन पाहिल्याचा उपयोग चौकटी बाहेरचा विचार करण्याकरिता होतो, असा अनुभव आहे. असा हेतू मनात ठेवून राजस्थान अभ्यास सहल काढली. ही सहल त्यादृष्टीने अत्यंत उपयोगाची झाली. दोन गटांमध्ये मिळून ५५ जणी अभ्यास सहलीत सहभागी झाल्या.

तिलोनिया, राजस्थान येथील बेअरफूट कॉलेज इथे देखील आपल्या सारखेच लौकिक शिक्षण नसतानाही प्रशिक्षण घेऊन ग्रामीण महिला प्रभावीपणे महिलांसाठी काम करताना दिसतात. हे बघण्याचा खूप खोल ठसा कार्यकर्त्यांच्या गटावर पडला.

उदयपूर मधील बरवाडा गावातील आजीविका ब्युरो आणि अजमेरमधील राजस्थान महिला मंडळ या संस्थांचेही काम गटाने पाहिले. जास्ती न शिकलेल्या स्थानिक महिला या विविध कौशल्यांचे प्रशिक्षण घेऊन कशा आत्मविश्वासाने उभ्या राहतात आणि मोठी मोठी सौर पॅनेल बनवण्याचे, बांधकाम व्यवसायात कारागिर बनण्यापासून ठेकेदार बनून मोठी कामे करतात हे सगळ्यांनी पाहिले. राजस्थानमधील महिलांचा एकूणच कष्टाळू स्वभाव, जिद्द, कोणत्याही कामाला कमी न लेखणे या सगळ्याचा खूप सकारात्मक परिणाम गटावर झाला. आपल्यालाही त्यांच्यासारखे सगळ्यांसमोर उभे राहून आपल्या संस्थेबद्दल बोलता आले पाहिजे अशी भावना अभ्यास सहलीला गेलेल्या सगळ्या सदस्यांची झाली.

अभ्यास सहलीत एकत्रित प्रवास, रोज उपासना, प्रेरणादायी गीते, अहवाल लेखन गटानेच करणे असे केल्याने कार्यकर्त्यांना ऊर्जा मिळाली. विशेष आकर्षण होते ते म्हणजे एक वेळचा विमान प्रवास! त्यासाठी अनेकींनी बचत गटातून पैसे साठवले, कर्ज घेतले पण सहलीत सहभाग घेतला.

७५% महिलांनी पहिल्यांदा विमानाचा प्रवास या निमित्ताने केला. रेल्वेमध्ये पहिल्यांदा बसल्या अशाही अनेक जणी होत्या. पुणे, सोलापूर आणि पुण्यातील ग्रामीण भागातील कार्यकर्त्या, विडी कामगार महिलांसोबत काम करणाऱ्या स्त्री-शक्ती प्रबोधनच्या कार्यकर्त्यांचा गट पहिल्यांदाच या निमित्ताने एकत्र आला आणि एकजिनसी झाला.

# १३ संवादिनी (स्त्री-शक्ती प्रबोधन, शहरी)

### प्रदीर्घ बैठक

विभागाची प्रदीर्घ बैठक दि. ६-७ मार्च २२ रोजी गप्पांगण, डोणजे येथे झाली. पुढील दहा वर्षांसाठीची संवादिनीची नव्याने मांडलेली सहा मध्यंतर उद्दिष्टे हीच बैठकीची मध्यवर्ती संकल्पना होती. सर्व उद्दिष्टांचा विचार सदस्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी गटचर्चा, खुला परिसंवाद आणि संवादिनी सहविचार सदस्यांनी केलेली प्रत्यक्ष मांडणी अशी योजना होती. तसेच, स्त्रीशक्ती प्रबोधन कार्यदिशेच्या उद्दिष्टांच्या मांडणीचे सत्र, वेगवेगळे जुने नवे उपक्रम आणि उद्दिष्ट जोडणी यावर खुले विचार मंथन, संपूरकता - व्यक्ती ते समष्टी या विषयावर मा. संचालकांचे मार्गदर्शन अशी अन्य सत्रे झाली. २० वर्षे कार्यरत ते दोन वर्षापासून काम करणाऱ्या अशा एकूण ५५ संवादिनी बैठकीसाठी उपस्थित होत्या. दोन शिरूर संवादिनींचा सहभाग देखील होता.

### महत्त्वाचे

**▶ सामान्यातील असामान्यत्व**

आपल्या प्रेरणास्थान असलेल्या क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले आणि राजमाता जिजाऊ यांच्या जन्मदिवसांच्या मध्ये म्हणजे दि. ३ ते १२ जानेवारी दरम्यान आपण दरवर्षी आधुनिक नवरात्र साजरे करतो. या वर्षी आपल्या आसपास असणाऱ्या काही वेगळे, विशेष, असामान्य काम करणाऱ्या स्त्रियांच्या कामाची माहिती घ्यायची असा 'सामान्यातील असामान्यत्व' शोधण्याचा उपक्रम हाती घेतला. अनेक स्त्रिया वेगवेगळ्या आव्हानांना सामोरे जात, स्वतः च्या क्षमतांचा योग्य वापर करून स्वतःची आणि कधी इतरांचीही प्रगती करतात. स्थळकाळाच्या पलीकडे गेलो तर लक्षात आले की स्त्री शक्ती जळी-स्थळी जागृत आहे. आणि मग कल्पनेपलीकडील वेगवेगळ्या क्षेत्रात कार्यरत स्त्रियांची माहिती समजली. या सर्वांचे एकत्रित संकलन आणि संपादन करून त्याची पुस्तिका बनवली. मा. बागेश्रीताई पोंक्षे यांच्या हस्ते या पुस्तिकेचे प्रकाशन झाले.

**▶ सदस्यांच्या कार्यकर्ता घडणीसाठी व्याख्याने**

'प्रबोधिनीचा इतिहास समजून घेताना' यावर स्वर्णलताताई भिशीकर, डॉ. अशोककाका कुकडे, नलिनीताई गुजराथी, रामभाऊ डिंबळे यांची, तर 'प्रबोधिनीचे विभाग समजून घेताना' या मालिकेत मुकुलिकाताई थत्ते, ज्ञानेश्वरकाका सावंत, सुनिताताई गायकवाड, गौरीताई कापरे, अमोलदादा गांगजी यांची व्याख्याने झाली.

### ओळख स्पर्शाची

कोविड काळात गटाने काही विषय अभ्यासून त्यावर चांगल्या चर्चा करून विषय समजावून घेतले. कोविडच्या बंद नंतर फेब्रुवारी मध्ये शिवजयंती निमित्त रेनबो इंटरनॅशनल, लोणी काळभोर येथे ५वी ते ८वीच्या ३२ मुलांची प्रत्यक्ष कार्यशाळा झाली.

### विकासिका

क्षमता ताणून, चाकोरी मोडून, ओलांडून विशेष कामगिरी करणाऱ्या स्त्रियांच्या कामाचा अभ्यास करून केलेल्या मांडणीतून 'चाकोरी ओलांडणाऱ्या स्त्रिया' व 'प्रेरणादायी स्त्रिया' या ई-पुस्तिकांची निर्मिती विकासिका गटाने केली. विचारभान या विवेकनिष्ठ विचारपद्धतीवर प्रशिक्षण कार्यक्रमात झालेल्या विषयांचा स्वाध्यायप्रवचन पद्धतीने गटात पुन्हा एकदा अभ्यास झाला. चक्री-उपासना उपक्रम नियोजन व प्रवास पीडीएफ स्वरूपात मांडणी केली.

### मासिक बैठक

कोविडमुळे गेली दोन वर्षे नियमित बैठकी प्रत्यक्ष होऊ शकत नव्हत्या, परंतु दूरस्थ पद्धतीने त्या सुरळीत पार पडल्या.

| महिना | विषय व वक्ते | उपस्थिती |
|---|---|---|
| एप्रिल २०२१ | कला संवादिनी : संवादिनी सदस्या | १०५ |
| जून | वर्षांत उपासना, देवराई व ग्रामदेवता : मा. प्रणव पाटील | ८५ |
| जुलै | वर्षारंभ उपासना, कृतीशील पुरस्कार वितरण : मा. श्रुती फाटक | ८० |
| ऑगस्ट | इच्छापत्र : मा. स्वाती यादवाडकर | ८१ |
| सप्टेंबर | भूलशास्त्र एक क्रांती : डॉ. मृण्मयी साठे | ५० |
| ऑक्टोबर | समतोल दिवाळी अंक प्रकाशन : मा. उज्ज्वला बर्वे | ७४ |
| नोव्हेंबर | Upcycling -शाश्वत जीवनशैलीसाठी : मा. सोनाली फडके | ८० |
| डिसेंबर | सामाजिक चळवळीतील स्त्रियांचे योगदान : मा. अंजली कुलकर्णी | ५० |
| जानेवारी २०२२ | स्त्री पत्रकार एक आव्हान : मा. कौमुदी काशीकर गुर्जर | ९० |
| फेब्रुवारी | केल्याने देशाटन-राजस्थान दौरा : ज्ञा. प्र. स्त्री-शक्ती प्रबोधन (ग्रामीण) विभागातील गट | ८२ |
| मार्च | मला समजलेली स्त्री शक्ती : मा. वृंदा पुरंदरे-शिवदे, मा. धनश्री वाघ | ८० |

## पालवी

कोविड ही संधी मानून कामाच्या पुनर्मांडणीचा विचार केला. मुलांमध्ये 'भावनिक बुद्धिमत्ता' विकसित करण्यासाठी काही अभ्यासक्रम तयार करण्याचे ठरविले. यासाठी अनयाताई निसळ आणि सुजाताताई होनप यांच्या पाच सत्रांचे आयोजन केले. यातून मिळालेल्या माहितीची, इतर पुस्तकांची व तज्ज्ञ लोकांची मदत घेऊन कृती खेळ तयार करणे असे काम आता चालू झाले आहे. आपले सण, उत्सव आणि व्रतवैकल्ये पारंपरिक पद्धतीने का साजरी केली जातात, याचा अभ्यास केला. पुढच्या पिढीला त्याबद्दल आत्मियता वाटून महत्त्वही पटेल, यादृष्टीने हे सर्व आपल्या आधुनिक जीवनशैलीशी कशा प्रकारे जोडता येतील याची मांडणी झाली.

## समतोल

ई-अंकामुळे समतोल अनेकांपर्यंत पोहोचला. प्रबोधिनीतील ज्येष्ठ व्यक्ती, पद्मभूषण डॉ. अशोकराव कुकडे आणि सुप्रसिद्ध लेखक सुमेध वडावाला रिसबूड यांच्यासारख्या अनेक मान्यवरांच्या उत्साहवर्धक प्रतिक्रिया मिळाल्या. अंकाचे तपशील पुढीलप्रमाणे -

१. एप्रिल २१ - अभ्यास प्रकल्प विशेषांक : छापील अंक, घरोघरी हस्ते वितरण
२. जुलै - विनोद
३. ऑक्टोबर - 'स्पर्श' दिवाळी अंक : छापील अंक, प्रकाशनाला ३० लेखकांची प्रत्यक्ष उपस्थिती.
४. डिसेंबर - प्रवास : शिरूर संवादिनीने संपादित केलेला अंक
५. फेब्रुवारी २२ - संक्रमण

## विद्याव्रत

मे २०२१ मध्ये २२ विद्यार्थ्यांचे दूरस्थ पद्धतीने विद्याव्रत शिबिर झाले. त्यामध्ये पुण्याबाहेरील विद्यार्थ्यांचा देखील सहभाग होता. या विद्यार्थ्यांचा विद्याव्रत संस्कार डिसेंबर २१ मध्ये प्रत्यक्ष झाला. त्याला ११ व्रतार्थी उपस्थित होते. पुण्याबाहेरील चार व्रतार्थींची उपस्थिती, सात माजी व्रतार्थींचा स्वयंसेवी सहभाग ही वैशिष्ट्ये आहेत. या गटासाठी संस्काराच्या आधी व नंतर 'राखी तयार करणे (सहभागी - ११ : श्रेयस या व्रतार्थीने यातून प्रथमच रु. २०० कमावले), खेळ (सहभागी - १०), वसुबारसेच्या निमित्ताने गोपूजन (सहभागी १५), पानिपत लाईट अँन्ड साउंड शो (सहभागी - ९), पावनखिंड सिनेमा-चर्चा (सहभागी - ६), शिवजयंती कार्यक्रम (सहभागी - ३ : माजी व्रतार्थी वैष्णवी हिने हा बसवलेला कार्यक्रम) अशी सत्रे झाली.

## कौशल्य

गटाच्या दूरस्थ परंतु नियमित झालेल्या बैठकींमध्ये पुढील सत्रे झाली.

१. भावनांची ओळख व नियमन या विषयाच्या अभ्यासासाठी 'भावनांच्या प्रांगणात' आणि इतर दोन पुस्तकाचे वाचन.
२. 'सुदृढ समाजासाठी व्यवस्थापन आणि नातेसबंध' या विषयावर चर्चा करून समतोल साठी लेखन.
३. 'गाणे तुझे माझे' या उपक्रमातून आपापल्या आवडीचे गाणे मुक्तपणे गाऊन इतरांना गटावर ऐकवताना ताण हलके झाले, गटाची वीण अधिक घट्ट झाली.
४. राठी शाळेतील मुलांसाठी सहा दूरस्थ सत्रे - विद्यार्थी संख्या २८ ते ३५.

## उमलत्या वयाशी जुळवून घेताना

| कार्यशाळा | संस्था व विशेष | संख्या |
|---|---|---|
| तरुणाईची आव्हाने | स. प. व टिळक महाविद्यालय (निर्भय कन्या अभियानांतर्गत) | ३१५ मुली |
| सहजीवन | १. अमृतेश्वर विद्यालय, विंझर, २. 'स्व'-रूपवर्धिनी | ९० व ५० मुली अनुक्रमे |
| संपूरकता | १. पोलीस प्रशिक्षण केंद्र, नानवीज, दौंड (पोलीस मित्रांसाठी प्रथमच कार्यशाळा - एकूण दोन वेळा), २. विविध ठिकाणचे संवादिनी गट | १. दोन्हीवेळी १७५ पुरुष PSI, २. ३५ |
| व्यक्तिमत्त्व विकसन | सिद्धिविनायक महाविद्यालय, पुणे (निर्भय कन्या अभियानांतर्गत) | ९५ |
| आरोग्य जाणीव, संपूरकता | गरवारे कला व वाणिज्य महाविद्यालय (निर्भय कन्या अभियानांतर्गत) | ७२ मुली |
| प्रशिक्षक प्रशिक्षण | शालेय मानसशास्त्र पदव्युत्तर पदविका वर्ग | ३६ |
| समानतेकडून संपूरकतेकडे | BMCC NSS कॅम्प, परसली (युवती विभाग - संवादिनी जोडीकार्य) | ५६ |
| ✲ HCL युवा-साथी | पुणे, औरंगाबाद, लातूर, कोल्हापूर जिल्ह्यातील ग्रामीण भाग | ५००० |
| ✲ संयम | २७ शाळा, ५ वस्ती भाग | ३५०० |

✲ या दोन्ही प्रकल्पात प्रज्ञा मानस संशोधिकेसोबत काम झाले. दोन्ही प्रकल्प मिळून गटातील गाभा प्रशिक्षक सदस्यांनी पुढच्या फळीतील २५ प्रमुख प्रशिक्षक तयार केले. ज्यांच्या माध्यमातून सुमारे १०० युवा आणि ७७ प्रौढ प्रशिक्षक तयार. दोन दिव्यांग प्रशिक्षकांचाही समावेश. त्यांच्यासाठीचे विशेष श्रवण साहित्य तयार केले. त्याशिवाय, माहिती तंत्रज्ञानाच्या जाळ्यामध्ये अडकत चाललेल्या मुलांच्या समस्यांवर काम करण्यासाठी Building Digital Guardians या मार्गदर्शनपर कार्यशाळेचे आयोजन केले गेले.

## वस्ती भेटी

नवीन व जुन्या सदस्यांना समाज दर्शन होत राहावे म्हणून वस्त्यांमध्ये नियमित भेटी व सर्वेक्षण केले जाते. यावर्षीही कोविडचे संकट असल्याने २४ नोव्हें. ते २४ डिसें. या काळात काळजी घेऊन नियोजनपूर्वक पाच वस्त्यांमध्ये काम केले. काशीवाडी, वडारवाडी, सातचाळ, गुरु नानक नगर, बुरुड आळी येथील ३०० कुटुंबांची गुगल फॉर्म वापरून विविध समाजगटांची माहिती मिळवली. त्यांचा अभ्यास व सोबतचे काम पुढील काळात करू.

अशाच प्रकारचा गुगल फॉर्म वापरून युवतींनी दि. ९ ऑगस्ट ते १४ ऑगस्ट २१ या काळात काशीवाडी, वडारवाडी, सातचाळ या वस्तीत युवतींचे सर्वेक्षण केले. एकंदर १०६ जणींची माहिती जमा झाली. याचे विश्लेषण होऊन विभागाच्या अभ्यास अहवाल पुस्तिकेत ते मांडले आहे. कोविड काळात सर्व बंद असल्याने दूरभाषवरून महिला व मुले यांच्याशी संवाद ठेवला.

**▶ सल्ला प्रशिक्षण - वैयक्तिक व गट समुपदेशन प्रशिक्षण**

विभागात होणाऱ्या भेटी व वस्तीभेटीतून समुपदेशनाचे काम वर्षभर सुरू असते. व्यक्तींच्या अडचणी, समस्या ऐकून त्यांच्यासोबत चर्चा करून उत्तरे शोधायला मदत करण्याचा प्रयत्न करतो. या प्रक्रियेतून समस्या परिहाराचे प्रशिक्षण होत असते. यावर्षी विविध बैठका व प्रशिक्षण वर्गातून १५ युवती व २५ महिला यांचेसाठी पाच सत्रे घेतली गेली. संवाद - घराघरात, समाजात, व्यक्ती-व्यक्तीमध्ये संवाद वाढायला हवा आहे. सकारात्मक संवाद करून लोकांच्या समस्या समजून घेऊन कशा सोडवायच्या याबाबत ॲड. व समुपदेशक प्रार्थना सदावर्ते यांनी व मा. हर्षाताई किर्वे यांनी सत्रे घेतली.

## समाज ऐक्यासाठी सांस्कृतिक कार्यक्रम

### भजनोपासना

सावित्री दलाच्या मासिक बैठकीत दोन वर्षांपूर्वी एकादशीनिमित्त एकत्र भजन करायचे ठरले आणि तेही दूरस्थ स्वरूपात. यामुळे कोविड काळात महिलांशी संपर्क ठेवणे व कुटुंबामधील प्रसन्नता, स्वस्थता टिकून रहायला मदत झाली. ज्या काळामध्ये प्रत्यक्ष जमणे शक्य होते, तेव्हा प्रत्यक्ष जमून किंवा दूरस्थ पद्धतीने कमीत कमी दहा ते पस्तीस महिला निश्चितपणे सहभागी झाल्या.

नव्याने अभंग शिकणे, सराव करणे त्याच बरोबर तंत्रज्ञानाची माहिती घेऊन दूरस्थ कार्यक्रमामध्ये भाग घ्यायला महिला शिकल्या. लहान मोठ्या गटांसमोर प्रत्यक्ष अभंग म्हणणे सरावामुळे उत्तम जमायला लागले. २०२० सालच्या आषाढी एकादशीपासून वर्षभर विभागात एकादशीला भजनोपासना होत होती. त्यामुळे पुणे केंद्राच्या दरवर्षी होणाऱ्या आषाढी एकादशीच्या भजनाची जबाबदारी मा. संचालकांनी विभागातल्या सदस्यांना दिली. वीस दिवस नियमितपणे सराव झाला. व्यवस्थित नियोजन करून प्रबोधिनीतील विविध विभागातील ५० सदस्यांच्या प्रत्यक्ष अभंग सेवेमुळे आषाढी एकादशीची भजनोपासना उत्तम झाली. दि. २० जुलै रोजी या आषाढीनिमित्त भजनोपासनेमध्ये एकूण ५१ लोकांनी प्रत्यक्ष सहभाग घेतला व ७०० लोकांनी दूरस्थ सहभाग घेतला.

### राष्ट्रीय एकात्मता महोत्सव

१० ऑक्टो. २१ला विशेष पद्धतीने शारदोत्सव कार्यक्रम झाला. राष्ट्रीय एकात्मता कार्यदिशेने महोत्सवाची कल्पना मांडली व सावित्री दलांनी ती अनुभवायची ठरवली. दलाच्या बैठकीत दोन महत्त्वाच्या कल्पना अंतिम केल्या गेल्या. सर्व राज्यांची सांस्कृतिक व सामाजिक माहिती देणारे प्रदर्शन व विविध राज्यांमधील सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले. एक आठवडा पूर्वतयारी करून बांबूपासून बनवलेल्या वस्तूंचे प्रदर्शन प्रथम सर्वांनी पहिले. नंतर विविध राज्यांची माहिती घेतली व सांस्कृतिक कार्यक्रम पाहिले. सभेमध्ये वीणाताई बेडेकर यांनी मणिपुर राज्याचा, विश्वेश कुलकर्णी यांनी छत्तीसगड राज्याचा तर अतुल बेल्लाई याने अरुणाचल राज्याचा वैशिष्ट्यपूर्ण परिचय करून दिला. सावित्री दलाच्या महिलांनी आलेल्या सर्व पाहुण्यांचे स्वागत केले. यामध्ये मुख्य पाहुण्या होत्या IAS मा. मृणाली जोशी! अभ्यासू वृत्ती, प्रयत्नांचे सातत्य, समान ध्येय असणारा मित्र परिवार व अनुभवी मार्गदर्शक या सर्व गोष्टींमुळे हे यश मिळवणे शक्य आहे असे यांनी सांगितले. सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये विविध राज्यांचे पेहेराव धारण करून त्या राज्यांची माहिती व लोकनृत्य (उदा. घुमर, भांगडा) सादर केली. भारतमातेची आरती व दिव्यांचे समर्पण केले गेले. भोंडला होऊन कार्यक्रमाचा समारोप झाला. ज्ञान प्रबोधिनीचे कार्यवाह मा. सुभाषराव देशपांडे यांनी सर्वांना मार्गदर्शन केले. मा. हर्षाताई किर्वे यांनी उपस्थितांचे उत्तम सहभागाबद्दल अभिनंदन केले. विविध राज्यातील विद्यार्थ्यांना प्रबोधिनीत पुन्हा येण्याचे निमंत्रण दिले. कोविड काळातील नियमांचे पालन करून वेगवेगळ्या नियोजित वेळी उपस्थित राहून एकूण १५० लोकांनी यात सहभाग घेतला. याशिवाय अनेक जणांनी तीन दिवस प्रदर्शन बघितले.

## मदतकार्य

या अंतर्गत शैक्षणिक साधन केंद्र या विभागामार्फत MAERSK या कंपनीकडून किराणा मालाची मदत वस्तीतल्या लोकांसाठी दिली गेली होती. दिवाळी जवळ आल्यामुळे फराळाचे जिन्नसही दिलेले होते. त्यामुळे किराणा माल आणि फराळ असे संच तयार करून प्रत्येक गरजू व्यक्तीला दिले. मदतकार्य दोन टप्प्यांमध्ये झाले. काशीवाडी वस्तीतल्या सावित्री दलात काम करणाऱ्या अर्चनाताई यांनी गरजू व्यक्तींची यादी बनवली. पहिल्या टप्प्यात ३५ कुटुंबांना

वाटप केले. तर दुसऱ्या टप्प्यात ७० कुटुंबांना वाटप केले. प्रत्येकी १० कि. किराणा व दिवाळी फराळ १२५ गरजू कुटुंबांना दिला.

## कौशल्य प्रशिक्षण आणि कार्यानुभव

युवती व महिलांसाठी विविध कौशल्य प्रशिक्षण देणे व शिकलेल्या गोष्टींसाठी सराव सत्र सुरू ठेवणे असे काम दि. २१ ऑगस्ट पासून सुरू केले. यामधून स्वयंरोजगार व उद्योजकता यासाठी लागणारी विविध कौशल्ये विकसित होतील अशी अपेक्षा आहे. युवतींची महाविद्यालये बंद होती. त्यांचे शिक्षण सुरू रहावे म्हणून पहिल्या वर्गाची योजना सुरू करताना राखी पौर्णिमेसाठी राख्या बनवून त्याची किंमत काढून त्या विकायच्या ठरल्या. पहिल्या पाच दिवसांच्या प्रयोगात रु. ४३०च्या साहित्यातून सव्वाशे राख्या बनवून रु. ५ ते रु. १५ किंमतीला विक्री केली. एकूण रु. ७३० ची विक्री झाली. त्यामधून मेंदी व पणती वर्गासाठी खर्च केला. पणत्या रंगवणे व सोल्डरिंग या वर्गामध्ये शिकलेल्या युवतींनी नैसर्गिक संसाधने विभागाच्याबरोबर प्रत्यक्ष कामाचा अनुभव घेतला. दिवाळीपूर्वी ४,५०० पणत्या युवतींनी रंगवल्या. त्यासाठीचे विद्यावेतन त्यांना मिळाले. तसेच सोल्डरिंग शिकलेल्या मुलींनी सोलर पॅनल युनिटमध्ये कामाचा अनुभव घेणे सुरू ठेवले आहे.

| कौशल्य | कालावधी | दिवस | संख्या |
|---|---|---|---|
| राखी | १७ ते २१ ऑगस्ट | ५ | ७ |
| मेंदी | १७ ते २१ ऑगस्ट | ५ | ७ |
| पणत्या | ६ ते ८ सप्टेंबर | ३ | ८ |
| सोल्डरिंग | १८ ते ३१ ऑगस्ट | १० | ७ |
| सोलर पॅनल | ऑक्टोबर २१ ते मार्च २२ | ६ महिने | ६ |
| फोटोग्राफी | ३१ ऑक्टोबर ते डिसेंबर | १२ | १६ |
| बांबू वस्तू प्रशिक्षण | २७ डिसेंबर ते १५ फेब्रुवारी | ३० | २४ |

**▶ बांबू वस्तू प्रशिक्षण वर्ग**

ज्ञान प्रबोधिनीच्या नागरीवस्ती अभ्यासगटातील सावित्री दलाच्या निरनिराळ्या वस्तीतून आलेल्या महिलांनी २७ डिसें. ते १५ फेब्रु. या काळात बांबू वस्तू प्रशिक्षण घेतले. महाराष्ट्र बांबू प्रमोशन फाऊंडेशन, मुंबई यांच्या अर्थसाहाय्यातून मातृमंदिर विश्वस्त संस्था, रतिलाल भगवानदास जैवतंत्रज्ञान विभाग, निगडी आणि नागरीवस्ती अभ्यासगट, पुणे यांच्या समन्वयाने हे प्रशिक्षण झाले. महिलांनी एकूण सात प्रकारच्या विणींपासून निरनिराळ्या वस्तू उदा. पेन स्टँड, लॅम्प शेड, पाण्याची बाटली बसेल अशी पिशवी, मोबाईल बसेल अशी पिशवी, चटयांच्या मॅटस्, पर्स, सुशोभनाच्या वस्तू अशा विविध वस्तू बनवल्या. तीन दिवस सर्व वस्तूंचे प्रदर्शन मांडले. प्रबोधिनीतील सर्व विभागांनी प्रदर्शनाचा लाभ घेतला. दि. २९ डिसें. ते १९ फेब्रु. या काळात ३० दिवसांचे प्रशिक्षण झाले. एकूण २४ महिलांनी त्यात सहभाग घेतला. या उपक्रमामुळे महिला बांबूच्या वस्तू बनवून भविष्यात स्वयं रोजगार मिळवतील असे वाटते. १९ फेब्रु. ला बांबू प्रशिक्षणात बनवलेल्या वस्तूंचे प्रदर्शन मांडले होते. या नंतर बांबू वर्गाच्या समारोपाकरता आलेल्या पाहुण्यांनी प्रदर्शनाला भेट दिली. प्रमुख पाहुणे डॉ. तैताली यांच्या हस्ते प्रशिक्षणात भाग घेतलेल्या महिलांना प्रमाणपत्र दिले. यानंतर डॉ. तैताली, मा. यशवंतराव व मा. सुभाषराव यांनी आलेल्या महिलांना मार्गदर्शन केले. प्रार्थनेने कार्यक्रमाचा समारोप झाला.

▶ शिष्यवृत्ती व विद्यावेतन स्वरूपात २०२१-२२ मध्ये दिलेली आर्थिक रक्कम रु. ४,१९,९९५

| क्र. | शिक्षणाचा प्रकार व विभाग | विद्या वेतन (रु.) |
|---|---|---|
| १ | युवती महाविद्यालयीन शिक्षण (ज्ञान प्रबोधिनी फाऊंडेशन कडून शिष्यवृत्ती) | २,६३,३५० |
| २ | पणती रंगवणे (नैसर्गिक संसाधने विभाग) | १९,६४० |
| ३ | सोल्डरिंग (नैसर्गिक संसाधने विभाग) | ७,५०० |
| ४ | सोलर पॅनल (नैसर्गिक संसाधने विभाग - दिवाळीपूर्वी) | ४०,४८० |
| ५ | सोलर पॅनल (नैसर्गिक संसाधने विभाग - दिवाळीनंतर) | ३५,३७५ |
| ६ | बांबू वस्तू (महाराष्ट्र बांबू प्रमोशन फाऊंडेशन) | ४१,२५० |
| ७ | बांबू वस्तू (नागरी वस्ती अभ्यासगट) | १२,४०० |

'ज्यासि आहे जगाचे भान ।
त्यावरि जगाची जबाबदारी पूर्ण ।
त्याने केलेचि पाहिजे दुःख निवारण ।
समाजाचे स्व-कलेने ।।९५।।

'याने मानवाअंगीची शक्ति ।
प्रकट होईल महादीप्ति ।
सेवा करील निसर्ग-प्रकृति ।
सर्व जीवांची ।।१०२।।'

(श्री तुकडोजी महाराज रचित ग्रामगीता, अध्याय ३६)

# १५ युवक विभाग

## शालेय दले

**▶ नियमित कामाशिवाय शालेय दलांवर झालेले महत्त्वाचे उपक्रम**

एप्रिल २१ ते सप्टें. २१ या कालावधीतले वृत्त : चाफेकर दलाने दर रविवारी एक अशा दोन महिन्यात पुण्यातील आठ ऐतिहासिक स्थळांना सायकलवर भेटी दिल्या. बाबासाहेब आंबेडकर दलावरील मुलांनी आषाढी एकादशीनिमित्त अभंग गायन केले. गणेशोत्सवादरम्यान सावरकर दलावरील मुलांनी ३००० घरांमध्ये, सोबतच तांबडी जोगेश्वरी या मानाच्या गणपतीसमोर संस्कृत आणि मराठी अथर्वशीर्षाचे पठण केले. गुरुगोविंदसिंह दलावर २४ विद्यार्थ्यांनी शाडू मातीच्या मूर्ती बनवून रंगवल्या. सॅम माणेकशॉ दलाने ढोलांशिवाय बरचीची दोन प्रात्यक्षिके केली.

**विज्ञान प्रदर्शने :** शालेय व महाविद्यालयीन विज्ञान दलांनी मिळून १४ सोसायट्यांमध्ये ७५ युवकांनी मिळून विज्ञान प्रदर्शने केली. शालेय दलांनी 'द्रवांचे विज्ञान', 'बलाचा अभ्यास' व महाविद्यालयीन दलांनी 'घरगुती उपकरणांमागील विज्ञान व मोजमापन' या विषयांवर प्रयोग सादर केले. यात एकूण ४० शालेय व ३० महाविद्यालयीन युवक सहभागी झाले होते.

ऑक्टो. २१ ते डिसें. २१ या दरम्यान यावर्षी देखील पणती विक्री, दिवाळी साहित्य विक्री, कंदील विक्री इ. उपक्रम झाले. यामध्ये कोथरूड, कर्वेनगर, वारजे, सहकारनगर, गोखले नगर आणि सदाशिव पेठ या भागात विक्री केंद्रे होती. अनेक ठिकाणी शालेय दले आणि युवक दले यांनी एकत्रित विक्री केंद्रे सांभाळली.

**हिवाळी शिबिरे :** डिसेंबरमध्ये कोथरूड भागातील चाफेकर दल, गुरुगोविंदसिंग दल, लक्ष्मणराव किर्लोस्कर दल आणि पेशवा बाजीराव दलाचे ६० कुमारांचे निगडी केंद्रात क्रीडा शिबिर झाले. सावरकर दलावर क्रीडा शिबिर आणि सामाजिक अनुभव शिबिर आणि इ. ७वीतील विद्यार्थ्यांची सायकल सहल झाली. सहकारनगर भागातील सॅम माणेकशॉ दल, छत्रपती शिवाजी दल आणि छत्रपती संभाजी दलाचे ३८ कुमारांचे तंबू शिबिर झाले. आर्य चाणक्य दलाच्या ३२ कुमारांचे साखर गावात तंबू शिबिर झाले.

जाने. २१ ते मार्च २१ या कालावधीमध्ये सर्व दले नियमित प्रत्यक्ष सुरू झाली. दोन वर्षांच्या कालावधीनंतर मुले मैदानावर आली असल्याने शारीरिक क्षमता विकसनावर भर देऊन भरपूर व्यायाम आणि खेळ सर्व दलांवर झाले. फेब्रुवारी महिन्यात किशोर

### युवकांचे प्रतिज्ञाग्रहण

कोविड काळामुळे कार्यक्रम पुढे-मागे होत असल्यामुळे वर्षभर प्रतिज्ञाग्रहणाचे कार्यक्रम होऊ शकले नव्हते. एप्रिल २०२२ मध्ये जो प्रतिज्ञाग्रहणाचा कार्यक्रम झाला त्यात २१ युवकांनी प्रथम व चार युवकांनी द्वितीय प्रतिज्ञा घेतली. त्याची तयारी वृत्तांत वर्षात चालू होती.

| क्र. | मुद्दा | तपशील |
|---|---|---|
| १ | दल संख्या | १७ नियमित दले (सदाशिव पेठ, शुक्रवार पेठ, बिबवेवाडी, सहकारनगर, कर्वेनगर, वारजे, सिंहगड रस्ता, नांदेड सिटी, गोखलेनगर) |
| २ | मुलांची उपस्थिती | कुमार - २००, किशोर - २५० एकूण (पट ६००) |
| ३ | मार्गदर्शक संख्या | ६७ |
| ४ | दुर्गभ्रमण व सायकल सहल | राजगड, तोरणा, रायरेश्वर, गळगड, रोहिडा, सिंहगड, मल्हारगड, आगाखान पॅलेस, पुण्यातील विविध देवळे आणि ऐतिहासिक वास्तू |
| ५ | प्रासंगिके | संत ज्ञानेश्वर, राणा प्रताप, छ. शिवाजी महाराज, शिवरायांचे मावळे, गुरुगोविंदसिंह, बाबासाहेब आंबडेकर, स्वातंत्र्यवीर सावरकर, महात्मा गांधी, स्वामी विवेकानंद, समर्थ रामदास, लोकमान्य टिळक, सी. व्ही. रमन, मराठी दिन, स्वातंत्र्यानंतरची युद्धे, परमवीरचक्र विजेते, गणेशोत्सव, आंदोलनांचा अभ्यास, हिंदुत्व, चिपळूण मदतकार्य अनुभवकथन, भोंगे-मस्जिद वैचारिक, सायकल, प्रकाशाची रचना, |
| ६ | खेळ | डॉजबॉल, लंगडी, चौरसधावा, दशहस्तांतरण, व्हॉलीबॉल, बेसबॉल, फुटबॉल, नौकायुद्ध, विंचूयुद्ध, कोंबडायुद्ध, अप्पारप्पी, लगोरी, लपाछपी |
| ७ | विविध दलांवरचे प्रयोग-उपक्रम | कार्यानुभव दिवस, सहाध्याय दिवस, सिनेमा पाहणे, कौशल्य विकसन सत्रे, गणपती पहायला जाणे, मातृभूमी पूजन, खाद्य विक्री, रक्तदान शिबिरे, एकमेकांच्या दलाला भेटी आणि सामने, राष्ट्रगान गायन स्पर्धेत सहभाग, पानिपत युद्ध शो ला भेट, गुरुद्वारा भेट |
| ८ | मार्गदर्शक दल | कबड्डी, फुटबॉल, बास्केटबॉल, हँडबॉल इ. खेळ झाले. सावरकर चरित्र, हिंदुत्व, शिवचरित्र अभ्यास, प्रबोधिनी साहित्य, नेतृत्व विकसन, निगडी केंद्र परिचय, अफगाणिस्तान परिस्थिती, प्रतिज्ञाग्रहण, इ. वैचारिके, प्रासंगिके व काही कौशल्य प्रशिक्षणाच्या कार्यशाळा (संगणक कौशल्य, संवाद, वादविवाद, वक्तृत्व, इ.) |

दलांचे स. प. महाविद्यालयाच्या मैदानावर एकत्र दोन दिवसीय क्रीडा आणि व्यक्तिमत्त्व विकसन शिबिर झाले. शिबिरामध्ये एकूण ९२ किशोर आणि १४ मार्गदर्शक उपस्थित होते. चाफेकर दलावरील १५ कुमारांनी स्वारगेट आणि शिवाजीनगर बस स्थानकात जाऊन एस.टी. संपातील संपकऱ्यांची भूमिका जाणून घेतली.

**▶ शालेय मार्गदर्शक दल : काही महत्त्वाचे उपक्रम**

पाच भागात विभागलेल्या शालेय दलांपैकी सहकारनगर आणि कोथरूड भागांचे एकत्र आणि गोखलेनगर, विज्ञान दल, प्रशालेय दल या भागांचे एकत्र, असे मार्गदर्शक दल चालवण्यात आले. नियुक्त ६७ जणांपैकी मार्गदर्शक दलावर नियमित उपस्थिती २०-२५ दरम्यान राहिली.

१. काशीवाडी मध्ये बरची प्रात्यक्षिक + घरोघरी मातृभूमिपूजन
२. विकासमित्र प्रकल्पात वेल्ह्यात शाळांमध्ये सत्र
३. वेल्हे भागात (राजगड) श्री शिवाजी राजगड स्मारक मंडळ यांच्यासोबत 'आग्र्याहून सुटका' यानिमित्त बरची प्रात्यक्षिक
४. विविध ठिकाणी जाऊन जाहीर कथाकथनं करणे
५. भवितव्य लेखन - एकत्रित चर्चा

## भौगोलिक विस्तार व राष्ट्रीय एकात्मता

**भौगोलिक विस्तार :** मार्च-एप्रिल महिन्यात २० युवकांचे विस्तार शिबिर प्रशिक्षण घेण्यात आले. दोन वर्षांनंतर पहिल्यांदाच विस्तार शिबिरांसाठी युवक पुण्याबाहेर गेले. दोन टप्प्यात एकूण २३० मुलांची शिबिरे झाली. पहिल्या टप्प्यात अलोरे, वाई, शिरूर आणि केतकी या गावांत मिळून ११ जणांनी १२० मुलांचे तर दुसऱ्या टप्प्यात कराड, सातारा, धुळ्यात ११ युवकांनी १०० मुलांचे शिबिर घेतले.

**राष्ट्रीय एकात्मता :** अरुणाचल प्रदेश Statehood Day निमित्त अरुणाचल प्रदेशच्या इतिहासाचा थोडक्यात परिचय व अरुणाचली लोकांशी परस्परसंवाद असा कार्यक्रम झाला.

या अंतर्गत झालेल्या अन्य उपक्रमांचे वृत्त महाराष्ट्राबाहेरील विस्तारकार्य यामध्ये दिलेले आहे.

## महाविद्यालयीन दले

पाच क्रीडा दले आणि तीन विज्ञान दले अशी एकूण आठ महाविद्यालयीन दले वर्षभर साप्ताहिक वारंवारितेने भरत होती. दलांवर नियमित खेळ/ विज्ञान अभ्यास प्रयोग, प्रासंगिके, वैचारिके, पद्य झाली. दलांनी गिर्यारोहण सहली, भातलावणीमध्ये सहभाग, विषय परिचय शिबिरे इ. प्रासंगिक उपक्रम सुद्धा आयोजित केले. सर्व दलांवर मिळून ११०-११५ युवकांची सरासरी उपस्थिती दर सप्ताहात वर्षभर होती.

**▶ महाविद्यालयीन मार्गदर्शक दल**

महाविद्यालयीन दलांवर नियुक्त ४१ मार्गदर्शकांपैकी सरासरी २० उपस्थितीने हे दल वर्षभर भरले. बैठकी व त्याला जोडून मार्गदर्शक दल होऊ लागल्यामुळे संघटना पक्की व्हायला गेल्या दोन-तीन वर्षांत चांगली मदत झाली आहे.

**▶ मदतकार्ये, विविध शिबिरे, उपक्रम, वैचारिके व प्रशिक्षणे**

१. एकूण आठ वेळा वेगवेगळे युवक हे वीर या गावातील अस्तित्व प्रतिष्ठान येथील मुलांचे शिबिर घ्यायला गेले. घरी बिकट परिस्थिती असलेले, अनाथ अशा मुलांना अस्तित्व प्रतिष्ठानमध्ये सांभाळले जाते. नकाशा काढणे, खेळ, गटकार्य, पद्य, स्पर्धा, विज्ञान सत्र असे अनेक उपक्रम युवकांनी तिथल्या मुलांसाठी घेतले.
२. रक्तदान शिबिर या उपक्रमाचा उपयोग व नियमित रक्तदानाची गरज यामुळे मे २१ ते मार्च २२ या काळात प्रबोधिनी वास्तू, सहकारनगर, कोथरूड, वारजे या भागांमध्ये १२ रक्तदान शिबिरे आयोजित केली. एकूण १०८० पिशव्या रक्त संकलन झाले. जानेवारी महिन्यातील शिबिरामध्ये महिलांचे रक्तदान यावर भर दिला.
३. मुळशीला कांगूरमाळ येथे विहीरीसाठी श्रमदान (टिळक दल नऊ जण) व लवी वेल्हा येथे २१ जणांचे श्रमदान झाले.
४. दि. २९ जुलै ते दि. १० सप्टेंबरपर्यंत स्टॉलवरून आणि दूरस्थ अशी गणेशमूर्ती विक्री झाली. सुमारे चार लाख रुपयांची एकूण उलाढाल झाली. एकूण ४५ युवक उपक्रमामध्ये सहभागी होते. एकूण ३९८ मूर्तींपैकी ३४४ मूर्तींची विक्री झाली. यातील सुमारे २२५ मूर्ती दूरस्थ नोंदवल्या गेल्या व त्यापैकी १९८ मूर्ती घरपोच दिल्या.
५. दिवाळीमध्ये कंदील विक्री उपक्रमाच्या प्रक्रियेमधली उत्तमता वाढवण्यासाठी Process time reduction, Cost cutting, supply chain security (vendor diversification), Product quality control, Packaging, Material log, storage management, Delivery, Maximizing sales, Stall models, new product development, Unique product procurement - KaKa, Jute, Warli, etc अशा दलानुसार जबाबदाऱ्या वाटून घेतल्या होत्या. दरवर्षी घाऊक विक्रेत्यांकडून कंदील व पणत्या विकत घेऊन ते आपल्या स्टॉलवर विकले जातात, पण या वर्षी शून्यापासून काही कंदील बनवून ते विकणे, असा अतिशय चांगला प्रतिसाद मिळालेला उपक्रम केला.
६. वर्षभरात विविध विषयांची अभ्यास शिबिरे, वैचारिके झाली. तसेच युवकांनी विविध गटांसमोर अभ्यास मांडणी केली. त्यातील काही विषय पुढीलप्रमाणे - बाबासाहेब आंबेडकर चरित्र वाचन, लोकमान्य टिळक चरित्र परिचय शिबिर, राष्ट्रीय एकात्मता मेळावा प्रक्रिया व प्रबोधिनीची भूमिका, श्री. गजानन मेहेंदळे यांच्या 'शिवाजी महाराज झाले नसते तर' या पुस्तकाचा अभ्यास, रशिया-युक्रेन संघर्ष व आंतरराष्ट्रीय परिणाम, राष्ट्रीय एकात्मतेसाठी स्वधर्म जागरण, यशस्वी जागतिकीकरणासाठी भारतीय राष्ट्रवाद, Conceptual Enrichment Workshop - Dynamics of Machinery, Vibrations, Introduction to Algorithms

## शालेय दले

**▶ ज्ञान प्रबोधिनी प्रशालेतील इ. ५वी ते ७वीचे कमलाबाई सोहोनी दल आणि इ. ८वी ते १०वीचे कल्पना चावला दल**

एप्रिल २०२१ ते मार्च २०२२ या कालावधीत दोन्ही दलांवर आठवड्यातून चार दिवस वर्गश: विविध खेळांनुसार आणि एक दिवस पथकश: अशी रचना होती. मुलींच्या व्यक्तिमत्त्व विकसन, समूहगुणविकसन आणि नेतृत्वगुण विकसनासाठी दैनंदिन दलाबरोबर विविध प्रासंगिक उपक्रमांचे आयोजन केले होते.

यावर्षी सुरुवातीचे काही महिने दल दूरस्थ माध्यमातून झाले. या दरम्यान दलावर व्यायाम, गटचर्चा आणि अनौपचारिक गप्पा यावर भर दिला. वैयक्तिक शारीरिक क्षमता वाढवण्यासाठी वर्गाने ठरवून व्यायाम संकल्प, योगासने, जास्तीत जास्त सूर्य नमस्कार घालणे, नवीन पद्य शिकून अर्थ समजून घेणे, प्रबोधिनी साहित्यातील काही भाग वाचून त्यावर चर्चा, महत्त्वाच्या घटना समजून घेऊन त्याची मांडणी, गटचर्चा, बौद्धिक खेळ यासारख्या वेगवेगळ्या कृती दलावर केल्या. कोविड काळातील बदललेली दलाची रचना पूर्ववत करत सप्टेंबर महिन्यापासून दूरस्थ आणि प्रत्यक्ष अशा दोन्ही माध्यमातून दल घेतले. आणि जानेवारी महिन्यापासून पूर्णपणे प्रत्यक्ष मैदानावर भेटून दल सुरू झाले. मैदानावर कमलाबाई सोहनी दलावर वर्गश: सांघिक खेळ झाले. कल्पना चावला दलावर ठरवून सलग काही महिने कबड्डी, व्हॉलीबॉल आणि बास्केटबॉल या तीन खेळांचे प्रशिक्षण मार्गदर्शिकांनी दिले. मुलींनी यातील आपल्या आवडीच्या खेळाची निवड करून त्यातील कौशल्य मिळवण्याचा प्रयत्न केला. खेळाबरोबर मनोरे स्पर्धा, अनुभवकथन, वर्ग बैठक, भारतातील महत्त्वाच्या व्यक्तींबद्दल मांडणी, आजूबाजूच्या परिसरात फिरून समस्या बघणे आणि त्यावर चर्चा करून उत्तरे शोधायचा प्रयत्न करणे यासारखे अनुभव मुलींनी घेतले. दर शुक्रवारी पथकश: दल झाले. त्यात इयत्ता १०वीतील मुलींनी अन्य वर्गांसाठी दलाचे नियोजन करून खेळ आणि उपक्रम घेतले. यावर्षी पथकश: राखी विक्री हा उपक्रम झाला. त्यामुळे त्यांच्यातील नेतृत्वगुण विकसित व्हायला मदत झाली.

**गणेशोत्सव :** कल्पना चावला दलावर सरावाच्या दरम्यान मुलींनी साथीला वाद्य आणि मिरवणुका नसताना सुद्धा फक्त बरचीनृत्य करण्यात मिळणारा आनंद घेतला. गणेशोत्सवात कमलाबाई दलातील मुली आरती आणि अथर्वशीर्ष पठण यासाठी प्रथमच प्रबोधिनीत भेटल्या. दोन्ही दलांसाठी गणेशोत्सवात गटकार्यांची स्पर्धा झाली. भागश: प्रत्येकी ३-४ मुलींच्या गटांत पाच विशेष गटकार्ये दिली होती. समाजासंबंधी नवीन माहिती आणि अनुभव देणारी गटकार्ये दोन्ही दलांवरील मुलींनी केली. या शिवाय दहा मुलींच्या घरील आरतीसाठी अन्य राज्यातील सदस्य दूरस्थ बोलावले होते. त्यांच्याशी गप्पा मारण्याची आणि त्यांची संस्कृती समजून घेण्याची संधी मिळाली.

**हिजाब व मुलींचे शिक्षण याविषयी अभ्यास**

प्रबोधिनीच्या पुणे व निगडी केंद्रांवर काम करणाऱ्या सहा युवतींनी चालू घडामोडींचा अभ्यास या अंतर्गत 'हिजाब आणि मुलींचे शिक्षण' यानिमित्ताने सुरू झालेल्या वादाचा पंधरा दिवस अभ्यास केला. प्रत्यक्षात काय घडले?, सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक आणि न्यायालयीन बाजू, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रतिक्रिया, या अंगांनी अभ्यास झाला. या अभ्यासाची सविस्तर मांडणी पुणे, निगडी, हराळी, अंबाजोगाई, वेल्हे येथील युवती कार्यकर्त्यांसमोर झाली. मुस्लिम महिलांच्या शिक्षणाविषयी त्यांच्या मुलाखतींद्वारे अभ्यास प्रकल्प करणाऱ्या प्रबोधिनीच्या कार्यकर्त्या मानसीताई बोडस आणि वाच. मनीषाताई शेटे यांनी मांडणीनंतर गटाला मार्गदर्शन केले.

**सहली :** दिनांक २७ सप्टेंबर रोजी ३० मार्गदर्शिकांच्या गटाने इ. ५वी ते ८वी या चार वर्गांच्या सहली नेल्या. सहलींची ठिकाणे क्रमशः - तिकोना, घनगड, राजगड व वेल्हे केंद्र आणि निगडी केंद्र. इ. ५-६वीतील मुलींनी दुर्ग भ्रमंती, आणि इ. ७-८वीतील मुलींनी सहली बरोबर प्रबोधिनीच्या केंद्राला भेट देऊन काम समजून घेतले. या सहलीतून मुलींनी आपल्या क्षमता वाढवण्याचा प्रयत्न केला. इ. ८वी मुलींची सायकल सहल झाली. त्यातून त्यांचा आत्मविश्वास वाढला.

त्याशिवाय पावनखिंड चित्रपटाच्या निमित्ताने पुण्यापासून थोडं दूर मराठ्यांच्या पराक्रमाने पावन झालेली खिंड प्रत्यक्ष पाहून यावी यासाठी पावनखिंड सहलीचे नियोजन केले. इयत्ता ९वी -१०वी मुलींनी २७ फेब्रुवारी रोजी चित्रपट बघितला आणि त्यानंतर २८ फेब्रुवारी ते १ मार्च अशी पावनखिंड इथे निवासी सहल झाली. आंबा गावी पोचल्यावर त्या वेळी चालू असलेल्या हिजाब प्रकरणावर अभ्यासपूर्ण मांडणी ऐकून गटचर्चा केली. रात्री जेवणानंतर दोन तास साहस गटकार्य करण्याचा आनंद गटाने घेतला. फक्त चित्रपट बघून किंवा एखाद्या प्रसंगाचा, ठिकाणाचा इतिहास समजून घेऊन पुरणार नाही. तर त्यातून प्रेरणा घ्यायची म्हणजे प्रत्यक्ष कृतीत ते यायला हवं. त्यामुळे मनातली भीती घालवण्याच्या छोट्या कृतीतून ती प्रत्यक्षात आणण्याचा प्रयत्न केला. रात्री अंधारात कोणत्याही कृत्रिम प्रकाशाची मदत न घेता दिलेलं काम अनोळखी गावात जाऊन पूर्ण करण्याचा अनुभव गटाने घेतला.

**शिबिर :** दि. २३ ते २५ डिसेंबर कमलाबाई दलाचे शिबिर झाले. पाच दिवसांचे नियोजित शिबिर तेव्हाच्या परिस्थितीमुळे तीन दिवस झाले. सर्व नियम पाळून सर्व सत्रे आणि खेळ प्रत्येकी दहा मुलींच्या गटांत पार पडली. गटात खेळायला परवानगी नसल्याने

लांब उभं राहून खेळता येतील असे नवीन खेळ आणि कृती हे या शिबिराचे वैशिष्ट्य होते. या शिबिरात खेळ, गटकार्य या बरोबर छोट्या-छोट्या समस्या सोडविण्यासाठी कल्पक उत्तर शोधण्याचा आनंदही मुलींनी आणि मार्गदर्शिकांनी घेतला.

वरील उपक्रमांबरोबरच भोंडला, अभंग गायन, लेझिम प्रशिक्षण, पुण्यातील नागरी वस्त्यांमध्ये जाऊन दल घेणे, अभ्यास दल, पद्य स्पर्धा, पुस्तक वाचन असे अनेक प्रासंगिक उपक्रम दलांवर झाले.

## मार्गदर्शिका गट

या वर्षी दहा दल प्रतिनिधी, दोन दल मार्गदर्शिका, एक साहाय्यक प्रतोद आणि एक दल प्रमुख अशा एकूण १४ युवतींची प्रशालेय दलासाठी नियुक्ती झाली होती. त्यातील सहा युवतींनी पूर्ण वेळ आणि आठ युवतींनी प्रासंगिक काम केले. दलाची पाक्षिक नियोजन व आढावा बैठक प्रत्यक्ष किंवा दूरस्थ झाली.

मार्गदर्शिका गटासाठी काही उपक्रम या वर्षात झाले. त्यातील महत्त्वाचे उपक्रम -

**पावसाळी सहल :** ११ जुलै २०२१ या दिवशी सहा मार्गदर्शिका राजगड इथे पावसाळी सहलीसाठी गेल्या होत्या. टाळेबंदीनंतर शालेय गटाची सहल नेण्याची पूर्वतयारी म्हणून ही सहल झाली. मार्गदर्शिकांना सहलीचे नियोजन करण्यासाठी आणि परिस्थितीचा अंदाज येण्यासाठी या सहलीचा उपयोग झाला.

**मार्गदर्शिका प्रशिक्षण बैठक :** नियमित बैठकीशिवाय दि. २९ ऑक्टोबर २०२१ रोजी एक दिवसाची मार्गदर्शिका प्रशिक्षण बैठक झाली. बारा युवतींनी सहभाग घेतला. नियोजन कौशल्य असा विषय होता. युवती विभागाच्या सुरुवातीपासून आत्तापर्यंतच्या कामाचा आढावा सुद्धा एका सत्रात घेतला.

**▶ प्रबोध शालेय गट**

**विज्ञान शिबिर २०२१ :** ज्ञान प्रबोधिनी शिवाय अन्य प्रशालांमध्ये शिकणाऱ्या इ. ५वी ते १०वीतील किशोरींसाठी प्रबोध शालेय गटाच्या माध्यमातून काम केले जाते. यावर्षी प्रथमच मुलींसाठी दि. ६ ते १३ जून या कालावधीत दूरस्थ विज्ञान शिबिर घेण्यात आले. मुलींमध्ये विज्ञानाची आवड निर्माण करणे व ती वाढवणे, त्यांच्या विचार-प्रक्रियेत सुधारणा आणणे आणि त्यांचे निरीक्षण कौशल्य वाढवणे ही या शिबिराची मुख्य उद्दिष्टे होती. निगडी आणि पुण्यातील युवतींनी एकत्र हे शिबिर घेतले. एकूण १४ युवतींनी शिबिराची जबाबदारी घेतली. शिबिरातील सहभागी मुलींची संख्या मर्यादित ठेवण्यात आली होती. संपूर्ण महाराष्ट्रातील २५ मुलींनी या शिबिरात सहभाग घेतला होता.

शिबिरात सहा गटांमध्ये मुलींना प्रकल्प वाटून देण्यात आले. या प्रकल्पांसाठी लागणारे किट शिबिराच्या आधी प्रत्येकीच्या घरी पोहोचवण्यात आले. दैनंदिन आयुष्यातल्या गोष्टी तशा का काम करतात असे प्रश्न विचारून त्यांच्या विचार प्रक्रियेला चालना द्यायचा प्रयत्न केला. एकूण पाच मुख्य सत्रांबरोबर मुलींना सत्रावर आधारित पूरक कृती रोज देण्यात आली. रोज नियमित गटात दिलेल्या प्रकल्पांवर गटमार्गदर्शिका गटातल्या मुलींशी चर्चा करत होत्या. समारोपामध्ये मुली व त्यांच्या पालकांशी शिबिराबद्दल, त्यांनी केलेल्या वेगवेगळ्या प्रयोगाबद्दल आणि प्रकल्पाबद्दल चर्चा झाली.

## महाविद्यालयीन दले

वर्षभर इ. ११वीच्या वर्गाची वर्गबैठक पाक्षिक पद्धतीने झाली. यामध्ये प्रबोधिनी साहित्य वाचन व चर्चा, युवतींनी विविध विषयांची तयारी करून स्वतः अभ्यास मांडणे, भवितव्य लेखाबाबत समजून घेणे, असे विविध विषय हाताळले गेले.

**▶ अहिल्याबाई होळकर दल**

नियमितपणे साप्ताहिक (प्रत्यक्ष अथवा दूरस्थ पद्धतीने) भरणाऱ्या दलावर व्यायाम-खेळ व विविध विषयांवर वाचन-चर्चा, अभ्यास करून मांडणी करणे अशा विविध माध्यमांचा वापर झाला. त्याशिवाय दलाचे काही विशेष कार्यक्रम झाले.

दिवाळीच्या निमित्ताने प्रबोधिनीत दीपोत्सव साजरा केला. इ. ११वी पुढील साधारण १२५ युवती यासाठी एकत्र जमल्या होत्या. सुरुवातीला परस्पर परिचय झाला. यावर्षासाठी विषय ऑलीम्पिक आणि पॅरा-ऑलीम्पिक खेळांमध्ये भारताला मिळलेले यश असा होता. त्यासंदर्भात दोन युवतींनी माहिती सादर केली. परिचय खेळ आणि माहिती सांगून झाल्यानंतर संपूर्ण वास्तूत पणत्या लावल्या. त्यानंतर पद्यगायन झाले आणि प्रार्थनेने समारोप झाला.

**▶ प्रशालेच्या २०१६च्या तुकडीमधील युवतींचे काम**

कोविड काळामध्ये स्वतःहून अनेकांशी संवाद साधणे, आधार देणे यादृष्टीने संपर्क गट म्हणून प्रत्येकीने काम करायचे असे ठरले. २०१६-२०२० या कालावधीत दहावी झालेल्या युवतींना संपर्क करून विचारपूस करणे आणि त्यानिमित्ताने ही संपर्क यादी अद्ययावत करणे, असे प्राथमिक काम त्यांनी केले.

वस्ती आणि ग्राम विकसन विभागातील महिला व युवतींसाठी व त्यांच्या कुटुंबीयांसाठी या काळात कशी काळजी घ्यावी, आहार कसा असावा, व्यायाम काय करावा असे तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन सत्र योजणे, ग्रामीण भागात जाणाऱ्या भोंगागाडीसाठी jingles तयार करणे, अशी कामे युवतींनी केली.

## अन्य महत्त्वाचे

ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, प्रज्ञा मानस संशोधिका, शैक्षणिक उपक्रम संशोधिका, संचालक कार्यालय अशा विविध विभागांच्या कामात युवतींनी जबाबदारीपूर्वक सहभाग घेतला.

मध्यवर्ती युवती संघटन बैठक, पुणे केंद्रीय विस्तारित समिती अशांमध्येही युवती सहभागी झाल्या.

# १७ उद्योजकता विकास केंद्र

उद्योजकता विकास केंद्रात दोन प्रकारचे काम सुरू आहे. उद्योग सुरू करण्याची अभिक्षमता मोजणे व संभाव्य उद्योजकाला मार्गदर्शन करणे, हे एक प्रकारचे काम. दुसरे प्रबोधिनीच्या विविध केंद्रांवर उद्योग पूरक उपक्रमांना चालना देणे.

वृत्तांत वर्षामध्ये एकूण पाच सदस्यांनी BEAM ही अभिक्षमता चाचणी दिली. प्रबोधिनीच्याच तीन ज्येष्ठ कार्यकर्त्यांनी ही चाचणी देऊन त्यांचे अनुभव संयोजकांना सांगितले. Business Risk घेण्याची वृत्ती कशी मोजता येईल, यावर अधिक प्रयत्न करण्याचे ठरले.

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी दिवाळीच्या निमित्ताने आकाश-कंदील तयार करणे व विक्री असा जो उपक्रम केला तो करण्याआधी हा उद्योग कसा करावा, यासंबंधी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्यात आले. प्रबोधिनीचा नैसर्गिक संसाधने विभाग व महाविद्यालयीन युवक दल यांनी दिवाळीनिमित्त 'तेजोमय' हा LED दिवे व माळा तयार करून विकण्याचा उद्योग केला. तीन वॅटचे सौर पॅनेल्स नैसर्गिक संसाधन विभागाने तयार केले, तर पणत्या रंगविणे व त्याला इलेक्ट्रॉनिक सर्किट जोडून LED दिव्यांची जुळणी करणे असे काम दलाच्या युवकांनी केले. आकर्षक माहितीपत्रक काढून गूगल फॉर्म्सच्या साहाय्याने मागण्या नोंदवण्यात आल्या व तडाखेबंद विक्री करण्यात आली. या उपक्रमातून युवकांना सुमारे रु. सव्वा लक्षचा लाभ मिळाला. त्याचा वापर ते विविध अभ्यासदौऱ्यांसाठी करू शकले. तत्पूर्वी गणेशोत्सवात गणेशमूर्तीचीही वेगळ्या गटाने खरेदी-विक्री केली. त्याचे वृत्त युवक विभागाच्या वृत्तात आले आहे.

केंद्र शासनाच्या अटल इनोव्हेशन मिशन या अंतर्गत अटल कम्युनिटी इनोव्हेशन सेंटर (ACIC) या योजनेमध्ये प्रबोधिनीची निवड झाली आहे. त्याची कार्य योजना व आर्थिक अंदाजपत्रक शासनास पाठवण्यात आले. या उपक्रमासाठी प्रामुख्याने शेती व बायोटेक्नॉलॉजी यातील नावीन्यपूर्ण कल्पनांवर आधारित start-ups ना मदत करायची आहे. त्यासाठी कंपनी कायद्याखाली Section 8 कंपनी नोंदवण्याची तयारी यावर्षात पूर्ण झाली. या दोन क्षेत्रांमधील पाच उद्योजकांच्या भेटी झाल्या. तसेच, फर्ग्युसन महाविद्यालय यांच्या पदव्युत्तर बायोटेक विभागाबरोबर एक सहमतनामा (MoU) करण्यात आला. तेथील विद्यार्थी निगडी केंद्रातील अनुभव घेण्यासाठी येऊ घातले आहेत.

श्री. दीपक कोतकर यांच्या सनगेट एंटरप्रायझेस या सौरशक्तीमधील उद्योगाला वेळोवेळी मार्गदर्शन करण्यात आले. या तंत्रज्ञानासंबंधी एक ते तीन महिन्यांचा अभ्यासक्रम चालविण्यासाठी शिवापूर व साळुंब्रे या उपकेंद्रांवर कार्यशाळा उभारण्यात आल्या. त्यासाठी M/S GKN Sinter Metals Pvt. Ltd., भोसरी, पुणे यांच्याकडून सीएसआरद्वारा अर्थसाहाय्य मिळाले. वैद्यकीय उपकरणांमध्ये माजी विद्यार्थ्यांचा Codex हा उद्योगसमूह वेगाने प्रगती करीत आहे. त्यांनी वैद्यकीय क्षेत्रात लागणारा एक DVT पंप नुकताच विकसित केला आहे.

सोलापूर केंद्रात गेल्या वर्षी सुरू झालेला कागदी पिशव्यांचा उद्योग चांगला वाढला आहे. सुमारे तीस विडी कामगार महिला यांची तंबाखू हाताळण्यापासून मुक्ती या उद्योगामुळे झाली आहे. सामाजिक उद्योजकता याचे हे एक चांगले उदाहरण होय. पुणे जिल्ह्याच्या वेल्हे तालुक्यात शेतातील गबाळापासून पेलेटस तयार करणे व त्या निर्धुर चुलीत वापरणे, याचा उद्योग सौ. सुरेखा दिघे यांच्या घरी सुरू झाला आहे. त्याचे काम स्त्री-शक्ती प्रबोधन (ग्रामीण) या विभागाच्या कार्यकर्त्यांनी केले.

पुण्यात मुकुंदनगर येथे मेल्कॉन या इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रातील महिला उद्योगाचे काही काम शिवापूरला करण्यासाठी प्रयत्न झाले. तांत्रिक बाबी शिकणे झाले असून आर्थिक दरपत्रकाचा अभ्यास सुरू केला आहे.

'मोजके थोरपुरुष होऊनि जाती ।
इतरांची पातळी न येचि वरती ।
तव ती समाजाची प्रगति ।
कैसी म्हणावी जाणत्याने? ।।७९।।'

(श्री तुकडोजी महाराज रचित ग्रामगीता, अध्याय १८)

'यासाठी प्रत्येक घटक सज्ञान ।
पाहिजे निरोगी, उद्योगी संपन्न ।
तरीच ते गाव आदर्शाचे भूषण ।
मिरवू शके ।।८०।।'

(श्री तुकडोजी महाराज रचित ग्रामगीता, अध्याय १८)

## केंद्र स्तरावरील कार्यक्रम

**▶ शारदीय नवरात्र**

शारदीय नवरात्रात आपल्या मनातील भाव, कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी माजी ज्येष्ठ अध्यापिका (पूजन) कृतज्ञता समारंभ. दि. १३ ऑक्टोबर २०२१ रोजी मनोहर सभागृहात साजरा झाला.

यात आलेल्या माजी ज्येष्ठ अध्यापिकांचे केंद्रात सध्या कार्यरत असलेल्या माजी विद्यार्थिनींनी पाद्यपूजन केले आणि आपल्या कृतज्ञतेचा भाव व्यक्त केला. नेमक्या शब्दांमध्ये त्या-त्या शिक्षकांच्या काही जुन्या आठवणींना उजाळा यावेळी दिला गेला आणि आपले मनोगत व्यक्त केले. विद्यार्थ्यांना घडवण्यासाठी आशीर्वादही मागितले. बिदरकर बाई, सौ. पुणतांबेकर बाई, सुहासिनीताई पानसे यांनी त्यांच्या प्रबोधिनीच्या प्रवासातील आठवणी सांगत कै. भाऊंमुळे कसे घडलो आणि प्रबोधिनीमय झालो, असे मनोगत व्यक्त केले. मा. यशवंतराव लिमये यांनी त्यांचे अध्यापकांसोबतचे अनुभव सांगितले. केंद्रप्रमुख मा. मनोजराव देवळेकर यांनी समारोप केला.

**▶ आ. माई श्रद्धांजली सभा**

दि. २१ नोव्हेंबर २१ रोजी कै. भाऊ तथा वामनराव अभ्यंकर यांच्या पत्नी आ. इंदिरा अभ्यंकर तथा माई यांचे देहावसान झाले. त्यांच्या स्मरणार्थ दि. २७ नोव्हेंबर रोजी श्रद्धांजली सभेचे आयोजन मातृमंदिर येथे केले होते. सभेची सुरुवात पंचपदीने झाली. त्यानंतर निगडी केंद्रातील अध्यापक, पालक यांनी अभंग सादर केले. गीतेतील १२व्या आणि १५व्या अध्यायाचे पठण देखील झाले. माईंच्या संस्कारांनी गीतापठणाचा वारसा पुढे चालवणाऱ्या माजी विद्यार्थिनी, माजी अध्यापक, पालक आणि नातेवाईक यांनी प्रातिनिधिक स्वरूपात आपल्या मनोगतातून आदरणीय माईंना आदरांजली वाहिली. भैरवीने कार्यक्रमाची सांगता झाली.

**▶ आ. भाऊ प्रथम पुण्यस्मरण**

दि. १६ फेब्रुवारी २२ रोजी कै. वामनराव तथा भाऊंच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त स. ७ वाजता निगडी प्राधिकरणातील वेगवेगळ्या ठिकाणाहून प्रभातफेरी काढण्यात आली. अभंग, मनाचे श्लोक, उत्तमपुरुष लक्षणे यांचे पठण विद्यार्थ्यांनी केले. अनेक पालक, माजी विद्यार्थी, केंद्रातील सदस्य यात सहभागी झाले. प्रभातफेरीला सुरुवात करण्याआधी वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या मार्गदर्शकांनी भाऊंच्या आठवणी विद्यार्थ्यांना सांगितल्या आणि त्यानंतर प्रभातफेरीला सुरुवात झाली. शेवटी सर्व गट मातृमंदिरात जमले. तेथे भाऊंच्या आवाजातील वैदिक राष्ट्रगीत सर्वांना ऐकवण्यात आले. पसायदान होऊन कार्यक्रमाची सांगता झाली. याच दिवशी संध्याकाळी समर्थभक्त मोहनबुवा रामदासी यांचे प्रवचन योजले होते. भाऊंच्या 'चिंतनिका' या पुस्तकाचे पुनर्प्रकाशन या कार्यक्रमात करण्यात आले. नंतर मोहनबुवांचे गुरू-शिष्य विषयावर प्रवचन झाले. यावेळी भाऊंचे कुटुंबीय उपस्थित होते.

### हर्षदराय रतिलाल कारिया कलाभवन उद्घाटन सोहळा

जागतिक योग दिनाच्या निमित्ताने दि. २१ जून २१ रोजी मनोहर सभागृहाच्या इमारतीतील चौथ्या मजल्याचा उद्घाटन व लोकार्पण सोहळा झाला. नेमबाजी, योग, रायफल शूटिंग व कबड्डी या क्रीडा प्रकारांसाठी सुसज्ज दालनांचे, क्रीडा आयुर्वेद व फिजिओथेरपी कक्षाचे उद्घाटन मा. मोहनराव गुजराथी व श्री. दत्तात्रय निकम यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर प्रसंगाला साजेसे 'सुवर्णक्षणांची घडो साधना' हे पद्य झाले. क्रीडाकुलने शानदार क्रीडा प्रदर्शन सादर करून जीवनातील क्रीडेचे महत्त्वाचे स्थान स्पष्ट केले. या उद्घाटनाला श्री. राजीव रानडे, निवृत्त आयकर आयुक्त हेही अभ्यागत म्हणून उपस्थित होते. याच दिवशी संध्याकाळी जागतिक संगीत दिनाचे औचित्य साधून तिसऱ्या मजल्यावरील कला दालनांचे उद्घाटन कला क्षेत्रातील माजी विद्यार्थ्यांच्या हस्ते करण्यात आले. बांधकामासाठी एक लक्ष देणगी देत मोलाचे योगदान देणाऱ्या देणगीदारांचा सन्मान या सत्रात करण्यात आला. कल्याणी टेक्नोफोर्जचे श्री. अनंत चिंचोळकर यांनी ध्वनिमुद्रणालयाचे उद्घाटन केले. 'डोळस मोरपिसारा' हे पद्य यावेळी शास्त्रीय बाजाने हंसध्वनी रागात सादर झाले. कलादालनाच्या वास्तुसंकल्प वाचनाने कामाची दिशा स्पष्ट झाली. ज्ञान प्रबोधिनीचे कार्यवाह मा. सुभाषराव देशपांडे यांनी कलेचे शिक्षणातील स्थान अधिक स्पष्ट केले. माजी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या संगीत सभेने कार्यक्रमाची सांगता झाली.

## विभाग स्तरावरील कार्यक्रम

### पूर्व प्राथमिक विभाग

**▶ वैयक्तिक सादरीकरण**

शैक्षणिक वर्षाच्या शेवटी सुद्धा खूप आनंदाचे वातावरण बालभवन आणि मनोहर सभागृहात पाहायला मिळाले. कारण होते, मुलांचे वर्गशः सादरीकरण!! म्हणजे पूर्व प्राथमिक विभागाचे स्नेहसंमेलन!! एका दिवशी, एक बालवर्ग आणि एक शिशुवर्ग असे वर्गशः सादरीकरण दि. ४ ते ११ एप्रिल यादरम्यान घेण्यात आले. मुलांचा भाषिक विकास होणे, आत्मविश्वास वाढणे, त्यांना सादरीकरणाची संधी देऊन त्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणे अशी उद्दिष्टे समोर ठेवून या स्नेहसंमेलनाचे आयोजन केले होते. यामध्ये सूत्रसंचालनापासून ते छायाचित्रे काढण्यापर्यंत सर्व जबाबदारी आणि मुलांच्या सादरीकरणासाठी गाणी, गोष्टी, नाटके याची निवड यामध्ये आपापल्या ताईंच्या मार्गदर्शनाने पालकांनी

समर्थपणे सहभाग घेतला. हे संमेलन खऱ्या अर्थाने पालक-पाल्य-शिक्षक यांचे होते असे म्हणायला हरकत नाही. सर्व कार्यक्रमांसाठी पाहुणे म्हणून विद्यालयातीलच काही अध्यापक, माजी विद्यार्थी व पालक उपस्थित होते. सर्व पाहुण्यांनी मुलांच्या कलाविष्काराचे खूप कौतुक केले आणि मुलांना, पालकांना शुभेच्छा दिल्या. यात एकूण १४ वर्गांचे वैयक्तिक सादरीकरण झाले. त्यात ३१३ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यावर्षी प्रथमच एवढ्या लहान वयात मुलांनी मोठ्या व्यासपीठावर वैयक्तिकरित्या सादरीकरण केले हे या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य ठरले.

## प्राथमिक विभाग

**▶ उद्घाटन सोहळा**

यावर्षी पहिली, दुसरीचे मराठी माध्यमाचे तीन वर्ग व इंग्लिश माध्यमाचा प्रत्येकी एक-एक वर्ग जोडून प्राथमिक विभाग गट क्रमांक एक तयार केलेला आहे. याच प्रकारे तिसरी, चौथीच्या वर्गांचा देखील एकत्रित गट क्रमांक दोन तयार केला आहे. या सर्व मुलांसाठी नवीन स्वतंत्र मजला मनोहर सभागृहाच्या इमारतीत बांधण्यात आला आहे. त्याचा उद्घाटन सोहळा दि. २२ जून रोजी श्री. नितीनभाई कारिया, श्री. पार्थ मुखर्जी, श्री. संजय कुलकर्णी, संचालक वा. गिरीशराव बापट यांच्या हस्ते झाला. या मान्यवरांनी नवीन वास्तुबाबत आनंद व्यक्त करत शुभेच्छा दिल्या.

## पूर्व माध्यमिक विभाग

**▶ अन् पारिजातक हसला - हरित पुस्तक पुरस्कार**

निगडी केंद्र व्यवस्थापक व पूर्व माध्यमिक विभागप्रमुख श्री. शिवराज पिंपुडे यांना 'अलाईव्ह' या संस्थेतर्फे 'अन् पारिजातक हसला' या पुस्तकासाठी वसंत पंचमीच्या दिवशी मनोहर सभागृहात सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र, पारिजातकाचे रोप आणि नेस्टबॉक्स देऊन 'हरित पुस्तक पुरस्काराने' सन्मानित करण्यात आले. ज्येष्ठ लेखक, दुर्ग व वनस्पती तज्ज्ञ प्राध्यापक प्र. के. घाणेकर, 'अलाईव्ह' संस्थेचे पदाधिकारी श्री. उमेश वाघेला व श्री. चैतन्य राजर्षी यावेळी उपस्थित होते. फेसबुक लाईव्हद्वारे महाराष्ट्र, गुजरात, छत्तीसगड, तर परदेशातून सिंगापूर, दुबई, लंडन आणि बेल्जियम मधून सुमारे तीनशे लोकांनी दूरस्थ कार्यक्रमात सहभाग नोंदविला. या पुस्तकाच्या इंग्रजी आवृत्तीचे प्रकाशन देखील लवकरच होणार असून, विद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी मृणाल मायदेव हे भाषांतर करीत आहेत. हे ई-बुक स्वरूपात लवकरच उपलब्ध होईल.

## क्रीडाकुल

**▶ धन्वंतरी याग**

मंगळवार, दि. २ नोव्हेंबर रोजी धनत्रयोदशीच्या दिवशी धन्वंतरी याग पूजन व वास्तुशांती समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. मनोहर सभागृहाच्या वरील विस्तारित इमारतीच्या बांधकामाची जबाबदारी स्वीकारली होती, ते श्री. शिवराजदादा पिंपुडे व सौ. पिंपुडे आणि क्रीडाकुल प्रशिक्षक श्री. निखिलदादा सोनोने व वैद्य सौ. सोनोने यांच्या शुभहस्ते ही पूजा झाली. श्री. महेश नांदे गुरुजी यांच्या मार्गदर्शनाखाली ही पूजा यज्ञाच्या साक्षीने, मंत्रोच्चारांच्या जागरात यथासांग पार पडली. पूजेसाठी श्री. नितीनभाई कारिया, परिसरातील क्रीडा क्षेत्रातील मान्यवर, नवनगर विद्यालयाचे वैद्यकीय क्षेत्रातील माजी विद्यार्थी, तसेच वैद्यकीय क्षेत्रातील पालक आणि केंद्रातील सर्व विभागप्रमुख, अध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

## गुरुकुल

**▶ रौप्य महोत्सव २०२१-२२**

गुरुकुलाच्या रौप्य महोत्सवी वर्षाचे नियोजन करताना त्यात विद्यार्थ्यांसाठी, पालकांसाठी, तसेच माजी विद्यार्थी आणि संपर्कात असलेल्या अन्य गुरुकुलांत काही उपक्रम नक्की करूया, असे अंतिम केले होते. विद्यार्थ्यांसाठी स्नेहसंमेलन आयोजित करण्यात आले होते. या स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी साने गुरुजी, शांताबाई शेळके, बाबासाहेब पुरंदरे, लता मंगेशकर अशा दिग्गजांना गायनातून श्रद्धांजली दिली. स्नेहसंमेलनाला जोडूनच पालकांसाठी मेळाव्याचे आयोजन केले होते. पालकांसाठी वैचारिक मांडणीत प्रज्ञा मानस संशोधिकेच्या प्रमुख, वा. अनघाताई लवळेकर यांनी 'मी व माझा पाल्य' या विषयावर मांडणी केली. कौशल्यपूर्ण दर्शनीय कार्यक्रमात सौ. सोनियाताई परचुरे व त्यांच्या विद्यार्थ्यांनी कथ्थक नृत्यप्रकारातून क्रांतिकारकांच्या कथांचे दर्शन घडवले. तसेच, बुद्धीबळाच्या पटावर नृत्यातून बुद्धिबळाचा डाव मांडला. देखणा असा नृत्यप्रकार विद्यार्थ्यांनी व पालकांनी यानिमित्ताने अनुभवला.

गुरुकुलातील अन्य संपर्क केंद्रे यांच्याशी स्नेह वाढवूया अशा विचारातून दि. १२ जाने. रोजी स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त अनेक केंद्रांना संपर्क करून सामूहिक सूर्यनमस्कार उपक्रमात सहभागी करून घेण्यात आले. २५०० लोकांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न यानिमित्ताने करण्यात आला.

खंत म्हणजे, मा. भाऊ ज्यांनी गुरुकुलाचा पाया रचला त्यांच्या निधनामुळे एकूणच रौप्य महोत्सवी वर्षाचा उत्साह थोडा कमी झाला. तरीही, विविध संपर्क-संवाद वाढवण्याच्या दृष्टीने मोजके कार्यक्रम घेऊन रौप्य महोत्सव साजरा करण्यात आला.

## अटल धडपडालय

**▶ स्पेस चॅलेंज**

अटल इनोव्हेशन मिशन व इसरो यांनी संयुक्तपणे आयोजित केलेल्या ATL Space Challenge २०२१ या स्पर्धेत आपल्या विद्यालयातील अर्णव हिरेमठ, अर्णव देवळेकर व अथर्व घोलप या विद्यार्थ्यांच्या प्रकल्पाची देशभरातील Top 75 Innovations मध्ये निवड झाली आहे.

अंतराळात दीर्घकाळ शून्य गुरुत्वाकर्षणात राहिल्याने अंतराळवीरांचे स्नायू व पर्यायाने हाडे ठिसूळ होण्याचा धोका असतो. यावर उपाय म्हणून या गटाने हवेच्या दाबाचा उपयोग करून सतत स्नायूंवर ताण ठेवणाऱ्या जॅकेटची कल्पना लहान चलप्रतिकृतीच्या माध्यमातून मांडली होती. या विद्यार्थ्यांनी दिवाळीच्या सुट्टीत या

प्रकल्पाचे काम स्वतःचे स्वतः दूरस्थ पद्धतीने व प्रत्यक्ष भेटून पूर्ण केले होते.

## युवक विभाग

**▶ प्रतिज्ञाग्रहण**

दि. १९ ऑगस्ट रोजी युवक विभागाचा प्रतिज्ञाग्रहणाचा कार्यक्रम झाला. यावेळी युवकांसोबत कुटुंबियांनी देखील प्रतिज्ञा घ्यावी, यासाठी प्रयत्न केले होते. युवकांसोबत यासाठी नियमित संपर्क-संवाद सुरू होता. प्रत्यक्ष कार्यक्रमात अकरा युवक आणि चार कुटुंबीय अशी पंधरा जणांनी प्रबोधिनीची प्रथम प्रतिज्ञा घेतली. तर चार युवकांनी द्वितीय प्रतिज्ञा आणि एका युवकाने तृतीय प्रतिज्ञा घेतली. प्रतिज्ञाग्रहणानंतर संचालक वाच . गिरीशराव बापट यांनी केंद्रातील सर्व सदस्यांना प्रतिज्ञेच्या रचनेबद्दल व प्रतिज्ञाग्रहणाबद्दल मार्गदर्शन केले.

## युवती विभाग

**▶ असीमा विज्ञान दल**

युवती विभागाचे असीमा विज्ञान दल हे इ. आठवी व नववीच्या मुलींसाठी (विद्यालयातील शालेय गटासाठी) घेण्यात आले. या दलाच्या निमित्ताने नवीन कामाची विभागात भर पडली. वर्षभरात एकूण सहा वेळा दल भरले. शालेय गटाची विज्ञानातील गोडी वाढवण्यासाठी व त्याच बरोबर विविध प्रयोग करून मुलींना योग्य विज्ञान समजून सांगणे यासाठी शालेय गटावर हे दल भरले. दलासाठी सरासरी २५ ते ३० जणी नियमित उपस्थित होत्या. विविध विषय दलात घेण्यात आले. चर्चांद्वारे, काही वेळेला चित्रपटाद्वारे, प्रत्यक्ष प्रयोग करून हे विषय हाताळले गेले. दलात घेतलेले काही विषय म्हणजे - पॅराशूटचे प्रयोग (वरून टाकलं तर दुसऱ्या गटापेक्षा उशिरा खाली पडलं पाहिजे), कौशल्य कसे महत्त्वाचे असते, इंद्रियांचा वापर करून कसे निरीक्षण करायला पाहिजे?, व्यक्तींचे निरीक्षण, वस्तूंचे निरीक्षण, विज्ञान-निरीक्षण खजिनाशोध, Components, Properties आणि System म्हणजे काय असते, सामान्य विज्ञानाच्या दोन प्रश्नमंजुषा, इ. या दलाची प्रतोद म्हणून अबोली भंडारी हिने जबाबदारी घेतली होती.

## पालक महासंघ

**▶ सूर्यनमस्कार यज्ञ**

पालक महासंघाच्या क्रीडाविभागाने यावर्षी महिलांसाठी सूर्यनमस्कार यज्ञाचे आयोजन केले होते. सुमारे दोन महिने विद्यालयातील अनेक महिला पालक सकाळी उपासनेनंतर नियमितपणे सामूहिकरित्या सूर्यनमस्कार घालत होत्या. अशाप्रकारे नियमित सामूहिक सूर्यनमस्कार घालून रथसप्तमीपर्यंत एक लक्ष सूर्यनमस्कार घालण्याचा संकल्प गटाने केला आणि हा संकल्प पूर्ण करण्यास काही महिलांनी दूरस्थ पद्धतीने तर काहींनी प्रत्यक्ष उपस्थित राहून यात आपले योगदान दिले. रथसप्तमीच्या दिवशी या कार्यक्रमाची सांगता झाली.

## सिंहगड मोहीम

छत्रपती शिवरायांची जन्मभूमी, कर्मभूमी असलेल्या सह्याद्रीच्या प्रत्येक कड्याकपारीला आणि गडकिल्ल्यांना स्वतःचा असा एक इतिहास आहे. हा इतिहास वाचायचा असेल, अनुभवायचा असेल, तर दगड-धोंड्यांची, काट्याकुट्यांची वाट तुडवत, इतिहासातील प्रसंगांच्या, बलिदानाच्या, विजयाच्या असंख्य खाणाखुणा प्रत्यक्षात पाहात गडकिल्ल्यांची भ्रमंती करावी लागेल.

याच हेतूने नवनगर विद्यालयातील १०००च्या वर पालकांनी एकत्रितपणे सिंहगड दुर्गभ्रमंती करण्याचे ठरले. या मोहिमेत सहभागी होण्यासाठी पालकांना केलेले आवाहन, नावनोंदणीसाठी गूगल फॉर्म तयार करणे ते आपत्ती व्यवस्थापनापर्यंत अनेक गोष्टींचे सूक्ष्म नियोजन सगळ्यांनी झोकून देऊन केले. केंद्रातील अध्यापकांचा मोठा गट आणि वैद्यकीय गटही नियोजनात उतरला होता.

रविवार, दि. ६ मार्च रोजी, ३२ बसेसमध्ये ठरलेल्या वेळेत १३५० पालक व विद्यार्थी उत्साहाने घोषणा देत, पद्य म्हणत कल्याण दरवाज्याला पोहोचले. कोणत्याही गडावर पहिल्यांदा येणाऱ्यांपासून अनेक गडकिल्ले कायम फिरणारे असे हे सगळे त्यानंतर गड चढून कार्यक्रमाच्या नियोजित ठिकाणी येऊन पोहोचले. गडावरील सभेची सुरुवात अशोक कामथे सर आणि विद्यार्थ्यांच्या खणखणीत आवाजातील वीररसपूर्ण पोवाड्याच्या सादरीकरणाने झाली. यानंतर शिवराजदादा, त्या दिवशीचे प्रमुख अभ्यागत श्री. अविनाश धर्माधिकारी, श्री. नंदू मते, श्री. मोहन शेटे यांनी उपस्थितांशी संवाद साधला. शीतलताई कापशीकर यांनी महिला दिनाच्या अनुषंगाने पोवाडा सादर केला. यानंतर श्री. अविनाश धर्माधिकारी यांनी सर्वांना पर्यावरण रक्षण, स्त्रीसक्षमीकरण आणि भारतीय स्वातंत्र्याचे अमृतमहोत्सवी वर्ष याला अनुसरून शपथ दिली. ही मोहीम सर्वांच्या एकजुटीतून अत्यंत उत्साहाने पार पडली.

नवनवीन ओळखी होणे, प्रत्येकातील क्रियाशीलतेला वाव मिळणे, नेतृत्वगुण वाढीस लागणे, आपला परीघ रुंदावणे, पर्यावरणविषयक जाणिवा जागृत होणे, धकाधकीच्या जीवनात काही क्षण तरी निसर्गाच्या सान्निध्यात मुक्तपणे फिरण्याचा आनंद घेणे, आपल्या मुलांमध्ये निसर्गाविषयी, पुरातन वास्तू-ऐतिहासिक ठिकाणांविषयी आवड निर्माण करणे, तिथला गौरवशाली इतिहास तज्ज्ञांकडून प्रत्यक्ष ऐकणे, अनुभवणे अशा अनेक उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी पालकांची एकत्रित दुर्गभ्रमंती ही एक मोठी सुवर्णसंधीच ठरली.

# १९ सोलापूर केंद्र

## प्राणायाम वर्ग

विडी कामगार महिलांचे आरोग्य सुधारावे या उद्देशाने सोलापुरातील चार भागांमध्ये एकूण १४ प्राणायाम वर्ग सुरू केले. या वर्गांमधून सुमारे १४० महिला दररोज अर्धा ते पाऊण तास प्राणायाम करतात. यासोबतच गेल्या वर्षभरात योगदिनानिमित्त 'योग कार्यशाळा', वटपौर्णिमेनिमित्त वृक्षारोपण व वृक्ष संगोपन कार्यक्रम, आषाढी एकादशीनिमित्त भजनसंध्या, गणेशोत्सवानिमित्त कलास्पर्धा, गीता जयंतीनिमित्त गीतापठण शुभारंभ, जागतिक महिला दिनानिमित्त मेळावा इ. कार्यक्रम झाले.

▶ **सामाजिक उद्योजकता**

विडी कामगार महिलांना आरोग्यपूर्ण पर्यायी रोजगार देण्यासाठी पिशवीनिर्मिती प्रकल्प कार्यान्वित आहे. वर्षभरात झालेली उलाढाल -

१. कापडी पिशवीनिर्मिती संख्या - १,५०,०००
२. कागदी पिशवीनिर्मिती संख्या- १,००,०००
३. एकूण पिशवीनिर्मिती संख्या - २,५०,०००
४. पर्यायी रोजगार मिळालेल्या महिलांची संख्या - ३०
५. एकूण उलाढाल - सुमारे रु. २५,००,०००/-

## पूर्वप्राथमिक विभाग

दि. १४ जून २१ रोजी दूरस्थ शाळेची सुरुवात झाली. कोविड काळात सर्व सण, उत्सव दूरस्थ माध्यमातून साजरे करण्यात आले. आषाढी एकादशी, गुरुपौर्णिमा, नागपंचमी, स्वातंत्र्यदिन, श्रीकृष्ण जयंती, बैलपोळा, श्रीगणेशोत्सव, स्वामी विवेकानंद जयंती, प्रजासत्ताक दिन व रथसप्तमीनिमित्त विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम व कृतिकार्य घेतले.

**विविध गुणदर्शन :** दि. ३० व ३१ मार्च रोजी क्रमशः छोटा गट व मोठ्या गटातील विद्यार्थ्यांचा विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम संपन्न झाला. यात ६४ विद्यार्थ्यांचा सहभाग होता.

**गंमत जत्रा :** दि. ६ व ७ एप्रिल रोजी शिशु शाळेच्या विद्यार्थ्यांसाठी गंमत जत्रेचे आयोजन केले होते. यात विविध २२५ खेळांची मांडणी केली होती.

## प्राथमिक विभाग

मुलांची वृत्तिघडण व्हावी व मूलभूत क्षमतांचा विकास व्हावा, या उद्देशाने प्राथमिक विभागात विविध उपक्रमांची रचना केलेली असते.

दि. १४ जून २१ रोजी नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात दूरस्थ पद्धतीने झाली. दि. २३ जून रोजी वर्षारंभ उपासना झाली. त्यानंतर दि. ११ जुलै शाळेच्या वर्धापनदिनी आदरणीय कै. अवंतिकाबाईंच्या कार्याची व शालेय उपक्रमांची माहिती दिली.

### मणिपूर येथील विद्यार्थ्यांचे सहनिवास

कै. श्रीमती ताराबाई हनुमंत रानडे यांनी ११२ अ, मोदी, सोलापूर येथील ८००० स्क्वे. फुटांची घरजागा प्रबोधिनीस बक्षीसपत्राने दान दिली. त्या जागेवर तीन मजली वास्तू आपण उभी केली. मणिपूर येथील विद्यार्थ्यांसाठीचा सहनिवास, युवक-युवतींसाठीचे कौशल्य, भाषा प्रशिक्षण इ. उपक्रम या वास्तूत सुरू व्हावेत असा उद्देश आहे. ज्यांच्या संकल्पनेतून ही वास्तू आकाराला आली, असे ज्ञान प्रबोधिनीचे द्वितीय संचालक कै. डॉ. व. सी. तथा आण्णा ताम्हनकर यांच्या स्मृतीला अभिवादन करण्यासाठी आणि त्यांच्या कर्तृत्वाच्या जागरातून प्रेरणा घेण्यासाठी नूतन वास्तू 'चैतन्य भुवन' उद्घाटनाच्या पूर्वसंध्येला दि. ११ डिसें. रोजी वसंतस्मृति गीत-अभंग कार्यक्रम झाला.

दि. १२ डिसें. २०२१ रोजी या वास्तूचे उद्घाटन झाले. त्यावेळी विवेकानंद केंद्राचे ज्येष्ठ कार्यकर्ते श्री. विश्वासजी लापालकर यांची विशेष उपस्थिती होती. तसेच डॉ. इरेशजी स्वामी, संचालक वाच. गिरीशराव बापट, वाच. स्वर्णलताताई भिशीकर, श्री. अमोलदादा गांगजी, सौ. सुवर्णाताई गोखले आदी उपस्थित होते.

**गणेशोत्सव :** दि. ९ सप्टें. रोजी विद्यार्थ्यांसाठी पर्यावरणपूरक गणेश मूर्ती बनविण्याची कार्यशाळा संपन्न झाली. दि. ११ सप्टें. रोजी सोलापुरातील दोन प्राचीन गणेशमंदिरांना दूरस्थ पद्धतीने भेट दिली. दि. १६ सप्टें. रोजी मा. नीलिमाताई रास्ते यांनी कथाकथनातून गणपतीबाप्पाच्या कथा सांगितल्या तर दि. १७ सप्टें. रोजी इ. १ली ते ४थीच्या विद्यार्थ्यांचा विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम झाला. यात ३७ विद्यार्थी सहभागी झाले होते.

**विशेष अभ्यास तयारी :** दि. १८ ते ३० ऑक्टो. दरम्यान दूरस्थ तासांबरोबरच विद्यार्थ्यांच्या गटांकडून शालेय विषयाची कार्यपत्रिके सोडवून, गणिती कृती करवून घेतल्या.

**राष्ट्रीय विज्ञान दिन :** विज्ञान दिनानिमित्त इ. चौथीच्या विद्यार्थ्यांसाठी विज्ञान खेळणी तयार करण्याचा उपक्रम घेण्यात आला. विद्यार्थ्यांनी जवळपास ५० विज्ञान खेळणी तयार केली. तसेच दि. २ मार्च रोजी इ. तिसरीच्या विद्यार्थ्यांसाठी पक्षी निरीक्षण भेटीचे आयोजन करण्यात आले होते.

## विशेष सन्मान

दि. ८ मार्च रोजी महिलादिनाचे औचित्य साधून 'जे इव्हेन्ट्स्' व ९२.७ बिग एफ्.एम्. यांनी 'सोलापुरातील कर्तृत्ववान महिलांचा सन्मान' या कार्यक्रमाअंतर्गत आपल्या शाळेतील ज्येष्ठ कर्मचारी श्रीमती प्रतिभा संदिपान चव्हाण यांची निवड केली. या कार्यक्रमात त्यांना सन्मानचिन्ह व भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले.

प्राथमिक शिक्षणातून विद्यार्थ्यांचा भाषेतील शब्दसंग्रह वाढला

पाहिजे, गणिताच्या मूलभूत संकल्पना स्पष्ट झाल्या पाहिजेत, इतिहासाच्या कथांमधून महापुरुषांची ओळख झाली पाहिजे व माध्यमिकमध्ये होणाऱ्या विषयवाढीस ते सक्षम बनले पाहिजेत, या दृष्टीने प्रयत्न केले गेले.

## माध्यमिक विभाग

माध्यमिक विभागात शालेय शैक्षणिक गुणवत्ता वाढीसोबतच स्वयंअध्ययन कौशल्ये, नेतृत्वगुण विकसन, सामाजिक जाणीव संवर्धन, जीवनकौशल्ये ओळख या उद्देशांनी उपक्रमांची रचना केलेली होती. विद्यारंभ, वर्षारंभ, योगदिन, आषाढी एकादशी कार्यक्रम, गणेशोत्सव, शिबिरे, सहली, पालक सभा इ. उपक्रम झाले. यातील नवीन उपक्रमांचे वृत्त खाली देत आहोत.

**▶ छोटे सायंटिस्ट उपक्रम**

विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान विषयाची गोडी निर्माण व्हावी, त्यांची वैज्ञानिक समज वाढावी यासाठी दि. ३० सप्टेंबरपासून इ. ८वी व ९वीच्या विद्यार्थ्यांसाठी 'छोटे सायंटिस्ट' या उपक्रमास सुरुवात झाली. विज्ञानातील विविध संकल्पनांवर आधारित छोटे-छोटे प्रयोग करून दाखविणे व विद्यार्थ्यांनी ते लगेच करून बघणे, त्यामागील तत्त्वे जाणून घेणे अशा प्रकारचे हे तास घेतले जातात. दि. ११ नोव्हें. रोजी इ.८वीच्या विद्यार्थ्यांसाठी 'निरीक्षण' या विषयावर कार्यशाळा संपन्न झाली. दि. १२ नोव्हें. रोजी इ. ९वीच्या विद्यार्थ्यांसाठी 'जीवशास्त्र' या विषयावर कार्यशाळा संपन्न झाली. विद्यार्थ्यांनी यात विविध प्रयोग केले. तसेच International Day of Scientific Culture ला रमण सायन्स सेंटरच्या वतीने Toys Making कार्यशाळा झाली. विज्ञानदिनाच्या दिवशी इ. ९वीच्या विद्यार्थ्यांनी विज्ञान प्रश्नमंजुषेचे आयोजन केले होते. इ. ८वीतील विद्यार्थ्यांनी विज्ञानातील संकल्पनांवर आधारित विविध प्रयोग इ. ५वी व ६वीच्या विद्यार्थ्यांकडून करून घेतले. आठ संकल्पनांवरील विविध ४० प्रयोग विद्यार्थ्यांनी केले.

**▶ खगोल मंडळाची स्थापना**

दि. २८ फेब्रु. रोजी प्रशालेत खगोल मंडळ सुरू झाले. या मंडळातर्फे दि. ४ व ५ मार्च रोजी इ. ७वी ते ९वीच्या विद्यार्थ्यांसाठी 'आकाश निरीक्षण' उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी खगोल मंडळाचे मार्गदर्शक मा. सिद्राम पुराणिक यांनी विद्यार्थ्यांना आकाश निरीक्षणाच्या मूलभूत संकल्पना व विविध खगोलीय स्थितींची माहिती दिली. १००हून अधिक विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभाग नोंदविला.

**दीक्षाग्रहण :** दि. १० जुलै रोजी पार पडलेल्या विद्याव्रत दीक्षाग्रहणात इ. ९वीतील ८० विद्यार्थ्यांनी विद्याव्रताची दीक्षा घेतली. यावेळी त्यांचे कुटुंबीयही दूरस्थ माध्यमातून या समारंभात सहभागी झाले होते. प्रमुख अतिथी प्रा. डॉ. श्री. महावीरजी शास्त्री यांनी विद्यार्थ्यांना आशीर्वाद देऊन मार्गदर्शन केले.

**गणेशोत्सव :** गणेशोत्सवादरम्यान विद्यार्थ्यांसाठी नृत्य, गायन, वादन, अभिनय, अभिवाचन इ. स्पर्धांचे आयोजन केले होते. यात १३५ हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. कलास्वादाअंतर्गत शिल्पकला, व्यंगचित्रकला, नाट्यअभिनय व निवेदन या कलांविषयी अनुक्रमे श्री. नितीन जाधव, श्री. उन्मेश शहाणे, श्री. सुनीलजी गुरव व श्री. कौस्तुभदादा गोडबोले यांनी मार्गदर्शन केले.

**कार्यशाळा/शिबिर :** इ. ८वी, ९वीच्या विद्यार्थ्यांसाठी यावर्षात दोन इलेक्ट्रॉनिक्स कार्यशाळा झाल्या. यात २७ विद्यार्थी सहभागी झाले होते. इलेक्ट्रॉनिक्स आय व Duel LED flasher Circuit ची जोडणी हे कार्यशाळेचे विषय होते.

दि. १७ ते २२ जाने. दरम्यान मा. सुनीताताई शिरगुप्पी यांच्या सहकार्याने दूरस्थ अर्थसाक्षरता शिबिर घेण्यात आले. यात इ.८वी व ९वीतील एकूण ५४ विद्यार्थ्यांचा सहभाग होता. यातून विद्यार्थ्यांना पैशाचे खरे स्वरूप, तो कसा निर्माण होतो, त्याचे कार्य काय, तो कोठे गुंतवायचा व कसे वापरायचे हे समजले.

**विद्यार्थी यश :** माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत प्रशालेतील इ. ८वीचे १० विद्यार्थी पात्र ठरले. अनुष्का मोरे हिने जिल्हास्तरीय ३०वा तर राज्यस्तरीय १९२वा क्रमांक मिळवला. इ. ५वीतील आठ विद्यार्थी पात्र झाले. कु. प्रांजली प्रशांत शरुरे ही तालुक्यात प्रथम आली. तर प्रणव अजय जाधव हा तालुक्यात ११वा आला. प्रांजलीने डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धेत प्रथम व द्वितीय फेरीत यश प्राप्त केले असून, अंतिम फेरी (कृतिसंशोधन) साठी तिची निवड झाली आहे.

**वैचारिक :** संचालक वाच. गिरीशराव बापट यांचे दि. ७ जाने. २२ रोजी वैचारिक झाले. विवेकानंदांचे विचार प्रत्यक्षात आणणाऱ्या व्यक्ती व त्यांनी केलेल्या कार्यातून मिळणारी सकारात्मक ऊर्जा, निर्माण झालेली प्रेरणास्थळे (शिलास्मारक) या संबंधीचे विचार त्यांनी प्रकट केले.

**अध्यापक प्रशिक्षण :** दरवर्षीप्रमाणे दि. १० ते १२ जून दरम्यान अध्यापक प्रशिक्षण शिबिर संपन्न झाले. प्रकल्प पद्धती व 'शिक्षण व्हावे चैतन्यदायी' या विषयावर मार्गदर्शन व चर्चा झाली. दि. १० डिसें. रोजीच्या अध्यापक बैठकीत संचालक वाच. गिरीशराव बापट यांनी विद्यारंभ उपासना पोथीचे प्रयोजन, विषय अध्यापनातून मूल्य शिक्षण, दैनंदिन अध्यापनातून प्राणमय, आनंदमय कोश विकसन, कृतिउपक्रमातून बुद्धिविकसन या विषयी मार्गदर्शन केले. दि. ३० जाने. रोजी अध्यापकांची उजनी, नीरा-नरसिंहपूर व माढा या ठिकाणी सहल झाली. पक्षी निरीक्षण, ऐतिहासिक वास्तू पाहाणे या उद्देशाने ही सहल काढण्यात आली. या सहलीत १४ अध्यापक सहभागी झाले.

**आंतरशालेय पुस्तकपरिचय स्पर्धा :** वाचन प्रेरणा वाढावी या उद्देशाने फेब्रुवारी महिन्यात आंतरशालेय पुस्तकपरिचय स्पर्धा संपन्न झाली. त्यात इ. ५वी ते ७वी, इ. ८वी ते १०वी आणि अध्यापक असे तीन गट होते. प्रत्येक गटास १० याप्रमाणे ३० पुस्तके अभ्यासासाठी दिली होती. एकूण आठ शाळांमधून १८९ विद्यार्थी व १५ अध्यापक सहभागी झाले होते. दि. २२ मार्च रोजी या स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ झाला. त्यात पुस्तके भेट देण्यात आली.

माध्यमिक शाळेतील विद्यार्थी शैक्षणिक गुणवत्तेसोबत बदलत्या काळाला आवश्यक अशी कौशल्ये मिळवणारा व जीवन संपन्न बनवणारी मूल्ये टिकवणारा व्हावा यासाठी प्रयत्नशील आहोत.

### शिशु अध्यापिका विद्यालय

दि. १५ जून पासून दूरस्थ माध्यमातून शिशु अध्यापिका विद्यालयाची ५९वी तुकडी सुरू झाली. डिसेंबरमधील अंतिम परीक्षेत विशेष योग्यता श्रेणीत सहा, प्रथम श्रेणीत नऊ व द्वितीय श्रेणीत एक अशा १६ विद्यार्थिनी उत्तीर्ण झाल्या. दि. १० फेब्रु. रोजी संकल्प ग्रहण व पारितोषिक वितरण समारंभ झाला. त्यात ६० छात्राध्यापिकांचा सहभाग होता. दि. १ जाने. २२ रोजी ६०व्या तुकडीची सुरुवात प्रत्यक्ष झाली. शिशुशाळा आयोजित स्नेहमेळावा व गंमतजत्रेत छात्राध्यापिकांनी सक्रीय सहभाग नोंदवला.

दि. १५ जून ते ३१ डिसें. या कालवधीत छात्राध्यापिकांनी परिसरातील चार शाळांमधील इ. ८वी व ९वीच्या विद्यार्थिनींसाठी आठवड्यातून एक अशा व्यक्तिमत्त्व विकास तासिका घेतल्या.

### युवक विभागातर्फे मदतीचा हात

**वंचित विद्यार्थ्यांना साहाय्य :** दि. १५ ऑगस्ट २१ रोजी वंचित गटातील ५० गरजू विद्यार्थ्यांना वर्षभर सर्व विषयांना पुरतील एवढ्या वह्यांचे वाटप केले.

**पूरग्रस्तांना मदत :** श्रीगणेश मूर्ती विक्री उपक्रमातून झालेल्या नफ्यातून मराठवाड्यातील 'केज' गावातील १०२ पूरग्रस्त कुटुंबांना ब्लँकेट्सचे वाटप प्रबोधिनीच्या अंबाजोगाई केंद्रामार्फत केले.

## आजची प्रबोधिनी

### ★ शिक्षण ★

१. **ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, पुणे**
(माध्यमिक, मुलांसाठी मर्यादित सहनिवास)

२. **ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालय, निगडी**
(पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक - मराठी व इंग्रजी माध्यम, गुरुकुल, क्रीडाकुल मुलांसाठी मर्यादित सहनिवास)

३. **ज्ञान प्रबोधिनी बालविकास मंदिर, सोलापूर**
(पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक)

४. **शिशु अध्यापिका विद्यालय, सोलापूर**

५. **ग्राम प्रबोधिनी, साळुंब्रे** (माध्यमिक, मर्यादित सहनिवास)

६. **ज्ञान प्रबोधिनी, हराळी** (प्राथमिक, माध्यमिक, मर्यादित सहनिवास)

७. **कृषि विद्यालय, हराळी**

८. **शैक्षणिक उपक्रम संशोधिका, पुणे** (बुद्धिमत्ता संवर्धन, प्रज्ञा विकास, शिक्षक प्रशिक्षण)

९. **शैक्षणिक साधन केंद्र** (शैक्षणिक ॲप व व्हिडिओ निर्मिती)

१०. **छात्र प्रबोधन, पुणे** (मासिक, स्पर्धा, प्रकाशन, उपक्रम)

११. **अनौपचारिक शिक्षण प्रकल्प - पुणे, डोंबिवली, बोरीवली, अंबाजोगाई, चिपळूण, बदलापूर, ठाणे**
(विकासिका, शिबिरे, विद्याव्रत, उपासना केंद्र, क्रीडादल, अभ्यासगट इ.)

### ★ संशोधन ★

१. **प्रज्ञा मानस संशोधिका, पुणे** (संशोधन, प्रशिक्षण, बुद्धिमापन, संवर्धन, समुपदेशन)

२. **संस्कृत संस्कृति संशोधिका, पुणे** (संशोधन, संस्कार पोथ्या, पौरोहित्य)

### ★ ग्रामविकसन ★

१. **नैसर्गिक संसाधने -** गुंजवणी खोरे, हराळी - (पाणलोट क्षेत्र विकास, सौर ऊर्जा, कृषी)

२. **कौशल्य प्रशिक्षण केंद्र, शिवापूर**

३. **सर्वंकष ग्रामविकास प्रकल्प** - साळुंब्रे, हराळी, अंबाजोगाई

(आजची प्रबोधिनी पान क्र. ६० वर पुढे चालू)

कोविडच्या छायेखालचे हे दुसरे वर्ष होते. निर्बंध, टाळेबंदी अशा अडथळ्यांमधूनही गेल्या वर्षभरात सर्व विभागांचे काम सुरू राहिले. किंबहुना काही विभागांचे काम कोविडला प्रतिसाद म्हणून विस्तारले. केंद्रावरील दसरा, वेळा अमावस्या, महिला दिन असे विशेष दिनही उत्साहात साजरे झाले.

## माध्यमिक विद्यालय

या वर्षी कोविडच्या दुसऱ्या लाटेच्या पार्श्वभूमीवर निवासी विद्यार्थ्यांसाठी शाळा लगेच सुरू करणे शक्य दिसत नव्हते. त्यामुळे १०वीच्या निवासी विद्यार्थ्यांचा अभ्यास बुडू नये, यासाठी आधीपासूनच तयारी सुरू झाली.

निवासी विद्यार्थ्यांच्या गृहभेटी करून त्यांना टॅबलेटस् आणि तीन महिन्यांचे शैक्षणिक साहित्य वाटण्यात आले. गावातील मुलांच्या शाळा जून महिन्यात टप्प्याटप्प्याने सुरू केल्या. या सगळ्या प्रयत्नाचे फलित म्हणून शालान्त परीक्षेचा निकाल १००% लागला.

गेल्या वर्षी आजूबाजूच्या गावांमध्ये शाळा पूर्ण बंद असल्यामुळे मुलांचे खूप नुकसान झालेले लक्षात आले. याला प्रतिसाद म्हणून हिप्परगा आणि करवंजी या दोन जवळच्या गावांमध्ये पुस्तक पेटी आणि गंमत शाळा उपक्रम शिक्षकांनी उस्फूर्तपणे सुरू केला.

**▶ विद्याव्रत**

गेल्या वर्षी कोविडमुळे विद्याव्रत संस्कार कार्यक्रम होऊ शकला नव्हता. इ. ९वीचा विद्याव्रताचा कार्यक्रम दि. ३१ जुलै २१ रोजी आणि इ. ८वीच्या मुलांचा विद्याव्रत संस्कार कार्यक्रम १६ एप्रिल २२ रोजी संपन्न झाला.

**▶ उपक्रम आणि विशेष दिन**

दर वर्षीप्रमाणेच अतिशय उत्साहाने या वर्षी वेगवेगळे उपक्रम पार पडले. या वेळी स्वातंत्र्यदिनाच्या दिवशी मार्गदर्शन करायला पुणे प्रशालेचे १९८३च्या तुकडीचे विद्यार्थी आणि केंद्रीय आयकर विभागाचे आयुक्त विवेकदादा वाडेकर पाहुणे म्हणून लाभले होते.

दि. १७ सप्टें. रोजी हैदराबाद मुक्ती दिन, दि. २ ऑक्टो. रोजी गांधी जयंती, दि. १५ ऑक्टो. रोजी दसरा, दि. २६ नोव्हें. रोजी संविधान दिन, दि. १२ जाने. रोजी स्वामी विवेकानंद जयंती, दि. १९ फेब्रु. रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती, दि. २ मार्च रोजी मराठी दिन साजरा इ. विशेष दिन उत्साहात साजरे करण्यात आले. दि. १२ मार्च रोजी इ. १०वीचा वर्षान्त समारंभ झाला आणि दि. १५ मार्च पासून शालान्त परीक्षेला सुरुवात झाली.

## कृषी विद्यालय

या वर्षी कृषी विद्यालयात चांगले प्रवेश झाले. प्रथम वर्षात ५८ आणि द्वितीय वर्षात ५१ विद्यार्थी होते. काही वेळा कोविडमुळे दूरस्थ तासिका घ्याव्या लागल्या, पण शेती हा विषय प्रत्यक्ष शिकण्याचा असल्यामुळे, स्थानिक प्रशासनाची परवानगी मिळवून शाळा जास्त वेळ प्रत्यक्ष चालवली आणि विद्यार्थ्यांनीही त्याला चांगला प्रतिसाद दिला.

**▶ प्रयोग क्षेत्र**

शेतीत प्रयोग करताना मुलांना व शिक्षकांना निरीक्षण व नियंत्रण करणे सोयीचे जावे आणि लहान क्षेत्रात चांगले प्रयोग व्हावेत म्हणून पाच एकर क्षेत्र राखीव ठेवण्यात आले. प्रात्यक्षिक क्षेत्रात गांडूळ खत, रोपवाटिका, नाडेप खत पद्धती, कंपोस्ट खत, अ‍ॅझोला निर्मिती, पीक संग्रहालय इ. प्रकल्पांची उभारणी केली. प्रयोग क्षेत्रावर सूर्यफूल बीजोत्पादन, हरभरा पिकातील एकात्मिक कीड नियंत्रण, करडई पिकात खुडणीचे प्रयोग, 'गोदावरी' या तुरीच्या वाणाची लागवड इत्यादी प्रयोग करण्यात आले. एका विद्यार्थी गटाने पाच गुंठे जागेवर भाजीपाला 'लागवड ते विक्री' अशी पूर्ण प्रक्रिया स्वत: अनुभवली.

**▶ अन्य उपक्रम**

दि. ८ सप्टें. २१ रोजी प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांची कोरडवाहू शेती संशोधन केंद्र आणि राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्र, सोलापूर येथे भेट झाली. दि. ५ जाने. २२ रोजी प्रयोग क्षेत्रावर आनंदी आणि निसर्गरम्य वातावरणात वर्षारंभ कार्यक्रम केला. दि. २६ मार्च २२ रोजी द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांची कृषी उत्पन्न बाजार समिती, मुरूम आणि विठ्ठलसाई सहकारी साखर कारखाना, मुरूम येथे भेट झाली. विद्यार्थ्यांनी बाजारात शेतमाल विक्रीची लिलाव पद्धत, ई-नाम (ऑनलाईन शेतमाल विक्री), शेतमालाचे भाव ठरवणे, शेतमाल साठवण इ. पद्धती प्रत्यक्ष पाहिल्या व अनुभवल्या. दि. १ मार्च २२ रोजी सोलापूर येथे पावनखिंड चित्रपट बघणे आणि त्यानंतर सोलापूर केंद्राला भेट देऊन विडी कामगारांसाठी चाललेले काम समजावून घेणे असा विद्यार्थी आणि शिक्षकांचा सहाध्याय दिन झाला. एप्रिलमध्ये चार दिवसांची अभ्यास सहल सांगली, कोल्हापूर आणि कोकण कृषी विद्यापीठ, दापोली येथे गेली होती.

**▶ कमवा-शिका योजना**

कमवा व शिका योजनेला मुलांनी यंदाही चांगला प्रतिसाद दिला असून बऱ्याच मुलांना शिकण्यासाठी आणि सहलीसाठी याचा उपयोग झाला आहे. आंब्यासाठी नव्याने ठिबक संच उभारणीचे पूर्ण काम कृषी विद्यालयाच्या शिक्षकांनी, कमवा-शिका योजने अंतर्गत विद्यार्थ्यांच्या मदतीने केले.

## प्रदेश विकसन

**▶ जलसंधारण**

प्रदेश विकसन विभागांतर्गत या वर्षी जलसंधारणाच्या कामात

बरीच विविधता होती. उस्मानाबाद जिल्ह्यातील लोहारा, उमरगा, तुळजापूर आणि कळंब अशा चार तालुक्यांमध्ये कामे झाली.

| क्र. | कामाचा प्रकार | संख्या | गावे |
|---|---|---|---|
| १. | फेरोसिमेंट तंत्रज्ञानाने टाक्या बांधणी | ७ | सय्यद हिप्परगा (लोहारा ता.), आराळी (तुळजापूर ता.), कोळेवाडी, बलसूर वाडी, बेळम तांडा, आचार्य तांडा, सुंदरवाडी (उमरगा ता.) |
| २. | तलावांचे गाळ काढणे व परिसरात वृक्षारोपण | २ | हराळी (लोहारा ता.), पाडोळी (कळंब ता.) |
| ३. | ऊर्ध्वम टेक्नॉलॉजीज विकसित बोअर चार्जर तंत्रज्ञान वापरून बोअर वेल पुनर्भरण | ३५ | दक्षिण जेवळी, भोसगा, दस्तापूर (लोहारा ता.) तुगाव (ता.) |
| ४. | विहीर खोलीकरण | ३५ | तोरंबा, सालेगाव (लोहारा ता.) |

कोविडमुळे गेली तीन वर्षे लांबलेल्या रोटरी प्रकल्पाची पूर्तता या वर्षी करण्यात आली. रोटरी क्लब ऑफ गांधी भवन पुणे यांच्या अर्थसाहाय्यातून ३५ विहिरींचे खोलीकरण, जनावरांना पाणी पिण्यासाठी २५ हौद आणि दोन गावांमध्ये पिण्याच्या पाण्यासाठी फेरोसिमेंट टाक्यांचे बांधकाम असे काम गेल्या तीन वर्षांत करण्यात आले. या प्रकल्पाला रोटरी इंटरनॅशनलचेही आर्थिक साहाय्य होते.

**▶ DAESI अभ्यासक्रम**

प्रदेशविकसन विभागाच्या अन्य कामांमध्ये हैद्राबाद येथील MANAGE (National Institute of Agriculture Extension Management) संचालित, २०१९ साली सुरू झालेला एक वर्षाचा DAESI (Diploma in Agricultural Extension Services for Input Dealers) अभ्यासक्रम पूर्ण झाला. ४० शेती निविष्ठा विक्रेत्यांनी यासाठी प्रवेश घेतला होता. ४० पैकी ३९ जण डिसेंबर महिन्यात झालेली परीक्षा देऊन यशस्वीपणे उत्तीर्ण झाले.

या तुकडीचा शुभेच्छा समारंभ ज्ञान प्रबोधिनीचे कार्यवाह मा. सुभाषराव देशपांडे आणि उस्मानाबाद जिल्ह्याचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्री. महेश तीर्थंकर यांच्या उपस्थितीत दि. २२ जुलै २२ रोजी पार पडला.

**▶ शेतमाल प्रक्रिया, विक्री आणि तूर उत्पादक गट**

शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाला चांगला भाव मिळावा यासाठी एक नवीन प्रयोग या वर्षी करून बघितला. तोरंबा गावातील २० शेतकऱ्यांचा गट एकत्र येऊन त्यांना आपल्या मार्गदर्शनाखाली तूर उत्पादन घेण्याचे आवाहन केले.

कृषी विभागाच्या मदतीने गटाला सुधारित बियाणे उपलब्ध करून देण्यात आले होते. शेतकऱ्यांना बीजप्रक्रिया, सेंद्रिय निविष्ठा बनवणे आणि सेंद्रिय तूर लागवड अशी प्रशिक्षणे देण्यात आली. या शेतकऱ्यांनी उत्पादित केलेली तूर मार्च महिन्यात हमी भाव किंवा बाजार भाव यातील अधिक असलेल्या दराने खरेदी करण्यात आली. या तुरीची डाळ बनवून त्याची विक्री सुरू आहे.

## स्त्री-शक्ती प्रबोधन

**▶ किशोरी विकास**

हराळी केंद्रात किशोरी विकास उपक्रम गेली सात-आठ वर्षे सुरू आहे. या सातत्याचा परिणाम म्हणून गेल्या वर्षीपासून या उपक्रमातले वैशिष्ट्य म्हणजे, स्थानिक युवतींचा गट आता हा उपक्रम घेण्यासाठी तयार होतो आहे.

या वर्षी सहा गावं आणि सहा तांडे अशा बारा ठिकाणी किशोरी विकास उपक्रम नियमित सुरू होता. या उपक्रमातून आपल्याला २० युवती मार्गदर्शिकांच्या माध्यमातून ३५० किशोरींपर्यंत पोहोचण्याची संधी मिळाली. GS Labs या कंपनीच्या सीएस्आर मधून आपल्याला किशोरी विकास प्रकल्पासाठी अर्थसाहाय्य मिळाले होते.

या वर्षी दि. ३ ते १२ जाने. या 'आधुनिक नवरात्रीच्या' काळात हराळी केंद्रावर किशोरींचा क्रीडा महोत्सव आयोजित करण्यात आला. या क्रीडा महोत्सवात बारा गावांतील ३०० मुली सहभागी होत्या. कबड्डी, डॉजबॉल, लंगडी, बेसबॉल अशा चार खेळांच्या स्पर्धा यानिमित्ताने घेण्यात आल्या. त्याच दिवशी, दि. १२ जाने. रोजी १० महिला, ४० किशोरी आणि १० युवतींनी ६०० सूर्यनमस्कार घालून आधुनिक नवरात्र उपक्रमाची सांगता झाली.

**▶ जास्वंद वर्ग**

किशोरींसाठी घेतल्या जाणाऱ्या उपक्रमाबरोबरच युवती गटासाठी उपक्रम सुरू करण्याची गरज जाणवत होती. वेल्हे केंद्रावर चालू असणारे युवतींचे कौशल्य प्रशिक्षण वर्ग किंवा 'जास्वंद वर्ग' हराळीतही घेता येतील असे वाटले. गेल्या वर्षी निगडी केंद्राच्या स्वरूपा जोशी या युवतीने एक वर्ष पूर्ण वेळ हराळी केंद्रावर काम करायला येण्याचे ठरवले आणि हराळीत जास्वंद वर्ग सुरू करण्याचे आव्हान स्वीकारले.

दोन स्थानिक प्रशिक्षिकांच्या मदतीने शिवणकला, ब्युटी पार्लर, संगणक आणि बेकिंग अशा चार कौशल्यांचे मूलभूत प्रशिक्षण युवतींना द्यायचे ठरले. या कौशल्यांच्या सोबतीने त्यांना काही जीवनकौशल्ये, आरोग्य विषयक जागृती, मैदानी खेळांची संधी देखील मिळेल, अशी योजना अभ्यासक्रमात केली होती.

वर्षभरात तीन महिन्यांचे तीन प्रशिक्षण वर्ग झाले, ज्यात साधारण ६० युवती सहभागी झाल्या. प्रशिक्षण वर्ग संपल्यावरही युवतींचा संपर्क दृढ होत रहावा, यासाठी त्यांच्या गृहभेटी, पाक्षिक बैठकी घेणे सुरू आहे.

## पूरक शिक्षण

**▶ बालवाडीची सुरुवात**

प्राथमिक शिक्षणाचा पाया पक्का करण्यासाठी हराळी गावामध्ये गेल्या वर्षी विकासिका सुरू केल्यानंतर पूर्व प्राथमिक गटापासूनच मुलांवर काम करायला हवे असे जाणवले. त्या दृष्टीने २०२१-२२ सालात हराळी गावात बालवाडी सुरू केली. 'हसरे पक्षी' असे नामकरण केलेल्या या बालवाडीत छोटा गट आणि मोठा गट मिळून हराळी गावातील ४२ मुलांनी प्रवेश घेतला.

**▶ विकासिका**

प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांचे भाषा व गणित विषयांचे मुलभूत अभ्यास कौशल्य विकसन व्हावे, त्यांच्या अभिव्यक्तीला पुरेशी संधी मिळावी आणि त्यांच्यामध्ये चांगल्या सवयींची रुजवात व्हावी, या उद्देशाने गेल्या वर्षी हराळी केंद्रातर्फे हराळी गावात आणि परिसरातील हिप्परगा, करवंजी व शीतलनगर (धानुरी) या गावात विकासिका उपक्रम राबवला गेला.

चारही गावांमध्ये मिळून इ. १ली ते ४थीच्या १६० विद्यार्थ्यांना या उपक्रमाचा लाभ झाला. विकासिका घेण्यासाठी प्रत्येक गावामध्ये दोन स्थानिक शिक्षिकांची नेमणूक करण्यात आली होती. नियमित आनंददायी कृतीयुक्त शिक्षणाच्या बरोबरच सण समारंभ साजरे करणे, आनंद मेळावे, बालसभा इत्यादि उपक्रमांचे आयोजन वेळोवेळी केले गेले.

पालकांची मुलांच्या शिक्षणाबद्दलची आस्था वाढावी, सहभाग वाढवा यासाठी सर्व ठिकाणी सुरू असलेल्या विकासिकेतील विद्यार्थ्यांच्या गृहभेटी घेऊन मार्गदर्शक ताई-दादांनी वेळोवेळी पालकांशी संवाद साधला. पालकांसाठी नियमितपणे मासिक सभांचे आयोजन करण्यात आले; ज्यामध्ये विकासिकेच्या कामाचे महत्त्व, कामाचे निवेदन याबरोबरच 'पालकत्व' याविषयीचे मार्गदर्शन करण्यात आले.

**▶ आनंदशाळा**

कोविड परिस्थितीत ऊसतोड कामगारांच्या तांड्यांवरील मुले शिक्षणापासून वंचित राहू नयेत आणि त्यांना शिक्षणात गोडी निर्माण व्हावी, यासाठी सुरू केलेला आनंदशाळा प्रकल्प याही वर्षी सुरू राहिला. शाळा सुरू होतील या आशेने शाळेच्या बरोबर हा उपक्रम कसा सुरू ठेवता येईल यासाठी आवश्यक बदलही अभ्यासक्रमाचे नियोजन करताना केले होते. पण प्रत्यक्षात दिवाळीपर्यंत शाळा सुरूच झाल्या नाहीत. त्यामुळे १० तांड्यांवर इ. १ली ते ७वी पर्यंतच्या मुलांसाठी आनंदशाळा जुलै महिन्यातच सुरू झाल्या.

प्रत्येक तांड्यावर दोन स्थानिक युवक किंवा युवती सहाध्यायी म्हणून काम करत होते. त्यांच्या मदतीला दोन प्रकल्प समन्वयक आणि चार क्षेत्र समन्वयक कार्यरत होते.

दिवाळीनंतर शाळा सुरू झाल्यावर शक्य होते तिथे शाळांमधून आणि अन्य ठिकाणी शाळेनंतरच्या वेळात आनंदशाळेच्या तासिका घेतल्या गेल्या. वर्षभर या माध्यमातून ५०० विद्यार्थ्यांच्या पर्यंत आपण पोहोचू शकलो.

यावर्षी विशेष म्हणजे आनंदशाळा प्रकल्पाच्या बरोबरीने हराळी केंद्राने ऊसतोड मजुरांच्या इ. ५वी ते १०वीच्या एकूण ४७ मुलांचे पालकत्व सहा महिन्यांसाठी घेतले होते आणि त्या सहा महिन्यांत २२ मुली व २५ मुले हराळी केंद्रात निवासी आली होती. या सर्व मुलांचे आपल्या शाळेतच शिक्षण सुरू होते. त्यामुळे या वर्षी दि. १५ सप्टेंबर रोजी बंजारा समाजाचे महापुरुष संत सेवालाल महाराज यांची जयंती विद्यार्थ्यांच्या उस्फूर्त सहभागाने साजरी करण्यात आली.

### साखरशाळा

मुरूम येथील विठ्ठल साई साखर कारखान्यावर ऊसतोडीसाठी आलेल्या सुमारे २०० मजुरांच्या कुटुंबातील मुलांसाठी या वर्षी दि. १५ डिसें. ते १५ एप्रिल या कालावधीत साखरशाळा प्रकल्प चालवण्यात आला. स्थानिक युवक-युवतींच्या मदतीने मुलांना मूलभूत साक्षरता व अंकज्ञान शिकवण्यात आले. सुमारे ७५ मुलांनी याचा लाभ घेतला.

## युवक विभाग

हराळीला युवक विभागाचे काम सुरू करण्यासाठी गेल्या पाच वर्षांपासून प्रयत्न चालू आहेत. किशोर, कुमार, युवक दल आणि या वर्षी एका विस्तार दलाची त्यात भर पडली. हराळीशिवाय शेजारी असलेल्या करवंजी गावात शालेय दल सुरू झाले.

दि. १२ ते १४ सप्टें. या कालावधीत केंद्रावर युवक गटाचा गणेशोत्सवानिमित्ताने तीन दिवसीय निवासी मेळावा झाला. त्या मेळाव्याला २५ माजी विद्यार्थी युवक आणि तीन मार्गदर्शक उपस्थित होते. यावेळी युवकांसमोर प्रतिज्ञांची मांडणी केली गेली, त्यांना प्रथम प्रतिज्ञेचे आवाहन केले गेले.

कुमार दलाचा (इ. ८वी ते १०वी) पणती विक्रीचा उपक्रम झाला. उपक्रमाच्या निमित्ताने नोंदी ठेवणे, संवाद साधणे, हिशोब ठेवणे, गटात काम करणे इ. कामांचा अनुभव या निमित्ताने मुलांना मिळाला. दिवाळीच्या सुट्टीच्या काळात सगळ्या मार्गदर्शकांची एकत्र दुर्गभ्रमण सहल गेली होती.

दि. १९ फेब्रु. रोजी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीला मेळाव्याच्या निमित्ताने चारही दलांचा एकत्र उपक्रम झाला. चारही दलांवरचे मिळून एकूण १२० जण मेळाव्यात सहभागी होते.

# २१ साळुंब्रे उपकेंद्र

## माहेरवाशीण मेळावा

स्त्रियांचे संघटन, विविध विचारांची देवाण-घेवाण, स्त्री-शक्ती प्रबोधन या उद्देशाने शाळेच्या माजी विद्यार्थिनी व पंचक्रोशीतील नवविवाहित मुलींसाठी दि. १४ ऑगस्ट २१ रोजी माहेरवाशीण मेळावा प्रत्यक्ष व दूरस्थ पद्धतीने साजरा झाला. गोडुंब्रे गावातील विठ्ठल मंदिरात हा कार्यक्रम घेण्यात आला. कोविड परिस्थितीमुळे यावर्षी संख्या मर्यादित ठेवली होती.

- ▶ सहभागी गावे - नेरे, कारखाना, साळुंब्रे, गोडुंब्रे, परंदवाडी
- ▶ सत्कारार्थी माहेरवाशिणींची संख्या - ०८
- ▶ विद्यार्थिनी, शिक्षिका व पालक माता उपस्थिती- ४१

सौ. मनीषाताई यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व नियोजन केले होते. याप्रसंगी साळुंब्रे गावच्या सरपंचा उज्ज्वलाताई आगळे यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षपद भूषविले. स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. मंजुषाताई दराडे यांनी आपल्या मार्गदर्शनात ''तुमच्या प्रत्येकामध्ये वेगळेपण आहे. तुम्ही तुमचे कर्तृत्व सिद्ध करा. एका तरी अनाथ मुलाला दत्तक घेऊन मदत करा,'' असे आवाहन केले. मा. व्यंकटराव भताने यांनी स्त्रियांमधील पंचशक्ती या विषयीचे प्रेरणा जागरण केले. याप्रसंगी विद्यालय व कॉलेज यांच्या सर्व स्त्रीशिक्षिका उपस्थित होत्या. उखाणे, झिम्मा, फुगडी व सत्कार याने कार्यक्रमाची सांगता झाली.

## पवनामाई उत्सव

मावळ तालुका व पिंपरी-चिंचवड परिसरासाठी वरदान ठरलेल्या पवना नदीची स्वच्छता व निर्मळता टिकावी, यासाठी घेण्यात येणाऱ्या पवनामाई उत्सवात पवना नदीच्या विविध घाटांवर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. हा कार्यक्रम दि. १९ व २० डिसेंबर २१ या दिवशी झाला.

१९ डिसेंबर रोजी चिंचवड येथील रामकृष्ण सभागृहात नावाडी हा संगीतमय कार्यक्रम झाला. पवनामाई निर्मळ टेकडी या योजनेअंतर्गत रिव्हर पोलीस या उपक्रमाची माहिती देण्यात आली.

**▶ पुरस्कार**

१. पर्यावरण मित्र पुरस्कार - श्री. सचिन भैय्यासाहेब लांडगे.

२. पवनामाई जलमित्र पुरस्कार - श्री हेमंत वाटवे

**▶ पथनाट्य स्पर्धा बक्षिसे**

१. प्रथम क्र. - ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालय निगडी

२. द्वितीय - मॉडर्न विद्यालय

३. तृतीय क्रमांक - ग्राम प्रबोधिनी साळुंब्रे

या कार्यक्रमांना डॉ. विश्वास येवले, श्री. प्रवीणजी लडकत, मावळातील सरपंच - पूनम अल्हाट, स्वाती शेळके, रोहिदास निंबळे, रोहन जगताप, सचिन भैय्यासाहेब लांडगे, हेमंत वाटवे, तसेच, डॉ. दिलीप माने, डॉ. अभय कुलकर्णी, श्री. नितीन कोतापल्ले, श्री. के. एन नागरगोजे इ. मान्यवर उपस्थित होते. तसेच वीसपेक्षा जास्त संस्था, महाविद्यालये व शाळा यांचे कार्यकर्ते व विद्यार्थी उपस्थित होते.

पवना धरण परिसर, थुगाव, शिवणे, गोडुंब्रे, मोरया गोसावी नदी घाट इत्यादी ठिकाणी नदीची आरती करणे, प्रतिज्ञा घेणे, दिवे सोडणे व पूजा करणे या स्वरूपाचा कार्यक्रम झाला.

## सदस्यांचे प्रतिज्ञाग्रहण

दि. २१ जाने. २०२२ रोजी केंद्रात प्रतिज्ञाग्रहणाचा कार्यक्रम झाला. युवक, पालक अशा १३ जणांनी यावेळी प्रथम प्रतिज्ञा घेतली व पाच शिक्षकांनी द्वितीय प्रतिज्ञा घेतली.

## विद्याव्रत संस्कार

विद्यालयातील इ. ८वीच्या ३८ विद्यार्थ्यांचा विद्याव्रत संस्कार यावर्षी झाला. प्रत्यक्ष संस्कारानंतर पाच विद्यार्थ्यांनी व काही पालकांनी मनोगत मांडले. पूर्वतयारीसाठी तीन व्याख्याने दूरस्थ व तीन व्याख्याने प्रत्यक्ष झाली. मा. स्वर्णलतातार्इंची यासंदर्भातील ऑडिओ व व्हिडिओ व्याख्याने विद्यार्थ्यांना ऐकवण्यात आली.

## संगणक कक्षाचे उद्‌घाटन

अवसर फाऊंडेशनच्या मदतीने १७ लक्ष रुपयांचा संगणक कक्ष विद्यालयात तयार झाला असून या कक्षाचे उद्‌घाटन दि. १९ मार्च २२ या दिवशी अवसर फाउंडेशनचे ट्रस्टी श्री. अनंत चतुर्वेदी यांच्या हस्ते करण्यात आले. विद्यालयातील विद्यार्थी व आसपासच्या शाळांतील विद्यार्थी यांना संगणकीय ज्ञान मिळावे, या उद्देशाने हा कक्ष उभारण्यात आला आहे. यावेळी अवसर फाऊंडेशनचे श्री. उदय भोसले (शाखा व्यवस्थापक) श्री. पंडित सर (अर्थान्वीक्षक), श्री. विक्रम मोहिते (सामाजिक कार्यकर्ते) उपस्थित होते. यासाठी श्री. गणेशदादा भताने यांनी विशेष प्रयत्न केले.

'नुसते नको उच्च शिक्षण ।
हे तो गेले मागील युगी लपोन ।
आता व्हावा कष्टिक, बलवान ।
सुपुत्र भारताचा ।।९।।'

(श्री तुकडोजी महाराज रचित ग्रामगीता, अध्याय १९)

# २२ अंबाजोगाई विस्तार केंद्र

### रस्त्यावरची आनंदीशाळा

विविध मदतकार्यातून संपर्क झाल्यानंतर दि. २६ जूनपासून शिकलकरी वस्तीवर जाऊन नियमितपणे मुलामुलींना शिकवायला सुरुवात केली. या वस्तीवरील सर्व पुरुष फरार आहेत. अशा कठीण प्रसंगी पोलिसांच्या सहमतीने नियमित संपर्क व शिक्षण सुरूच ठेवले. बेरीज, वजाबाकी, सोबतच गुणाकार या संख्यांमधील फरक ओळखणे, लहान-मोठी संख्या ओळखणे, गणिती क्रियांचा व्यवहारात वापर कसा होतो ते समजून सांगणे, साखळी पद्धतीने १ ते १०० आकडे म्हणून घेणे, इत्यादी अभ्यास झाला. मराठी वाचनासाठी छोटी-छोटी विधाने देण्यात आली.

दि. २७ जुलैची विवेकवाडी, मुक्तांगण येथील सहल या मुलांच्या जीवनातील पहिली सहल ठरली. मुलांच्या आवडीचे पदार्थ, नवे कपडेही या मुलांना देण्यात आले. शिकलकरी वस्तीवर रक्षाबंधनाचा कार्यक्रम देखील घेण्यात आला. मुलांमध्ये उत्साह आहे, मात्र घरगुती अडचणीमुळे त्यांची गैरहजेरी देखील असते. अनेक मुलांमध्ये स्वच्छता, दररोज अंघोळ करणे या बाबत आता चांगले बदल झालेले दिसून येत आहेत.

### आनंदशाळा

आनंदशाळा यामध्ये तीस ते पस्तीस मुलांचा गट नियमितपणे रोज तासभर जमत आहे. यामध्ये मुलांशी विविध विषयांवर चर्चा, कृती सत्रे घेतली जातात. दोरीला गाठी मारणे, मीठ व त्यावरील माहिती, विविध प्रयोग, मला आवडणाऱ्या कविता, प्रवास वर्णन अशा अनेक गोष्टी या आनंदशाळेत घेतल्या जातात.

### विज्ञान तंत्रज्ञान केंद्र

| | |
|---|---|
| खोलेश्वर प्राथमिक विद्यालय, खडकपुरा, अंबाजोगाई | मुलांची संख्या ६० एकूण तासिका -३ |
| विवेकानंद विद्यालय, अंबाजोगाई | मुलांची संख्या - ७० एकूण तासिका - ४ |
| आनंद गट, ज्ञान प्रबोधिनी, अंबाजोगाई | मुलांची संख्या - ३५ एकूण तासिका - १० |
| मोरेवाडी गुरुदेव विद्यालय, दिपेवडगाव | मुलांची संख्या - ५५ एकूण तासिका - १ |
| मोरेवाडी दिपेवडगाव जिल्हापरिषद विद्यालय, दिपेवडगाव | मुलांची संख्या - ४७ एकूण तासिका - १ |

### युवक गट

१. दि. १५ सप्टें. रोजी युवक गट आणि किशोरवयीन मुले यांच्यासोबत कोविड काळात मुलांसमोर असणारे प्रश्न, स्मार्टफोनचा वापर कसा करावा? विद्यार्थीदशेत समोर येणाऱ्या आव्हानांना सजगतेने कसे दूर ठेवावे या अनुषंगाने चर्चा झाली.

२. दि. ८ ऑगस्टला शेपवाडीच्या १० मुलांसाठी एक दिवसीय शिबिर घेण्यात आले.

३. दि. १० सप्टें. रोजी गणेश चतुर्थी निमित्त गोविंद केंद्रावर गणपतीची प्रतिष्ठापना करण्यात आली व विविध उपक्रमांमध्ये युवकांनी सहभाग घेतला.

४. दोन कार्यकर्त्यांनी हराळी प्रबोधिनी येथे जाऊन आनंदशाळेचे प्रशिक्षण घेतले व तिथल्या पाच आनंदशाळांना भेटी दिल्या.

### स्वयंरोजगाराकडे वाटचाल

नागरीवस्त्यांमधील मुली व युवतींना जर अधिक सक्षम केले तर खूप काही करता येऊ शकते. शिकलकरी वस्तीवरच्या अनेक मुलींमध्ये खूप चांगले हस्तकौशल्य आहे. घराच्या दारासाठी तोरण, झुंबर, सजावटीच्या वस्तू त्या अतिशय सुंदर बनवतात. परंतु त्यांना जमा-खर्च, खरेदी-विक्री, नफा-तोटा याबद्दल फारसे ज्ञान नाही. त्याचबरोबर अशा हस्तकलेच्या वस्तूंचा व्यवसाय करण्यासाठी लागणारे भांडवल त्यांच्याकडे नाही. याबाबत विचार चालू असताना मुंबईतील प्रबोधक परिवाराचे सुरेंद्र पाटील व करंदीकर कुटुंब या कामासाठी मदत करणारे झाले. खरेदी कशी करायची हे मुलींनी कार्यकर्त्यांसोबत बाजारात जाऊन समजून घेतले. प्रत्येकीने काय करायचे ते ठरले. किती दिवसांत करायचे ते ठरवले. पाहता-पाहता आता विक्रीयोग्य आकर्षक वस्तू तयार व्हायला लागल्या आहेत. ही प्रगती समाधानकारक आहे.

### युवती गट

१. दि. ५ सप्टें. रोजी शाडू मातीची गणेशमूर्ती बनवण्याची कार्यशाळा निवेदिता गटाच्या माध्यमातून घेण्यात आली. मार्गदर्शनासाठी चित्रकार मा. श्री गणेश कदम सर उपस्थित होते. गणेशोत्सवात सजावट, ढोल वादन हे युवती गटाने केले.

२. माँ शारदा गटाने विद्याव्रत संस्कार यावर चर्चा सत्र आयोजित केले होते. त्यात १८ मुलींनी सहभाग नोंदवला.

३. दि. ७ ते १४ ऑक्टो. दरम्यान नवरात्रानिमित्त नृत्य, महिला प्रकल्पाला भेट, रांगोळी स्पर्धा, एकपात्री नाटक, दांडिया, सहल हे उपक्रम घेतले. गोविंद केंद्रावर शारदेची स्थापना व रोज आरती करण्यात आली.

४. महिला दिनानिमित्त दि. १ ते ७ मार्च विशेष सप्ताह साजरा केला गेला. महिलांवर आधारित एक लघुचित्रपट आणि प्रेरणा देणारा एक विचार असे जास्तीत जास्त महिलांपर्यंत या काळात पोहोचवले. निवेदिता गट, माँ शारदा गट, शिशुविहार ताईंच्या गटाने यात सहभाग घेतला. दि. ११ मार्च रोजी अंबाजोगाईतील साहित्य निकेतन ग्रंथालय येथे आयोजित कार्यक्रमात ॲसिड हल्ल्यावर आधारित नाटक सादर केले.

## निवेदिता कॅरिबॅग (रिसायकल गट)

दि.१४ मार्च २२ रोजी गटाने लातूर येथे कॅरिबॅग कलेक्शन पॉईंटला भेट दिली. अंबाजोगाई कॅरिबॅगच्या प्रदूषणातून मुक्त करणे हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून हा गट पुढील काळात काम करता यावे यासाठी प्रयत्नशील आहे.

## अन्य महत्त्वाचे उपक्रम

▶ **मा. संचालक दौरा :** दि. १८ जुलै २१ रोजी संचालक वाच. गिरीशराव बापट यांच्यासोबत भवितव्य लेखावर चर्चा झाली. विभागाचा भविष्यवेध करायचा असेल तर आपल्याला चालू कामाचा वेध घेणे आवश्यक आहे. त्यामध्ये संख्यात्मक व गुणात्मक या दोन्ही गोष्टींची भर घालावी लागेल. त्यासाठी आपल्याला दिशा व गती बदलावी लागेल व स्वतःचा भविष्यवेध घ्यायला लागेल असे त्यांनी मार्गदर्शनात सांगितले. वैयक्तिक भेटी, प्रतिज्ञाग्रहण समारंभ, बैठकी अशा स्वरूपाचा संचालकांचा दौरा झाला.

▶ **सदस्यांचे प्रतिज्ञाग्रहण :** दि. १७ जुलै २१ रोजी प्रतिज्ञाग्रहण कार्यक्रम झाला. यात दोन युवतींनी प्रथम तर, प्रसाददादा चिक्षे यांनी तृतीय प्रतिज्ञा घेतली. संचालक वाच. गिरीशराव बापट यांनी सर्वांना प्रतिज्ञा दिली. या कार्यक्रमासाठी १५ प्रबोधक उपस्थिती होते.

▶ **भजनसंध्या :** दि. २६ जुलै २१ रोजी भजनसंध्येत सात गट सहभागी झाले होते. सदस्यांनी उत्साहाने सहभाग घेऊन तबला पेटीवर तयारी करून सादरीकरण केले. भजनाला साथ देण्यासाठी श्री. चिक्षेकाका उपस्थित होते. एकूण उपस्थिती ३० ते ३१ होती.

▶ **प्रयोगशील शिक्षक पुरस्कार वितरण सोहळा :** श्री. मच्छिंद्र नागरे व श्री. अमोल घोगरे यांना २०२१ चा प्रयोगशील शिक्षक पुरस्कार देण्यात आला. दि. २८ जुलै रोजी प्रयोगशील शिक्षक पुरस्कार वितरण सोहळा हा कार्यक्रम घेण्यात आला. मा. निकम सर व मा. राजसाहेब कीर्दंत सर यावेळी उपस्थित होते. या कार्यक्रमाला १७ जणांची उपस्थिती होती.

▶ **वर्षारंभ :** दि. १७ ऑगस्ट २१ रोजी वर्षारंभ उपासना घेण्यात आली. यात प्रत्यक्ष २५ तर दूरस्थ पद्धतीने १२ जणांची उपस्थिती होती. विविध गटांचे व सहविचार समितीतील सदस्यांचे वैयक्तिक संकल्प यावेळी सादर करण्यात आले. वर्षारंभ उपासनेमागची भूमिका श्री. अभिजीतदादा देशपांडे यांनी मांडली.

▶ **व्याख्यान :** दि. २६ सप्टें. रोजी योगी अरविंद यांच्या दीडशेव्या जयंतीनिमित्त प्रा. डॉ. वृंदा देशपांडे-जोशी (औरंगाबाद) यांचे व्याख्यान आयोजित केले होते. गूगल मीटद्वारे हे व्याख्यान झाले.

▶ **सामूहिक दिवाळी :** दि. ३१ ऑक्टो. २१ रोजी केंद्राचा दीपोत्सव गोविंद केंद्रावर झाला. दीपोत्सवाचे सगळे नियोजन युवती गटाने केले होते. नावीन्यपूर्ण म्हणजे या वर्षी मोठा आकाशकंदील बनवण्याचे प्रशिक्षण किरणदादा राऊतमारे यांनी गटाला दिले. तर छात्र प्रबोधन दिवाळी अंकाचे मुखपृष्ठ गटातील वैभवी व हर्षाली या दोघींनी रांगोळीमध्ये उतरवले. डॉ. निशिकांत दादा पाचेगावकर व डॉ. अनिलदादा मस्के यांची दीपोत्सवला प्रमुख उपस्थिती होती.

▶ **बालकुमार बक्षीस वितरण :** कोविडच्या परिस्थितीमुळे बालकुमार साहित्य संमेलनाचे बक्षीस वितरण लांबत चालले होते. ते दि. ३१ ऑक्टो. रोजी घेण्यात आले. या कार्यक्रमास मा. रवींद्र पांडे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ईश्वरी जोशी हिने केले. बालकुमार साहित्य संमेलनात सहभागी सर्व विद्यार्थ्यांना पुस्तकरूप बक्षीस देण्यात आले. या कार्यक्रमास पालक विद्यार्थी मिळून ५० जणांची उपस्थिती होती.

▶ **छात्र प्रबोधन :** अंबाजोगाई केंद्रामार्फत सामूहिक दिवाळीमध्ये छात्र प्रबोधनच्या दिवाळी अंकाचे प्रकाशन करण्यात आले. यावर्षी सुमारे १०० अंकाचे वितरण अंबाजोगाई केंद्रामार्फत केले गेले.

▶ **भवितव्य लेख :** नोव्हेंबर महिन्यात भवितव्य लेख याविषयी गटश: एक व एकत्रित एक अशी बैठक घेण्यात आली. या बैठकीत स्वप्नांचा वेध, बदलांचा वेध व चालू कामाचे भावी नियोजन या मुद्यांवर सविस्तर चर्चा व लेखन झाले. दूरस्थ प्रशिक्षणात गटाने सहभाग घेतला. डिसेंबर महिन्यात भवितव्य लेख याविषयी गटश: दोन बैठका घेण्यात आल्या. या बैठकीत अध्ययन निष्पत्ती व दर्शक याविषयी विचारमंथन झाले.

▶ **मदत, भेटी व अन्य :** विवेकवाडी परिसरात ५५ सीताफळाची रोपे लावली. वृक्षारोपणाच्या निमित्ताने अनेक स्नेहींच्या विवेकवाडी परिसराला भेटी होत आहेत. पैठण आणि धारूर गावांना भेट दिली. तिथल्या विकास कामांसाठी चर्चा झाली. पूरग्रस्त बांधवांच्या १०२ कुटुंबांसाठी नवीन पांघरुणांची मदत पाठवण्यात आली. तसेच साड्यांचे वाटप करण्यात आले.

'ग्रामसुधारणेचा मूलमंत्र ।
सज्जनांनी व्हावे एकत्र ।
संघटना हेचि शक्तीचे सूत्र ।
ग्रामराज्य निर्माण करी ।।१७।।'

'गावाचा प्रत्येक सज्ञान ।
याचे असावे सहकार्य पूर्ण ।
हाक देता सर्वजण ।
जमोनि यावेत एकत्र ।।२४।।'

(श्री तुकडोजी महाराज रचित ग्रामगीता, अध्याय ११)

## २३ डोंबिवली विस्तार केंद्र

### विशेष वृत्त

▶ **'आप्पांच्या आठवणी' :** दि. १९ ऑगस्ट २१ या दिवशी ज्ञान प्रबोधिनीचे संस्थापक कै. आप्पांच्या पुण्यतिथीनिमित्ताने हा कार्यक्रम आयोजित केला होता. हा कार्यक्रम दूरस्थ पद्धतीने झाला. त्यांच्या मानसकन्या वाच. स्वर्णलताताई भिशीकर यांनी त्यांच्या आठवणी सांगितल्या. आ. आप्पांनी त्यांच्या मानस मुलांना सहज संवादातून कसं घडवलं, मुलांच्या आजारपणात ते कसे काळजी घेत?, तसेच त्यांची माणसे जोखण्याची - हेरण्याची कला, प्राणी-वेली यावरील प्रेम हे स्वभाव विशेष छोट्या-छोट्या उदाहरणातून ताईंनी सांगितले. 'रूप पालटू देशाचे' हे त्यांचे स्वप्न प्रबोधिनीतील सर्व कार्यकर्त्यांना पूर्ण करायचे आहे. त्यासाठी लोकसंघ निर्माण करायचे आहेत, त्यांनी दिलेला हा कार्यरूपी, ज्ञानरूपी वसा निरपेक्षपणे पुढे चालू ठेवायचा आहे. हीच आजच्या दिवशी त्यांना खरी आदरांजली असेल असे मनोगत लताताईंनी व्यक्त केले. प्रार्थनेने कार्यक्रमाची सांगता झाली. डोंबिवली केंद्रातील सर्व विभाग व प्रबोधिनीच्या वेगवेगळ्या केंद्रातील सदस्य मिळून १०० सदस्य यामध्ये सहभागी झाले होते.

▶ **मा. संचालक दौरा :** संचालक वाच. गिरीशराव बापट यांची केंद्रभेट झाली. त्यांच्यासोबत सुमेधदादा फाटक व श्रीरंगदादा टोके हे युवक कार्यकर्ते देखील पुण्याहून आले होते. आ. संचालकांच्या उपस्थितीत सहविचार समितीची बैठक, विद्याव्रत गटाची बैठक तसेच केंद्राची वर्षारंभ उपासना झाली. दोन्ही बैठकी व वर्षारंभ उपासनेचा समारंभ प्रत्यक्ष घेण्यात आले. उपासनेनंतर सर्व विभाग प्रमुखांनी आपापल्या विभागाचा व केंद्रप्रमुखांनी केंद्राचा वार्षिक संकल्प जाहीर केला.

त्यानंतर केंद्राच्या रौप्य महोत्सवानिमित्त घेतलेल्या निबंध स्पर्धेचा बक्षीस समारंभ झाला. ऑगस्ट महिन्यात कै. आप्पांची जन्मतिथी व पुण्यतिथी असते, या निमित्ताने आ. संचालकांनी आप्पांच्या आठवणी सांगितल्या. प्रार्थनेने कार्यक्रमाची सांगता झाली. या कार्यक्रमाला सर्व विभागातील मिळून ३२ सदस्य उपस्थित होते.

▶ **लॉग फ्रेम प्रशिक्षण वर्ग :** दि. १७ ऑक्टो. या दिवशी लॉग फ्रेम प्रशिक्षणाचे सत्र प्रत्यक्ष घेण्यात आले. केंद्रातील वेगवेगळ्या विभागातील १४ सदस्या सहभागी झाल्या होत्या. केंद्राच्या सदस्या अरुणाताई व हर्षाताई यांनी यासंबंधी मार्गदर्शन केले. अतिशय सोप्या पद्धतीने त्यांनी या सत्राची मांडणी केली. या प्रशिक्षणाच्या निमित्ताने उपस्थितांना लॉग फ्रेम तंत्राची तोंडओळख झाली.

▶ **सार्थ भजन :** केंद्राचे सार्थ भजन दि. १८ डिसें. रोजी झाले. कानविंदे सभागृहात झालेल्या या भजनात २८ सदस्य प्रत्यक्ष उपस्थित होते. प्रथेप्रमाणे पंचपदीने सुरुवात झाली. लावा लावा शिळा, संत भार, मौन धरले का सांगा, जनाबाईचा डोईचा पदर, दत्त करुणात्रिपदी, धन्य धन्य हो प्रदक्षिणा असे विविध अभंग, भजने निरूपणासहीत झाली. भजनाचा शेवट पसायदानाने झाला.

**नियमित उपक्रमांचा आढावा**

| उपक्रमाचे नाव | लाभार्थी | कार्यकर्ते |
|---|---|---|
| प्रबोधक मंडळ (साप्ताहिक) | ३५ | ८ |
| विद्याव्रत संस्कार | ८ | ८ |
| ग्रामीण विभाग : | | |
| बाळेवाकळण इ. ९ वी (साप्ताहिक) | १६ | १० |
| संवादिनी - ३ गट (मासिक बैठका) | ८ | ४४ |
| पौरोहित्य विभाग | १४९५ | १३ |

▶ **ग्रामीण सहल :** दि. १३ फेब्रु. या दिवशी डोंबिवली केंद्राची ग्रामीण सहल झाली. केंद्रातील वेगवेगळ्या गटातील १७ सदस्या या सहलीत सहभागी झाल्या होत्या.

प्रबोधिनीच्या स्त्री-शक्ती प्रबोधन, ग्रामीण विभागातर्फे होणाऱ्या 'गावाकडच्या गोष्टी' या उपक्रमाच्या अंतर्गत वेल्हे तालुक्यातील सोंडे कार्ले गावात सहल आयोजित केली होती. तेथील स्त्री-शक्ती प्रबोधन गटातील वेगवेगळ्या उपक्रमात सहभागी ताईंशी झालेल्या संवादातून त्यांचे अनुभव जाणून घेता आले. आशावर्कर यांच्या माध्यमातून प्रबोधिनीचे 'आरोग्यसखी' प्रकल्पाचे जे काम सुरू आहे, त्याबद्दल अधिक माहिती मिळाली. अप्रतिम अशा ग्रामीण भोजनाचा आस्वादही यावेळी घेता आला. शेतफेरी देखील झाली. वंदनाताई कामठे व भारतीताई खासबागे यांनी या सहलीचे नियोजन केले होते.

### युवती विभाग

दि. ५ सप्टें. या दिवशी अनुभवकथनाचे सत्र झाले. निगडी व पुणे केंद्रातील काही युवतींनी चिपळूण येथे पूरग्रस्त गावांना भेटी देऊन मदतकार्य केले. हे अनुभव सांगण्यासाठी निगडीची अस्मिताताई इनामदार-बारसावडे ही युवती बैठकीत उपस्थित होती. नैसर्गिक आपत्तीत मदत म्हणून चिपळूण हेच गाव का निवडले? कशाप्रकारे मदत केली? पुढेही कशाप्रकारे मदतकार्य सुरू राहाणार आहे? याबद्दल अस्मिताताईने आपले अनुभव सांगितले. सत्राला वेगवेगळ्या विभागातील तसेच ठाणे व बदलापूर केंद्रातील ३० सदस्य उपस्थित होते. या सत्राची संपूर्ण जबाबदारी युवतींनी अतिशय छान प्रकारे पार पाडली. यावेळी अस्मिताताईने केलेल्या आवाहनाला प्रतिसाद म्हणून डोंबिवली केंद्रातर्फे चिपळूण जवळील खेड्यात रु. २५,०००/- चे सौर दिव्यांचे वाटप केले गेले.

ऑक्टोबर महिन्यात येणारी भगिनी निवेदिता यांची जन्मतिथी

व पुण्यतिथी या निमित्ताने डोंबिवली केंद्राच्या युवती गटाने भगिनी निवेदिता यांच्या चरित्र कथनाचा कार्यक्रम आयोजित केला होता. हा कार्यक्रम दूरस्थ पद्धतीने झाला. चरित्र कथन निगडी युवती विभागातील प्रतिमाताई वामन हिने केले. विविध विभागातील तसेच ठाणे, बदलापूर केंद्रातील मिळून २८ सदस्य उपस्थित होते.

## पौरोहित्य विभाग

सप्टेंबर महिन्यात पुण्यातून संस्कृत संस्कृति संशोधिकेतर्फे दूरस्थ पद्धतीने गणेश प्रतिष्ठापना पूजेची कार्यशाळा घेतली गेली. कार्यशाळा घेण्यासाठी पुण्यातील पुरोहितांबरोबर डोंबिवली गटातील पुरोहिता माधुरीताई बेहेरे व वैजयंतीताई चावरे यांनी सहभाग घेतला.

दि. २१ नोव्हें. रोजी गटातील स्नेहा गोगटे व सुषमा सावंत या पुरोहितांनी चेन्नई येथे तमिळ-तेलुगू वधूवरांचा विवाह आपल्या प्रबोधिनी पद्धतीने संपन्न केला. इंग्रजी व हिंदी भाषेतून हे पौरोहित्य त्यांनी केले. उपस्थित सर्वांना ते आवडले, असा प्रतिसाद मिळाला.

फेब्रुवारी महिन्यात पुरोहिता ऋताताई जोगळेकर यांनी हिमाचलचे राज्यपाल श्री. राजेंद्र आर्लेकर व श्री. मराठे यांच्या कुटुंबातील सदस्यांसाठी साखरपुड्याचे पौरोहित्य केले. महाराष्ट्राचे राज्यपाल मा. भगतसिंग कोश्यारी हे देखील कार्यक्रमात उपस्थित होते. ऋताताईंना राज्यपालांशी संवाद साधण्याची तसेच महत्त्वाच्या व्यक्तींसमोर प्रबोधिनीचे प्रतिनिधित्व करण्याची संधी यानिमित्ताने मिळाली.

## संवादिनी विभाग

आचार्य विनोबा भावे यांचे 'स्त्रीविषयक विचार' समजून घेण्यासाठी संवादिनी गटप्रमुखांनी आ. विनोबांच्या पुस्तकांचे वाचन व चर्चा असा संकल्प केला होता. दर बुधवारी दूरस्थ पद्धतीने भेटून 'स्त्रीशक्ती' व 'सप्तशक्ती' या पुस्तकांचे वाचन गटाने केले. सप्तशक्तीमधील सात शक्तींबद्दलची मांडणी सात सदस्यांनी उपासना गटासमोर केली. यात ठाणे केंद्रातील तीन सदस्याही सहभागी होत्या.

स्वातंत्र्यदिनानिमित्ताने 'स्वातंत्र्योत्सव - प्रगतीची वाटचाल' हा कार्यक्रम बहिणाबाई संवादिनी गटाने दूरस्थ पद्धतीने सादर केला. देशभक्तीपर गीतांचे सादरीकरण, भारतीय महिला शास्त्रज्ञांच्या मंगलयान मोहिमेतील सहभागावर सादरीकरण, सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचा आढावा, ऑलिम्पिकमधील भारतीय महिलांचे योगदान इ. विषयी माहिती देणे असे कार्यक्रमाचे स्वरूप होते.

या वर्षी बहिणाबाई संवादिनी गटाने स्त्रियांमध्ये 'शारीरिक व मानसिक आरोग्य' याविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी मार्गदर्शनपर व्याख्याने आयोजित करण्याचे ठरविले होते. त्या अंतर्गत शारीरिक आरोग्य, मानसिक आरोग्य आणि आहार विषयक जागरुकता अशी तीन सत्रे घेण्यात आली. जानेवारी, फेब्रुवारी आणि मार्च अशा तीन महिन्यात आहारतज्ज्ञ अनघा आर्कटकर, मानसतज्ज्ञ सुनीता गुप्ते, डॉ. ईशा काणे या तीन तज्ज्ञांनी दूरस्थ पद्धतीने मार्गदर्शन केले.

(आजची प्रबोधिनी पान क्र. ५२ वरून पुढे चालू)

## आजची प्रबोधिनी

### ★ आरोग्य ★

**१. दीनानाथ मंगेशकर रुग्णालय व्यवस्थापन, पुणे** **२. कमला मेहता नेत्र रुग्णालय, शिरवळ**

### ★ स्त्री-शक्ती प्रबोधन ★

**१. संवादिनी - पुणे** (मध्यवर्ती, पौड रस्ता, औंध), सोलापूर, डोंबिवली, बोरीवली, भाईंदर, ठाणे, शिरुर, (समतोल द्वैमासिक, मासिक बैठक, गप्पाकट्टा इ.)

**२. स्त्री शक्ती प्रबोधन (ग्रामीण)**- शिवगंगा व गुंजवणी खोरे (बचत गट, आरोग्य, किशोरी-युवती विकास, स्वयंरोजगार)

### ★ राष्ट्रीय एकात्मता ★

**१. नागरी वस्ती अभ्यास व सल्ला मार्गदर्शन केंद्र, पुणे**

**२. ईशान्य भारत शैक्षणिक विस्तार प्रकल्प** **(अभ्यास सहली, मैत्री अभियाने, प्रशिक्षण वर्ग)**

**३. ज्ञानसेतू प्रकल्प** (ईशान्य भारत, छत्तीसगड, झारखंड, जम्मू-काश्मिर)

### ★ नेतृत्व संवर्धन ★

**१. युवक विभाग -** पुणे, निगडी, सोलापूर, हराळी

**२. युवती विभाग -** पुणे, निगडी, हराळी

**३. नेतृत्व संवर्धन केंद्र, पुणे** (प्रशिक्षण वर्ग, शिबिरे, कार्यशाळा)

**४. स्पर्धा परीक्षा केंद्र, पुणे** (केंद्रीय लोकसेवा आयोग परीक्षा मार्गदर्शन)

### ★ सामाजिक उद्योजकता ★

१. उद्योजकता विकास केंद्र, पुणे

# २४ महाराष्ट्रातील अन्य विस्तारकार्य

ज्ञान प्रबोधिनीच्या अंबाजोगाई आणि डोंबिवली या विस्तार केंद्रांचे सविस्तर वृत्त या आधी दिलेले आहे.

त्याशिवाय, ठाणे, चिपळूण, बदलापूर, शिरूर, भाईंदर अशा महाराष्ट्रातील संपर्क केंद्रांद्वारे विविध ठिकाणी चालणाऱ्या कामाचे संकलित संक्षिप्त वृत्त पुढे दिलेले आहे.

## ✻ ठाणे संपर्क केंद्र ✻

**नियमित उपक्रमांचा आढावा**

| उपक्रमाचे नाव | लाभार्थी | कार्यकर्ते |
|---|---|---|
| विकासिका गट (मासिक उपक्रम) : बेडेकर शाळा आणि आनंद विश्व गुरुकुल | १५ ते २० | ४ |
| संवादिनी गट (मासिक उपक्रम) : संवादिनी वाचक मंच | २० | ३ |
| प्रासंगिक गट (वर्षान्त, वर्षारंभ, सार्थ भजन, सार्थ उपासना, वाचक मंच) | | १२ |
| मातृभूमी पूजन | २५ ते ३० | ३ |

**▶ विकासिका**

पूरक शिक्षण कार्यदिशेच्या अंतर्गत केंद्रातर्फे विकासिका घेतल्या जातात. या वर्षी विकासिकेच्या दूरस्थ तासिका बेडेकर शाळा आणि आनंद विश्व गुरुकुल शाळेत झाल्या. युक्ताहार विहार, निरीक्षण कौशल्य, वैज्ञानिक दृष्टिकोन ही उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवून महिन्यातून एकदा याप्रमाणे, बारा तासिकांची मांडणी केली गली. दि. ११ ऑगस्टपासून तासिकांना सुरुवात झाली. प्रबोधन गीते, व्यायाम, चातुर्मासातील आहार आणि आपले आरोग्य, विविध भाषिक व गणिती खेळ, त्या-त्या महिन्यात घडलेल्या ठळक बाबी आणि त्यावर चर्चा, छात्र प्रबोधन अंकातील कथा, ललित लेख इ. चे वाचन, कोडी, विज्ञान प्रयोग, गटकार्य, निरीक्षण कौशल्यासाठीचे काही खेळ, इ. तासिकांना घेतले गेले. वर्षभरात मुलांची उपस्थिती सरासरी १५ ते २० अशी होती.

**▶ संवादिनी**

स्त्री-शक्ती प्रबोधन अंतर्गत केंद्राचा संवादिनी गट चालतो. वर्षभरात संवादिनीत वेगवेगळे मासिक उपक्रम झाले. त्याला सरासरी १५ ते २० सदस्या उपस्थित होत्या. संवादिनी पुणे तर्फे आयोजित 'विचार भान' कार्यशाळेला सहा ते सात जणी, याचबरोबर 'प्रबोधिनीचा इतिहास समजून घेताना' या दूरस्थ सत्रांसाठीही तीन कार्यकर्त्या उपस्थित होत्या. विनोबांच्या पुस्तकाचे वाचन डोंबिवली गटाबरोबर दर बुधवारी होत होते, या वाचनात तीन कार्यकर्त्यांचा सहभाग होता. 'जो-हॅरी विंडो' या स्व-ओळखीशी संबंधित खेळाचे तंत्र समजून घेत संवादिनीने आपला दुसरा वर्धापन दिन साजरा केला. स्वातंत्र्यसंग्रामात आहुती दिलेल्या स्वातंत्र्य सेनानी महिलांना अभिवादन केले गेले. डोंबिवलीच्या पुरोहिता सुचेताताई वर्तकांनी स्वयंपौरोहित्याचे महत्त्व व हेतू याबाबत मार्गदर्शन केले. आधुनिक नवरात्र साजरे करण्यासाठी सामान्य स्त्री मधील असामान्यत्वाचा शोध घेऊन त्यांच्या मुलाखती, इ. कार्यक्रम झाले.

संवादिनी सदस्यांचे एकत्र वाचन व चर्चा व्हावी, या उद्दिष्टाने दि. १२ मे २१ पासून वाचक मंचाची सुरुवात झाली. वर्षभरात सहा ते सात बैठकी घेतल्या. यात समतोल अंकांवरील अनेक लेखांवर चर्चा, प्रवास हा विषय असलेल्या समतोल अंकाच्या मुखपृष्ठाचे वाचन, समतोलमध्ये येणाऱ्या पात्रास पत्र याचे वाचन केले गेले. विनोदी साहित्य लिहिलेल्या महिलांच्या पुस्तकांवर चर्चा, स्त्री संतांचा अभ्यास करून मिळवलेल्या माहितीची देवाणघेवाण झाली.

शारदीय नवरात्रात कन्यापूजन केले जाते. त्यानिमित्ताने दि. ९ ऑक्टो. २१ रोजी आनगाव येथे बालिका आश्रमाला भेट दिली. एकूण १५ जणी या उपक्रमात सहभागी होत्या. संवादिनी गटातील सदस्यांनी बालिका आश्रमातील मुलींसाठी हस्तकौशल्ये, गोष्ट, भोंडला घेतला आणि खाऊ व पुस्तके भेट दिली. मुलींचा आनंद चेहऱ्यावर दिसत होता. शेजारीच असलेल्या वृद्धाश्रमालाही भेट देण्यात आली. नियोजनबद्ध अशी ही बालिका आश्रमाची भेट संवादिनी सदस्यांच्या कायम स्मरणात राहील.

दि. १९ फेब्रु. २२ या दिवशी नसरापूर या गावात संवादिनीची सहल झाली. ग्रामविकसनाचे काम समजून घेत, तसेच सुवर्णाताई गोखलेंशी संवादातून सहलीची रंगत वाढली. वेगवेगळे खेळ घेतले गेले, नवीन आलेल्या महिलांना ठाणे केंद्रात सुरू असलेल्या कामाचे निवेदन केले गेले. स्त्री प्रधान व स्त्रियांच्या भावविश्वात डोकावलेल्या चित्रपटांवर चर्चा झाली. आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यासाठी ठाण्यातील मानसोपचार तज्ज्ञ नंदिनी गोरे यांनी 'मनाचा योग आनंद योग' यावर संवाद साधला.

**▶ प्रासंगिक**

वर्षान्त, वर्षारंभ, प्रत्येक महिन्यात होणारी सार्थ उपासना, सार्थ भजन या कार्यक्रमांचे आयोजन केले गेले. राष्ट्रअर्चने अंतर्गत अरूंधतीताई आणि मीराताई यांच्याकडे मातृभूमी पूजन झाले. या सर्व उपक्रमांमध्ये केंद्रातील सर्व कार्यकर्त्या उपस्थित होत्या.

दि. १९ ऑक्टो. २१ रोजी सार्थ भजन झाले. विठ्ठल रखुमाईंची पूजा करून, झांजा व टाळ्यांचा नाद करत पंचपदीने सुरुवात झाली. नंतर प्रत्येकीने एक-एक अभंग घेऊन त्याचे निरूपण केले व सर्वांनी अभंग म्हणले. सार्थ भजनाची सांगता पसायदानाने होऊन, अल्पोपहाराचा कार्यक्रम झाला.

कार्यकर्त्यांनी एकनाथजी रानडे यांचे 'सेवा साधना' आणि 'स्वीकारशील स्वदेशी' या दोन पुस्तकांचे वाचन केले.

## ❊ चिपळूण संपर्क केंद्र ❊

▶ **मा. संचालकांची केंद्र भेट**

संचालक वाच. गिरीशराव बापट यांच्या कार्यकर्त्यांच्या गटांबरोबर व वैयक्तिक झालेल्या मार्गदर्शक बैठकी, गृहभेटी प्रेरणादायी व आनंददायी झाल्या. कार्यकर्त्यांना सामूहिक उपासनेचे महत्त्व मा. संचालकांनी त्यांच्या मार्गदर्शनात समजावले. आपल्या कामातील उत्तमता गाठण्यासाठी व राखण्यासाठी, व्यक्तिमत्त्व विकसनासाठी अभ्यास व प्रशिक्षण चालू ठेवण्याची आवश्यकता त्यांनी समजावली. छोटे सायंटिस्ट गटाने नवीन प्रयोग पुस्तिका तयार करावी, सर्व युवकांचे एकत्रित शिबिर, सहल व्हावी, असे देखील त्यांनी सुचवले.

▶ **छोटे कलाकार**

केंद्राचे कार्यकर्ते व उपक्रमांच्या निमित्ताने प्रबोधिनीच्या संपर्कात आलेल्यांचा एकमेकांशी परिचय व्हावा म्हणून त्रिपुरारी पौर्णिमेला 'फूल फूल गुंफुनीच माळ होतसे' या संगीत संध्येदरम्यान 'छोटे कलाकार' ह्या उपक्रमाची उद्घोषणा झाली. आपल्या सांगीतिक कलांचे जतन, हस्तांतरण, चांगले ऐकण्याची मुलांना सवय लागणे या उद्देशाने हा उपक्रम सुरू केला आहे. युवा कलाकारांनी या उपक्रमाचे नियोजन केले.

एकाच दिवशी वेगवेगळ्या पाच ग्रामीण शाळांमधे वाद्यांसहित जाऊन कलेचे सादरीकरण केले. शास्त्रीय/सुगम गायन, पखवाज, तालवाद्य, हार्मोनियम वादन, नारदीय कीर्तन, याचे सादरीकरण केले. या उपक्रमामुळे ३०० विद्यार्थ्यांशी संपर्क आला. 'छोटे कलाकार' ही ज्ञान प्रबोधिनीच्या उपक्रमांमध्ये एक मोलाची भर ठरेल, असे माननीय संचालकांनी केतकी येथील भेटीच्या वेळेस सांगितले.

▶ **प्रदीर्घ बैठक**

केतकी गावात कोकण प्रतोद आदित्यदादा शिंदेंच्या मार्गदर्शनाखाली 'भवितव्य लेख' या विषयी एक दिवसीय निवासी बैठक झाली. भविष्यवेध शास्त्र, कल्पना विस्फोट तंत्र यातूनच 'भवितव्य लेख' कसा लिहायचा याचे मार्गदर्शन झाले.

केंद्र सहविचार समिती, केंद्राची रचना, उपक्रम व इतर जबाबदाऱ्या याची निश्चिती यावेळी झाली. केंद्र सहविचार समिती व केंद्राचा भवितव्य लेख या संकल्पना सदस्यांना नव्याने माहिती झाल्या. या सर्वामुळे केंद्राचे काम आता अधिक नियोजनपूर्वक होऊ लागले आहे.

▶ **भवितव्य लेख**

या वर्षी प्रथमच केंद्राच्या भवितव्य लेख लिखाणाच्या प्रक्रियेस सुरुवात झाली. संपूर्ण प्रक्रियेत केंद्र सहविचार समितीने काम केले. केंद्राने आत्तापर्यंत केलेले काम व येत्या १० वर्षांत करायचे काम, याची सांगड घालण्यासाठी बैठकी झाल्या.

केंद्रातील सदस्यांनी स्वप्नरंजन प्रक्रियेतून तयार केलेल्या उद्दिष्ट वाक्यांपैकी तेरा वाक्यांवर येत्या दहा वर्षांत काम करण्याचे ठरविले व त्यातून पाच उद्दिष्टे अंतिम करण्यात आली. या पाच उद्दिष्टांच्या आधारे भौगोलिक विस्तार, शालेय पूरक शिक्षण व समूहगुणविकसन या केंद्राच्या प्राधान्याने कार्य दिशा असतील असे ठरले.

▶ **युवक विभाग**

दि. २९ ऑगस्ट पासून दळवटणे येथे साप्ताहिक दलास सुरुवात झाली. वय वर्षे ७ ते १७ मधील मुलांचा यात सहभाग आहे. खेळ, विज्ञान प्रयोग, परिसर सहल, प्रासंगिक असे दलाचे स्वरूप असते.

चिपळूण परिसरातील पुरानंतरच्या मदतकार्यात प्रत्यक्ष मदत व नियोजनात युवकांचा सहभाग होता. 'नदीची पाठशाळा' उपक्रमात सहभाग होता. तसेच नागेश्वर येथे दुर्गभ्रमण झाले. दूरस्थ विज्ञान शिबिरात सुमारे २० युवकांचा सहभाग होता. क्षमता विकास कार्यक्रमाचे आयोजन केले गेले.

▶ **युवती विभाग**

युवतींच्या गटाच्या पद्य, खेळ, प्रासंगिक वाचन अशा स्वरूपात मासिक बैठकी सुरू झाल्या आहेत.

▶ **अन्य, विशेष**

१. माखजन प्रशाला : शाळेचे शैक्षणिक धोरण याविषयी आदित्यदादा शिंदे यांचे मार्गदर्शन, श्री. प्रशांतराव दिवेकर, श्री. सुरेंद्र ठाकूरदेसाई यांच्याद्वारे अध्यापकांचे प्रशिक्षण, शिक्षक गटाची नवनगर विद्यालय, निगडी येथे भेट

१. पोफळी प्रशाला : अग्रणी-प्राग्रणी उपक्रमाचे हे पाचवे वर्ष, सहभागी मुले - २८

२. ज्ञान प्रबोधिनी तर्फे 'TWJ - The Social Reforms - चेतना' शिबिरात विविध विषयांवर मार्गदर्शन

३. साप्ताहिक उपासना : उपासना व प्रबोधिनी साहित्याचे वाचन, स्वयं अध्ययन कौशल्य, शैक्षणिक धोरण इ. विषयांवर बैठकी

४. केंद्र सहविचार बैठक : मासिक

५. छोटे सायंटिस्ट : शाळा - तीन, विद्यार्थी संपर्क - ११६

६. ग्रीन वे चूल वितरण : सेवा साधना प्रतिष्ठान व ज्ञान प्रबोधिनीच्या संयुक्त विद्यमाने १०० चुलींचे वितरण

७. निगडी केंद्र भेट - दिवाळी पहाट व 'नांदी'त 'छोटे कलाकारांचा' सहभाग

८. व्यक्ती परीचय - 'सोहम घोरपडे' - चिपळूण कार्यकर्ता

## ❊ बदलापूर संपर्क केंद्र ❊

▶ **नियमित उपक्रम**

शिशुविहार विद्या मंदिर या शाळेतील इ. ७वीतील २१ मुलांसाठी दूरस्थ पद्धतीने आठ कार्यकर्त्यांनी विकासिका घेतल्या. मुलांना मुख्यत: इंग्रजी संभाषण शिकवले. त्याशिवाय सामान्य ज्ञान, भाषिक खेळ शिकवले. मुलांना एखादा विषय देऊन तो ध्वनिमुद्रित करून पाठवण्यास देखील शिकवले.

▶ **विशेष उपक्रम**

१. एप्रिल महिन्यात २२ मुलांचा सहभाग असलेले पाच दिवसांचे गंमत शिबिर दूरस्थ पद्धतीने आयोजित केले होते. दररोज मारुती स्तोत्राशी संबंधित एक गोष्ट, विज्ञान प्रयोग, इंग्रजी अक्षरांपासून चित्र, शिवचरित्र कथन असे विषय होते.

२. 'अनुभवांचे बोल' हा विविध क्षेत्रात काही विशेष कामगिरी करणाऱ्या व्यक्तींच्या अनुभवकथनाचा, सर्व नागरिकांसाठी खुला असा उपक्रम जून २१ पासून दूरस्थ पद्धतीने सुरू केला होता. या कार्यक्रमामध्ये पुढील अनुभवकथने झाली - १. कोविड काळात रुग्ण मदतीपासून ते अंत्यसंस्कारांपर्यंत काम केले अशा 'स्व'-रूपवर्धिनी संस्थेच्या महाविद्यालयीन युवती कार्यकर्त्या, २. अनेक वर्षे वारीचा अनुभव असणाऱ्या प्रज्ञाताई गोखले, ३. वायुसेनेतील निवृत्त सार्जंट श्री. दीपक गद्रे व पाणबुडीवर अनेक वर्षे कार्यरत असलेले श्री. अनिलकुमार सिंग, ४. 'फॉस्टर मदर' म्हणून काम करणाऱ्या वर्षाताई कुलकर्णी, ५. वृत्तनिवेदिका व लेखिका दीपालीताई केळकर, ६. दुबईमध्ये जे मजूर व कामगार कोविड काळात अडकले होते त्यांना भारतात परत येण्यासाठी मदत करणाऱ्या शुभांगीताई साका, ७. पालघर जिल्ह्यात आदिवासी लोकांसाठी काम करणाऱ्या वर्षाताई परचुरे.

३. देवाच्या जुन्या तसबिरी, मूर्ती, जीर्ण पोथ्या अशा वस्तूंची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावणारी नाशिक येथील 'संपूर्णम्' ही संस्था व बदलापूर संपर्क केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने जुन्या तसबिरी, मूर्ती इ. संकलन करण्याचा उपक्रम ऑगस्ट महिन्यापासून सुरू करण्यात आलेला असून बदलापूर व परिसरातील नागरिकांनी त्याला चांगला प्रतिसाद दिला आहे.

४. नवरात्रात प्रत्येक कार्यकर्त्याने एक दिवस याप्रमाणे प्रबोधिनीच्या घटनेतील एकेका प्रकरणाची व आधुनिक नवरात्राचा उपक्रम म्हणून प्रत्येक कार्यकर्त्याने एका संत चारित्र्याची मांडणी केली.

५. वर्षभरात आयोजित सर्व प्रशिक्षण वर्गांना कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

## ✲ शिरूर संवादिनी ✲

१. एप्रिल २१ : लेखिका इंदुमती जोंधळे यांची दूरस्थ मुलाखत झाली. मासिक बैठकीत कलासंगम हा विषय झाला.

२. मे २१: कृतज्ञता सप्ताह साजरा केला गेला व लघुचित्रपटांचे रसग्रहण केले.

३. जून २१ : योग शिक्षकांकडून योग-विषयक मार्गदर्शन झाले.

४. जुलै २१ : ४०० विद्यार्थ्यांपर्यंत पर्यावरणाच्या वेगवेगळ्या घटकांची माहिती दृक्-श्राव्य स्वरूपात पोचवली. मासिक बैठकीत ऐकावे कसे? हा विषय झाला.

५. ऑगस्ट २१ : मासिक बैठकीत स्वातंत्र्याचे इंद्रधनू हा विषय झाला.

६. सप्टें. २१ : संस्था /व्यक्ती भेट यामध्ये निमोणे येथे माळरानावर अत्याधुनिक शेती करणाऱ्या ७५ वर्षीय प्रधान काका यांची भेट घेतली.

७. ऑक्टो. २१ : शिरूर संवादिनीच्या यूट्यूब चॅनलची नवरात्रात सुरुवात केली. १७ जणींनी वर्तमानकाळातील प्रेरणादायी स्त्रियांची चरित्रे यूट्यूबवर सादर केली.

८. नोव्हें. २१ : समतोल स्पर्श दिवाळी अंक यावर चर्चा झाली.

९. डिसें. २१ : ई-समतोल प्रकाशित करण्याची संधी शिरूर संवादिनीला मिळाली. प्रवास या विषयावरच्या ई-समतोल अंकाचे सर्वांनी स्वागत केले. मासिक बैठकीत 'वाचू आनंदे' हा विषय झाला.

१०.जाने. २२ : प्रजासत्ताक दिनानिमित्त देशभक्त व समाजसेवकांची दूरस्थ व प्रत्यक्ष चरित्रे सादर केली. हा उपक्रम साधारणतः ११०० विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचला. मासिक बैठकीत 'वेळेचं गणित' हा विषय झाला.

११.फेब्रु., मार्च २२ : ज्ञानगंगा शाळेमध्ये प्रत्यक्ष चरित्र कथन, दोन शाळांमध्ये दहावीच्या वर्गाच्या निरोप समारंभात सहभाग व नाट्य सादरीकरण इ. झाले. साधारण ५०० विद्यार्थी, पालक व शिक्षक उपस्थित होते. मा. संचालकांनी भवितव्य लेखाविषयी मांडलेल्या दहा प्रश्नांचा ऊहापोह मासिक बैठकीत केला गेला.

१२. मार्च २२ : संवादिनीच्या प्रदीर्घ निवासी बैठकीला शिरूरच्या दोन सदस्या उपस्थित होत्या. महिलादिनाच्या निमित्ताने ज्ञानगंगा शाळेत संवादिनीची माहिती देणे व सेंट जोसेफ स्कूल येथे इ. ५वी ते १०वीच्या मुलींसाठी ओळख स्पर्शाची आणि उमलत्या वयाशी असे दोन्ही उपक्रम २०० मुलींसाठी झाले. राष्ट्रीय सेवा योजनेतील निवासी शिबिरासाठी मोबाइल आणि ध्येयनिश्चिती या दोन विषयांवर १५० मुलांसाठी चर्चासत्र घेतले. कारेश्वर इंग्लिश मिडीयम स्कूल, कारेगाव येथे ओळख स्पर्शाची आणि उमलत्या वयाशी हे उपक्रम झाले. मासिक बैठकीत डोळ्यांचे आरोग्य हा विषय झाला आणि संवादिनी सदस्यांच्या डोळ्यांची तपासणी झाली.

## ✲ पौड रस्ता व औंध संवादिनी ✲

२०२०-२१ मध्ये बाहेर जायला बंदी असली तरी सर्व कार्यक्रम ठरवल्याप्रमाणे दूरस्थ पद्धतीने सुरू होते. यातील उपक्रमांमध्ये सोलापूर संवादिनी आणि भाईंदर संवादिनी गट सहभागी होता.

▶ **मासिक बैठक**

आरोग्य, संत साहित्य आणि योग, संस्कृती, शिक्षण, साहित्य, सामाजिक कार्य अशा क्षेत्रातील ज्येष्ठ व्यक्तींनी मासिक बैठकीत मार्गदर्शन केले. गौरीताई कापरेंनी स्त्री-शक्ती प्रबोधनाची उद्दिष्टे समजावून देताना आत्मनिर्भरता, आत्मसन्मान यांचे अर्थ

सोप्या पद्धतीने समजावून दिले. डॉ. मृदुलाताई चौधरी यांचे संतसाहित्यातील भक्तीयोगावरील भाष्य, मा. महेशराव आठवले यांच्या बरोबर झालेल्या 'संस्कृती' वरील चर्चेने विचारांना चालना दिली. डॉ. अरुणा चाफेकरांनी डॉक्टर व रुग्ण यांच्या नात्यावर प्रकाश टाकताना रुग्णांच्या विचारधारेत झालेल्या बदलाची जाणीव करून दिली. पन्नाशीनंतर आरोग्य कसे सांभाळावे यावरील स्मिताताई बोरा यांचे मार्गदर्शन व शंकानिरसन, भगिनी निवेदितांच्या चरित्राची ओळख, स्त्री-शक्ती प्रबोधन, ग्रामीण सदस्यांच्या अभ्यासदौरा अनुभवकथनातून त्यांनी घेतलेली झेप, साहित्य क्षेत्रातील विदुषी शुभांगीताई भडभडे यांच्या साहित्याचा परिचय वेगळाच आनंद देऊन गेला. शिक्षण आणि सामाजिक क्षेत्रात धडपड करत काम करणाऱ्या विनायक दादा आणि सार्शाताई माळी या दांपत्याच्या कार्याचा परिचय झाला.

▶ **अन्य, विशेष**

१. गप्पा कट्टा : दर महिन्यात ठरवलेल्या सहा आयामांवर आधारित एक विषय घेऊन तो विषय चर्चिला जातो. त्यामध्ये आपण खरेच काही बदललो आहोत का?, लग्नाचे वाढते वय हा चिंतेचा विषय आहे का? लता मंगेशकर यांची आवडती गाणी व गाण्यांच्या आठवणी असे अनेक विषय होते.
२. आधुनिक नवरात्रात साधनाताई साठे-वझे आणि मयुरी हरिश्चंद्र मेहता यांच्या मुलाखती झाल्या.
३. अभंग, पद्य गट : दर महिन्यात प्रबोधिनीच्या पद्यांचा आणि आषाढी एकादशीच्या अभंगांचा सराव दूरस्थ पद्धतीने झाला. आषाढी एकादशीचे भजन चारही गटांचे मिळून दूरस्थ पद्धतीने झाले.
४. वाचन गट : विद्याव्रत अभ्यासाला जोड म्हणून प्रबोधिनीच्या शिक्षण विषयक प्रकाशनांचे वाचन व चर्चा दर आठवड्याच्या वाचन गटात झाली.
५. केंद्र भेट : स्त्री-शक्ती प्रबोधन (ग्रामीण) यांचे काम समजून घेण्यासाठी नसरापूर केंद्र भेट आणि शेत सहल झाली.
६. पौडरस्ता व औंध ज्ञान प्रबोधिनी संवादिनी गटाला पहिल्यांदाच संचालक भेट झाली.

## ❊ सोलापूर संवादिनी ❊

पौडरस्ता संवादिनीने दूरस्थ पद्धतीने घेतलेल्या मासिक बैठकींना सोलापूर संवादिनी सदस्या उपस्थित होत्या. यावर्षीच्या कार्यसंकल्पानुसार दर महिन्याला प्रत्येक सदस्याच्या घरी मातृभूमी पूजन करायला सुरुवात झाली.

आधुनिक नवरात्रामध्ये 'सामान्यातील असामान्यत्व असणाऱ्या स्त्रिया' हा विषय समोर ठेवून सुप्रिया मोरे या रिक्षा चालक ताईंची तसेच कोविड काळात भरीव काम करणाऱ्या गटातील सदस्या मधुराताई कुरुलकर यांची मुलाखत घेतली. प्रत्येक दिवशी काही वाचन व चर्चा अशा प्रकारे नवरात्र साजरे केले. गणपती उत्सवात आरती व प्रसाद वाटप झाले.

प्राणायाम वर्गातील महिलांचा मेळावा जुनाविडी घरकुल येथील श्रीराम मंदिरात झाला. त्या मेळाव्यात आणि मार्चमध्ये महिला दिनाच्या निमित्ताने शाळेत विडी घरकुल महिलांसाठी मेळावा झाला. त्यात संवादिनी सदस्यांनी सहभाग घेतला. कोविड काळात अनाथ झालेल्या बालकांना आपल्या गटातील काही सदस्यांनी स्वयंस्फूर्तीने शालेय साहित्य वाटप खरेदीत आर्थिक मदत केली.

दासबोध वाचनाचा उपक्रम नवीन असल्यामुळे तो कसा वाचावा, यावर दासबोध अभ्यासक्रमाच्या समीक्षक मेघनाताई घांग्रेकर यांचे मार्गदर्शन घेतले व त्यानुसार प्रत्यक्ष किंवा दूरस्थ पद्धतीने वाचन चालू आहे.

## ❊ भाईंदर संवादिनी ❊

या वर्षी दोन प्रत्यक्ष आणि बाकीच्या दूरस्थ पद्धतीने बैठकी झाल्या. व्यक्तीविकासासाठी विद्याव्रत या पुस्तकाचे साप्ताहिक वाचन आणि अभ्यास एका गटाने केला. मासिक बैठकींमध्ये कृतिसत्र - टाकाऊतून टिकाऊ किंवा उपयोगी असे सत्र झाले. आदित्यदादा शिंदे यांनी 'आव्हान हे ज्योतींना' पद्याचे खूप छान रसग्रहण केले आणि पद्य अगदी सोप्या शब्दात उलगडून सांगितले.

बागेश्रीताई पोंक्षे ह्यांनी शोध स्वतःचा ह्यावर मार्गदर्शन केले. ऑक्टोबरमध्ये बऱ्याच कालावधीनंतर ही प्रत्यक्ष मासिक बैठक होती. बागेश्रीताई काही कारणास्तव येऊ शकल्या नाहीत पण त्यांच्याशी आणि वेल्हे येथील काही तायांशी झूम वरून संवाद साधला. उर्मिलाताई आपटे यांनी केलेले डॉ. आनंदीबाई गोपाळराव जोशी यांच्या आत्मचरित्राचे अभिवाचन (दूरस्थ), अंजलीताई राईलकर आणि साधनाताई सेठिया यांची संपूरकता याविषयी मांडणी आणि बाकीच्या बैठकींमध्ये गटातील व्यक्तींचे काही उपक्रम झाले.

आधुनिक नवरात्र - या वर्षी यामध्ये मातृभूमी पूजन, महिला मेळावा, कृतीसत्र, इ. झाले. श्री. वसंत बापट, पं. भीमसेन जोशी आणि शांताबाई शेळके या तीन दिग्गजांचे जन्मशताब्दी वर्ष असल्याने त्यांच्या साहित्यातील, त्यांच्या जीवनावरील वाचन, कवितांचे वाचन, त्याचे सादरीकरण, रक्त तपासणी शिबिर, असेही झाले. सामान्यातील असामान्य महिला हा या वेळच्या शारदोत्सवाचा सूत्रविषय असल्याने त्यासंदर्भात काही मुलाखती, इ. कार्यक्रम झाले.

फेब्रुवारी महिन्यात सुनंदाताई पटवर्धन यांच्या जव्हार येथील आदिवासी भागात असलेल्या संस्थेत त्यांच्या मार्फत चालणारे काम बघितले.

# २५ महाराष्ट्राबाहेरील विस्तारकार्य

महाराष्ट्राबाहेर विविध राज्यांमध्ये ज्ञान प्रबोधिनीचे अनेक उपक्रम पोहोचत आहेत. मुख्यतः राष्ट्रीय एकात्मता हा धागा मनात ठेवून शैक्षणिक आणि संघटनात्मक रचनांद्वारे सीमावर्ती किंवा आव्हानात्मक राज्यांमध्ये कार्यक्रमांची आखणी कार्यकर्त्यांद्वारे होत असते. भारतीयत्वातून प्रकट होणारी सांस्कृतिक समृद्धता समजून घेण्यासाठी कार्यकर्त्यांनी या दुर्गम राज्यांमध्ये प्रत्यक्ष प्रवास करावा लागतो. कोविडमुळे प्रवास बंदी असूनही कार्यकर्त्यांनी संबंध जोडण्याचे आणि अभ्यास करण्याचे अनेक नवे-नवे मार्ग शोधले व प्रत्यक्ष आणि दूरस्थ संपर्क सुरू ठेवले, त्याचे वृत्त पुढे दिले आहे.

### * अरुणाचल प्रदेश *

ज्ञान प्रबोधिनीच्या स्पर्धा परीक्षा केंद्राच्या प्रमुख वा. सविता कुलकर्णी, प्रबोधिनीच्या ज्येष्ठ कार्यकर्त्या बागेश्रीताई पोंक्षे आणि युवक संघटन सचिव आशुतोष बारमुख यांनी डिसेंबर महिन्यात अरुणाचल प्रदेशात दौरा केला. विविध कार्यकर्ते, अधिकारी यांच्या यानिमित्ताने भेटी झाल्या. वॉलाँग इथल्या शैक्षणिक स्थितीची पाहणी सदस्यांनी केली. भारतीय लष्कर आणि भारत-तिबेट सीमा पोलिस दलातल्या अधिकाऱ्यांच्या भेटी देखील झाल्या. अरुणाचलातील रोईंग इथल्या रिवॉच संस्थेमध्ये दि. १२ डिसें. रोजी स्पर्धा परीक्षा केंद्राचे उद्‌घाटन सविताताईंच्या हस्ते करण्यात आले.

ज्ञान प्रबोधिनीचे ज्येष्ठ कार्यकर्ते स्व. विवेकराव पोंक्षे यांचा रिवॉच संस्थेच्या उभारणीत महत्त्वाचा वाटा होता. त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ रिवॉच येथे पूर्वांचलातील संस्कृतीची ओळख करून देणारी चित्रे असलेली एक भिंत 'विवेक गॅलरी' या नावाने उभारण्यात आली आहे. या गॅलरीचे उद्‌घाटन त्याच दिवशी स्व. विवेकरावांच्या पत्नी बागेश्रीताई यांच्या हस्ते करण्यात आले. अनेक वर्षांपासूनचे विविध कुटुंबांसोबत असलेले जिव्हाळ्याचे संबंध म्हणजेच अरुणाचलातील ज्ञान प्रबोधिनी असे या दौऱ्याच्या निमित्ताने पुन्हा एकदा जाणवले. स्पर्धा परीक्षा मार्गदर्शनातून संपर्कात आलेले तरुण विद्यार्थी ही या प्रबोधिनी कुटुंबातील उत्साहपूर्ण भर आहे!

### * मध्यप्रदेश - इंदौर *

दि. १९, २० फेब्रुवारीला युवक विभागातील पाच युवकांचा इथे दौरा झाला. तेथील श्री स्वर ध्वज पथकासोबत आपण गेली तीन ते चार वर्षे जोडलेले आहोत. इथले मराठी भाषिक लोक दरवर्षी मोठ्या प्रमाणात शिवजयंती साजरी करतात. यंदा सलग तिसऱ्या वर्षी प्रबोधिनीने यात सहभाग घेतला. शिवजयंतीच्या दिवशी सकाळी वाद्य गटाच्या मानवंदनेत गटाने सहभाग घेतला. सकाळच्या कार्यक्रमानंतर सरावाच्या ठिकाणी छोटीशी बैठक होऊन नवे समाजाभिमुख उपक्रम करण्याचा आणि छत्रपती शिवाजी महाराजांचा अभ्यास करण्याचा सामूहिक संकल्प सदस्यांनी केला. इंदौर मधील दोन नगरसेवक श्री. गजानंद गावड, श्री. सुधीर कोल्हे आणि मराठी भाषिक संघांचे अध्यक्ष श्री. युवराज काशिद यांनी सरावाच्या ठिकाणी भेट दिली. या गटाला युवकांनी शिवचरित्राचा अभ्यास करण्यास प्रोत्साहन दिले. त्यासाठी अभ्यास सत्रे योजली होती. शिवचरित्र समजून घेण्यासाठी विविध साधने कशी वापरावीत याबद्दल गटाला मार्गदर्शन केले.

### * छत्तीसगड *

जून २०१६ मध्ये युवकांच्या एका गटाने छत्तीसगडच्या नक्षल अतिरेकाने प्रभावित भागाला भेट दिल्यानंतर, तेव्हापासून आत्तापर्यंत तिथे सहा भेटी झाल्या. या वर्षी जवळजवळ दोन वर्षांच्या दीर्घ कालावधीनंतर दोन कार्यकर्त्यांनी प्रत्यक्ष प्रवास व भेटी केल्या. जुने संपर्क मजबूत करणे आणि नवीन संपर्क निर्माण करणे हा या भेटीचा मुख्य उद्देश होता. या दौऱ्यादरम्यान काही आयएएस आणि आयपीएस अधिकाऱ्यांशी संवाद साधला.

प्रवास शक्य नसलेल्या काळात पुण्यातील युवक गटाने छत्तीसगडचा अभ्यास केला. या गटातील पाच सदस्यांनी जंगलातील नक्षलवाद, शहरी नक्षलवाद, यूएपीए आणि एल्गार परिषद प्रकरण, वन कायदा आणि बस्तरसंबंधी सांस्कृतिक परिचय असे विविध विषय वेगवेगळ्या मंचांवर सादर केले. या समस्यांबद्दल जागरूकता पसरवण्यासाठी ३५ तासांचे अभ्यास साहित्य तयार केले आहे, जे या गटामध्ये सामील होणाऱ्या नवीन सदस्यांच्या विषय परिचयासाठी वापरले जाते.

डिसेंबर २१ मध्ये बोस दलावरील पाच युवक छत्तीसगड अभ्यास दौऱ्याला पुणे येथून निघाले. छत्तीसगड मधील वेगवेगळ्या जिल्ह्यांमध्ये व गावांमध्ये स्थानिक लोकांच्या, अधिकारी, संस्था, समाज-सेवकांच्या भेटी झाल्या व काही ठिकाणच्या मुलामुलींची शिबिरे सुद्धा या युवकांनी घेतली.

### * जम्मू - पूँछ *

दि. ७ ते १८ सप्टें. २१ या कालावधीत पूँछ जिल्ह्यातील ७५ शिक्षकांसाठी चित्रफीत निर्मिती आणि तंत्रज्ञान समजून घेण्यासाठी दूरस्थ कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. तसेच पूँछमध्ये ५५ शिक्षक प्रशिक्षकांसाठी मूलभूत साक्षरता आणि संख्याशास्त्र, कार्यपत्रके तयार करणे आणि गेमिफिकेशन या विषयावर दूरस्थ जिल्हास्तरीय प्रशिक्षण दि. ९ ते ११ सप्टें. दरम्यान आयोजित केले गेले. ज्ञान प्रबोधिनीच्या वाच. स्वर्णलता भिशीकर, रागिणीताई

नाईक, हेमाताई होनवाड, किरण बर्वे सर, पल्लवीताई पराडकर, सुवर्णाताई कऱ्हाडकर यांनी ही सत्रे घेतली.

भारत सरकारच्या समग्र शिक्षा प्रकल्पांतर्गत दि. २२ व २३ मार्च रोजी पूँछमधील ३५ शिक्षक प्रशिक्षकांसाठी गेमिफिकेशनचे प्रत्यक्ष जिल्हास्तरीय प्रशिक्षण आयोजित केले गेले होते. शालेय शिक्षण संचालनालय, जम्मूद्वारे दि. २३ ते २५ मार्च दरम्यान आयोजित जम्मूमधील ५० शिक्षक प्रशिक्षकांसाठी गेमिफिकेशन, चित्रपट निर्मिती आणि इंट्रोडक्शन टू ऑगमेंटेड रिॲलिटी (AR) आणि व्हिज्युअल कादंबरी या विषयावर प्रत्यक्ष राज्यस्तरीय प्रशिक्षण आयोजित केले गेले.

शैक्षणिक साधन केंद्रातील दहा सदस्यांच्या गटाने प्रत्यक्ष जाऊन प्रशिक्षण घेतले व काही गृहभेटी देखील केल्या. दूरस्थ प्रशिक्षणांतून ओळख झालेल्या अनेक शिक्षकांच्या प्रत्यक्ष भेटींमुळे संबंध आणखी दृढ झाले.

### * कर्नाटक - कलबुर्गी *

दि. ९ जुलै १९ रोजी सोलापूर केंद्रातील कार्यकर्त्यांद्वारे कलबुर्गी येथे शालेय गटातील विद्यार्थ्यांसाठीच्या उपक्रमांची २० मुलांसह सुरुवात झाली. त्यानंतर नियमितपणे हे साप्ताहिक वर्ग चालू आहेत. या वर्षभरात एक दिवसीय चार तासांचे ४१ विकासिका तासिका वर्ग झाले. त्या तासिकांमध्ये पुढील उपक्रम झाले -

१. दिनविशेष - मुलांना कवी, लेखक, संगीतकार इ. कला क्षेत्रातील महान व्यक्तींचे जीवन चरित्र व परिचय करून दिले.
२. जागतिक दिन - यामध्ये योग दिन, पर्यावरण दिन, विज्ञान दिन याबद्दल माहिती दिली. विज्ञान दिनाआधी दोन कार्यशाळा घेतल्या. त्यामध्ये विज्ञानाचे प्रयोग करून दाखवले. नंतर विज्ञान दिनादिवशी प्रत्यक्ष मुलांनी प्रदर्शन मांडून त्याबद्दल माहिती सांगितली. यामध्ये एकूण ६१ मुलांनी सहभाग नोंदवला.
३. पालक संवाद - प्रबोधिनीचे काम पालक, कुटुंबापर्यंत पोहोचावे यासाठी वेळोवेळी पालक संवाद होत होते. जे पालक येऊ शकले नाहीत, त्यांच्या घरी जाऊन, कुटुंबापर्यंत पोहोचून संवाद साधण्याचा प्रयत्न केला गेला. मातृभूमी पूजनही झाले.
४. हस्तकौशल्यामध्ये टाकाऊ वस्तूपासून आपल्याला उपयोगी येणाऱ्या वस्तू तयार करत होते. उदा. पेन, रबर ठेवण्यासाठी पेनस्टँड, कागदी पिशव्या, कागदी फुले, फुलदाणी इ.
५. मैदानी खेळ, बौद्धिक खेळ, गटकार्य, सहविचारानी एखादी कृती पूर्ण करणे इ. उपक्रम घेण्यात आले. याबरोबर साप्ताहिक उपासना, वाचन, चर्चा इ. सुरुवात झाली.

### सांस्कृतिक देवाणघेवाण : श्री गणेश आरती

'राष्ट्रीय एकात्मतेसाठी गणेशोत्सव' या संकल्पनेवर या वर्षीचा गणेशोत्सव आधारला होता. यावेळी संवादाची विविध माध्यमे खुली झाल्याने या वर्षी देशभरातील विविध महनीय व्यक्तींना आभासी पद्धतीने आरतीसाठी निमंत्रित करता आले. ज्ञान प्रबोधिनी प्रशालेतील विद्यार्थ्यांनी यूट्यूब लाईव्हवरून आरतीत सहभाग घेतला व पाहुण्यांशीही संवाद साधला. यात १. श्री. अतुलचंद्र कुलकर्णी (IAS -DG महाराष्ट्र कारागृह प्रमुख), २. श्री. जामयांग सेरिंग नामग्याल (खासदार, लडाख), ३. श्रीमती पद्मा बंडोपाध्याय (निवृत्त एअर मार्शल), ४. श्री. प्रवीण इंगवले (IPS, मणिपूर), ५. श्री. गौर गोपाल दास (प्रवक्ते व प्रचारक, इस्कॉन), ६. श्री. संदीप कवीश्वर (सहसंघटनमंत्री - वनवासी कल्याण आश्रम), ७. श्री. एन. बीरेन सिंग (मुख्यमंत्री, मणिपूर), ८. श्री. पेमा खांडू (मुख्यमंत्री, अरुणाचल प्रदेश) हे पाहुणे सहभागी झाले.

त्याशिवाय, आभासी दूरस्थ आरतीसाठी पुण्यातील ७५ कुटुंबांनी १८ राज्ये आणि ४ संप्रदायातील ७८ पाहुण्यांना बोलावले होते. ४० स्वयंसेवकांनी आरतीचे समन्वयक म्हणून या उपक्रमात भाग घेतला. त्यांनी यजमान आणि दूर प्रदेशातील पाहुणे यांच्यातील संवाद सुकर केला. आपल्या राष्ट्रातील विविध प्रादेशिक परंपरा आणि सण समजून घेण्याच्या उद्देशाने हा उपक्रम आखण्यात आला होता. आरतीनंतरचा संवाद खरोखरच उद्‌बोधक आणि आनंददायी होता. सहभागी सदस्यांनी त्यांच्या विविध चालीरीतींच्या मधील साम्यस्थळे अनुभवली. अनेकांचे एकमेकांशी दीर्घकाळ टिकणारे बंध निर्माण झाले. पाच स्वयंसेवकांच्या मुख्य गटाने उत्सवाच्या दहा दिवसांत हा कार्यक्रम पार पाडला.

सर्व पाहुण्यांना प्रसाद आणि काही भेटवस्तू पाठवण्यात आल्या. ज्या पद्धतीने महाराष्ट्रात गणेशोत्सव साजरा केला जातो, ते पाहून प्रभावित झालेल्या हरियाणातील एका कुटुंबाने, दरवर्षी त्यांच्या घरी साजरा करण्याचा संकल्प केला. त्यांच्या यजमानांनी त्यांना गणेशोत्सवात पाळल्या जाणाऱ्या सर्व आवश्यक रीतिरिवाजांची ओळख करून दिली आणि पाहुणे कुटुंबाने आगामी १० दिवस पूजा करण्यासाठी गणेशमूर्तीची स्थापना केली. अरुणाचल प्रदेशातील विद्यार्थ्यांच्या एका गटाने त्यांचे पारंपरिक नृत्य सादर केले आणि त्यांची आदिवासी गाणी गायली; जेणेकरून महाराष्ट्रीयन विद्यार्थ्यांना ईशान्य भारताच्या समृद्ध संस्कृती आणि वारशाची जाणीव व्हावी.

## Jnana Prabodhini Prashala Alumni Foundation (JPPAF)

### सदस्यत्व

JPPAFने एप्रिल २१ मध्ये वार्षिक व आजीवन सभासदत्व देण्यास सुरुवात केली. याचा उद्देश JPPAFच्या माजी विद्यार्थ्यांसाठी चालणाऱ्या विविध उपक्रमांचा, आणि अन्य साहाय्यक सेवा उदा. कार्यालय, संकेतस्थळ आणि औपचारिक/कायदेशीर बाबींसाठीचा खर्च यासाठी रक्कम उभी करणे हा आहे. यातून माजी विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष/व्यावहारिक आणि अप्रत्यक्ष लाभ होईल असेही योजले आहे. काही उद्योजक माजी विद्यार्थ्यांनी ते देत असलेल्या आरोग्य आणि पर्यटन विषयक सेवांमध्ये JPPAF सभासदांना सूटही दिली आहे. मार्च २२ पर्यंत ३५ जणांनी वार्षिक आणि ३०५ जणांनी आजीवन सभासदत्व घेतले आहे.

### विशेष उद्दिष्ट गट

विविध विषयांचा अभ्यास करण्याच्या दृष्टीने विशेष उद्दिष्ट गट या स्वरूपात एकत्र जमणारे माजी विद्यार्थी आणि संबंधित विषयांमध्ये प्रत्यक्ष काम करणारे माजी विद्यार्थी असे व्यावसायिक गट अशांच्या प्रमुखांच्या त्रैमासिक बैठकीत विविध उपक्रमांचा आढावा आणि पुढील नियोजन याविषयी चर्चा झाली. दि. २७ फेब्रुवारी २२ रोजी आरोग्य विशेष उद्दिष्ट गटाने 'Discussing Immunity in Holistic Context' हा आरोग्यविषयक अभ्यासपूर्ण लेख प्रसिद्ध केला. यात वैद्यकीय क्षेत्रातील multi-speciality आणि multi-disciplinary पद्धतींचे विवेचन केले गेले आहे.

### ५१@५१ स्नेहमेळावा

ज्ञान प्रबोधिनी प्रशालेच्या सुवर्णमहोत्सवी वर्षात अनेक विद्यार्थी-विद्यार्थिनी बऱ्याच वर्षांनी भेटले आणि प्रबोधिनीतून घेतलेल्या संचिताचा आयुष्यात कसा प्रभाव पडला याच्या चर्चा झाल्या. यातून अशी संकल्पना पुढे आली की विद्यार्थी व विद्यार्थिनींच्या प्रशालेतील पहिल्या दहा वर्षातल्या ५१ जणांच्या वाटचालीच्या गोष्टी दर रविवारी एक याप्रमाणे तयार करून सगळ्यांपर्यंत पोहोचवूया. या सगळ्यासाठी एक गट तयार झाला. गटात तीन ज्येष्ठ मार्गदर्शक आणि इतर नऊ जण सहभागी होते. यात मुलाखती घेणे, शब्दांकन करणे, संपादन करणे आणि छायाचित्रांसह मांडणी करून सगळ्यांपर्यंत पोहोचवणे याचा समावेश होता. प्रत्येक गोष्टीवरचा प्रतिसाद आणि पुढच्या गोष्टीची उत्सुकता यात सगळेच पूर्ण वर्षभर गुंतले होते. या ५१ गोष्टी आणि त्यावर संचालक वाच. गिरीशराव बापट यांनी सगळ्या गोष्टींचा परामर्श घेऊन लिहिलेला ५२वा लेख अशी या मालिकेची सांगता झाली.

दि. ५ मार्चला संध्याकाळी प्रबोधिनीच्या उपासना मंदिरात एक छोटासा मेळावा आयोजित केला होता. ज्यांच्या गोष्टी होत्या असे २७ जण त्यांच्या कुटुंबियांसमवेत आले होते. तसेच काही ज्येष्ठ शिक्षक, प्रबोधिनीतले ज्येष्ठ सदस्य उपस्थित होते.

JPPAF च्या माजी विद्यार्थी सहायता केंद्राचा +९१ ९५७९९००१२९ हा संपर्क क्रमांक सर्व प्रकारच्या संपर्क व विचारणा यासाठी उपलब्ध आहे. तसेच jppalumni.org हे संकेतस्थळ माजी विद्यार्थ्यांच्या कर्तृत्वाचे कौतुक करण्याचे, त्यांच्या प्रतिभाशक्तीला एक व्यासपीठ देण्याचे, त्यांना नोकरी/प्रशिक्षणाच्या पर्यायांची माहिती करून देण्याचे माध्यम बनले आहे. वृत्तात उल्लेख केलेले सर्व लेख, नियतकालिके, ५१@५१ लेखमाला आणि सर्व उपक्रमांचे तपशील या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

**▶ अन्य उपक्रम**

**गुरुपौर्णिमा :** दि. ८ ऑगस्ट २१ रोजी दृक्श्राव्य माध्यमातून गुरुपौर्णिमा साजरी केली. कला विशेष उद्दिष्ट गटाने संतांच्या गुरूंना वंदन करणाऱ्या रचना सादर केल्या. तसेच तालयोगी पं. सुरेश तळवलकर यांची श्री. समीर दुबळे यांनी मुलाखत घेतली. पंडितजींनी 'गुरुतत्त्व' या विषयावर त्यांचे विचार मुलाखतीत मांडले. या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण भारतीय सेनादल प्रमुख जनरल मनोज नरवणे (प्रशाला पुणे, १९७६ तुकडी) यांचा विशेष संदेश हे होते.

**करिअर कार्यशाळा :** दि. ३१ ऑक्टो. २१ रोजी माजी विद्यार्थी सहायता केंद्रातर्फे ज्ञा. प्र. प्रशालेतील सध्या इ. १०वीत असणाऱ्या व गेल्या काही वर्षांत १०वी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसाठी करिअर कार्यशाळा आयोजित केली. पहिल्या भागात श्री. शरदराव सुंकर यांनी 'करिअर म्हणजे काय?' आणि 'करिअर कसे निवडावे?' याविषयी सत्र घेतले. दुसऱ्या भागात विज्ञान, तंत्रज्ञान, वित्त, परदेशी भाषा, Design/Animation, कायदा, पत्रकारिता इ. क्षेत्रातील तज्ज्ञ माजी विद्यार्थ्यांची स्वतंत्र सत्रे झाली. एकूण १३० विद्यार्थ्यांनी कार्यशाळेत सहभाग घेतला.

**पेडल मंडळ :** २०१९ मध्ये तयार झालेल्या या गटाने पुढील सहली/दौरे केले (कंसात सहभागी संख्या) : १. आसाम : गुवाहाटी - मानस राष्ट्रीय उद्यान (१९), २. डेक्कन क्लिफहँगर स्पर्धा : पुणे - गोवा ३२ तासात (८) ३. खडकवासला - पानशेत वर्षा सहल (२०) ४. 'राईड काश्मिर' रॅली (६) ५. शिरवळ-वीर हिवाळी सहल (१२)

**ट्रेकर्स ग्रुप :** जुलै २१ मध्ये तयार झालेल्या या गटाने माजी विद्यार्थी व त्यांचे कुटुंबीय अशा १० जणांसह रोहिडेश्वर दुर्गभ्रमण केले.

# २७ ज्ञान प्रबोधिनी फौंडेशन, अमेरिका

## Jnana Prabodhini Foundation (JPF)

ज्ञान प्रबोधिनी फौंडेशन हे शिक्षण, ग्रामविकसन, आणि स्त्री-शक्ती प्रबोधन ह्या विषयांमध्ये कार्यरत आहे. या वर्षात JPF ने २६ वेगवेगळ्या प्रकल्पांवर काम केले. कॅलेंडर वर्ष २०२१ मध्ये JPF $२,४७,००० (१.८ कोटी रुपये)चा निधी उभा करू शकले ज्याचा उपयोग १५ प्रकल्पांसाठी झाला. कोविड रिलीफ आणि मुक्ती अशा दोन मोहिमा ह्या वर्षी राबवण्यात आल्या. कोविड रिलीफ मधून उभ्या केलेल्या $३१,००० (रु. २३.३ लक्ष) निधीतून JPFने २० जीव वाचवू शकणाऱ्या उपकरणांची मदत भारतात केली. मुक्ती मोहिमेअंतर्गत विडी कामगार महिलांसाठी पर्यायी रोजगार निर्माण करायला निधी उभारण्यात आला.

### विविध प्रकल्प

Beyond Language Barriers (BLB) या प्रकल्पाची सुरुवात JPFने मुलांचे इंग्रजी संभाषण सुधारण्यासाठी केली. या अंतर्गत २२ स्वयंसेवक ४० विद्यार्थ्यांना आभासी पद्धतीने प्रत्येक आठवड्याला भेटून इंग्रजी सुधारण्यासाठी प्रयत्न करत असत. प्रेरणासेतू हा असाच अजून एक प्रकल्प, ज्या अंतर्गत करिअर साठीच्या वेगवेगळ्या विषयांची ओळख २० शाळांतील मुलांना करून देण्यात आली. उद्योजकता, तंत्रज्ञान आणि कला या विषयांमधली १५ सत्रे या वर्षात पार पडली. बाल प्रबोधिनी हा भारता बाहेर वाढलेल्या मराठी मुलांना आपली संस्कृती, इतिहास आणि आपला वारसा याची ओळख करून देणारा प्रकल्प आहे. यात ५-११ वयोगटातील अमेरिका, कॅनडा, इंग्लंड व आयर्लंड येथील ४७ मुलांनी सहभाग घेतला. एप्रिल २०२१ मध्ये हा प्रकल्प प्रायोगिक तत्त्वावर सुरू झाला व ऑगस्ट मध्ये याची नियमित सुरुवात झाली. बाल प्रबोधिनी साठी शुल्क म्हणून उभा राहिलेला $६१५० (रु. ४.५ लक्ष) चा निधी हराळी केंद्राला देणगी म्हणून देण्यात आला.

JPF Analytics हे एक संगणकीय सामाजिक विज्ञान व्यासपीठ आहे जे एक लवचिक भविष्य निर्माण करण्यासाठी पुराव्यावर आधारित संशोधन, विश्लेषण आणि धोरणनिर्मितीमध्ये कार्यरत आहे. ऑगस्ट २०२१ मध्ये COVID KAP प्रकल्प यशस्वीरित्या पूर्ण झाल्यानंतर या गटाची स्थापना करण्यात आली आणि त्याची रचनात्मक बांधणी सुरू आहे. भाषांतर गट प्रबोधिनीच्या समृद्ध साहित्याची व्याप्ती जागतिक आणि प्रादेशिक भाषांमध्ये वाढवण्यासाठी काम करत आहे. चला प्रकल्प करूया च्या यशस्वी अनुवादानंतर ही टीम सध्या नियोजन कौशल्य (प्लॅनिंग स्किल्स) आणि हट्टी व्हा हट्टी(बी रिझोल्युट) नावाच्या पुस्तकावर लक्ष केंद्रित करत आहे.

JPFच्या $१,२६,००० (रु. ९३ लक्ष) च्या मोठ्या मदतीने प्रबोधिनीच्या विविध शाळा आणि केंद्रांमधील ३४७ विद्यार्थ्यांना त्यांचे शिक्षण चालू ठेवण्यास मदत झाली आणि ४२५ विद्यार्थ्यांना आनंदशाळा, हराळी येथे चार महिने माध्याह्न भोजन मिळण्यासही मदत झाली. JPFने ग्राम प्रबोधिनी, साळुंब्रे येथील व्यक्तिमत्त्व विकास उपक्रमास $१०,००० (रु. ७.३ लक्ष) तर छात्र प्रबोधन मधील विविध उपक्रमांसाठी $६,५०० (रु. ४.८ लक्ष) चा निधी उभा करायचे काम केले.

स्त्री-शक्ती प्रबोधन विभागाच्या ७ प्रकल्पांसाठी JPFने $३६,२५० (रु. २७ लक्ष) चा निधी उभा केला. यामध्ये उद्योजकता, कौशल्य विकास, आरोग्य सुधारणा आणि विडी कामगारांसाठी पर्यायी रोजगार, आरोग्य सखी आणि स्वावलंबन कार्यक्रम (जास्वंद वर्ग) यांचा समावेश आहे. विविध पाणलोट व्यवस्थापन प्रकल्पांनाही $१५,००० (रु. ११ लक्ष) ची मदत अनेकांच्या देणग्यांमुळे मदत उभी करता आली.

JPGN (ज्ञान प्रबोधिनी ग्लोबल नेटवर्क) हे JPFचे सर्वात मोठे संघटन वाढीच्या दृष्टिकोनातून सुरू असलेले काम आहे. ८०० पेक्षा जास्त व्यक्ती चार खंडांमध्ये याद्वारे जोडल्या गेल्या आहेत. या वर्षभरात एकूण २० भेटीगाठीचे कार्यक्रम झाले, ज्यात कोविड निर्बंधांमुळे सहा वैयक्तिक आणि चौदा आभासी भेटीगाठी होत्या. एप्रिल २०२१ मध्ये, बे एरियामधील JPGN सदस्यांनी व्हर्च्युअल कॉन्सर्टद्वारे $५,००० (रु. ३.७ लक्ष) पेक्षा जास्त निधी उभारला आणि भारतातील कोविड-१९ च्या मदतीला पाठिंबा दिला. परदेशातील पहिला विद्याव्रत संस्कार UAE मध्ये JPF समन्वयकांनी निगडी प्रबोधिनीच्या सहकार्याने आयोजित केला. JPF करिअर आणि मेंटॉरिंग फोरम नवीन पदवीधरांना मार्गदर्शन, राहण्याची सोय, नेटवर्किंग आणि नोकरी शोधण्यात मदत करत आहे. विद्यार्थ्यांसाठी मदतीची गरज पाहता, JPF या उपक्रमासाठी रचना उभी करण्याचा प्रयत्न करत आहे. युवती विभाग Abroad ही परदेशात राहणाऱ्या युवतींसाठी कुठल्याही विषयाबद्दल बोलायला वा मार्गदर्शन घ्यायला एक खुली सुरक्षित जागा आहे. मे २१ मध्ये त्यांनी सत्रे आयोजित करण्यास सुरुवात केली. आत्तापर्यंत विविध विषयांवरील नऊ सत्रे आयोजित केली आहेत. हे संघटन उपक्रम जेपीएफसाठी कणा म्हणून काम करत आहेत आणि खऱ्या अर्थाने 'शाश्वत भविष्यासाठी' लोकांना जोडत आहेत.

# सन्माननीय देणगीदार व सीएस्‌आर साहचर्य

▶ ज्ञान प्रबोधिनीच्या अनेक हितचिंतकांनी सन २०२१-२२ मध्ये देणग्या दिल्या आहेत. जागेअभावी रु. १०,००० वरील दात्यांचीच नावे दिली आहेत. तथापि सर्वांविषयी मनःपूर्वक कृतज्ञता आहे. अनवधानाने एखादे नाव राहिले असल्यास त्याबद्दल क्षमाप्रार्थी आहोत. ज्या व्यक्तींनी दि. १ एप्रिल २१ ते ३१ मार्च २२ या कालावधीत एकापेक्षा अधिक वेळा देणग्या दिल्या आहेत, त्यांची रक्कम शक्यतो एकत्रित दर्शविली आहे. कार्यालयीन नोंदी परिपूर्ण होण्यासाठी आपल्या सूचनांचे स्वागत आहे व सहकार्याची अपेक्षा आहे.

▶ १०,०००/- पर्यंतच्या देणग्यांची एकूण वार्षिक रक्कम रु. ४९,१२,८६१/-

▶ सर्व देणग्यांची एकूण वार्षिक रक्कम रु. १२,९७,१३,८४१.७१/-

**प्रत्येकी रु. १०,०००/-**

१) अभ्यंकर उमेश
२) अशिज्मा मीना
३) आठवले रोहिणी
४) आडकर आशुतोष
५) आहेर आदित्य
६) इनामदार प्रभावती
७) इनोव्हेटिव्ह केम टेक (मेधा माढेकर)
८) उटगीकर अविनाश
९) एम प्लास्ट
१०) कडलसकर सुहास
११) करंबेळकर वंदना
१२) करवडे माधुरी
१३) कांबळे सिद्धार्थ
१४) कार्लेकर संगीता
१५) काळसूर विशाखा
१६) काळे अंजली
१७) कुणकोलिकर इशांत
१८) कुलकर्णी अपूर्वा
१९) कुलकर्णी निलेशा
२०) कुलकर्णी प्रशांत
२१) कुलकर्णी मुक्ता
२२) कुलकर्णी योगिनी
२३) कुलकर्णी राहुल
२४) कुलकर्णी विनोद
२५) कुलकर्णी सुनीता
२६) कुलकर्णी हर्षद
२७) कुलकर्णी हृषीकेश
२८) केसकर वर्षा
२९) कोटणीस उषा
३०) खरे श्रीपाद
३१) गद्रे किरण
३२) गांधी प्रसन्न
३३) गाडगीळ नंदिता
३४) गोखले हेमंत
३५) गोरे सतीश
३६) गोऱ्हे निश्चल
३७) गोसावी अदिती
३८) चांडककर चिन्मय
३९) चांदे सुनंदा
४०) चिटणीस संजय
४१) चिटणीस सुधीर
४२) चुटके विनय
४३) चोळकर सुहास
४४) चौधरी श्रीपाद
४५) जोग चिंतामणी
४६) जोशी अंजली
४७) जोशी देवयानी
४८) जोशी माधव
४९) जोशी योगेश
५०) जोशी रवींद्र
५१) जोशी सुनंदा
५२) जोशी सुमन
५३) झिन्झुवाडिया भूषण
५४) टिळक प्रकाश
५५) ठाकर केतकी
५६) ठुबे श्रेयस
५७) डॉ. कोतवाल जयश्री
५८) डॉ. खरे प्रज्ञा
५९) डॉ. गायकवाड शीतल
६०) डॉ. गोडबोले सुनील
६१) डॉ. दंडवते रोहित
६२) तिखे विनय
६३) तुळजापूरकर विवेक
६४) दनावळे संतोष
६५) दामले मंदार
६६) दामले महेश
६७) दिंडोरे सर्वेश
६८) देऊसकर संजय
६९) देशपांडे आशा
७०) देशमुख नरेंद्र
७१) नारळीकर लीलावती
७२) निवसरकर अतुल
७३) पंढरी - कोठेकर क्षितीजा
७४) पटवर्धन अलका
७५) पटवर्धन शंतनू
७६) पटवर्धन सुरेश
७७) परब - एकंबीकर स्नेहल
७८) पलांडे श्रीनिवास
७९) पाटील गुणेश
८०) पाध्ये नितीन
८१) पाध्ये मंजिरी
८२) पिंगळे विजय
८३) पेटकर ज्ञानेश्वर
८४) पेठे स्नेहा
८५) पेठे विश्वनाथ
८६) प्रभुदेसाई प्रतिभा
८७) प्रभू निनाद
८८) फडके आसावरी
८९) फाटक दीपा
९०) बर्वे संजय
९१) बोडस योगेश्वर
९२) भंडारी अनुजा
९३) भागवत वेदा
९४) भागवत हृषीकेश
९५) भाटे अविनाश
९६) भोसले विक्रम
९७) महाजन आश्लेषा
९८) महाजन नंदा
९९) मे. भाग्योदय ट्रान्सपोर्ट कंपनी
१००) मेहेंदळे कविता
१०१) मोडक नलिनी
१०२) मोडक संदीप
१०३) मोडक सीमा
१०४) रास्ते कमलाकर
१०५) लेले शिल्पा
१०६) वझे सौरभ
१०७) वर्मा क्षितीज
१०८) वागडे युवराज
१०९) वायकर नूतन
११०) विद्वांस शैलजा
१११) वेंकटरामन
११२) वैद्य राजेंद्र
११३) वैद्य हेमंत
११४) संवत्सर प्रमोद
११५) सावकूर शिल्पा
११६) सिधये माणिक
११७) सिधये सुहास
११८) सोमण अपर्णा
११९) सोहोनी गुरुदत्त
१२०) हर्डीकर श्रावण
१२१) हळबे विनायक

**रु. १०,००१ ते २०,०००/-**

१) अक्कलकोटकर प्रांजल
२) आपटे निखील
३) आपटे सजनी
४) आवटे रवी
५) उंडे प्रज्ञा
६) एरंडे प्रज्ञा
७) ओझर्डे राजश्री
८) करकरे मकरंद
९) कर्वे नितीन
१०) काटकर वेदवती
११) काठवडे प्रीती
१२) कामठे अशोक
१३) कापशीकर शीतल
१४) कुंभोजकर आशिष
१५) कुलकर्णी अतुलचंद्र
१६) कुलकर्णी कुणाल
१७) कुलकर्णी नितीन
१८) कुलकर्णी शिल्पा
१९) कुलकर्णी सुभाष
२०) कोतकर निलेश
२१) खरे स्मिता
२२) गांधी समीर
२३) गाडगीळ अमित
२४) गावसकर दिवाकर
२५) गोखले माधवी

२६) चौधरी हर्षल
२७) छापेकर मकरंद
२८) जोगळेकर प्रमोदिनी
२९) जोशी पुष्पा
३०) जोशी मृणाली
३१) जोशी राहुल
३२) झेंडे परेश
३३) डॉ. केळकर वैदेही
३४) डॉ. मोघे मृणालिनी
३५) तारक दर्शना
३६) तेरवाडकर वसंत
३७) दहिफळे हनुमंत
३८) दातार शिवांगी
३९) दामले मोहन
४०) दिघे तृणाल
४१) देवकर शारदा
४२) देवधर अपरा
४३) देवधर विद्यानंद
४४) देवळेकर मनोज
४५) देशपांडे अजित
४६) देशपांडे योगेश
४७) देशपांडे श्रिया
४८) देशमुख हृषीकेश
४९) नगरकर आशा
५०) नांदे मानसी
५१) निखिल इंजिनिअर्स
५२) निमकर मधुसूदन
५३) नेसरी अनिल
५४) पटवर्धन नितीन
५५) पटवर्धन हर्षदा
५६) परांजपे तेजश्री
५७) परांजपे सीमा
५८) पाटणकर नितीन
५९) पाध्ये मिलिंद
६०) पानसरे धोंडीबा
६१) पालकर अनिल
६२) पिंगळे मुकुल
६३) पिंपळखरे अतुल
६४) पुरोहित उमेश
६५) पेठकर मनाली
६६) पेशवे विवेक
६७) पोतदार पूजा
६८) प्रधान पांडुरंग
६९) प्रधान संजय
७०) प्रधान सिमरन
७१) फाळके अमोल
७२) बंगिनवार संगीता
७३) बर्वे अविनाश
७४) बागले लखन
७५) बागाईतकर अमित
७६) बागुल कविता
७७) बिमळखेडकर प्रकाश
७८) बेडेकर नीलिमा
७९) बेळगी सुबोध
८०) बोकिल चैतन्य
८१) बोरुडे ज्ञानदेव
८२) भागवत अमृता
८३) भिसे प्रतिक
८४) भोसले संग्राम
८५) मंचली श्रीनिवास
८६) मल्लिक तानिया
८७) माने प्रशांत
८८) मुळे मिलिंद
८९) मेहता केतन
९०) रांगणेकर प्रीती
९१) राव सुरेश
९२) लखोटे ऋषिकेश
९३) लिमये अभय
९४) लिमये अर्णव
९५) वझे केशव
९६) वझे संजय
९७) वझे सदाशिव
९८) वाकणकर प्रकाश
९९) वाघ अजय
१००) वैद्य अविनाश
१०१) शिंदे सचिन
१०२) शुक्ला कमलाकर
१०३) शेटे अजित
१०४) संत उदय
१०५) समर्थ ग्राफिक्स
१०६) सावदेकर जयदीप
१०७) सासणे भारत
१०८) सोनार संजयकुमार
१०९) हिरेमठ रुपाली

**रू. २०,००१ ते ३०,०००/-**

१) आहेरकार जय
२) इनामदार अश्विनी
३) कट्टा नागमणी
४) कानडे तुषार
५) कापशीकर विवेकानंद
६) कामत भैरवी
७) कामत सचिन
८) काळे छाया
९) काळे स्वाती
१०) कुंटे विलास
११) कुलकर्णी अंजली
१२) कुलकर्णी रंजना
१३) कोतकर प्रशांत
१४) क्षीरसागर सचिन
१५) खातू अमितकुमार
१६) गद्रे अमित
१७) गद्रे विनायक
१८) गायकवाड अनिता
१९) चांदोरकर संपदा
२०) चावरे स्मिता
२१) जहागीरदार समीर
२२) जाडकर गौरीशंकर
२३) जोशी ऋजुता
२४) डांगे जयश्री
२५) डॉ. कुर्लेकर उत्क्रांत
२६) डॉ. गांधी सचिन
२७) डॉ. गोडबोले गिरीश
२८) डॉ. देसूरकर विनायक
२९) डॉ. वैद्य प्रद्युम्न
३०) डॉ. सहस्रबुद्धे स्नेहलता
३१) ढोले अलका
३२) देशपांडे राहुल
३३) देशपांडे सुहासिनी
३४) नांगरे राहुल
३५) नायक ममता
३६) पटवर्धन विनायक
३७) पत्की अभिजीत
३८) पागे चंदा
३९) पाटील सुधीर
४०) पै नीरज
४१) फाटक दीपक
४२) फाटक नितीन
४३) फाटक सुधा
४४) बर्वे किरण
४५) बर्वे मिलिंद
४६) बाग प्राची
४७) बागुल अनघा
४८) बादरायणी आरती
४९) भांडारकर स्वप्निल
५०) भाट्ये मंजिरी
५१) भिडे अनिल
५२) मराठे अभिजीत
५३) मराठे सतीश
५४) मोडक गौरव
५५) लाटकर अमेय
५६) लेले जयश्री
५७) वैद्य शांती
५८) शाह गायत्री
५९) शुभा शामराव
६०) शेळगावकर योगेश
६१) संधाने राघवेंद्र
६२) सहस्रबुद्धे विद्याधर
६३) सांडभोर प्रसाद
६४) सागडे जया
६५) साठे रेवती
६६) सेवक योगेश
६७) सोनी सुचेता
६८) सोहोनी रजनी

**रू. ३०,००१ ते ५०,०००/-**

१) करंजकर पराग
२) करंदीकर अश्विनी
३) कानडे नंदकुमार
४) कामठे विक्रम
५) काळे हेमलता
६) काशिकर सुनील
७) कुलकर्णी अभिजीत
८) कोपरकर माणिक
९) कोपरकर रमेश
१०) गुरव अवधूत
११) गोखले सुनील
१२) गोडबोले मंदार
१३) चिपळूणकर शर्मिष्ठा
१४) जमदाडे स्वप्नील
१५) जोगळेकर संजय
१६) डॉ. कर्णे स्वप्नील
१७) डॉ. कुलकर्णी केदार
१८) डॉ. केळकर धनंजय
१९) डॉ. गुजराथी अदिती
२०) डॉ. रहाळकर जयेश
२१) देशमुख किशोर
२२) देशमुख जी. व्ही.
२३) नित्सुरे सलील
२४) परांजपे मंगेश
२५) पाटील सुरेंद्र
२६) पाध्ये आसावरी
२७) फाटक माधव
२८) बापट अजित
२९) बोधनी धनश्री
३०) मरगळे राहुल
३१) मांडके कल्याणी
३२) मोरे सखाराम
३३) राजपूत अभिश्री
३४) रामटेके उमेश
३५) रेणुसे सतीश
३६) वझे विनया
३७) वार्डा स्वाती
३८) वैद्य प्रीती
३९) शिंदे गोपाळ
४०) शेंडे स्वानंद
४१) साठे दिलीप
४२) सेवक मंगला

### रू. ५०,००१ ते १,००,०००/-

| | | |
|---|---|---|
| १) | कै. दातार लीना | ५०,००१/- |
| २) | मोडक आदित्य | ५०,००१/- |
| ३) | पिंपळखरे हिमाली | ५१,०००/- |
| ४) | भावे समीर | ५१,०००/- |
| ५) | अद्वंत बिपिन | ५१,००२/- |
| ६) | राव आनंद | ५२,०००/- |
| ७) | जोशी पद्मजा | ५२,१००/- |
| ८) | करंदीकर प्रसन्न | ५७,०००/- |
| ९) | कुलकर्णी विश्वनाथ | ५७,०००/- |
| १०) | किर्वे हर्षा | ५७,७६०/- |
| ११) | कुलकर्णी रुपाली | ६०,०००/- |
| १२) | देवगावकर मंदार | ६५,०००/- |
| १३) | पारखी वामन | ६५,०००/- |
| १४) | उदास विद्या | ६५,१००/- |
| १५) | मनोहर वीणा | ७०,०००/- |
| १६) | वाघमारे दीप्ती | ७०,०००/- |
| १७) | कदम ऋत्वी | ७५,०००/- |
| १८) | बडे मिलिंद | ७६,००१/- |
| १९) | बिवलकर सुहासिनी | ८०,०००/- |
| २०) | चांदोरकर शशांक | ८१,०००/- |
| २१) | कट्टी वेदांत | ८१,५००/- |
| २२) | जाधव दिशा | ८८,५९०/- |
| २३) | अभ्यंकर नेहा | १,००,०००/- |
| २४) | अभ्यंकर एस् एम् (ले. कर्नल, निवृत्त) | १,००,०००/- |
| २५) | कुमठेकर सुप्रिया | १,००,०००/- |
| २६) | गिजरे सुरेश | १,००,०००/- |
| २७) | डॉ. हरताळकर अमित | १,००,०००/- |
| २८) | पत्के सुधीर | १,००,०००/- |
| २९) | पाटणकर शरदचंद्र | १,००,०००/- |
| ३०) | पाटील पुरुषोत्तम | १,००,०००/- |
| ३१) | पाटील सुधीर | १,००,०००/- |
| ३२) | पाटील वसंत | १,००,०००/- |
| ३३) | बोडस मोहना | १,००,०००/- |
| ३४) | वष्ट वरूण | १,००,०००/- |
| ३५) | वाल्हेकर गुलाब | १,००,०००/- |

### रू. १,००,००० पेक्षा जास्त/-

| | | |
|---|---|---|
| १) | गाडगीळ सचिन | १,०२,०००/- |
| २) | कुलकर्णी सविता | १,०८,१९६/- |
| ३) | जोगळेकर कुंदा | १,१०,०००/- |
| ४) | दाढे सुनील | १,२१,०००/- |
| ५) | रानडे राजीव | १,२५,०००/- |
| ६) | मोरे अनुप | १,५०,०००/- |
| ७) | पटवर्धन मिलिंद | १,५६,००१/- |
| ८) | पांगारे चंद्रकांत | १,६६,८४८/- |
| ९) | दातार नीला | २,००,०००/- |
| १०) | कुलकर्णी विजय | २,०६,०००/- |
| ११) | देव प्रदीप | २,१०,०००/- |
| १२) | संत मिलिंद | २,३०,०००/- |
| १३) | नातू संजीव | २,५१,०००/- |
| १४) | सेवक गायत्री | २,५५,०००/- |
| १५) | दलाल प्रतिभा | ३,००,०००/- |
| १६) | येरवडेकर अजय | ५,००,०००/- |
| १७) | गुजराथी नलिनी | ५,५०,०००/- |
| १८) | देसाई चंद्रशेखर | ७,५०,०००/- |
| १९) | दलाल अर्जुन | १०,००,०००/- |
| २०) | कानिटकर अजित | ११,५२,५००/- |
| २१) | गोगटे आशा | २५,००,०००/- |
| २२) | कारिया नितीन | ७७,२५,०००/- |
| २३) | पाटील किशोर | १,००,००,०००/- |

### न्यास, कंपन्या आणि फाउंडेशन

| | | |
|---|---|---|
| १) | कै. श्री. एम. जी. कोटिभास्कर ट्रस्ट | १०,०००/- |
| २) | बेळांबे फाउंडेशन | १०,०००/- |
| ३) | नातू पब्लिक चॅरीटेबल ट्रस्ट | १०,०००/- |
| ४) | साई एज्युकेअर प्रा. लि. | १४,२५०/- |
| ५) | ज्ञान प्रबोधिनी सेवक सहकारी पतसंस्था | १५,०००/- |
| ६) | शार्प इंजिनिअरींग | १६,१८०/- |
| ७) | लायन्स क्लब ऑफ पूना निगडी | १६,५००/- |
| ८) | इंटिग्रेटेड सॉफ्टवेअर आणि सिस्टम | २०,०००/- |
| ९) | रमा पुरुषोत्तम फाउंडेशन | २०,०००/- |
| १०) | शारदा विष्णू चॅरिटेबल ट्रस्ट | २०,०००/- |
| ११) | इनरव्हील क्लब पुणे इम्पीरियल | २५,०००/- |
| १२) | जिव्हाळा फाउंडेशन | २५,०००/- |
| १३) | डी. व्ही. ब्रह्मे आणि सन्स सेल आणि सर्व्हिसेस | २५,०००/- |
| १४) | मांडके हिअरिंग सर्व्हिसेस | २५,०००/- |
| १५) | कार्किनोस हेल्थ केअर प्रा. लि. | २७,०००/- |
| १६) | क्रेस्टर्न टूर्स | २७,०००/- |
| १७) | कर्तव्य ट्रस्ट | २९,०००/- |
| १८) | इनरव्हील क्लब ऑफ पुणे मिडटाउन | ३५,०००/- |
| १९) | दासॉल्ट सिस्टिम्स फाउंडेशन | ३५,०००/- |
| २०) | अॅगकॉन प्रोजेक्ट प्रा. लि. | ४५,०१०/- |
| २१) | सायबेज आशा ट्रस्ट | ४९,७००/- |
| २२) | इंजोटेक इंडिया प्रा. लि. | ५०,०००/- |
| २३) | मोरे सुशील केशवराव (एचयूएफ) | ५०,०००/- |
| २४) | धन्वंतरी मेडिकल फाउंडेशन | ५०,०००/- |
| २५) | श्री भागिरथ तापडिया ट्रस्ट | ५०,०००/- |
| २६) | श्री सद्गुरू एज्युकेशनल अँड वेलफेअर ट्रस्ट | ५०,०००/- |
| २७) | इनरव्हील क्लब ऑफ निगडी प्राईड | ५५,०००/- |
| २८) | दुर्गादेवी चॅरिटेबल ट्रस्ट | ६०,०००/- |
| २९) | बायो वेद फार्मास्युटिकल्स प्रा. लि. | ६३,१००/- |
| ३०) | सेवा सहयोग फाउंडेशन | ६५,५००/- |
| ३१) | प्रदीप्त भारत फाउंडेशन | ८६,५००/- |
| ३२) | बेसेल पॉलीओलिफिन्स इंडिया प्रा. लि. | ९०,०००/- |

| | |
|---|---|
| ३३) फिनिक कन्सल्टिंग इंडिया प्रा. लि. | १,००,०००/- |
| ३४) इनरव्हील क्लब पुणे | १,२५,०००/- |
| ३५) पुणे नगर वाचन मंदिर | १,२६,०००/- |
| ३६) रोटरी क्लब ऑफ पुणे प्राईड | २,००,०००/- |
| ३७) मेगर (इंडिया) प्रा. लि. | ३,००,०००/- |
| ३८) रोटरी क्लब ऑफ पुणे शनिवारवाडा चॅरिटी ट्रस्ट | ४,७५,०००/- |
| ३९) दाबके ट्रस्ट | ५,००,०००/- |
| ४०) प्रबोध अर्थवर्धिनी प्रा. लि. | ५,००,०००/- |
| ४१) रविराज हाय-टेक प्रा. लि. | ५,००,०००/- |
| ४२) एन जी परांजपे प्रतिष्ठान | ५,६२,५००/- |
| ४३) पर्सिस्टंट फाउंडेशन | ८,३३,७२८/- |
| ४४) प्रबोध अर्थसंचय | १०,००,०००/- |
| ४५) प्रबोध अर्थसंचय प्रा. लि. | २७,३२,०००/- |
| ४६) मातृमंदिर विश्वस्त संस्था | ३५,९९,५००/- |
| ४७) ए. व्ही. साठे फाउंडेशन | १,००,००,००१/- |
| ४८) ज्ञान प्रबोधिनी मेडिकल ट्रस्ट | ३,४१,८०,०००/- |

### परदेशी योगदान

| | |
|---|---|
| १) देव मुग्धा | २५०/- |
| २) गणपुले विजय | ७००/- |
| ३) राजा श्रीश | १,२००/- |
| ४) डिके शशांक | १,५००/- |
| ५) गोंधळेकर योगेश | ९,५१०/- |
| ६) आयकार्टिस सोल्यूशन | १५,०००/- |
| ७) दर्प अविनाश | २५,०००/- |
| ८) कानेटकर माधवी | ३०,०००/- |
| ९) शिरहट्टी सचिन | ३५,०००/- |
| १०) डंबळ संजीव | ५०,०००/- |
| ११) यूके ऑनलाईन गिव्हिंग फाउंडेशन | ६५,१५२.७१ |
| १२) करंदीकर श्रीकृष्ण | १,००,०००/- |
| १३) डॉ. गोखले - गोडबोले आभा | १,५०,०००/- |
| १४) साठे प्रभाकर | १,७५,०००/- |
| १५) महाराष्ट्र सेवा समिती ऑर्गनायझेशन | २,८५,९६४/- |
| १६) डॉ. नेने अश्विनी | ३,००,०००/- |
| १७) भागवत सविता | ३,५५,०२७/- |
| १८) ग्रेटर पॅसिफिक कॅपिटल मॅनेजमेंट लि. | ३,७३,५००/- |
| १९) इंडियन डेव्हलपमेंट अँड रिलीफ फंड | ७,३७,५००/- |
| २०) मर्कस् ग्लोबल सर्व्हिस सेंटर | १७,१७,४३५/- |
| २१) जीकेएन सिन्टर मेटल्स प्रा. लि. | १७,५०,०००/- |
| २२) महाजन जयश्री | ४२,००,०००/- |
| २३) ज्ञान प्रबोधिनी फाउंडेशन | ९४,५१,७१३/- |

### सीएस्आर साहचर्य (देणगी)

| | |
|---|---|
| १) ब्लूम कम्बशन इंडिया प्रा. लि. | १,९५,०००/- |
| २) बाटलीवाला अँड कारणी सिक्युरिटीज इंडिया प्रा. लि. | २,८०,०००/- |
| ३) एनजेएस इंजिनिअर्स इंडिया प्रा. लि. | ३,००,०००/- |
| ४) जानकीदेवी बजाज ग्राम विकास संस्था | ४,७०,०००/- |
| ५) एमआयबीए ड्राइव्हटेक आय. प्रा. लि. | ५,००,०००/- |
| ६) सायबेज आशा ट्रस्ट | ५,८०,०००/- |
| ७) पॉलीवन पॉलिमर इंडिया प्रा. लि. | ७,२८,९४५/- |
| ८) अँडोर डिगॅट्रॉन प्रा. लि. | ७,३०,०००/- |
| ९) ग्लोबंट इंडिया प्रा. लि. | ९,१४,०००/- |
| १०) कोफोर्ज बिझिनेस प्रोसेस सोल्यूशन्स प्रा. लि. | १०,००,०००/- |
| ११) बजाज होल्डिंग्ज अँड इन्व्हेस्टमेंटस् | ११,००,०००/- |
| १२) प्रिशंट टेक्नॉलॉजीज प्रा. लि. | १३,०५,०००/- |
| १३) केपीआयटी टेक्नॉलॉजीज लि. | ४१,००,०००/- |

### सीएस्आर साहचर्य (इनव्हॉईस)

| | |
|---|---|
| १) एक्सेल इंडस्ट्रीज लि. | १,४२,१९०/- |
| २) भारत फोर्ज लि. | १४,८१,२२५/- |

## ❖ देणगीदारांसाठी आवश्यक माहिती ❖

▷ ज्ञान प्रबोधिनी तर्फे शिक्षण, संशोधन, ग्राम विकसन, स्त्री शक्ती प्रबोधन, आरोग्य या क्षेत्रांमध्ये चालणाऱ्या उपक्रमांना हितचिंतक देणगीदारांचा नेहमीच हातभार लागत आलेला आहे. ज्ञान प्रबोधिनी न्यासाला दिलेल्या देणग्या आयकर विभागाच्या तरतुदीनुसार ८०जी अंतर्गत ५०% कर सवलतीसाठी पात्र आहेत. ज्ञान प्रबोधिनीला देणगी देताना भारतीय नागरिकत्व असलेल्या देणगीदारांनी स्वतः चे नाव, पत्ता व पॅन क्रमांक व परदेशी नागरिकांनी नाव, पत्ता व नागरिकत्वाचे (पासपोर्टचे) तपशील देणे आवश्यक आहे.

▷ ज्ञान प्रबोधिनी न्यासांतर्गत विविध उपक्रमांसाठी/ विभागांसाठी देणगी द्यायची असल्यास खाली दिलेल्या दुव्यावर (link) तपशील मिळतील. भारतीय नागरिकांसाठी आणि भारतामध्ये खाते असलेल्या परदेशी नागरिकांसाठी ऑनलाइन देणगी देण्याची सोय व त्यासाठीचे दुवे (links) सुद्धा तेथे मिळतील. काही विभागांसाठी ही सोय सध्या उपलब्ध आहे. अन्य विभागांसाठीचे संपर्क क्रमांक उपलब्ध आहेत.

- **ऑनलाइन देणगी देण्यासाठी व तपशीलासाठी लिंक - https://www.jnanaprabodhini.org/en/donate**

▷ ज्ञान प्रबोधिनी मुख्य संस्थेला भारतीय अथवा परदेशी नागरिकांना बँक ट्रान्सफर किंवा धनादेशाद्वारे देणगी द्यायची असल्यास पुढील क्रमांकावर अथवा ईमेल वर संपर्क साधावा.

- **ज्ञान प्रबोधिनी अर्थ कार्यालय - +९१ २० २४२० ७१०४**
- **ईमेल - jpco@jnanaprabodhini.org**

▷ परदेशी नागरिकांना देणगी द्यायची असल्यास ज्ञान प्रबोधिनीशी संलग्न असलेल्या अमेरिकेतील ज्ञान प्रबोधिनी फाऊंडेशनच्या माध्यमातून सुद्धा आपण देणगी देऊ शकता. त्यासाठी पुढील दुव्यावर माहिती उपलब्ध आहे.

- **https://www.jnanaprabodhinifoundation.org/support-us**



विवेकानंद केंद्राच्या राष्ट्रीय उपाध्यक्षा पद्मश्री श्रीमती निवेदितादीदी भिडे आणि कार्यवाह श्री.भानुदासजी यांची ज्ञान प्रबोधिनीला भेट



नायजेरियाचे प्राध्यापक इघोसा इ. ओसाघे यांची ज्ञान प्रबोधिनीला भेट



येड्तोरे मठाचे शंकराचार्य श्री शंकर भारती स्वामीजी यांची ज्ञान प्रबोधिनीला भेट



पूंछ, जम्मू येथे प्रशिक्षणात सहभागी शिक्षकांसह शैक्षणिक साधन केंद्राचे सदस्य



सविताताई कुलकर्णी व बागेश्रीताई पोंक्षे
RIWATCH, रोईंग, अरुणाचल प्रदेश येथे स्थानिक विद्यार्थी व कार्यकर्त्यांसह




'विवेक गॅलरी' RIWATCH, रोईंग, अरुणाचल प्रदेश



इंदोर येथील स्वर वाद्य पथकातील कार्यकर्ते व प्रबोधिनीच्या युवक कार्यकर्त्यांची बैठक



राजस्थान अभ्यास दौऱ्यात सहभागी स्त्री-शक्ती प्रबोधन, ग्रामीण विभागाच्या कार्यकर्त्या




श्रीमती मृण्मयी जोशी (निवडणूक अधिकारी, जिल्हाधिकारी, पलक्कड, केरळ) उत्कृष्ट निवडणूक प्रक्रियेसाठी राष्ट्रीय पुरस्कार स्वीकारताना




'शिरूर आयकॉन' पुरस्कार मिळवणाऱ्या शिरूर संवादिनी कार्यकर्त्या




स्पर्धा परीक्षा केंद्रातील अधिकारी मेळावा व केंद्रीय लोकसेवा आयोग २०२१ परीक्षेचे यशवंत अधिकारी




डॉ. नितीन खाडे (राज्य निवडणूक आयुक्त, आसाम) उत्कृष्ट निवडणूक प्रक्रियेसाठी राष्ट्रीय पुरस्कार स्वीकारताना



श्रीमती दीप्ती मेहेंदळे–कानडे (उपसचिव, वित्त, बंगळूरू) उत्कृष्ट कामाबद्दल २०२१ चा प्रधानमंत्री पुरस्कार स्वीकारताना




भारतभरात कार्यरत स्पर्धा परीक्षा केंद्र कार्यकर्ता अधिकाऱ्यांची संख्या


# ज्ञान प्रबोधिनी

५१०, सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०.
दूरभाष क्र. : (०२०) २४२०७०००
www.jnanaprabodhini.org contact@jnanaprabodhini.org